# निःस्पृह



न. म. जोशी

न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्या जीवनावरील कादंबरी

# निःस्पृह

न. म. जोशी

इंद्रायणी साहित्य प्रकाशन

ISBN-81-7418-089-3
NISPRUHA (MARATHI)
Dr. N. M. JOSHI

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

मुद्रक
प्रमोद वि. बापट,
स्मिता प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

प्रकाशन दिनांक
१८ ऑगस्ट १९९७

© डॉ. न. म. जोशी

मूल्य एकशे वीस रुपये

# १

**आ**भाळ अंधारू लागलं होतं. अंधुक संधिकिरणं आता पृथ्वीचा निरोप घेत होती. पाखरं घरट्यात विसावली होती. 'बहिरवक्षेत्रा'च्या आसपासच्या कुरणात चरणारी गाईगुरं केव्हाच आसऱ्याला जाऊन सुस्तावली होती. आभाळाच्या अंगणात चांदण्यांनी लुकलुकत प्रवेश केला होता. आसमंत शांत होता.

प्रभू झोपडीतून बाहेर आले. आज संध्येला अमळ उशीरच झाला होता. कृष्णेच्या अथांग पात्रात सायंकाळच्या सूर्याला अर्घ्य देताना आज त्यांची समाधीच लागली होती. ते खळाळते चैतन्य शरीराला सर्वांगानं स्पर्शून जाताना त्यांचं भान हरपलं होतं. त्या अनामिक आणि अरूप विश्वशक्तीशी ते तदात्म झाले होते. सूर्याचा लाल गोळा, त्याला अंगावर खेळविणारे विशाल आकाशपटल, कृष्णेचा वाहता प्रवाह, दूरवर दिसणारे डोंगर, त्यांवरून उतरणारे गुरांचे ठिपके. . . ते सारं काही विसरले होते आणि चांगलं अंधारून येईपर्यंत पाण्यातच होते. मनी विचारांचे तरंग उद्भवले होते. . .

"हा सुंदर परिसर माणसांनी गजबजला पाहिजे. कृष्णेच्या पाण्याला नुसत्या दगडधोंड्यांची संगत! तिला जिवंत माणसांची सोबत मिळाली पाहिजे. माझ्यामागं हे बहिरवक्षेत्र गजबजलं पाहिजे. बहिरवासमोर रोज दिवली लागली पाहिजे."

केव्हापासून हे विचार त्यांच्या मनात खेळू लागले होते. त्या नादात आज उत्तरीय आणायचंही ते विसरले होते. या विचारांची वस्त्रं लपेटूनच आज ते नदीवरून परत आले. कवाड सारून आत गेले. दिवली तयार केली. अंधाराच्या

गडद काळ्या पडद्यावरून एक तांबुस-पिवळी प्रकाशज्योत पुढे सरकत होती. पुढे बहिरवाची रौद्रगंभीर पाषाणमूर्ती होती. कमरेइतक्या उंचीची ती पाषाणमूर्ती प्रभूंना खुणावीत होती. प्रभूंनी दिवली खाली ठेवली. वाऱ्याच्या झोतानं ती विझू नये म्हणून तिला देवळीचा आसरा दिला. ज्योतीचा पिवळसर प्रकाश बहिरवाच्या मुखमंडलावर पसरला तशी ती मूर्ती आणखीच गंभीर दिसू लागली. ती जणू विचारत होती, 'प्रभू, तुझ्यामागं इथं दिवा कोण लावणार आहे ?' कमंडलूतल्या पाण्यानं प्रभूंनी ती पाषाणमूर्ती स्वच्छ धुऊन काढली. परडीतून आणलेल्या रानफुलांनी सजविली. तिच्या कपाळी चंदन लेपलं. दिवलीनं ओवाळलं आणि हात जोडून भक्तिभावानं प्रभू म्हणाले,

"बहिरवा, आता फार दिवस अशी सेवा होईलसं वाटत नाही. गात्रं शिथिल झाली आहेत. कायेचा कोंभ आता धरणीला भेटू पाहतोय. कुडीतला प्राण आता विसावा शोधतोय. झाली सेवा गोड करून घे. आणखी हवी असेल तर सामर्थ्य दे. भैरवा, तूच सेवा करून घे."

पुन्हा एकदा प्रभूंनी पाषाणमूर्तीला ओवाळलं. ओवाळता-ओवाळता एक दिव्य प्रकाशकिरण त्यांच्या नेत्रांना भेदून गेला. अंतरात गलबललं... आणि...

'उदईक अनेगुंदीला जाऊन रामराजांची भेट घ्यावी,' असा निश्चय करून प्रभू परतले.

उषःकालीच प्रस्थान ठेवावं म्हणून त्यांनी पडशी भरली. दूरवरच्या प्रवासाला आवश्यक तेवढीच साम्रगी समवेत घेतली. अनेगुंदीची भेट यशस्वी व्हायला हवी. ती कशी होईल या विचारातच ते निद्रावश झाले.

पहाटेचा शुक्र उगवला आणि प्रभूंनी बहिरवक्षेत्राच्या वेशीबाहेर पाऊल टाकलं. मागं वळून त्यांनी मनोभावे नमस्कार केला आणि म्हणाले, "पुन्हा परत येईन तेव्हा तुझ्या दिव्याची व्यवस्था झालेली असेल बहिरवा."

देशाटन करता-करता कोया प्रभूंना कुठं तरी टेकायचं होतं. कृष्णाकाठची ही माती त्यांना आवडली. त्यांनी तिला आपलं म्हटलं आणि या बहिरवक्षेत्री कोया प्रभू वास करू लागले. आता ते बहिवरक्षेत्र राहिलं नाही. ती कोया प्रभूंची तपोभूमी झाली. अधूनमधून प्रभू तपस्या सोडून लोकांत येत. त्यांच्याभोवती माणसांचं मोहोळ जमा होई. कुणाला प्रभूंच्या दर्शनानं मनःशांती प्राप्त होई, तर कुणी त्यांच्या आशीर्वादानं संकटमुक्त होई. सारे लोकांचेच भाव. प्रभूंना कशाचा

अहंकार नव्हता की कशाचा लोभ नव्हता. ना नावाचा, ना संपत्तीचा. प्रभू म्हणजे बैरागी, सर्वसंगपरित्याग केलेले संन्यासी; पण लोकोद्धारासाठी विजनवासातील हा संन्यासी आपण होऊन लोकांत येई आणि त्या वेळी ते मौनाला दूर करून वाणीला वाट करून देत. त्यामुळे कुणी त्यांना प्रवचनकार म्हणत, तर कुणी पुराणिकबाबा म्हणून ओळखत. अशा या पुराणिकबाबानं लोकांची मनं जिंकली होती खरी. ऐहिकतेच्या निबिड अरण्यात अडकलेल्या लोकमानसाला काही काळ तरी उचलून घेऊन आध्यात्मिकतेच्या स्वच्छ आणि निरभ्र आकाशाचं दर्शन घडविण्याचं अलौकिक सामर्थ्य कोया प्रभूंच्या वाणीत होतं. आपल्या उर्वरित आयुष्याची कृतकृत्यता त्यांनी याच कार्यात मानली होती आणि म्हणूनच प्रभूंना असं वाटत होतं की, या बहिरवक्षेत्री लोकांची वस्ती वाढली पाहिजे. कृष्णेच्या पाण्यात जनसमुदाय डुंबला पाहिजे. गाईगुरांच्या गळ्यांतील घंटानाद इथल्या वायूवर स्वार व्हायला पाहिजे. . . या विचारांनी भारल्यामुळेच हा संन्यासी काही काळापुरती भगवी वस्त्रे टाकून आणि व्यवहाराची पडशी खांद्यावर घेऊन अनेगुंदीला निघाला होता.

अनेगुंदीच्या रामराजाच्या राज्याचा विस्तार मोठा होता. चहूबाजूंनी फोफावलेल्या त्याच्या राज्याच्या विस्तृत सीमा थेट या मरहट्ट देशाला वळसा घालून पुढं जात होत्या. रामराजानं मनात आणलं तर या बहिरवक्षेत्रीची उजाड भूमी मुलांमाणसांनी भरून जाईल आणि कृष्णाकाठच्या मातीचं सोनं होईल हे कोया प्रभूंना ठाऊक होतं. म्हणून रामराजाला साकडं घालायला ते अनेगुंदीला कर्नाटकात चालले होते. राजा अनेगुंदीला नाही भेटला तर विजयनगरला भेटेल. तिथं नाही भेटला. तर श्रीरंगपट्टणला भेटेल. आपण कसंही करून राजाची भेट घ्यायचीच अशा दृढनिश्चयानं प्रभू चालले होते. जाता-येता केव्हा तरी एकदा त्यांना बेलूरला जायचं होतं. मनात संकल्प खूप होते. ते सिद्धीस परमेश्वर नेणार आहे, अशी प्रभूंची श्रद्धा होती.

चार सप्ताहांची भ्रमंती संपली. प्रभू अनेगुंदीला येऊन तर पोचले. भाग्ययोगेकरून रामराजा अनेगुंदीतच होता. वेशीच्या सोबतीनं उभ्या असलेल्या एका धर्मशाळेत प्रभूंनी आपली पडशी ठेवली आणि वेशीवरच्याच एका प्रहारीसमवेत राजाला सांगावा धाडला. 'कोया प्रभू आलेत.' रामराजा दोन प्रहारीची विश्रांती घेत पहुडला होता. प्रभूंच्या आगमनाची वर्दी मिळाली. रामराजा

विद्वानांचा आणि विद्वत्तेचा भोक्ता होता. प्रभूंविषयी त्याला मनोमन आदर वाटत होता. सेवकानं वार्ता आणली आणि रामराजानं तत्काळ निरोप धाडला,

"आपण त्वरित येणं करावं. रामराजा आपल्या सेवेस उत्सुक आहे."

प्रभू राजवाड्याकडे गेले. रामराजानं त्यांना उत्थापन दिलं. आदरानं निकटच्या आसनावर बसवून त्यानं त्यांना विनम्रभावे प्रणाम केला, "प्रभू, का येणं केलं ?"

"राजा, यावं लागलं."

"आपल्या आगमनानं आम्हाला संतोषच झाला आहे, पण आपण यावं लागलं म्हणता; आपल्या तपस्येत कुणी खंड तर नाही ना आणला ?"

"राजाधिराज, तपस्या तर विनाखंड होतेच. सर्व कुशल आहे."

"मग आपल्या मनातील हेतू बोलावा, प्रभू."

"राजा, अनेगुंदीच्या सीमा महाराष्ट्र देशाला पार करून जातात. तिथं कृष्णातीरी मी वास्तव्य करून राहिलो. त्या परिसराला बहिरवक्षेत्र म्हणतात. आता एक इच्छा आहे..."

"निःसंकोचपणे इच्छा काय ती सांगावी, प्रभू."

"बहिरवक्षेत्री सुंदर निसर्ग आहे. कृष्णा अखंड वाहते. भूमी चांगली पिकते; पण माणसं हवीत. राजा, या क्षेत्री माणसांची वस्ती व्हायला हवी."

... रामराजा क्षणभर विचारात पडला. त्यानं आपल्या पापण्या झाकून घेतल्यासारख्या केल्या. प्रभूंच्या मनी पाल चुकचुकली. रामराजाच्या तोंडून निःसंदिग्ध होकार का नाही आला ? काही बोलू पाहणारी त्याची जिव्हा थबकली का ?..."

"रामराजा, मनात काही शंका ?" कोया प्रभूंनी विचारलं.

"प्रभू, शंका कशी ती नाहीच. आहे ती अडचण आहे. प्रभू, विजयनगरच्या साम्राज्याची शत्रूनं धुळवड केली. तीतून आम्ही नुकतेच कुठं सावरतो आहोत. कर्नाटक देशातून इतक्या दूरवर वस्ती करण्यासाठी मनुष्यबळ उभं करणं आता तरी आम्हाला सहजसाध्य वाटत नाही. आमच्या तलवारी आम्ही म्यान केल्या म्हणजे कुठं गुढ्या-तोरणं उभारायची याचा विचार करायला आम्हाला अवधी मिळेल."

"राजा, मग ही गोष्ट असाध्य असं मी समजू तर.." कोया प्रभूंनी काहीशा

तीव्र स्वरात विचारलं.

"नाही प्रभू. असाध्य काहीच नाही. आपणच मनावर घ्याल तर हे होईल."

"मी? मी मनावर घेऊ? राजा, आमचं आता उत्तरायण आहे. तेही संपत आलेलं.. त्यातून आम्ही सर्वसंगपरित्याग केलेले संन्यासी..."

"प्रभू, सूर्याचं तेज उत्तरायणातच प्रखर असतं आणि सर्वसंगपरित्यागाचं म्हणाल तर त्याचाही विचार मी केलाय."

"कसला विचार केला?"

"प्रभू, बहिरवक्षेत्रात आपणच वस्ती उभारा, वाढवा. आपण संन्यासी असलात तरी आपला गोतावळा खूप मोठा आहे. तो तिथं वसवा. गाव उभारा. गावकूस घाला. . . मनातली इच्छा पूर्ण करा. . . प्रभू, या नव्या गावाच्या कारभारासाठी अष्टाधिकाराचे ताम्रपत्र मी आपणालाच देतो. आपणच रोपटं लावा, त्याचं संवर्धन करा..."

रामराजाचे हे शब्द ऐकताच कोया प्रभूंना कसंसंच झालं. होय! स्वाभाविकच आहे. पुराणिकाला पाटीलकी कशी जमावी. कीर्तनकाराला कोतवाली कशी करता येणार? मुक्त मानवाला लिप्त आयुष्य कसं जगता येणार. . . पण प्रभूंनी विचार केला. . . आपणच योजना दिली. आता आपणच माघार घेऊन चालणार नाही. प्रभूंनी राजाला संमती देऊन टाकली.

"प्रधानजी, प्रभूंच्या नावे गावाच्या अष्टाधिकाराचा ताम्रपट त्वरित तयार करून आणा," रामराजानं प्रधानाला आज्ञा केली आणि प्रभूंकडे वळून तो म्हणाला, "प्रभू, श्रावणमास आहे. आता आपण मासभर इथंच वास्तव्य करावं. आपली विद्वत्ताप्रचुर प्रवचनं आम्हाला श्रवण करायची आहेत."

"राजा, एक मासभर एका ठिकाणी वास्तव्य? नाही. अटन व विजन हा खरा आमचा धर्म. तो सोडून आम्ही काही काळ विजनातून लोकांत आलो; पण सदैव लोकांतच राहणं म्हणजे घेतला वसा टाकून देणं..."

"जशी आपली इच्छा प्रभू; पण निदान आजचा दिवस तरी अनेगुंदीच्या राजाला आपलं आतिथ्य करू द्या."

"राजा, आतिथ्याचं अजीर्ण होईल एवढं ते तू केलं आहेस. आम्ही संतुष्ट आहोत. उदईक आम्ही परतीच्या प्रवासाला निघणार. राजा, निरोप दे आम्हाला."

"प्रभू, अनेगुंदीचं हे विस्तृत राज्य आपणासारख्या संतसज्जनांच्या सावलीत

सुरक्षित आहे. ही सावली अशीच मिळू दे. आपला वरदहस्त आम्हावर असू दे," असं म्हणून भारावलेला रामराजा कोया प्रभूंच्या पाया पडला. प्रभूंनी त्याच्या दोन्ही बाहूंना धरून त्याला प्रेमभरानं उठवलं आणि त्याच्या मस्तकी आपला उजवा हात ठेवून ते सद्गदित स्वरात म्हणाले, "राजा, आयुष्यमान् भव !"

प्रधानजी येऊन उभे होते. हे भावचित्र पाहताना त्यांनाही काही बोलवेना. भावनेचा भर ओसरल्यावर रामराजानं ताम्रपट प्रभूंच्या स्वाधीन केला आणि विचारलं,

"प्रभू, गावाचं नाव कोणतं ?"

"त्याला मी तरी बहिरवक्षेत्र म्हणतो."

"नाव सुलभ असावं, सोपं हवं."

"आहे. आणखी एक नाव आहे— माहुली."

"हे नाव चांगलं आहे, प्रभू. द्या तो ताम्रपट. आम्ही माहुली ग्रामाचा उल्लेख करूनच हा ताम्रपट आपणाकडे पाठवून देतो."

"तथास्तु !" असं म्हणून कोया प्रभूंनी रामराजाचा आणि अनेगुंदीचा निरोप घेतला.

बहिरवक्षेत्री परत यायला दोन मासांचा अवधी लागला. आश्विन उजाडला. बहिरवक्षेत्र फुलारलं होतं. उजाड माळावरही हिरव्या गवताचे अंकुर कुठं-कुठं डोकावू लागले होते. कोया प्रभूंनी आपल्या समस्त गोतावळ्याला पाचारण केलं होतं. कुणाला जमीन देऊ केली, कुणाला सावलीला जागा दिली, कुणाला टेकडीच्या उतारावर नांगर घालायला सांगितलं, तर कुणाला कृष्णेची पूजा करायला बोलावलं. प्रभूंना स्वतःचा संसार असा नव्हताच; पण भाऊ होते, भावजया होत्या, त्यांची मुलं, नातवंडं, पतवंडं . . . आणि आणखी असेच सगेसोयरे. सगळे जमा झाले.

विजयादशमीला गावकूस घालायचं होतं. घराच्या भिंती उभारल्या जात होत्या. उंबरे बसवले जात होते आणि हळूहळू तिथं एक गाव आकाराला येत होतं. . . माहुली. . . संगम माहुली. कृष्णेकाठची माहुली. कोया प्रभूंची माहुली. विजयादशमी उजाडली. घरांच्या चौकटींना तोरणं लटकली. अंगणं सडारांगोळ्यांनी सुशोभित झाली. फुलमाळांनी प्रवेशद्वारं सजली. गावकुस घातलं. बहिरवासमोर गुरवानं शिंग फुंकलं. एरवी बहिरवासमोर एकच दिवली

जळायची. आज तिथं पणत्यांची रांग होती. बहिरवक्षेत्र आज गजबजून गेलं होतं. आसपासचे, पंचक्रोशीतले ग्रामवासी बहिरवक्षेत्रींचा हा सोहोळा बघायला आले होते. कोया प्रभूंच्या अंतरीची इच्छा माहुलीच्या रूपानं मूर्तिमंत उभी राहिली होती.

कृष्णेच्या काठावर वर्दळ सुरू झाली होती. मातीला माणसांचे पाय लागले होते. माहुलीशेजारच्या वेळूच्या बनात बाळगोपाळ खेळ खेळत होते. एरवी उजाड, निर्जन वाटणारा आसमंत आता चैतन्याने ओसंडत होता. कोया प्रभूंच्या साकारलेल्या स्वप्नानं इथल्या वाऱ्याला जाग आणली होती. शुक्र उगवताच पहाटे जात्यावरल्या ओव्यांचे आवाज ऐकू येत होते; तसेच कृष्णाकाठी आणि कृष्णेच्या पात्रात ब्राह्मणांचे मंत्रोच्चारही उमटत होते.

कोया प्रभूंच्या रूपानं इथल्या मातीला धनी मिळाला होता. निसर्गाला मानव भेटला होता. हळूहळू, दिनक्रमानं माहुली बाळसेदार होत होती. प्रभूंचा गोतावळा माहुलीत स्थिरावला होता. मग प्रभूंचे झाले प्रभवणे आणि पुढे-पुढे प्रभवणेच्या ऐवजी प्रभुणे असंच लोक म्हणू लागले. माहुली गाव आणि प्रभुणे नाव यांचं नातं असं अतूट झालं. प्रभुणे कुठले, तर माहुलीचे आणि माहुली कुणाची तर प्रभुण्यांची असं कुणाला झोपेतून उठवून विचारलं तर त्यानं सांगितलं असतं. प्रभुण्यांच्या संगती सोबतीत आणि प्रोत्साहनानं आणखीही काही कुटुंबं येऊन माहुलीत स्थिरावली; पण प्रभुणे बहुसंख्येनं होते. काही दिवसांनी बारा बलुतेदार आले. काळ्या आईची सेवा करायला काही कुळवाडी आले. गावगाडा इतर गावासारखा चालू झाला. घरंदारं मुलामाणसांनी फुलली. शेतंशिवारं बहरली. डोंगरदऱ्यांतून गुरंढोरं चरू लागली. कोया प्रभूंनी लावलेलं माहुली गावाचं इवलंसं रोपटं आता शाखा उपशाखांनी भरून वृक्ष होऊ पाहत होतं. बहिरवाचा परिसर गजबजला होता.

प्रभू आता थकले होते. प्रवास संपत आल्याची जाणीव त्यांनाही झाली होती. माहुलीला एवढी घरं झाली; पण प्रभूंनी आपली झोपडी सोडून कुठंच जाण्याचं नाकारलं होतं. कितीएक प्रभुण्यांनी त्यांना आग्रह केला. त्यांच्यापाशी हट्ट धरला. मुलांमाणसांत राहण्यासाठी आर्जवं केली; पण प्रभू बधले नाहीत. ते म्हणत, "माझ्या कुडीतून प्राण बाहेर पडेल तेव्हाच मी या झोपडीच्या कवाडातून बाहेर पडेन."

लोकांचं काही चालेना तसा लोकांनी त्यांचा नाद सोडून दिला. प्रभूंना त्याचा ना खेद ना त्याची खंत. आता त्यांना कुठंच गुंतायचं नव्हतं. . . कोणताही पाश त्यांना नको होता. हरिनाम घेता घेताच या जीवनाचा त्याग केव्हा तरी अचानकपणे करावयाचा आहे, हे त्यांनी ठरवलं होतं. अलीकडे तर प्रभूंनी झोपडीबाहेर येणंही बंद केलं होतं.

आणि अचानक कोण्या एका संध्याकाळी. . . गावातल्या प्रभवण्याच्या एका पोराला प्रभूंचा निपचित पडलेला देह दिसला. पोरगं लंगोटी सावरत आणि तोंडात बोट घालत गावातून हिंडलं. गाव जमा झालं. अवघे प्रभवणे जमा झाले. वृक्ष उन्मळून पडला होता. अनेक नव्या वृक्षांना आकार देऊन, मूळ वृक्ष मातीत मिसळला होता. गंगा वाहिली होती; पण भगीरथ कैलासवासी झाला होता. माहुली गाव गदगदला. त्या दिवशी माहुलीत चूल म्हणून पेटली नाही. प्रभुण्यांचे उंबरे अश्रूंनी भिजले. बहिरवासमोर दिवली मात्र लागलेली होती. प्रभूंनीच आपला दिवा विझण्यापूर्वी ती लावली होती.

प्रभूंचा देह कृष्णेकाठी वाळवंटात आणण्यात आला. चंदनी चितेवर ठेवला. मंत्राग्नी दिला. चंदनाच्या काष्ठांनी पेट घेतला. कोया प्रभू अग्निमय झाले. देहाच्या पंजरातील आत्मा केव्हाच मुक्त झाला होता. आता देह रक्षामय झाला. माहुलीला जन्म देऊन, प्रभवण्यांना आसरा देऊन, हा पुराणिकबाबा स्वर्गवासी झाला, पंचत्वात विलीन झाला. बहिरवक्षेत्राच्या निर्मनुष्य भूमीवर चैतन्य उभं करणारा शिल्पकार हरपला.

* * *

कालचक्र फिरत होतं. दिवस, सप्ताह, मास, वर्षं. . . अठराव्या शतकाच्या सुरुवातीलाच प्रतिनिधींनी शाहूमहाराजांची आज्ञा घेऊन या संगम माहुलीला ब्राह्मणांची वस्ती वाढवली. राजाश्रय मिळताच अनेक कुटुंबे माहुलीला सावलीसाठी आली. प्रभुण्यांच्या घराण्याकडे आता पूर्वीसारखे अष्टाधिकार राहिले नव्हते. जोसकीचे आणि कुळकर्णीपणाचे असे दोनच हक्क प्रभवण्यांकडे राहिले होते. या प्रभवण्यांतच गंगाधरभट्ट प्रभवणे म्हणून सुशील ब्राह्मण होता. प्रतिनिधींनी त्याला काही जमीन अग्रहार दिली. गंगाधरभट्ट माहुलीत स्थिरावला. शेतीचं उत्पन्न होतं. कृष्णाकाठचं क्षेत्र होतं. दिवस बरकतीचे होते. गंगाधरभट्ट सुखी-समाधानी होते. ऐहिकाची आणि अध्यात्माची सांगड त्यांनी आपल्या

जीवनात विलक्षण रीतीनं घडवून आणली होती. शास्त्रपारंगतता, शूचिर्भूत सनातनी वृत्ती आणि निर्लोभ स्वभाव. त्यामुळे एकसुरी जीवनातही गंगाधरभट्टाला आनंद प्राप्त होत होता. गंगाधरभट्टाच्या कुळावर नियतीची कृपादृष्टी होती. गंगाधरभट्टाच्या वंशवेलीवर एक तेजस्वी फूल यायचं होतं. माहुलीचा कीर्तिध्वज फडकायचा होता. दैवाचा तसा संकेत होता.

¤

# २

**मा**हुली गावाच्या मध्यावरच प्रभुण्यांचं घर होतं. घर कसलं ते ! चार भिंतींवर छप्पर उभारून केलेली सावली. पुढे-पाठीमागं सोपे होते. दोन्ही बाजूंना मोकळी अंगणं भरपूर. पूर्वाभिमुख असलेल्या या घरासमोरूनच गावातला मोठा समजला जाणारा रस्ता जात होता. सातार्‍याच्या बाजूनं गावाला भिडलेला हा रस्ता वळणावळणांनी थेट कृष्णाबाईवर जाऊन थांबला होता. सार्‍या गावाची वर्दळ काय ती याच रस्त्यावरून. अंगणात नागेशभट्ट चौपाई टाकून बसलेले असायचे. आडोसा आणि संरक्षण म्हणून अंगणाभोवती शेवरी लावलेली होती. शेवरीच्या पसार्‍यातून माणूस जाईल एवढी वाट मुद्दाम ठेवली होती. गंगाधरभट्टांचा वंश नागेशभट्ट पुढे चालवीत होते. नागेशभट्टांचंही आता वय झालं होतं. तरुणपणी कृष्णेच्या डोहात पोहताना सपासप हात मारणार्‍या नागेशभट्टांचे हात आता एरवीच थरथर कापू लागले होते. बाभळीच्या भल्या मोठ्या ओंडक्याचे कुर्‍हाडीच्या एका घावासरशी दोन तुकडे करणारे नागेशभट्ट आता पूजापात्रही उचलू शकत नव्हते. करड्या नजरेनं समोरच्या व्यक्तीला घामाघूम करणारे त्यांचे डोळे आता कासराभर अंतरावरचं पाहण्यासाठीही कुरकूर करू लागले होते. म्हणून नागेशभट्ट अंगणात चौपाईवर पडून असत. गावातली पोरंटोरं जाता-येता आत डोकावून 'काय आजोबा' म्हणत. चौपाईच्या खाली एक पितळी डबा असे. त्यात कधी नुसतीच खडीसाखर, कधी भुईमुगाचे खारवलेले दाणे, तर कधी उसाचे करवे असत. आजोबांकडे येणार्‍या पोराच्या हातावर हमखास काही पडे. कामधंद्याला येणारा-जाणारा माणूस नागेशभट्टाशी बोलल्याशिवाय रस्त्यावरून

पुढे जायचा नाही. नागेशभट्ट शंभरीला येऊन पोचले होते. नव्वदी ओलांडेपर्यंत ते कृष्णेवर चालत जाऊन आंघोळ करून येत. सत्तरीपर्यंत त्यांचे सगळे दात शाबूत होते; पण आता शंभरीला मात्र त्यांना निसर्गानं बजावलं होतं, 'नागेशबाबा, जरा जपून ! आता आमच्याशी मस्ती नाही करायची. आता जरा बेतानंच वागायचं.'

निसर्गाचा इशारा नागेशभट्टाला मानावाच लागला. कारण मुलगा बाळकृष्णभट्ट यानंही आता सत्तरीत प्रवेश केला होता. नातू विश्वनाथ आता चांगला कर्तासवरता झाला होता. नातसून पार्वती सासऱ्याची मायेनं काळजी घेत होती. नागेशभटाचं घर भरलेलं होतं. उणीव होती ती एकच. . . विश्वनाथला अजून मूल व्हायचं होतं. पार्वतीची कूस रिकामीच होती. कुणी नागेशभट्टाला विचारलं तर तो हसून म्हणे,

"एखाद्या वेलीला उशिरा फुलं लागतात. आपण वाट पाहायची असते."

वृद्ध नागेशभट्टानं तीन कमी शंभर पावसाळे पाहिलेले. त्याच्या गाठी अनुभव मोठा. त्यानं कितीएक माणसं पाहिलेली आणि कितीएक प्रसंगांतून तो सहीसलामत पार पडलेला. त्यामुळं नागेशभट्टाच्या चौपाईभवती मुलामाणसांनी, आयाबायांनी सतत गर्दी केलेली असायची. कुणी सल्ला विचारायला, कुणी रुजवात करायला, कुणी मध्यस्थी करायला, विनवायला, तर कुणी नुसताच मोठेपणा द्यायला.

एके दिवशी सायंकाळी नागेशभट्टाच्या अंगणातला दरबार असाच भरला होता. संगमेश्वरीचे धोंडभट्ट नागेशभट्टाची विचारपूस करायला त्या दिवशी आले होते. धोंडभट्ट कोल्हापुरावरून पुढं संगमेश्वरी जाणार होते. म्हणून दुपारचेच ते निघून गेले. दुपारपासून नागेशभट्टाला कसंसंच होऊ लागलं होतं. रस्त्यावरून माणसांची तुरळक ये-जा सुरू होती. सायंकाळच्या वेळी तुळशीच्या बीची दुधातली लापशी रोज नागेशभट्ट घेत असे. मुलगा बाळकृष्णभट्ट लापशी घेऊन आला. नागेशभट्टानं त्याला खुणेनंच नको म्हणून सांगितलं. बाळकृष्णभट्ट घरात परत गेला. नागेशभट्टाचा डोळा लागला. संध्याकाळी नागेशभट्ट कधीच झोपत नसे; पण आज त्याला राहावलंच नाही. शरीर आपोआप कलंडलं आणि विलक्षण थकवा वाटू लागला. त्या ग्लानीतच त्याचा डोळा लागला. घरातली माणसं बाहेर डोकावून पाहत होती. डोळा लागला म्हणून परत जात होती.

रात्र अंधारून आली. स्वयंपाकाच्या चुली पेटल्या. दिवे लागले. मुलं परवचा म्हणायला बसली. मोठ्यांनी संध्यापाठ उरकले आणि. . . अंगणातून एक विलक्षण हाक आली, "बाळकृष्णा..."

बाळकृष्णभट धावून आले. विश्वनाथ आला, पार्वती आली. अवघा गोतावळा जमला...

नागेशभट्टाचं शरीर घामानं थबथबलं होतं. पानावर दंवाच्या थेंबांनी गर्दी करावी तशी त्याच्या शरीरावर घर्मबिंदूंनी गर्दी केली होती. नागेशभट्टाचा जीर्ण चेहरा पांढराफटक पडला होता. डोळ्यांतलं तेज मावळलं होतं. पार्वतीनं पदराआड धरून लामणदिवा आणला. त्या तांबुसपिवळ्या प्रकाशात शंभरीचा नागेशभट्ट यमाच्या उंबरठ्यावर उभा राहिल्यासारखाच दिसत होता.

"बापू, काय झालं ?" बाळकृष्णभट्टानं विचारलं.

"मला... स्वप्न, पडलं..." अडखळतच नागेशभट्टानं सांगितलं.

"कसलं स्वप्न, बापू ? आम्हाला सांगा."

पार्वतीनं नागेशभट्टांचं अंग पुसून काढलं. तुळशीचा ऊन-ऊन काढा आणला. त्याचे दोन घोट घशाखाली गेल्यावर नागेशभट्टाला जरा हुशारी वाटू लागली. उठून बसण्याचा प्रयत्न करूनही त्याला बसता मात्र आलं नाही.

"माझ्याजवळ या सगळे. आज मला सगळ्यांना जवळून बघायचं आहे," क्षीणशा आवाजात नागेशभट्ट बोलले. सगळे त्यांच्या चौपाईभवती बसले. कुणाला काही सुचत नव्हतं. नागेशभट्टाचं आजचं बोलणं वेगळंच होतं. कुठे तरी पाल चुकचुकत होती. मध्यरात्र नसूनही घुबडाचा घूत्कार दूरवरून ऐकू येत होता. रातकिड्यांची किर्र वाढली होती. देवघरातल्या समईचा प्रकाश मंदावला होता. जळणाऱ्या चुलीकडं कुणाचंच लक्ष नसल्यानं लाकडं धूर ओकत होती.

"बापू, स्वप्न कसलं ते सांगा ना," विश्वनाथ अजीजीनं म्हणाला,

"सांगतो, बाळा सांगतो," एक आवंढा गिळून नागेशभट्ट म्हणाले,

"स्वप्न तसं वाईट नाही... पण मला त्याचा अर्थ वाईट लागतो."

"संध्याकाळी पडलेली स्वप्नं खरी नसतात, बापू," इतक्यात कोणी तरी बोललं.

"बापू, स्वप्न सांगा," बाळकृष्णभट्ट पुन्हा म्हणाले.

"आपल्या देवघरातल्या देवळीत किती दिवे आहेत ?"

“चार.”

“शेजारी कोनाड्यात किती पणत्या आहेत ?”

“एक.”

“अगदी बरोबर. मग खरंच...”

“काय खरंच ?

“चार पणत्या आधी लागलेल्या होत्या. त्या एकापाठोपाठ विझल्या आणि... कोनाड्यातली ती एकच पणती...” बोलताना नागेशभट्टाला ठसका लागला... उबळ आली. पुढं बोलवेना. वर उफाळणारी उबळ दाबून नागेशभट्ट म्हणाले, “ती एकच पणती... पण तिची ज्योत खूप मोठी होतेय... तिचा प्रकाश प्रखर होतोय... सगळीकडं लख्ख उजेड पसरतोय... पार्वती... तुझी कूस उजवणार आहे. तुला मुलगा होणार आहे... एकच पणती... पण... चार पणत्या लागोपाठ विझणार आहेत.” ...एवढं एकदम बोलणं त्या वृद्ध शरीराला सहन झालं नाही. नागेशभट्टानं मान टाकली. कंठाशी प्राण अडला. डोळ्यांतली बुबुळं फिरली. बाळकृष्णभट्ट धावले. त्यांनी गंगा आणली. बोटानं ओठ उघडून गंगेचे चार थेंब नागेशभट्टाच्या मुखात घातले. गंगेच्या स्पर्शानं नागेशभट्टाचे ओलावलेले ओठ काही तरी बोलण्यासाठी धडपडत होते.

... एव्हाना प्रभुण्यांच्या अंगणात सारा गाव जमला होता. यायला जागा नव्हती तर लोकांनी शेवरीचं कुंपण भुईसपाट करून टाकलं. नागेश भट्टाच्या चौपाईला लोकांनी वेढलं. चौपाईच्या खाली नेहमीप्रमाणं खाऊचा पितळी डबा होता. त्यातल्या वड्या उघड्याच पडल्या होत्या; पण कुण्या पोरानं आज हात नाही पुढं केला, की वड्या नाही मागितल्या. वादळात चिमण्या अंग आखडून आसऱ्याला बसतात तशी पोरं आपल्या आई-वडिलांना नाहीतर थोरल्या बहिणी-भावाला बिलगून उभी होती. नागेशभट्टाचे प्राण आता ओठाशी येऊन थांबले होते. त्याला काही तरी बोलायचं होतं; पण बोलता येत नव्हतं. बराच वेळ नुसती ओठांची हालचाल... नुसतीच तडफड आणि फडफड... अखेर तीही थांबली... आणि...

देवघरातील पहिली पणती विझली.

* * *

ज्या कृष्णेच्या काठी, माहुलीच्या मातीत नागेशभट्टानं उभं आयुष्य काढलं

त्याच कृष्णेच्या काठी त्याचं आयुष्य विसावलं. नागेशभट्टाची चौपाई, तो पितळी डबा, त्याची जपाची माळ, त्याचं मृगाजीन या साऱ्या वस्तू घरातल्या प्रत्येक माणसाला जाता-येता त्यांची आठवण करून देत होत्या. अंगणातला सकाळ-सायंकाळचा दरबार आता भरत नव्हता. नागेशभट्टाच्या अंतकाळी मोडून पडलेलं शेवरीचं कुंपणं अजून तसंच अस्ताव्यस्त होतं. ते पुन्हा उभं करायचं भान आता कुणाला नव्हतं. नागेशभट्टानं माहुलीच्या पाच-सात पिढ्या तरी पाहिल्या होत्या. त्यानं तरुणपणी अंगाखांद्यावर खेळवलेली माहुलीतली पोरं आता म्हातारी होऊन अंतकाळाची वाट पाहत होती. कितीएकांचे संसार उभारायला नागेशभट्टाचा हात लागला होता. कितीएकांची आयुष्यं नागेशभट्टाच्या जागरूकतेमुळं सन्मार्गी झाली होती आणि म्हणूनच नुसतं प्रभुण्यांचं घरच नव्हे, तर अवघी माहुली नागेशभट्टाला विसरू शकली नाही.

बाळकृष्णभट्टालाही आताशा कसंसंच व्हायचं. एकदम आणि अचानक. नागेशभट्टाइतकी बाळकृष्णाची कुडी तुडतुडीत नव्हती. सहा तपांचं आयुष्य जगूनही आयुष्यभर बाळकृष्णभट्ट प्रकृतीला सांभाळूनच राहिला होता. बापाची बळकटी मुलात नव्हती. आता तर बापाचं मरण प्रत्यक्ष पाहिलेलं, अनुभवलं. बाळकृष्णभट्ट घरात आताशा विषण्ण असायचा. त्यातून त्या स्वप्नाची आठवण. . . नागेशभट्टाला अंतकाळी, करकरीत तिन्हीसांजेला पडलेलं ते विलक्षण स्वप्न. . . त्यामुळे घाबरा झालेला त्याचा जीव. . . याची आठवण झाली की, बाळकृष्णभट्टाचा ऊर कसल्यातरी अपरिचित भीतीनं दाटून यायचा.

काय त्या स्वप्नाचा अर्थ !

चार पणत्या लागोपाठ विझल्या.

आणि एकच पणती. . . तिची ज्योत विलक्षण प्रकाशमान. . . या स्वप्नाचा अर्थ लावता-लावता बाळकृष्णभट्ट स्वतःच एक दिवस नागेशभट्टाची वाट धरून चालता झाला. . . आणखी एक पान गळून पडलं. आणखी एक पणती विझली.

आणि याच वेळी पार्वती गर्भवती होती. तिची कूस उजवली होती. विश्वनाथाला पितृत्व प्राप्त होणार होतं. प्रभुण्यांच्या घरात नवा जीव जन्माला येणार होता. गर्भवती पार्वती अगोदरच भारावलेली. त्यातून घरात लागोपाठ दोन मृत्यू घडलेले. कधी-कधी तिच्या काळजात एकदम धस्स व्हायचं आणि आधीच हळवं झालेलं तिचं मन भीतीनं कापू लागायचं. विश्वनाथाचा धीराचा हात

पाठीवर असला की, तिची भीती कमी व्हायची; पण जसजसे दिवस भरत आले तसतशी पार्वती सशाच्या काळजाची होऊ लागली. दुपारच्या वेळी माणसं कामाधामाला बाहेर गेली की, तिला घर खायला उठे. तशी घरात माणसं मुळीच नव्हती असं नव्हतं; पण घर माणसांनी भरगच्च असलं म्हणजे पार्वतीला बरं वाटायचं. लहान मुलाची अवस्था ! दुसरं काय.

पार्वतीचे दिवस भरत आले होते. देवघराशेजारच्या खोलीत बाळंतिणीचा मांड मांडलाच होता. एकदा पहाटेचीच जागी झाली पार्वती. आणि विश्वनाथरावांना म्हणाली,

"अहो, उठा... मला कृष्णाबाईवर जावंसं वाटतंय."

"या वेळी ! वेडी ग वेडी ! अग. आत्ता तर कोंबडा आरवला."

"आरवला ना... मग उठा. मला कृष्णाबाईवर घेऊन चला." पार्वतीचा स्वर कमालीचा जडावलेला होता.

"पार्वती, अशा अवस्थेत कशाला कृष्णाबाईवर येतेस ?..."

"मला यायचंय."

"हट्टच आहे तर !"

"हो. हट्टच म्हणा. अहो, मला डोहाळे नाही लागले इतर बायकांसारखे. हे डोहाळेच म्हणा."

"डोहाळे नाही कसे ! चांगले डोहाळे होते पार्वती तुला," विश्वनाथराव किंचित हसून म्हणाले.

"कुठले हो डोहाळे ? मी कधी चिंचा-पेरू खायला मागितले का पुरणपोळ्या करून खाल्ल्या..."

"अगं, डोहाळे फक्त खाण्याचेच का असतात ! डोहाळे म्हणजे पोटातल्या गर्भाच्या मातेच्या वर्तनातून दिसून येणाऱ्या वृत्ती."

"चला... माझ्या वर्तनातून तुम्हाला काय असं दिसून आलं ?"

"पार्वती, तुझा मुलगा वांड होणार आहे आणि विद्वानही."

"आपण कशावरून म्हणता ?"

"पार्वती, तू आम्हाला काही गोष्टी सांगितल्या नाहीस तरी आम्हाला ठाऊक झाल्यात. आम्ही आमच्या डोळ्यांनी त्या टिपल्यात," असं विश्वनाथराव म्हणाले तेव्हा पार्वतीने काहीशा आशंकेने मान फिरवली आणि त्यांच्या नजरेला नजर देत

ती म्हणाली,

"असं काय मी केलंय हो आणि तुमच्यापासून लपवून ठेवलंय ! सांगा तरी."

"सांगू ?"

"हो सांगा."

"सात महिन्यांपूर्वीची गोष्ट. . . पार्वती नावाची एक सोज्वळ सालस बाई. . . कार्तिकस्नानासाठी म्हणून पहाटेसच बायकांबरोबर कृष्णाबाईवर गेली. आणि स्नान करता-करता सरळ पाण्यावर सपासप हात मारू लागली. बायका म्हणाल्या. . . पार्वती, अगं काय करतेस ? पार्वती म्हणाली, पोहते. मला पोहावंसं वाटतंय. मग कुणी तरी तिची एक सखी दुसऱ्या सखीच्या कानात कुजबुजली, अगं, पार्वतीला दिवस गेलेत. दोन महिने झालेत."

पार्वती लाजली आणि पदराआड तोंड लपवून अनुरक्त आवाजात म्हणाली, "अगबाई, हे तुम्हाला कसं माहीत झालं ?"

"पार्वती, हेच तुझे डोहाळे. आपला मुलगा पट्टीचा पोहणारा होणार आहे, असं मला त्या दिवसापासून वाटू लागलंय."

"आणखी काय काय वाटू लागलंय ?"

"भांडखोरही होणार आहे."

"अगबाई, मी कधी कुणाशी भांडले आहे का ?"

"तू भांडली नाहीस; पण भांडण चालेल तिथं धावून जायचीस भांडण सोडवायला आणि निवाडा करायला."

"मग भांडखोर काय म्हणता, न्यायी म्हणा."

"तसं म्हण हवं तर."

"चला. . . बोलण्यात वेळ नका घालवू. . . मला कृष्णाबाईवर घेऊन चला. मला ओटी भरायची आहे कृष्णाबाईची."

"मला वाटलं, एवढ्या बोलण्यानंतर तू कृष्णाबाईवर जायचं विसरली असशील."

"मी नागेशभट्टांची सून आहे म्हटलं. कृष्णाबाईला मी विसरले तर प्रभुण्यांच्या घरात शोभायची नाही मी."

"बरं . . चल; पण आज आंघोळ घरीच कर. ओटी तेवढी तिथं भर. तू

अवघडलेली आहेस.”

“नाही. आज मी कृष्णाबाईत सचैल स्नान करणार आहे. . .”

“पार्वती, अगं, कसला वेडा हट्ट हा. . .”

“असू दे वेडा हट्ट. आज तो पुरा करा तुम्ही. कदाचित. . , कदाचित. . .” पार्वतीचा स्वर थबकला.

“कदाचित काय पार्वती. . . बोल ना,” विश्वनाथ आशंकेनं म्हणाला.

“कदाचित पुन्हा हट्ट करायचा प्रसंग कधीच येणार नाही.”

“म्हणजे. . . असं काय बोलतेस, पार्वती ?”

“मी का बोलते ते मलाच कळत नाही. चला, उठा नं.”

आता गत्यंतरच नव्हतं. विश्वनाथ-पार्वती दोघंही उठली. पार्वतीनं नवं टोपपदरी लुगडं, विश्वनाथचं धोतर, फुलांची परडी, कुंकवाचा करंडा आणि ओटीचं सारं साहित्य बरोबर घेतलं. पूर्वेची क्षितिजकडा पांढुरकी होऊ लागली होती; पण अजून चांगलाच अंधार वाटत होता. पायाखाली नीट दिसतं नव्हतं. तरी रोजची पायाखालची वाट असल्यानं विश्वनाथ-पार्वती एखाद्या उद्यानातून चालावं तसे चालत होती. वाऱ्याची एखादी मंद झुळुक झाडावेलीवरून येताना गंध लपेटून येत होती. अंग शहारून-मोहरून येत होतं. गर्भवती पार्वतीच्या वृत्ती उल्हसित होत होत्या.

नागेशभट्ट आणि बाळकृष्णभट्ट यांच्या मृत्यूनंतर आज किती तरी दिवसांनी पार्वतीला अशी मोहरलेली विश्वनाथानं पाहिली. विश्वनाथ-पार्वती मग या दुनियेला विसरले. आसपासची घरं भुर्रकन उडून गेली. पायाखाली मातीच्या वाटेवर गवताचा हिरवागार गालिचा तयार झाला. दूरवरचा उजाड माळ गर्द राईनं भरून गेला. वाऱ्याच्या झुळकांबरोबर सुगंध येऊ लागला. विश्वनाथ-पार्वती नंदनवनातून चालत होते. त्यांच्या मनोभूमीतून सुखाचे झरे झरत होते.

“ए, बोलत नाहीस ते काही ?” विश्वनाथनं पार्वतीला विचारलं.

“सुखाच्या वेळी माणसानं फार बोलू नये. शब्दांनी सुख दचकतं आणि दूर पळतं.”

“पण अशा मुकेपणानं सुख समजायचं तरी कसं ?”

“तेव्हाच जास्त समजतं.”

विश्वनाथानं पार्वतीचा हात हातात घेतला. तो हलकेच दूर करून पार्वती

म्हणाली, "कृष्णाबाईवर आलो आहोत म्हटलं आपण."

सुखाच्या स्वप्नभूमीत रमलेल्या विश्वनाथाच्या पायाला कृष्णेच्या काठची वाळू बोचली आणि एक कळ मस्तकी पोचली तेव्हा तो भानावर आला.

आता वाळवंटात अंधुक प्रकाश जाणवू लागला होता. वाळूतून वर आलेले गारगोट्यांचे खडे चमकदार दिसत होते. पूर्वकडा आरक्त झाली होती. सूर्याच्या आगमनाची वर्दी देणारे श्वेतवर्णी मेघदूत आकाशात अवतरू लागले होते. कृष्णाकाठी प्रातःस्नानाला नेमाने येणारी ब्राह्मण मंडळी खांद्यावर धोतराचे ओले पिळे आणि हातांत पूजापात्रे घेऊन परतत होती.

पाण्याच्या अगदी काठाशी आल्यावर पार्वतीनं हातातलं साहित्य वाळूत रुतलेल्या एका मोठ्या धोंड्यावर ठेवलं. विश्वनाथ धोतराचा काचा मारून नदीच्या पात्रात शिरला. पाण्यावर सपासप हात मारत तो मध्यावर गेला आणि 'हरगंगे भागीरथी !' असं म्हणून त्यानं पाण्यात डुबी घेतली.

गुडघाभर पाण्यात उभी राहून पार्वती त्याच्याकडे कौतुकानं पाहत होती. एक क्षण... दोन क्षण... काही क्षण...

"अहो, वर या ना." ...पार्वती व्याकुळपणे म्हणाली. आता कौतुकाची जागा काळजीनं घेतली होती. बराच वेळ झाला तरी विश्वनाथाची जलसमाधी संपली नव्हती. पार्वती आणखीच व्याकुळली.

"अहो,... तुम्ही कुठं आहात ?" तिचा स्वर रडवेला झाला होता.

"अहो,...आम्ही इथं आहोत." ...तिच्या पाठीमागून आवाज आला. तिच्या रडव्या आवाजाची नक्कल करत विश्वनाथ म्हणाला होता.

"किती घाबरले मी..."

"मीसुद्धा घाबरलो. म्हटलं माझ्यामागं पाण्यात धाव घेतेस का काय तू ?"

"आणखी थोडा वेळ जाता तर आलेसुद्धा असते. चला, माझा हात धरा. मला अंग भिजवू द्या."

"फार पुढं जायच नाही हं पार्वती. आता तू एकटी नाहीस," असं म्हणून विश्वनाथानं तिला हातानं धरून पुढं नेलं. पार्वतीनं एक बुडी मारली आणि 'गंगामाई भागीरथी' म्हणत ती वर आली. वस्त्र अंगाला घट्ट लपेटून बसलेलं, लांबसडक काळेभोर केस निथळत असलेले. हात विश्वनाथाच्या हाती...

"काय पाहता एवढं ?"

"पाहतो आहे आपला मुलगा कसा होईल ते," विश्वनाथ म्हणाला.

मग काठावर येऊन दोघांनीही अंगं कोरडी केली. नवं टोपपदरी लुगडं नेसून पार्वतीनं कृष्णामाईची खणानारळानं ओटी भरली आणि एक रौप्यमुद्रा ओवाळून टाकून पाण्यात फेकली... भक्तिभावानं हात जोडून ती मनात म्हणाली,

"कृष्णाबाई, माझ्या पतीला आणि पोटातल्या गर्भाला उदंड आयुष्य दे !"

परतताना आता चांगलं फटफटलं होतं. कोवळी प्रकाशकिरणं पृथ्वीला भेटायला धावत होती. माहुलीचा परिसर जागा झाला होता. पहाटे दळणाऱ्या जात्यांच्या पाळया आता विसावल्या होत्या. विश्वनाथानं पार्वतीला विचारलं, "आजच तुला कृष्णाबाईची ओटी भरावी असं का वाटलं ?"

"डोहाळे," पार्वती हसून म्हणाली.

"हसण्यावारी नेऊ नको पार्वती, खरं सांग."

पार्वती खरंच मग गंभीर झाली. थकलेल्या माणसानं एकेक पाऊल जडपणे पुढं टाकावं तसे तिचे शब्द येऊ लागले...

"अहो, माझे दिवस भरत आलेले. . . तुम्हाला आठवतं, मामंजींचं ते स्वप्न. . ."

"कसलं स्वप्न..."

"चार पणत्या लागोपाठ विझतील आणि एक पणती..."

"हं, हं... पण त्याला एवढं भ्यायचं ?"

"आधीच स्त्रीचं काळीज सशाचं. त्यातून ती अवघडलेली..."

"तू काही भिऊ नकोस पार्वती. अगं सारीच स्वप्नं खरी होत नसतात. मुळीच घाबरू नकोस."

"मी भ्यालेले नाही; पण देवापुढे मागणं मागितलं. देवाला गाऱ्हाणं सांगितलेलं असावं."

बोलता बोलता दोघं घरापाशी येऊन ठेपली आणि इकडं घरात बाकीच्या माणसांनी काळजीचं काहूर उठवलं होतं...

"पहाटेचीच दोघं कुठं नाहीशी झाली !"

विश्वनाथ-पार्वतीला बघून सगळ्यांनी मनावरली काळजीची काजळी झटकली आणि मग थट्टेला ऊत आला. विश्वनाथाची आते आलेली होती. आते बाळकृष्णभट्टाची थोरली बहीण. म्हातारी मोठी चिवट आणि बोलण्यात तशी

खवट.

"थांबा रे बाळांनो उंबऱ्यावरच. मीठमिरच्या आणते..."

पार्वती लाजली. चूर होऊन आतेच्या अंगावरून आत पळाली.

"विसू, अरे दिवस भरलेल्या बायकोला वेळी-अवेळी नदीवर नेलंस. विचारायचंस तरी रे मला," आते म्हणाली.

* * *

देवघराशेजारच्या अंधाऱ्या खोलीचं एक दार लोटून घेतलेलं होतं आणि अर्ध्या दाराशी उंबऱ्यावर आते बसून राहिली होती. स्वयंपाकघराच्या चुली केव्हाच थंडावल्या होत्या. माजघरात मुलं-माणसं पेंगुळवाणी झाली होती. ओसरीवरच्या देवळीत एकच दिवा जळत होता. विश्वनाथ ओसरीवरून इकडे-तिकडे फेऱ्या मारत होता आणि अपुऱ्या प्रकाशात त्याचीच भली मोठी सावली त्याचा पाठलाग करीत होती.

"विश्वनाथा, तू झोप रे बाबा. उगाच का तारवटतोस," आतून आते ओरडली; पण विश्वनाथाच्या फेऱ्या संपल्या नाहीत.

आतेचं ओरडणं थांबलं नाही.

विश्वनाथाच्या त्या फेऱ्या आणि आतेचं ते ओरडणं तेव्हाच संपलं, जेव्हा आतून 'टॅहॅं टॅहॅं' चा आवाज ऐकू आला. पार्वतीच्या प्रसूतिवेदनेची एक किंकाळी घराच्या भिंतींना भेदून गेली... पण ती किंकाळी नुसत्याच प्रसूतिवेदनेची नव्हती. ती किंकाळी घोर शरीरव्यथेतून निर्माण झाली होती...

मुलाला जन्म देऊन पार्वती बेशुद्ध झाली.

अंकुर डोकावला आणि पार्वतीला ग्लानी आली.

अनुभवी आतेनं मोठेपणानं सुईणपण केलं. रात्र अंधार भरू लागली. काजळी दाट होऊ लागली. बाळंतिणीची सगळी निगानिगुती आटोपून आतेनं नवजात चिमणा जीव दुपट्यात लपेटून बाहेर आणला आणि ती विश्वनाथाला म्हणाली...

"घे रे बाबा, संभाळ याला. मी पार्वतीकडे पाहते."

"काय झालं आते, पार्वती बरी आहे ना ?"

"बरी नसायला काय झालं; पण अंगावरन थोडं जास्त गेलंय. सकाळपर्यंत वाट पाहू, नाही तर वैद्याला बोलावून आणायला हवं रे बाबा," आते काहीशा काळजीच्या स्वरात म्हणाली.

तो इवलासा जीव. . . जगाच्या प्रथमदर्शनानंच त्याचे इटुकले डोळे दिपले होते जणू. डोळे उघडून मिचमिच्या नजरेनं तो विश्वनाथकडे पाहत होता आणि विश्वनाथ मात्र काळजीतच होता.

. . .दोन दिवस असेच गेले. पार्वती तापानं फणफणली होती. आतेनं तिला माहीत असणारी चाटणं पार्वतीला चाटवली होती, मात्रा उगाळून दुधातून तिला चाटवल्या होत्या; पण ताप हटला नव्हता. धाकटा विनायकभट्ट वाईच्या एका पाठशाळेत शिकत होता. तो आला होता. म्हणाला, "कोल्हापुरास जाऊन वैद्याला घेऊन येतो."

विनायकभट्ट कोल्हापुरास जायला निघाला. जाताना भावजयीची भेट घ्यावी म्हणून तो आत गेला. बाजेवर निस्त्राण अवस्थेत पार्वती पडलेली होती. तिचा चेहरा ओढलेला दिसत होता. डोळे खोल आणि फिकट दिसत होते.

"कोल्हापुरास एक नामांकित वैद्य आले आहेत. त्यांना घेऊन येतो," विनायकभट्ट म्हणाला.

"कशाला जाता भावोजी एवढ्या दूर. . ." क्षीण आणि थकलेल्या आवाजात पार्वती म्हणाली, "मला काही खरं वाटत नाही."

"असं का म्हणता ? तुम्ही चांगल्या बऱ्या व्हाल."

"उगीच आशा लावता झालं. भावोजी, मी हातीपायी धड सुटले आणि बाळाला काही झालं नाही हेच नशीब. मला तेवढंच हवं होतं. आता पुढं काय वाढून ठेवलं असेल ते आनंदानं खाईन मी."

"असं नका बोलू. आजारी कुणी पडत का नाही. बाळंतपणानंतर प्रकृती कुणाची बिघडत का नाही. तुम्ही काही काळजी करू नका. बाळाला आई हवी आहे. आम्हाला तुम्ही हव्या आहात. . ." असं म्हणून भावजयीला धीर देऊन विनायकभट्ट निघून गेला.

आणि इकडं बाळानं आकान्त मांडला. पार्वती तापानं फणफणलेली. आतेनं सांगितलं, "बाळाला अंगावर पाजू नको."

पण बाळ कसला हट्टी. त्याला स्तन्यच हवं होतं. त्याला वरचं दूध नको होतं. विनायकभट्टाच्या बायकोनं- बाळाच्या काकूनं-खूप आंजारलं, गोंजारलं. चांदीची वाटी अन् चिरटोळी, त्यानं दूध पीना म्हणून चांदीचं बोंडलं; पण छे. . . दोन दिवसांत दोन थेंब काही पोटात गेले नसतील.

आणि त्यामुळे इकडं विश्वनाथाची स्थिती केविलवाणी. पार्वती तशी पडलेली, मुलाचं हे असं... विश्वनाथला अन्न काही गोड लागेना. जिवाची बेचैनी वाढली; पण करतो काय बिचारा. वाट पाहणं आणि सोसणं यापलीकडं त्याला तरी काय करता येणार होतं ?...

अखेर तिसऱ्या दिवशी आतेच म्हणाली,

"विश्वनाथ, आज पाजू दे तिला बाळाला."

पार्वती बाजेवर उठून बसली. मागल्या भिंतीला टेकून आधार घेतला.

दोन दिवस तिचा ऊर प्रेमानं दाटून राहिला होता, त्याला आज आता वाट मिळणार होती. मातृत्वाच्या आत्यंतिक सुखसंवेदनांचा लाभ तिला होणार होता.

पार्वतीनं जवळ घेतलं, तसं बाळाचं रडं आणखीनच वाढलं आणि त्याची इवली नजर, इवले हात काही शोधू लागले. . . पार्वतीनं त्याला पदराखाली घेतलं...

एवढ्यात आते म्हणाली, "थांब गो पार्वती, अगं आज तिसरा दिवस. बाळाला पाजतेस प्रथमच ना... विडा खा हा... आणि त्याच्या तोंडी लाव..."

आतेनं मऊ पिकल्या पानांचा केशर-वेलची घातलेला विडा पुढं केला. पार्वतीनं तो खाल्ला. जरा चावला आणि तिचे ओठ लालचुटुक झाले.

"आते, विडा खायचा आत्ता ?" विश्वनाथानं कुतूहलानं विचारलं, आणि तो पार्वतीच्या रंगलेल्या ओठांकडं पाहू लागला.

"बाबारे, तुला नाही समजायचं ते. कशाला चौकशी करतोस ?" आते म्हणाली आणि तिनं बाळाचा गोळा पार्वतीच्या पुढ्यात केला.

"त्याच्या ओठात घाल बाई एवढासा कण..."

बाळाचे ओठ तेवढ्या कणानंही रंगले. मग आते म्हणाली,

"आता पी खुशाल चुरूचुरू..."

आणि मग वासरू गाईला बिलगलं. पान्हा फुटला...

पार्वतीच्या डोळ्यांत तुडुंब समाधान दिसलं...

आते विश्वनाथला म्हणाली, "तुझा दिवटा चिरंजीव अगदी करारी होणार आहे हो. दोन दिवस उपाशी राहिला; पण हवं तेच मिळवलं त्यानं."

विश्वनाथनं येणारं हसू ओठाआड लपवलं; कारण आता त्याला हसण्याचंही भान उरलं नाही. तो फक्त पाहत होता. मायलेकरांची समाधी त्याला दिसत

होती...

आणखी दोन दिवस उलटले. विनायकभट्टाला कोल्हापुराहून यायला आणखी एखादा दिवस उजाडणार होता. तोपर्यंत गावातल्याच एका प्रभवणे वैद्यानं नाडी तपासली, काढा सांगितला, पथ्यपाणी कसं ते सांगितलं...

पण जाताना त्यांचाही चेहरा गंभीर झाला होता.

रात्री विश्वनाथ पार्वतीसमोर तिपाई टाकून बसला होता. तेवढ्यात आते आलीच आणि रागेरागे म्हणाली, ... "काय गुलूगुलू गोष्टी करता रे ?...चल बाहेर हो."

"आते, बारशाचं बोलतोय. गुलूगुलू नाही नुसतं."

"बारसं थाटात कर रे बाबा."

"आते, तू सांगशील तसं करू."

"माझं काय मेलीचं ! तुझ्याच मुलाचं कवतिक व्हायला हवं," असं म्हणून आते निघून गेली.

"पार्वती, बारशाला तू खडखडीत बरी होशील," विश्वनाथ मृदूपणे म्हणाला.

"होईन का हो खरंच बरी मी !" असं विचारतानाच पार्वतीला धाप लागली. खोकल्याची उबळ आली. पाणी पिण्यासाठी हातात भांडं घेतलं होतं ते सुटलं. खाली पडलं.

"पार्वती, तू पडून राहा. उगाच श्रमी होऊ नकोस."

"आता मला सदाचंच पडून राहावं लागणार आहे."

"असं बोलायचं नाही. थाटात बारसं करायचंय. बारशाला तू अगदी बरी होणार. उद्याच विनायक येईल, त्याच्याबरोबर वैद्य येतील."

"माणसानं आशा करीत राहावं. त्यातच समाधान असतं," असं म्हणत पार्वती बाजेवर आडवी झाली.

सकाळ फटफटली. पार्वतीला तोंड धुवायला कढत पाणी द्यायचं, मग तिला काढा द्यायचा यासाठी आतेची सगळी तयारी झाली होती. आवराआवर करताकरताच आते बोलत होती,

"पार्वती, ऊठ गो बाई... आज जरा लवकर आवरीन म्हणते."

...आतेची सगळी तयारी झाली. एका तसराळ्यात आतेनं कढत पाणी आणून ठेवलं. त्यावर वेळणी झाकण झाकली. दुसऱ्या एका लहानशा पातेल्यात

पाणी ठेवून दिलं. स्वच्छ पंचाचा एक फडका घडी करून शेजारी ठेवला आणि ती म्हणाली—

"पार्वती, ए पार्वती, ऊठ, अगं. . . ताप फणफणला वाटतं पोरीचा पुन्हा," आतेनं जवळ जाऊन पाहिलं. . . आणि . . ."पार्वतीऽऽ"

आतेची आर्त किंकाळी वातावरणाला भेदून गेली.

अचेतन पार्वतीच्या शेजारी सचेतन बाळ होता.

पार्वतीच्या पदराखाली तो काही शोधत होता.

विश्वनाथ अवाक होऊन उंबरठ्यात उभा होता आणि याच वेळी विनायकभट्ट दारातून आला; त्याच्या पाठीमागे वैद्यराज होते; पण त्यांचा रुग्ण केव्हाच निष्प्राण झाला होता. . . आणखी एक पणती विझली होती !

* * *

तरीही बारसं झालंच. तसं बारसं करण्याच्या अवस्थेत होतं कोण ?

विश्वनाथ तर दु:खानं जणू वेडा झाला होता. त्याला कशातच रस वाटत नव्हता. मग आतेनं पुढाकार घेतला. अगदी बाराव्या दिवशी नाही तरी महिन्याच्या वाढदिवसाला पोराचं नाव ठेवायलाच हवं. मुलगा दिसामाशी वाढायचा. त्याला कोणत्या नावानं हाक मारायची ! म्हणून मग आतेनंच पाळणा सजवला. दोऱ्यांना चार फुलमाळा बांधल्या. ऊदकाड्याच्या धुरानं खोली भरून गेली. घरात बाळलेणी होतीच. नवीन फक्त अंगडंटोपडं शिवलं आणि बाळ सजला. चार नात्यागोत्याच्या, चार सगेसोयऱ्यांच्या सवाष्णी आतेनं बोलावल्या आणि बाळाला पाळण्यात घातला.

नाव ठेवण्यात आलं रामचंद्र !

बाहेर पडताना आलेल्यातली एक बाई तोंडापुढं पदर धरून म्हणाली,

"राम जन्माला आला आणि आई राम म्हणाली." आतेनं तिला परत बोलावली अणि मग किती तरी वेळा ती समोर उभी गप्प आणि आतेच्या तोंडून शब्दांचे तोफगोळे तिच्यावर ! आते गप्प झाली आणि जा म्हणाली तेव्हा ती बाई निघून गेली.

* * *

आईविना राम वाढत होता. गाईविना वासरू मोठं होत होतं. विश्वनाथच त्याची आई आणि विश्वनाथच बाप. आतेला सुनेकडून बाळंतपणासाठी बोलावणं

आलं होतं म्हणून आते गेली होती. जाताना विश्वनाथला बजावून गेली होती—

"सांभाळ हो विश्वनाथ, लहान पोराची निगुती फार असते. डोळ्यांत तेल घालून जपावं लागतं. मला जायलाच हवं म्हणून जाते. विनायक आहे, त्याची बायको आहे. करतील सारे; पण तू लक्ष ठेव."

आतेचे डोळे किती वेळपर्यंत गळत होते. . . आते बैलगाडीत बसली. बैलगाडीची चाकं रस्त्यावरून रांगोळी काढत दूर-दूर जात होती. ती अगदी दिसेनाशी झाली तेव्हा विश्वनाथ भानावर आला...

त्याला आठवण झाली, बाळाला वावडिंग घालून दूध द्यायला सांगितलं होतं आतेनं...

* * *

राम आता चांगली मान धरू लागला. हसायचा मोठा गोड; पण रागावला की त्याच्या डोळ्यांत ठिणग्या फुलल्या आहेत, असं इतक्या लहानपणीदेखील वाटायचं. विनायकाची बायकोच तसं म्हणायची.

दिवसभर राम कुठंही असायचा, कुणीही त्याला घेऊन हिंडवायचं; पण दिवेलागण झाली की मात्र त्याला बापाची मांडी हवी असायची. त्याच्या काकीनं, विनायकभट्टाच्या बायकोनं तेलवाती करायला घेतल्या की याची रडण्याची किरकिर सुरू. मग तिनं हातातलं काम टाकून धावतपळत यावं, तो गोपा मांडीवर घ्यावा नाही तर हातावर झुलवावा आणि विश्वनाथराव येईपर्यंत वाट बघावी, असं किती तरी दिवस चाललं होतं.

अशीही पाच वर्षं गेली. राम आता चांगला खेळू-फिरू लागला होता. विश्वनाथरावांनी त्याला श्लोक म्हणायला शिकवले होते; पण श्लोकांपेक्षा लोकांकडे याचं लक्ष अधिक, अक्षरं शिकण्यापेक्षा उनाडपणे हुंदडणं त्याला आवडे.

कधी-कधी विश्वनाथराव सचिंत होत; पण त्यांचं विचारी मन त्यांना सांगे, 'चिंतेचं काही कारण नाही. पोरवय आहे. मुंज झाली की आपोआप सुधारेल. एकदा ताम्हन व पळी-पंचपात्र घेऊन संध्या करू लागला की याच्या बुद्धीला स्थिरता येईल.' या आशेच्या अभ्रातच विश्वनाथराव वावरत होते.

विश्वनाथरावांचा व्याप आता वाढला होता. पंचक्रोशीत त्यांना प्रवचन-पुराणासाठी, कधी चातुर्मासात तर कधी एरवीही आमंत्रणं येत. विनायकभट्ट

घरचे सगळे हवे-नकोचे व्यवहार बघत होतेच. राम चांगला खातापिता आणि खेळता होता. आता विश्वनाथरावांना तशी कोणतीच काळजी नव्हती.

'रामची मुंज करून त्याला सन्मार्गी लावला की आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली,' असे मुक्ततेचे मनस्वी विचार त्यांच्या मनात सतत येत.

असेच विश्वनाथराव कुठं प्रवचनासाठी गेले होते. संध्याकाळी परत आले तो थकलेले. . . खांद्यावरची पडशी कशी तरी खाली ठेवून ते वाकले. . . आणि कोसळलेच.

लहानगा राम धावत आला. . . गळ्यात हात टाकून म्हणाला,

"मला काय आणलंत ?"

"खडीसाखर आहे बाळा त्याच्यात. घे."

"तुमच्या कपाळाला घाम. आणि हे काय ? रक्त ?"

"हो. . ." पुढं विश्वनाथरावांना काही बोलताच आलं नाही. एखादं झाड उन्मळून पडावं तसे ते पडले.

विनायकभट्टानं वैद्याला बोलावून घेतलं. वैद्यांनी परीक्षा केली. कुठं तरी पडून डोक्याला मार लागला होता. रक्तस्राव फार झाला होता. मेंदूला मुका मार लागला होता.

"उद्या सकाळपर्यंत शुद्धीवर आले तर आशा आहे." वैद्यांनी सांगितलं.

रात्रभर विश्वनाथराव निपचीत पडून होते. आणि शेजारी राम ! एखाद्या निर्व्याज हरिणशावकासारखा.

पहाटेला अगदी अस्पष्ट कण्हण्याचा आवाज आला.

ज्योतीची विझण्यापूर्वीची फडफड !

"विनायक. . ." विनायकभट्ट आले. . .भावाचा हात हाती घेतला. . .

"विनायक. . . राम. . . ला. . . सांभाळ. . ."

ज्योत विझली. शरीराच्या फांदीवरून प्राणाचं फूल गळून पडलं.

विश्वनाथ विश्वरूप झाला. रामला काहीच समजलं नाही. विनायकभट्टानं पाणावलेले डोळे पुसले आणि तो रामला म्हणाला,

"चल, त्यांना झोपू दे. सकाळी उठतील. रात्रभर जागरण झालं आहे."

. . .चौथी पणती विझली होती !

¤

## ३

**वि**श्वनाथाचा स्वर्गवास होऊन अडीच-तीन वर्षं झाली तरी रामची मुंज अजून व्हायचीच होती. त्याच्या बरोबरची गावातली आणि पंचक्रोशीतली मुलं सकाळ-सायंकाळ संध्या करीत होती आणि राम मात्र अजून तसाच होता. विनायकभट्टाला गावातली जाणती माणसं म्हणू लागली,

"आठवं वरीस लागेल त्याला. त्याची मुंज करून टाक. कुमारिकेला लग्नाविना आणि मुलाला मुंजीविना फार काळ ठेवू नये."

विनायकभट्ट म्हणजे तसा थंड गोळा. त्याचं लक्ष घरात कमीच असायचं. त्यातून 'स्वयंपाकघरातल्या' सूचना पाळण्यावर त्याचा कटाक्ष फार असे. आपल्या सबंध घरावरही आपल्या चुलत्यापेक्षा चुलतीची सत्ता अधिक आहे हे रामला जाणवत होतं. तो डोळ्यांनी पाहत होता, कानांनी ऐकत होता; पण तोंडानं बोलत मात्र नव्हता. त्याच्याच घरात तो जणू आश्रित झाला होता.

चुलत्याबद्दल रामच्या मनात कुठं तरी खोल ओढ होती आणि पुतण्याबद्दल चुलत्याच्या थंड हृदयाला केव्हा तरी, कुठं तरी पाझर फुटत होता; पण विनायकभट्ट दिवसभर बाहेरच असायचा आणि घरातली लहानमोठी कामं करता करता रामला दिवस पुरायचा नाही.

आठ वर्षांचा पोर !

नदीवरून रोज दहा-बारा घागरी पाणी आणावं लागे त्याला. "कळशी उचलत नाही." अशी तक्रार त्यानं एकदा केली तर चुलतीनं लहान कळशी आणून दिली आणि म्हणाली, "जास्त खेपा कराव्या लागतील हो आता."

रामाचे पाय थकून जायचे. खांदा दुखायला लागायचा. नदीवर कळशी भरून खांद्यावर घेताना तर त्याची तिरपीटच उडायची. लोक आश्चर्यानं बघायचे. रामची कीव करायचे, पण सांगाचयं कुणी? विनायकभट्टाच्या बायकोच्या तोंडाला लागायचं कुणी?

विनायकभट्ट सकाळचाच बाहेर निघाला होता एकदा. कपाळी दुबोटी गंध, उपरणं आणि पडशी खांद्यावर घेऊन तो बाहेर पडायला आणि उघडाबंब राम कळशी घेऊन आत यायला एकच गाठ पडली. चुलत्यापुतण्याची दृष्टभेट झाली. भावनांची देवघेव झाली. रामचं अंगअंग भिजलेलं होतं. विनायकभट्टानं पडशी खाली ठेवली, रामच्या खांद्यावरची कळशी घेतली आणि त्याला आपलं उपरणं देत तो म्हणाला, "रामा, अंग टीप याला. किती भिजलास!"

"काका, पाणी नाही, घाम आहे."

"घाम!" विनायकभट्ट थक्क होऊन पाहतच राहिले. रामची छाती अजून भात्यासारखी वर-खाली होत होती. त्याच्या उजव्या खांद्याला घट्टा पडला होता आणि डाव्या खांद्यावर लाल-तांबूस चट्टा उमटला होता.

विनायकभट्ट काहीशा तीव्र स्वरात म्हणाला, "अगं, इकडे ये पाहू."

"काय आहे? कशाला हाक मारलीत मला?" आतून आवाज.

"या रामकडं एकदा बघ तरी."

"काय झालंय त्याला?" ओच्याला हात पुसत विनायकभट्टाची बायको आली.

"अगं, त्याला कशाला एवढं कामाला लावतेस!" विनायक अजीजीच्या सुरात म्हणाला.

"का, मी काही त्याची दावेदारीण नाही. त्याला खायला घालते, कामाला लावते, माझ्या मुलाला मी जे केलं असतं तेच त्याला करते हो." एकामागोमाग एक असे शब्द विनायकाच्या कानात घुसत होते.

"अगं, ते खरं; पण त्याचा जीव केवढा! हे बघ, सशाच्या पाठीवर धान्याची गोण दिली तर त्याला वाहून नेता येईल का?"

"हा ससा काय? अस्सं... मग घ्या त्याला आणि कुरवाळत बसा. माझं काय मेलीचं! घरात पाणी नसलं तर सगळेच हरी-हरी म्हणत बसू."

"तसं नव्हे. माझ्या म्हणण्याचा विपर्यास करू नकोस."

"मग काय करू ?... हा ससा आणि मी कोण ? पारधी ?"

"छे ग. तू त्याची चुलतीच आहेस, म्हणून सांगतो. जरा मायेची पाखर घाल त्याच्यावर. अग, अंतकाळी विश्वनाथानं वचन घेतलं होतं माझ्याकडून."

"वचन द्यायला तुम्हाला सुखासुखी काय होतंय. . . घरात कष्ट उपसावे लागतात मला."

असे हे वाद वारंवार होत. त्यामुळे विनायकभट्ट शक्यतो ते टाळीत असे; पण अगदीच असह्य झालं म्हणजे बोलल्याशिवाय त्यालाही राहवायचं नाही.

घरात गाय व्याली होती. दोन-तीन दिवस चीक निघत होता. घरदार आणि आलागेलासुद्धा खरवस ओरपत होता; पण रामच्या वाट्याला काही खरवस यायचा नाही. कारण घरात खरवस तयार होण्याची वेळ आणि रामची पाण्याची वेळ एकच ! रामला खरवस तर अतिशय आवडायचा. विनायकभट्टाच्या हे ध्यानी आलं होतं; पण अर्धांगीसमोरून खरवस घेऊन रामला खाऊ घालायचा म्हणजे पेटत्या चुलीत हात घालून भाजून घेण्यासारखं होतं.

रामच्या आठ-दहा खेपा तरी नदीवर होत. चार खेपा झाल्या होत्या, चार अजून राहिल्या होत्या. नदीकाठच्या एका सपाट कातळावर उभा राहून राम समोरच्या विशाल क्षितिजाकडे पाहत होता. पायतळीच्या पाण्यात त्याच्या गोजिरवाण्या मुखड्याचं प्रतिबिंब पडलं होतं. नदीचा वाहता प्रवाह, वर विशाल आकाश, मन भरून टाकणारा तो आसमंत !

राम कष्ट विसरला, त्रास विसरला, जाच विसरला, दुखरा खांदा विसरला. असा किती तरी वेळ तो उभा होता.

पाठीमागून मृदू-चिंब स्वरात हाक ऐकू आली... "राम... ए..." रामनं मागं वळून पाहिलं... "काका, तुम्ही !"

विनायकभट्टच होता. एरवी निर्विकार आणि कळाहीन असलेला त्याचा निबर चेहरा प्रेमानं विलक्षण डंवरलेला होता. त्याच्या डोळ्यांत भावना दाटून आल्या होत्या. हातांत फडक्याची झोळी होती, झोळीत काही तरी होतं.

"काका, मला हाक मारलीत ?" रामनं जवळ जाऊन विचारलं.

"होय रे बाळा. हे बघ, तुझ्यासाठी काय आणलयं."

"काय आहे ?"

"खरवस !"

"खरवस ! काका, तुम्ही ? इथं आणलात !"

"हो. चल तिकडं झाडाखाली बसू."

"चला काका; पण थांबा. एवढी कळशी टाकून येतो आधी. नाही तर काकू रागावेल.

"राहू दे ती कळशी. तू आधी खा बघू."

"बरं चला."

दोघे चुलते-पुतणे झाडाखाली जाऊन बसले. विनायकभट्टानं गाठ सोडली. आत केळीच्या हिरव्यागार पानावर पिवळसर पांढऱ्या खरवसाच्या टपोऱ्या वड्या होत्या. एक वडी विनायकानं रामच्या हातावर ठेवली.

"काका, तुम्ही पण खा ना."

"नको बाळा. मी काय घरी खूपच खातो. तुलाच मिळत नाही म्हणून आणला."

"काका, तुम्ही खरवस इथं का घेऊन आलात?" रामनं विचारलं. विनायकभट्ट काहीच बोलला नाही. मग तोंडातल्या-तोंडात पुटपुटल्यासारखं करून म्हणाला,

"सावलीत बसून खाता येत नसलं म्हणजे उन्हात बसून खावं लागतं; पण खाल्लं हे पाहिजेच."

"कॉय-म्हणालॉत-कॉकॉ," खरवसाचा तोबरा भरून रामनं विचारलं आणि पुन्हा एक वडी त्यानं उचलली.

"काही नाही. काही नाही. तू खा आपला," असं म्हणून विनायकभट्ट गुडघ्यात मान घालून बसला.

दूरवरून त्याला नारायणशास्त्री येताना दिसले. नारायणशास्त्री अलीकडेच माहुलीला येऊन राहिले होते. आतापर्यंतचं आयुष्य त्यांनी कर्नाटकात काढलं होतं. त्यांची मुलंबाळ तिकडंच स्थायिक झाली होती; पण उर्वरित काळ कोणत्या तरी शांत ठिकाणी जपजाप्य आणि देवदेवतार्चन करण्यात घालवण्याची इच्छा असल्यानं नारायणशास्त्र्यांनी निवासासाठी माहुलीची निवड केली होती. सत्तरी ओलांडलेले नारायणशास्त्री लोखंडाच्या कांबीसारखे टणक होते. डोईवरल्या पांढऱ्या केसांनीच त्यांचं म्हातारपण काय ते दिसायचं; पण तुळतुळीत श्मश्रू केलेली असली म्हणजे तेही दिसायचे नाहीत. नारायणशास्त्री एकटेच माहुलीत

राहत होते. देवभक्तीला आणि लोकसंपर्काला त्यांच्या जवळ भरपूर वेळ होता. त्यामुळे नारायणशास्त्र्यांची मठी म्हणजे जणू गावाची चावडी झाली होती. याबाबतीत नागेशभट्टाचं काम आता नारायणशास्त्री करीत होते.

नारायणशास्त्र्यांनी तरुण वयात काशीक्षेत्री राहून मोठ्या कष्टानं विद्या संपादन केली होती. दशग्रंथी ब्राह्मण होते ते. षड्दर्शनांचा त्यांचा अभ्यास मोठा होता. त्यांना श्रीमंताघरची अनेक आमंत्रणं येत. प्रवचन, पुराणं, सल्लामसलत, न्यायनिवाडा यासाठी नारायणशास्त्र्यांचं पाऊल त्या परिसरात प्रत्येक मोठ्या घरात पडलं होतं; पण नारायणशास्त्री सर्वसामान्य भटा-भिक्षुकाप्रमाणे दक्षिणा किंवा दान कधीच घेत नसत.

"विद्या विकली जात नाही," असं ते म्हणत. त्यांच्या या करारी, निरपेक्ष व निःस्वार्थी वृत्तीमुळे त्यांचा दरारा त्या भागात मोठाच होता. नारायणशास्त्री माहुलीत एकटेच राहत असल्यामुळे आणि त्यांच्या संतापी स्वभावामुळे त्यांचं जीवन काहीसं एकलकोंडं होतं; पण त्यालाही एक दुसरी बाजू होतीच. नारायणशास्त्र्यांच्या अवतीभवती माहुलीतल्या मुलांचा घोळका सतत असे. एखाद्या अजस्त्र आणि विशाल वटवृक्षानं आपल्या पायतळीच्या इवल्या झुडुपांना आणि गवताच्या पात्यांना सावली द्यावी त्याप्रमाणे नारायणशास्त्री मुलांना प्रेम देत होते. हा वृक्ष एका रोपट्यावर विशेष प्रेम करत होता. ते रोपटं म्हणजे प्रभुण्यांचा राम !

नारायणशास्त्र्यांना पाहताच विनायकभट्ट आदरानं उठून उभा राहिला. रामही उठला आणि दोघांनी नारायणशास्त्र्यांना नमस्कार केला. अगदी वाकून आणि विनम्रभावानं.

"आयुष्यमान् भव ! काय करताय रे इथं ?" नारायणशास्त्री आपल्या जाड्याभरड्या आवाजात म्हणाले.

"आजोबा, आम्ही खरवस खातोय," राम तोंडातला खरवसाचा घास गिळत म्हणाला.

"इथं ? नदीकिनारी ? उत्तम. . . बाळा, इथं स्नानसंध्या, अर्घ्यउदक हे करायचं का खरवस खायचा ?"

"काकांनी आणला, मी खाल्ला."

"घ्या शास्त्रीबोवा, आपणही घ्या. दोन दिवसांपूर्वीच गाय व्याली. घ्या."

विनायकभट्टानं एक तुकडा नारायणशास्त्र्यांच्यापुढे केला.

"विनायका, अरे मी आता काही खात नाही. तूच खाऊन टाक. बरं, एक आठवण झाली म्हणून विचारतो, रामची मुंज कधी करणार आहेस ?"

"खरं तर याआधीच करायला हवी होती," विनायकभट्ट काहीशा लाजिरवाण्या स्वरात म्हणाला.

"मग का नाही केलीस ?"

"राहून गेली खरी."

"अरे, शरीरपोषणासाठी अन्न, तसं मनाच्या पोषणासाठी हे संस्कार आवश्यक असतात. ब्राह्मणाचा मुलगा मुंजीविना राहिला तर . ."

"शास्त्रीबोवा, मला रामची मुंज करायची आहे; पण. . ."

"घरात अजून विचारलं नाही, असंच ना ?" नारायणशास्त्र्यांनी विनायकाच्या मनीची व्यथा ओळखली होती.

"तसं काही नाही; पण. . ." विनायक सारवासारव करीत म्हणाला, "मला जरा विचार केला पाहिजे."

"अतिविचार म्हणजे कार्यनाश," खणखणीत तीव्र आवाजात नारायणशास्त्री म्हणाले. त्यांच्या स्वरात जणू एक प्रकारे दरडावणीच होती.

"मग. . मग मी काय करू ?"

"उद्या मी रामची मुंज लावतो."

"काय ! तुम्ही ?. . . आपण ?" चकित झालेला विनायकभट्ट पुढे काही बोलूच शकला नाही.

"हो. हो. मी. अरे, मी गेली दोन-तीन वर्षं बघतोय. या पोराकडे तुमचं मुळीच लक्ष नाही. बरोबरच आहे. ज्या पोराला आईबाप नाहीत त्याला विचारणार कोण ? वाटेवर पडलेल्या फुलाला उचलून घेणार कोण ? वाऱ्याबरोबर उडून गेलं आणि देवाच्या डोक्यावर बसलं तर नशीब त्याचं. नाही तर असंच कुठं तरी हेलपाटत शेवटी कुणाच्या तरी पायदळी चुरडलं जाणार !. . ."

नारायणशास्त्र्यांच्या मुखातून एक एक अस्खलित शब्द ठिणगीसारखा बाहेर येत होता आणि विनायक अवाक होऊन ते ऐकत होता. नारायणशास्त्र्यांना थांबविण्याचं किंवा प्रत्युत्तर करण्याचं धैर्य त्याच्या ठायी नव्हतं. शिवाय नारायणशास्त्र्यांचा अधिकारच तसा मोठा होता. विनायकभट्ट अधिकच

केविलवाणा झाला. त्याच्या चेहऱ्यावरचे आर्जवी भाव अधिक गहिरे दिसू लागले. त्याची हतबुद्धता त्याच्या निस्तेज डोळ्यांत अधिक उठून दिसत होती. ते पाहून नारायणशास्त्र्यांचा पारा जरा खाली आला. त्यांचा कठोर स्वर मृदू झाला. अंगारासारख्या फुललेल्या डोळ्यांत कणव पाझरू लागली. विनायकाच्या पाठीवर थोपटून ते म्हणाले,

"विनायका, अरे मी बोलतो ते केवळ बोलायचं म्हणून बोलत नाही.अंतरीच्या कळवळ्यानं बोलतो. हिऱ्याला पैलू पाडावेच लागतात, सोनं मुशीत घालावंच लागतं, तशी मुलांची मुंज करावीच लागते. जेवणावळी नाही घातल्यास तरी चालतील; पण संस्कार मात्र झालाच पाहिजे."

"शास्त्रीबुवा, खरं आहे. मी आता त्याच विचारात आहे."

"नुसता विचारात नको. प्रत्यक्ष काही तरी कर. नाही तर असं कर. उद्या पहाटे लवकर तू तुझ्या बायकोला आणि रामला घेऊन माझ्या मठीवर ये. आपण मुंज लावून टाकू. देवक तू बसवायचंस."

"उद्याच ?"

"हो, उद्याच. कारण परवा संध्याकाळी मी जाणार आहे कोकणात. सावंतवाडीच्या राजेसाहेबांनी बोलावलंय."

"तसं नको शास्त्रीबुवा. रामची मुंज मी चांगली साग्रसंगीत करीन. तुम्ही कोकणातून आल्यावरच करू."

"पाहा बरं, नाही तर तेव्हाही असंच काही तरी सांगशील."

"नाही शास्त्रीबुवा. कृष्णेच्या वाहत्या पाण्याची शपथ घेऊन सांगतो, मी रामची मुंज लवकर करीन."

मग दोघे जण नारायणशास्त्रींच्या पुन्हा पाया पडले. त्यांनीही आशीर्वाद दिला, "चिरंजीव व्हा !"

नारायणशास्त्री तिथून गेले; पण विनायकच्या मनाला चुटपूट लावून गेले. विनायक घरी गेला. त्यानं कुणालाही काही विचारलं नाही. पंचांग काढलं आणि महिन्यानंतरचा एक मुहूर्त पाहून मुंजीचं नक्की करून टाकलं. घरात थोडी धुसफूस झाली. चडफड झाली; पण ती तेवढीच. आपली धुसफूस कोणी मनावर घेत नाही असं कळल्यावर ती धुसफूस तिथल्या तिथं विझली. आते कोल्हापूरला तिच्या सावत्र मुलाकडे होती. तिला निरोप गेला आणि कोल्हापुरावरून उलट

निरोप आला,

"त्रयोदशीला आतेचा दहावा दिवस आहे. विनायकला बोलवलंय."

हा निरोप ऐकताच विनायक सुन्नसा झाला. आतेचा फार मोठा आधार त्या घराला होता. कोणत्याही लग्नकार्यात तर मोठेपणी पुढं होऊन सारं काम करणारं माणूस आता उरलं नव्हतं. रामच्या मुंजीत आते आली तर बराचसा भार हलका होईल हे विनायकला ठाऊक होतं, म्हणून तर त्यानं आतेला आग्रहानं बोलावून घेतलं आणि निरोप हा असा आला; पण आता मांडलेला मांड काही उधळता येत नाही, की बांधलेलं तोरण तोडता येत नाही.

घरात मुंजीची तयारी सुरू झाली. दळणंकांडणं होऊ लागली. उन्हात वाळवणी पडू लागली. विनायक भट्टानं ठरवलं होतं की, कशात कमी म्हणून काही करायचं नाही. मुंजघर आता चांगलं मुला-माणसांनी भरलं होतं. सूर्योदयाबरोबरचा मुहूर्त होता. आदल्या रात्री राम देवघरात गेला आणि तिथंच झोपला. एकटाच. पहाटे मातृभोजन होतं. मातृभोजनाला चुलतीच घास भरवणार होती.

रात्री देवघरातून मुसमुसण्याचा आवाज आला. विनायकभट्ट जागा झाला आणि त्यानं पाहिलं तो काय ! गुडघ्यात मान घालून राम बसला आहे, त्याच्या डोळ्यात पाणी आणि त्याला हुंदके आवरत नाहीत.

विनायकभट्ट चटकन आत गेला आणि रामला पोटाशी धरून म्हणाला,

"रामा, कारे बाबा डोळ्यांत पाणी ?"

"काका !"

"काय झालं ? सांगशील का नाही."

"नाही काका... मला सांगता येणार नाही..." असं म्हणून राम हमसाहमशी रडू लागला.

"गप बाळा, मला सांग नं काय झालं ते."

"मी सांगितलं तर उद्या माझी मुंज होणार नाही काका."

"का ?"

"घरात भांडणं होतील."

"अरे पण का ? कुणाची भांडणं ? सांगशील का नाही."

"काकूंच्या माहेरच्या त्या बाई आल्यात ना, त्या म्हणाल्या की..."

"काय म्हणाल्या ते सांग लवकर."

"म्हणाल्या की, आई-बापाबरोबर हा का नाही उलथला लवकर."

"त्या असं म्हणाल्या ?'

"हो."

"थांब," असं म्हणून विनायकभट्ट त्वेषानं उठून जाऊ लागला. रामनं त्याच्या धोतराचा सोगा धरला आणि आर्तपणे म्हणाला,

"काका, आत्ता मध्यरात्र आहे. उद्या मुंज आहे माझी. आता कुणाला, काही बोलू नका. आता बोललात तर घराची शांतता बिघडेल. म्हणून मी एकटाच इथं येऊन बसलो."

डोळे पुसत राम म्हणाला, "काका, मी रडणार नव्हतो; मला रडणं आवडत नाही; पण आज मला सहन नाही झालं, काका."

"हो, हो. खरं आहे तुझं म्हणणं."

"काका, मला बाबांची फार आठवण होते."

"आणि आईची ?"

"आई मला आठवतच नाही."

"कशी आठवेल तुला? अजून पुरे डोळेसुद्धा उघडले नव्हतेस तू तर आमच्या हवाली करून निघून गेली पार्वतीवैनी तुला."

"काका, आज आई असती तर . ." रामच्या डोळ्यांतून टिपं आली.

मग रात्री उरलेला वेळ विनायकभट्ट रामच्या शेजारीच पहुडला. पहाटेचा शुक्र उगवायला त्याला जाग आली. त्यानं रामला उठवलं. तिथून पुढचे विधी यथासांग उरकले. भांडणतंटा, धुसफूस, खळखळ, काही झालं नाही. मुंज चांगली झाली. प्रभुण्यांचा राम बटू झाला. छातीवर जानवं रुळू लागलं. कमरेला लंगोटी आली आणि गोपद्माएवढा घेरा आला. मुंजविधी पार पडला तेव्हा विनायकभट्टानं निःश्वास सोडला आणि एका फार मोठ्या जबाबदारीतून मुक्त झाल्याच्या आनंदात त्या रात्री तो गाढ झोपी गेला.

* * *

"राम, ए रामाऽऽ. . . येतोस का रे शेतावर ?" कुलकर्ण्यांच्या विसूची हाक आली. तशी प्रभुण्यांचा राम पाटावरून लंगोटी सावरत सावरत उठला. गायत्री मंत्रानंतर 'अस्त्राय फट्' करताना त्याला फार मजा वाटायची. तीन-चार वेळा तसं

करून आणि आचमनं घेऊन 'सर्वदेव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति' असं तो घाईघाईनं म्हणाला आणि बाहेर पळाला. काकू मागच्या अंगणात काहीसं पाखडत होत्या. विनायकभट्ट साताऱ्याला गेले होते. घरात तशी सामसूम होती. पंचा गुंडाळून आणि वर कोपरी अडकवून राम बाहेर पडला. विसू थांबलाच होता. दोघं हात धरून अनवाणी पायांनीच धूम पळत होते.

"देशमुखांच्या वावरात बांधाला ओळीचे आंबे आहेत," विसू म्हणाला, "चल, तुला दाखवतो."

"अरे, मग ओळीच्या आंब्याखाली काय सावलीत जाऊन पडायचं आहे तुला न मला ?" रामनं विचारलं.

"सावलीत पडायचं कशाला, झाडावर चढायचं महाराज, आवाज ऐकलात ? कोकिळेचा... आंब्याचा मोहोर ! कुठं-कुठं कैऱ्या, कुठं पाडाचे आंबे, चल मौज करू या आज."

विसूनं हे सांगताच रामच्याही तोंडाला पाणी सुटलं. काट्याकुट्यांतून, डोईवर ऊन असताना, दोघं पळत होते.

देशमुखांचं वावर लांबच-लांब विस्तृत पसरलं होतं आणि त्याच्या दुसऱ्या टोकाला बांधावर आंब्याची झाडं ओळीनं होती. आंब्याच्या झाडांना कुठं-कुठं मोठ्या गोटीएवढ्या कैऱ्या लटकल्या होत्या. वावरात आता कुणीच दिसत नव्हतं. सारे कुळवाडी अन् गडी दुपारच्या सावलीला निपचित विश्रांती घेत पडले होते. कुलकर्ण्यांचा विसू खाली उभा राहिला आणि प्रभुण्यांचा राम खारीसारखा सरसर झाडावर चढला. एक एक कैरी तोडून तो खाली टाकत होता. खाली जमिनीवर पडल्यावर प्रत्येक कैरीचा रप्प आवाज येत होता.

"राम, अरे पळ... तो बघ देशमुखांचा गडी येतोय," असं म्हणून विसूनं मागच्या मागं पळ काढला. तो आपल्या मित्रासाठी रामसाठी थांबलाही नाही. रामला आश्चर्य वाटलं. सगळीच मुलं कैऱ्या पाडायला येतात तसे आपण आलो. विसूला एवढं घाबरायचं कारण !

देशमुखांचा गडी पळत येत होता. तरी त्याची आकृती अशी होती, की, एखादी दगडाची भली मोठी शिळा पुढं सरकत आहे, असं वाटत होतं. आपल्या खुरट्या मिशांना पीळ भरत तो म्हणाला,

"ए पोरा, खाली उत्तर. तुझी पाठ तिंबतो."

"हा आलो खाली," असं म्हणून रामनं धपकन खाली उडी मारली आणि तो गड्यासमोर उभा राहिला.

"चोर हायेस का रं ?"

"कुणाला चोर म्हणता ? मी यातली एकही कैरी अजून घेतलेली नाही."

"मग कैऱ्या झाडावरनं खाली जमिनीवर कशा आल्या ?"

"मीच काढल्या."

"कुणाच्या परवानगीनं ?"

"कुणाच्या नाही. विसू म्हणाला चल कैऱ्या पाडू."

"आस्सं. चल आता देशमुखांसमोर तुला आडवा पाडतो अन् कैरीचं लोणचं घालतात तसं तुझं घालतो," असं म्हणून गड्यानं सगळ्या कैऱ्या भराभर गोळा केल्या आणि रामच्या बखोटीला धरून तो त्याला फरफटत नेऊ लागला. रामनं त्याच्या हाताला हिसडा मारून स्वत:ला मोकळं करून घेतलं आणि तो म्हणाला, "असं ओढत नेण्याची काही जरूर नाही. मी कैऱ्या पाडल्या आहेत. मी यायला तयार आहे."

देशमुख वाड्याच्या पाठीमागच्या बाजूला एका चौथऱ्यावर बसले होते. त्यांचा प्रशस्त देह पाहून रामच्या मनात विचार आले, एका चौथऱ्यावर दुसरा चौथरा बसवला आहे. . . आणि तो खुदकन स्वतःशीच हसला आणि ते पाहून देशमुख गरजले,

"काय रे, कोण तू ?"

"धनी, चोराला पकडून आणलाय," गड्यानं सांगितलं आणि त्यानं पाठीवरच्या झोळीत गोळा केलेल्या कच्च्या हिरव्या कैऱ्यांची रास देशमुखांपढे ओतली. देशमुखांनी एकवार त्या कैऱ्याकडे आणि एकवार रामकडं निरखून पाहिलं. आणि पुन्हा ते गरजले,

"या कैऱ्या तू पाडल्यास ?"

"हो."

"का ?"

"खाण्यासाठी."

"ही चोरी आहे."

"नाही," राम निश्चयपूर्वक म्हणाला.

"नाही ?" देशमुखांच्या रुंद कपाळावर आठ्यांची जाळी तयार झाली होती. त्यांच्या भुवया उंचावल्या होत्या आणि चेहऱ्यावर क्रोधमिश्रित आश्चर्य प्रकटलं होतं.

"ही चोरी नाही ?" त्यांनी पुन्हा विचारलं.

"नाही. मी चोरी अजून तरी केलेली नाही; कारण सगळ्या कैऱ्या तुमच्या पुढ्यात आहेत आणि यापूर्वी त्या तुमच्या गड्याजवळ होत्या."

रामच्या या कायदेबाज उत्तरानं देशमुख आणखीच थक्क झाले. एवढ्याशा चिमुरड्या पोरानं उत्तर देताना इतकं सफाईदार उत्तर द्यावं, याचंच त्यांना आश्चर्य वाटलं. मनातून रामचं कौतुकही वाटलं; पण वरून तसं न दाखवता शक्य तितक्या कठोर आवाजात ते पुन्हा ओरडले,

"चोरी केली नसलीस तरी चोरी करण्याचा तुझा विचार होता खरं की नाही बोल !"

"चोरी करण्याचा नव्हता. कैऱ्या खाण्याचा होता."

"कैऱ्या कुणाच्या झाडाच्या ?"

"आपल्या. देशमुखांच्या."

"दुसऱ्याची वस्तू त्याला न विचारता नेणं याला काय म्हणतात ?"

"चोरीच म्हणतात; पण आपल्याकडे अशी पद्धत आहे की, शेतातला ऊस, हरभरा, झाडावरचे आवळे, आंबे कुणी मुलांनी केवळ खाण्यासाठी तोडले तर त्याला चोर म्हणत नाहीत. मला कैऱ्या विकायच्या नव्हत्या, फक्त खायच्या होत्या," राम स्पष्ट शब्दांत आणि स्वच्छ स्वरात म्हणाला.

रामच्या या बिनतोड उत्तरानं तर देशमुख बसल्या जागी थिजून गेले होते. रामची तर्कबुद्धी, त्याचा युक्तिवाद, त्याची बोलण्याची पद्धत आणि तरीही त्याचं असणारं धाष्ट्र्य यांबद्दल देशमुखांच्या मनात कौतुकाचे तरंग निर्माण झाले होते. 'हा मुलगा इतर मुलांहून काही वेगळा आहे,' हे त्यांना पटलं होतं; पण त्याची आणखी व्यूहपरीक्षा घ्यावी म्हणून देशमुख म्हणाले, "आपल्याकडे काय पद्धत आहे, हे तू मला शिकवू नकोस. मी म्हणतो ही चोरीच आहे."

"आहे."

"कबूल ?"

"कबूल."

"मग याबद्दल तुला शिक्षा ?"

"काहीही आणि कोणतीही करा. मी भोगायला तयार आहे." हे बोलताना रामच्या डोळ्यांत विलक्षण निश्चय दिसत होता. तो भ्यालेला तर नव्हताच; पण चेहऱ्यावरचे भाव तीव्र होते.

"पुढे ये," देशमुख म्हणाले.

राम थोडा पुढे सरकला. देशमुख चौथऱ्यावरून उठले. दोन खुंट्यांवर आडवा ठेवलेला वेत त्यांनी हातात घेतला, डोळे मोठे करीत ते पुढं आले आणि त्यांनी गड्याला खुणावून सांगितलं,

"कैऱ्या भर."

गड्यानं एका टोपलीत सगळ्या कैऱ्या भरल्या. देशमुख हळूहळू रामच्या बाजूनं पुढे येत होते. हातातला वेत ते फिरवत होते. राम खडेखांब उभा होता. देशमुखांचा चेहरा आता अधिक उग्र दिसत होता. त्यांनी घसा खरवडून विचारलं,

"विनायकभट्टाचा पुतण्या नव्हे का तू ?"

"हो."

"म्हणजे विश्वनाथाचा मुलगा ?"

"हो."

"चांगला ब्राह्मणाचा पोर ! संध्या-वैश्वदेव करायचं सोडून हे उद्योग करतोस !"...

आता देशमुख रामच्या अगदी जवळ आले. त्यांनी हातातला वेत उगारला. रामच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. तो पुतळ्यासारखा निश्चल होता. आर्तता नाही की आर्जवं नाहीत, भय नाही की व्याकुळता नाही...

...आणि

देशमुखांची चर्या बदलली. हातातला वेत गळून पडला. देशमुख मृदू झाले. ओरडण्याऐवजी ते प्रसन्नपणे हसू लागले आणि रामच्या पाठीवर थोपटत ते म्हणाले,

"शाबास बाळा ! आपण तुझ्यावर प्रसन्न आहोत. अरे, तुझ्या वयाची इतर पोरं असती तर घाबरली असती. तू गुन्हा कबूल केलास आणि शिक्षा भोगण्याचं धैर्य दाखवलंस याबद्दल तुझं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. घे, या सगळ्या

कैऱ्या तुझ्याच आहेत, घे" असं म्हणून देशमुखांनी कैऱ्यांनी भरलेली ती टोपली रामच्या पुढे केली.

राम म्हणाला, "मला इतक्या कैऱ्या नकोत. मी यातल्या दोनच खाणार होतो. तेवढ्या घेतो."

"बरं बरं. दोनच घे," हसून देशमुख म्हणाले आणि त्यांनी आपल्या गड्याला फर्मावलं, "या सगळ्या कैऱ्या विनायकभट्ट प्रभुण्यांच्या घरी पोचत्या कर. आणि हे पाहा, हा मुलगा आणि त्याचे कुणीही मित्र आपल्या शेतात आले तर त्यांना कधीही हटकायचं नाही. समजलं ?"

गड्यानं समजल्यासारखं करून मान हलवली, तो 'जी' म्हणाला आणि त्यानं एकवार अपराधी भावनेनं रामकडे पाहिलं.

राम घरी परतला. यातलं त्यानं घरी काहीच सांगितलं नव्हतं. संध्याकाळी पाण्याच्या चार घागरी नदीवरून आणायच्या होत्या. दिवेलागणीला शेवटची घागर आणून त्यानं स्वयंपाकघरातल्या मोठ्या पातेल्यात ओतली, तेव्हा त्याची काकू मोठमोठ्या आवाजात कुणाला तरी सांगत होती,

"आज देशमुखांकडून आमच्याकडे कैऱ्या आल्या. मग लगेच लोणचं घालून टाकून मोकळी झाले."

लोणच्याचा खमंग वास सगळीकडे दरवळला होता. त्या काळी मोठमोठे खानदानी जमीनदार आणि घरंदाज शेतकरी विद्वान ब्राह्मणांना आपल्या मळ्यातील धान्यधुन्य, भाजीपाला, फळाफळावळ भेट म्हणून पाठवीत असत. आदरसूचक अशी ती भेट असे. अशी भेट पाठवणं हे मोठेपणाचं लक्षण आणि भेट स्वीकारणं हे सन्मानाचं लक्षण समजण्यात येत असे. देशमुखांचा त्या भागात असाच लौकिक होता. पिढ्यान्‌पिढ्यांची गर्भश्रीमंती त्यांच्या घराण्याला वारशानं लाभली होती. देशमुख स्वतःही ही परंपरा मोठ्या इतमामानं संभाळीत होते. देवधर्म, कुळाचार या निमित्तानं त्यांच्या घरी भटा-भिक्षुकांना आसरा मिळत होता, तर प्रवचन-पुराणांच्या निमित्तानं विद्वान पंडितांचा त्यांच्या घरी राबता होता. गावातील काही निवडक ब्राह्मण कुटुंबाना देशमुख हस्ते परहस्ते मदत करीत असत. देशमुखांकडून आहेर मिळणं हे गौरवाचं समजलं जाई. नागेशभट्टाच्या कारकीर्दीत प्रभुणे-देशमुखांचे चांगले संबंध होते; पण त्यानंतर संबंध फारसा आलाच नाही. विनायकभट्टाला तर देशमुखांकडून असा आहेर कधीच मिळाला

नव्हता. त्यामुळे विनायकभट्टाच्या बायकोला आज विशेष वाटत होतं. आज देशमुखांनी त्याचा सन्मान केला होता. टोपलीभर कैऱ्या प्रभुण्यांच्या घरी देशमुखांकडून गड्याहाती पाठवल्या होत्या आणि त्याबद्दल विनायकभट्टाची बायको इतरांना पुन्हा-पुन्हा सांगत होती.

रात्री विनायकभट्ट घरी आला. संध्या आटोपून तो पाटावर बसला. रामचं जेवण आधीच झालं होतं. तो मागच्या अंगणात गुरांना पेंड देत होता.

"आज लोणचं छान झालंय," विनायकभट्ट म्हणाला.

"देशमुखांच्या घरून आज गड्याहाती कैऱ्या आल्या."

"देशमुखांकडून ?... छान..."

"टोपलीभर आहेत, तुमचा लौकिक देशमुखांच्या कानी गेलेला दिसतो. त्यांनी आपणहून पाठविल्या."

"माझा लौकिक ? माझा कसला लौकिक !" विनायकभट्ट ते शब्द झटकून टाकीत म्हणाला.

"अहो, त्याशिवाय का देशमुखांनी एवढ्या कैऱ्या पाठविल्या ?"

असं विनायकभट्टाची बायको म्हणत असतानाच राम आला. त्याची आणि विनायकभट्टाची नजरानजर झाली. चुलता-पुतण्या एकमेकांकडे बघून हसले. जणू विनायकभट्टाला म्हणायचं होतं—

"मला खरी गोष्ट ठाऊक आहे. देशमुखांनी कैऱ्या का पाठविल्या ते मला माहीत आहे."

राम काहीच बोलला नाही. तो ओसरीवर निघून गेला. विनायकभट्ट म्हणाला, "आज लोणचं चांगलं लागतंय; कारण आजच्या कैऱ्यांना वेगळी चव आहे."

"म्हणजे ? मी लोणचं केलं त्याचं काहीच नाही का ?"

"तू लोणचं नेहमीच चांगलं करतेस; पण आजच्या कैऱ्यांचा गुणच काही वेगळा."

"तो कसा काय ?" तिची प्रश्नमुद्रा.

विनायकभट्टाला येताना सगळी हकिगत समजली होती. रामनं केलेला चोरीचा प्रयत्न, देशमुखांघरी त्याचा झालेला संवाद, सर्व त्याला येतानाच ठाऊक झालं होतं. देशमुखांच्या गड्यानं वाटेत भेटल्यावर त्याला हे सर्व सांगितलं होतं. विनायकभट्टाच्या अंगावर ते सारं ऐकताना रोमांच उभे राहिले होते. रामच्या

कर्तृत्वाच्या वर्णनानं त्याचा ऊर भरून आला होता आणि आता तर बायको म्हणत होती, "आपला लौकिक त्यांच्या कानी गेला वाटतं !"

"होय ! लौकिकच; पण कुणाचा ? माझा नव्हे. या रामचा." अशा विचारांनी त्याच्या मनात आता गर्दी केली होती. रामचा निश्चयी आणि करारी स्वभाव, त्याची सोशिक वृत्ती यांचं अगदी नव्यानं दर्शन विनायकाला झालं होतं आणि या दर्शनानं त्याचे डोळे दिपले होते.

आपल्या बायकोची आपल्या कर्तृत्वाविषयीची गोड समजूत कशी काढून टाकावी आणि रामचा लौकिक तिच्या कानी कसा घालावा या चिंतेत असतानाच कुलकर्ण्यांचे अप्पाजी घरात घुसले. ते आले तेच तरातरा आणि बोलायला लागले ते अगदी वीज कडाडू लागल्यासारखे.

"अरे विनायका, तुझ्या त्या राम्याला जरा अक्कल शिकव. त्याच्या नादानं आमची पोरं कुठंही सैरावैरा धावतात आणि कुणाचीही बोलणी खातात."

"अप्पाजी, झालं काय ते तरी सांगा," विनायकभट्ट शांतपणे म्हणाला.

"ते तुला मी आधी सांगितलंच आहे. आज आमचा विशा आणि तुझा राम्या, गेले होते शेण खायला..." अप्पाजी पुन्हा दातओठ खाऊन म्हणाले.

"तुम्ही काय म्हणताय ते मला नीट समजलं नाही. राम आणि विसू कुठे गेले होते ?"

"देशमुखांच्या वावरात. ओळीच्या आंब्याकडे. तुझ्या राम्यानं नेलं त्याला. स्वतः सुटला आणि विशाला मात्र देशमुखांचा गडी येऊन वाटेल तसं बोलला."

बाहेरच्या अंगणात राम गुरांसाठी वैरणीच्या पेंड्या तयार करत होता. हातातला मोठा विळा फेकून देऊन तो ताडकन आत आला आणि म्हणाला,

"चूक... मी आणि विसू देशमुखांच्या शेतात गेलो होतो हे खरं. आम्ही कैऱ्या पाडल्या हेही खरं; पण..."

"पण काय ! बोल ना आता. आता उचकट तुझी जीभ .. अरे ब्राह्मणाचा पोर ! एवढा घोड्यासारखा वाढलास, स्नानसंध्या नाही... अरे, तुला साधं 'रामो हरिः'सुद्धा येत नाही. तुझ्या वयाची पोरं बघ... कौमुदी म्हणतात. तुला कारिका म्हणता येत नाही. आपण उनाडतो ते उनाडतो आणि दुसऱ्यांच्या मुलांना बरोबर घेऊन जातो... काय रे ए, शंखोबा !" असं म्हणून अप्पाजी पुढं आले आणि त्यांनी रामचा कान जोरात पिळला. अप्पाजी वयस्कर होते. त्यांना गावात मान

होता. म्हणून विनायकभट्टाला काहीच बोलता आलं नाही; पण त्यांनी अशा रीतीनं रामला बोलावं, त्याचा कान पिळावा, हे मात्र त्याला आवडलं नाही; पण त्याला बोलता आलं नाही.

"अप्पाजी, रामचं जरा ऐकून तर घ्या." विनायक समजावणीच्या सुरात म्हणाला.

"तूही त्याचीच कड घेतोस का रे ?" अप्पाजी आणखीच पिसाळले.

"माझी कड घेण्याचा प्रश्न नाही. माझी बाजू सत्य आहे. तुमचा विसूच मला बोलवायला आला होता. मी नाही त्याला नेलं."

"खोटं, धांदात खोटं." थयथया नाचल्यासारखे पाय आपटत अप्पाजी म्हणाले, "आमचा विशा आपणहून कुणाच्या पाचोळयावरसुद्धा पाय द्यायचा नाही. मग चोरी करण्याची गोष्टच सोडा."

"पण त्यानं देशमुखांच्या शेताच्या बांधावर पाय दिला आणि तो देण्यासाठी त्यानं मलाही बरोबर नेलं," राम तितक्यात स्पष्टपणे म्हणाला.

"विनायका, तुझा हा दिवटा पुतण्या आता फार पुढे जायला लागला बरं. वेळीच त्याला आवर, नाही तर पश्चात्ताप करायची पाळी येईल तुझ्यावर."

आणि मग माजघराच्या दाराआडून आवाज ऐकू आला–

"अप्पाशास्त्री, हे तुम्हीच सांगता म्हणून बरं. सोनारानं कान टोचलेले बरे असतात. मी यांच्या कानीकपाळी दोन वर्षं ओरडतीय; पण काही उपयोग नाही. आता तरी यांचे डोळे उघडतील."

इकडून अप्पाशास्त्री, तिकडून बायको, मधे विनायकभट्ट आणि समोर राम !

मग विनायकाच्या अंगात काय संचारलं कुणास ठाऊक; पण त्यांची मवाळ मृदू चर्या बदलली. त्यांच्या आवाजाला धार आली आणि त्यांच्या थंड नजरेत निखारे फुलले.

"तुम्ही दोघंही आक्रस्ताळे आहात," विनायकभट्ट म्हणाला, "अप्पाजी, खरी गोष्ट तुम्हाला माहीत नाही."

"विनायका, धन्य तुझी ! अरे, या तुझ्या पराक्रमी पुतण्यासाठी माझ्या पांढऱ्या केसांचा अपमान करतोस !"

"अप्पाजी, पांढऱ्या केसांनीही आपला आब राखून वागावं."

विनायकाचे हे शब्द ऐकून मात्र अप्पाजींचे डोळे पांढरेफटक झाले.

आतापर्यंत त्यांनी त्याच्या तोंडून इतके कठोर शब्द कधीच ऐकले नव्हते. त्यांचा अपेक्षाभंग झाला होता.

"अस्सं ! मला खरी गोष्ट माहीत नाही ? मग मी जातोच कसा," असं म्हणून अप्पाजी जाऊ लागले. विनायक पुढे गेला आणि अगदी मधाळ आवाजात त्यांना म्हणाला,

"अप्पाजी, तुमचा अवमान करावा हा माझा हेतू नव्हता; पण खरंच सांगतो, रामचा यात काही दोष नाही. उलट देशमुखांनी रामचा सन्मान केलाय. रामला शिक्षा करण्याऐवजी त्यानं पाडलेल्या सगळ्या कैऱ्या देशमुखांनी आमच्या घरी पाठविल्या आहेत."

"अहा रे ! विनायकभट्टा ! अरे विश्वनाथाचा भाऊच का तू ? बाळकृष्णभट्टाचा मुलगाच का रे ? नागेशभट्टाचा कुलदीपक ना तू ?" हात नाचवीत अप्पाशास्त्री म्हणाले, "अरे किती लाचार, किती लाळघोट्या तू ? एवढ्याशा कैऱ्या देशमुखानं पाठविल्या तर तुझ्या अंगाला मोहर आला. छीः छीः !" असं म्हणून अप्पाशास्त्र्यांनी डोळे मिटून घेतले. कानांवर हात ठेवून डोकं गच्च दाबून धरलं आणि जणू काही आपणावर ब्रह्मांड कोसळतं आहे, असा देखावा केला आणि अखेर पाय आपटत ते निघून गेले.

* * *

सकाळ झाली. मागल्या अंगणातल्या डाळिंबीच्या खाली थापलेल्या वाळक्या शेण्या राम गोळा करीत होता. विनायकभट्ट पाठीमागून आला आणि त्यानं रामचे दोन्ही खांदे धरून गदागदा हलवले आणि म्हणाला,

"खरं सागं रामा, काल काय घडलं ?"

"काका, तुम्हाला जे आणि जसं कळलं ना तसंच घडलं. मीदेखील तुम्हाला तसंच सांगितलं."

"अगदी खरं ना हे ?"

"माझ्या गळ्याची..."

"अं हं... अशी ऊठसूठ गळ्याची शपथ घ्यायची नाही."

त्याचा हात धरून विनायकभट्ट म्हणाला, "पण हे पाहा. पुन्हा तू असा कुणाच्या शेतात जाऊच नको आणि कागाळ्या आणू नको. मला माहीत आहे राम, गावातली इतर पुष्कळ मुलं तुझ्यापेक्षा उनाड आहेत; पण तुझी याबाबत

ख्याती झाली आहे ना. मग त्यांनी करायचं आणि तुझं नाव घ्यायचं. त्यापेक्षा तू कुणाबरोबर जातच जाऊ नको."

"नाही जाणार काका. तुम्हाला वाटतं ना मी जाऊ नये, मग नाहीच जाणार. मलासुद्धा काका, खोटं बोलणारी, भित्री, पळपुटी माणसं आणि मुलं आवडतच नाहीत. अप्पाजींचा विसू पळपुटा, भित्रा आहे. खोटं तर नेहमीच बोलतो."

"अरे, तू कितीही खरं बोललास तरी लोकांना त्याचं काय ? आता आजचं बघ, तो विसू सुटला आणि अप्पाजींनी तुझ्या नावाचा बभ्रा केला गावभर."

"पण देशमुखांनी तर माझी पाठ थोपटली काका !"

"ती देशमुखांच्या वाड्यात. गावात तुझी पाठ बडविली जायला हवी असंच म्हणतात लोक."

"अहो, जगावेगळे चुलते-पुतणे. सकाळची सगळी कामं तश्शी राहिली आहेत. अगदी झाडाखाली, सावलीला कानगोष्टी करीत बसला आहात. पाणी कुणी भरायचं ?" असं म्हणत तरातरा काकू आतून आली. तिनं एक मोठी घागर दाणकन रामच्या पुढ्यात आपटली. तिचा तो अनाठायी आवेश पाहून विनायकाला हसू आलं. आणि विनायक हसला म्हणून राम हसला. मग काय ! आगीत तेल ! तोफेत आणखी दारू भरली गेली. आणि मग जो भडिमार सुरू झाला, त्याला तोंड देता-देता विनायकाला पुरेवाट झाली.

* * *

राम पाण्यासाठी नदीवर निघून गेला. विनायकभट्टाला पुढच्या आठवड्यात वडूजच्या सावकाराकडून आमंत्रण आलं होतं, सप्तशतीचे पाठ महिनाभर वाचून शेवटी ब्राह्मणभोजन घालण्याचा सावकाराचा बेत होता. त्याची तयारी विनायकानं सुरू केली होती. स्वयंपाकघरात डोकावून विनायक म्हणाला,

"हे पाहा, पुढल्या आठवड्यात मी जाणार आहे वडूजला. महिनाभर येईन असं वाटत नाही. घर सांभाळा."

"आजच का सांगता ? यापूर्वी कधी तुम्ही असे गेला नव्हता वाटतं ? का या वेळी सांगावंसं वाटलं तुम्हाला ?"

"रामसाठी. अलीकडे तुमची आणि त्याची गाठ म्हणजे सापामुंगसाची भेट. . ." हसून विनायक म्हणाला.

"बाई, बाई, बाई ! आता मात्र अगदी हद्द झाली. मी साप होय ! काही वाटतं

का बोलायला !"

"बरं तू मुंगूस. मग झालं; पण हे बघ, मुंगूस म्हणजे काही सर्वगुणसंपन्न नव्हे. तेसुद्धा रक्ताला चटावलेलंच असतं."

"मी काही कुणाच्या रक्ताला चटावलेली लाव नाही. चांगली त्याची चुलती आहे. तो माझा पुतण्या आहे."

"आहे ना ? मग सांभाळा त्याला. पोर आहे..."

"जसं काही मी त्याला विषच घालतीय ! एवढा कळवळा येत असेल आणि माझ्याविषयी..."

"अगं तसं नव्हे..." तिला थांबवत विनायक म्हणाला.

"माझ्याविषयी एवढी खात्री नसेल तर त्याला न्यावा बरोबर वडूजला सप्तशती वाचायला."

"नेलं असतं गं; पण त्याला सप्तशती येते कुठं वाचायला."

"नाही ना येत ? मग त्याला इथं पाणी भरू द्या, शेण्या थापू द्या आणि गुरांना वैरण चारू द्या. त्याची तीच लायकी आहे."

...यावर विनायकाला काही बोलता आलं नाही. खरोखरीच रामला काही येत नव्हतं. ब्राह्मणाच्या मुलांना ज्या वयात जे धर्म-कर्म यावं अशी अपेक्षा होती, त्यातलं काहीच रामला येत नव्हतं. मुंज केली म्हणून संध्येची चार आचमनं घेण्यापलीकडे त्याला काहीच माहिती नव्हती. वैश्वदेव, अभिषेकासाठी लघुरुद्र, पुरुषसूक्त. . . काही काही नाही. विनायकाला मनातून खेद वाटत होता; पण करतो काय ! रामचं वयही आता कान धरून पाठाला बसविण्याचं राहिलेलं नव्हतं. त्यानं आता दशक केव्हाच ओलांडलं होतं. त्याचे अवयव आता भरू लागले होते.

वडूजला जायला निघताना विनायकानं देवाला नमस्कार केला आणि रामनं विनायकाला नमस्कार केला. तेव्हा विनायकभट्ट भरल्या आवाजात मोठ्या कष्टानं एवढंच म्हणाला, "सांभाळ हो रामा."

...रामच्या डोळ्यांत तरारलेलं पाणी गालांवर ओघळून वाळून गेलं होतं.

¤

# ४

“सहस्रशीर्षा, सहस्राक्ष, सहस्रपाद,
सभूमिं विश्वतोवृत्त्वा, अत्यतिष्ठ दशांगुलं...”

शंकरशास्त्र्यांच्या पाठशाळेतले विद्यार्थी एकसुरात पुरुषसूक्त पाठ करीत होते. माहुलीक्षेत्री संगमाच्या शेजारी नदीतीराला लागून असलेली ही पाठशाळा ख्यातनाम होती. शंकरशास्त्र्यांच्या पाठशाळेत माहुलीच्या यच्चयावत ब्राह्मणांची मुलं 'संथा' घेण्यासाठी येत असत. शंकरशास्त्र्यांचा दबदबा मोठा होता. कर्मठ ब्राह्मण, सनातनी गृहस्थ आणि कडक शिस्तीचे गुरुजी अशी माहुलीतच काय पण पंचक्रोशीत आणि आसपासही त्यांची प्रसिद्धी होती. मुंज झालेलं ब्राह्मणाचं प्रत्येक पोर या पाठशाळेची पायरी केव्हा ना केव्हा ओलांडून आलेलं असायचंच. अवघ्या माहुलीत जेवढी म्हणून ब्राह्मण घरं होती, त्यातली सगळी मुलं पाठ इथं घेत.

फक्त एकच मुलगा या पाठशाळेत येत नव्हता.

प्रभुण्यांचा राम !

पाठशाळेत जाण्यापेक्षा पोहायला जावं, पुरुषसूक्त पाठ करण्यापेक्षा नदीकिनारी जाऊन नाहीतर एखाद्या ओढ्याकाठी जाऊन मंडूकसूक्त ऐकावं, वैश्वदेवाचे कर्णकटू मंत्र पाठ करण्यापेक्षा निसर्गदेवाच्या सान्निध्यात जाऊन कोकिळकूजन ऐकावं याकडे रामचा ओढा अधिक होता. सहाध्यायांकडे बसून मंत्रपठण करीत बसण्यापेक्षा एकटं दुकटं रानावनात भटकणं, हिंडणं रामला अधिक आवडत होतं. रामबरोबरची मुलं स्नानसंध्या तर करू.लागलीच होती; पण काहींनी कारिका म्हणून पुढे घोडदौड सुरू केली होती; पण राम ! छे, त्याला

यात गती नव्हती, रसही नव्हता.

एकदा त्याला त्याच्या गुरुजींनी म्हणायला सांगितलं,

शुक्लृपच्मुचिरिच् वच् विच्, सिश्च ःच्छित्यज्निजिर्भजः

. . . हे अवघड शब्द काही केल्या रामच्या जिभेवरून पुढे सरकेनात. शंकरशास्त्र्यांनी त्याचा कान पिरगळला, दोन दणके पाठीत घातले आणि चार सुसंस्कृत शिव्याही हासडल्या; पण रामची वाणी रामवर प्रसन्न होईना आणि शब्द जिभेवर बसेनात.

शक्लृपचमुचिरिच् वच् विच्...

अनुस्वार कुठे तरी जायचा, उकाराऐवजी इकार तोंडातून यायचा, श ऐवजी छ उच्चारला जायचा. शंकरशास्त्र्यांनी रामचा नाद सोडून दिलाच होता. त्यांनी एकदा विनायकभट्टाला स्वच्छच सांगितलं होतं, "हा मुलगा ब्राह्मणाच्या पोटी जन्माला कसा आला याचंच मला आश्चर्य वाटतं."

त्या दिवसापासून रामची पाठशाळा सुटली आणि अर्थातच शाळेचे पाठही संपले. आता त्याच्यापुढे वाट मोकळी होती...

घरचं नेमून दिलेलं आवश्यक तेवढं काम करावं, रानात भटकावं, नदीत मनसोक्त डुंबावं, कधी वाळूत लोळावं आणि सूर्यकिरणांनी शरीर भाजावं, झाडावर चढावं, करवंदाच्या जाळीत बेगुमानपणे शिरावं, एखाद्या वेळी एखाद्या डोंगराच्या सुळक्याकडे एकटक पाहत बसावं, कधी पक्ष्यांचा चिवचिवाट कान भरून ऐकावा, तर कधी सूर्योदय किंवा सूर्यास्त डोळे भरून पाहावा, असा रामचा मुक्त दिनक्रम होता.

. . . आताही तो शंकरशास्त्र्यांच्या पाठशाळेच्या बाजूनं जात असताना त्याला विद्यार्थ्यांचे स्वर ऐकू आले—

सहस्रशीर्षा, सहस्राक्ष, सहस्रपाद

सभूमिंवृत्त्वा, अत्यतिष्ठ दशांगुलम्...

शंकरशास्त्री वरखाली मान करून आणि विशिष्ट प्रकारांनी आवाज काढीत संथा देत होते. खालच्या आवाजाला त्यांची मान खाली जात होती. टिपेच्या आवाजाला वर होत होती. मध्येच शंकरशास्त्री मानेला असा काही हिसडा देत की, एवढ्या मोठ्या हिसड्यानं त्यांची मान मोडेल असं पाहणाऱ्याला वाटावं.

पाठशाळेच्या मुख्य इमारतीच्या चारी बाजू कौलारू छपरांनी पुढे उतरत्या

वाढवून त्यांना कुडाच्या भिंती घालण्यात आल्या होत्या. मधे मधे खिडक्यांसारखे गाळे ठेवण्यात आले होते. शंकरशास्त्री त्याला 'गवाक्ष' म्हणायचे. अशाच एका गवाक्षातून रामला शंकरशास्त्र्यांची हलणारी मान दिसत होती आणि दुसऱ्या गवाक्षातून त्याच्या सवंगड्यांच्या पाच-पंचवीस माना खाली-वर होताना त्याला दिसत होत्या.

रामनं अंगठा आणि पहिलं बोट यांची आकडी करून तोंडात घातली आणि जोरात शीळ फुंकली...

आत मुलं म्हणत होती, 'सहस्रशीर्षा, सहस्राक्ष, सहस्रपाद...'

मुलांच्या आवाजाला भेदून ही शीळ त्यांच्या कानांत तीरासारखी घुसली, त्यांच्या खाली-वर होणाऱ्या माना गवाक्षाकडे वळून स्थिरावल्या आणि डोळे बाहेरचा शोध घेऊ लागले... शंकरशास्त्री संथा देतच होते. त्यांचे डोळे मिटलेले होते त्यामुळे त्यांना पुढं काय चाललंय ते दिसत नव्हतं. ते काही तरी सांगत होते, मुलं काही तरी म्हणत होती. मुलांच्या बाहेर काही तरी खाणाखुणा चालल्या होत्या. हातांनी आणि डोळ्यांनी...

"ब्राह्मणः मुखमासीत्..."

"ब्राह्मणः मुखमाशीत... मासीत् च्या ऐवजी माशीत. कुणी तरी चुकला होता. त्याच्या तोंडून अजागळपणे ही चूक घडली होती. शंकरशास्त्र्यांच्या तिखट कर्णेंद्रियात तो शब्द सळईप्रमाणे घुसला. त्यांनी मिटलेले डोळे उघडले आणि ते म्हणाले, "काय रे मूर्खांनो..." पण डोळे उघडताच त्यांना दिसलं ते हे की सगळीच मुलं बाहेर पाहत होती. एकाचंही लक्ष चाललेल्या आतील कार्यक्रमाकडे नव्हतं. कुणीही शंकरशास्त्र्यांकडे लक्ष देत नव्हता. चौकटीत चित्र डोकवावं तसा राम गवाक्षातून डोकावलेला दिसत होता.

शंकरशास्त्री भयंकर संतापले. त्यांचा संताप इतका अनावर झाला की, त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. त्यांचे ओठ थरथरत होते. कपाळाच्या शिरा ताड्ताड् उडत होत्या. डोळे वटारले होते. बुबुळाभोवती निखारे फुलले आहेत, असं वाटत होतं.

"राम्या, आत ये," शंकरशास्त्री गरजले.

चौकटीतलं चित्र नाहीसं झालं. राम तिथून पुढे सरकला. अदृश्य झाला. शंकरशास्त्र्यांचा पारा आणखीच चढला. आता त्यांचे विद्यार्थी त्यांचं लक्ष्य बनले

होते.

"उभे राहा सगळे," दातओठ खात ते म्हणाले.

मुलं दचकल्यासारखी उठून उभी राहिली.

कोपऱ्यात मृगाजिनाच्या गुंडाळीला टेकून एक चिंचेचा लांबसडक फोक ठेवलेला होता. तो शंकरशास्त्र्यांनी हाती घेतला आणि हवेत उडवून त्याचा सप् सप् असा आवाज काढला. मग ते पुन्हा गरजले–

"कार्ट्यांनो, त्या राम्याच्या नादाला लागून वाटोळं करून घ्यायचं आहे का आयुष्याचं ! स्वतः टोणगा एवढा वाढला आणि इतरांना आपल्यासारखं करू पाहतोय. काय रे विशा, नाऱ्या, वाशा, बोला सगळे."

विसू, नारायण, वासू... ज्यांची ज्यांची नावं शंकरशास्त्र्यांच्या तोंडून निघाली त्यांची त्यांची जिवाची रोपटी थरारली. काळजं शहारली.

...आणि मग...

चिंचेचा फोक पुढल्या टोकाला फाटला आणि शंकरशास्त्र्यांचे हात दुखू लागले, तेव्हाच मुलांचा मार थांबला. थांबतानाही शंकरशास्त्र्यांनी पुन्हा एकदा रामच्या वंशाचा उद्धार केला आणि प्रभुण्यांच्या कर्तृत्ववान कुळात हा दिवटा जन्माला घातल्याबद्दल त्यांनी नियतीला दोष दिला.

"आज आता काही शिकवणार नाही मी तुम्हाला. चला चालते व्हा," असं शंकरशास्त्र्यांनी म्हणायचा अवकाश ! कोंडवाड्यातून गुरं ज्या ओढीनं बाहेर पळतात, त्या ओढीनं मुलं बाहेर पडली.

कुणी पाठ चोळत होता.

कुणी तळव्यावर फुंकर घालत होता.

कुणी पिंढरीवर उठलेला वळ पाहत होता...

प्रत्येकाला कुठंना कुठं प्रसाद मिळाला होता.

"ए, आता कुठं जायचं रे ?" विसूनं साऱ्यांना विचारलं. .

"चला प्रभुण्यांच्या वाड्यावर जाऊ. राममुळे आज आपल्याला मार बसला. त्याचं उट्टं काढू या."

"तो काय घरी सापडतोय होय रे ?" वासुदेव म्हणाला.

"मग कुठं सापडेल तिथं जाऊ या."

"कुठं सापडेल ते सांगा ना..."

"नदीच्या बाजूला भैरोबाचं शेत आहे ना, पलीकडं. . . तिथंच असणार तो. नेहमी त्या बाजूला गुरं चारायला घेऊन जातो."

"चला, आपणही जाऊ तिकडं."

"चला. . . पळा. गुरुजींनी आणखी पाहिलं म्हणजे ओरडतील." सगळी वानरसेना नदीच्या बाजूला उड्या मारत, पळत गेली.

गावापासून पाव कोस अंतरावर भैरोबाचं शेत होतं. नदीच्या बाजूनं उंचवटा ओलांडला की, शेताचं शिवार ! शेताच्या बांधावर उंच उभं राहिलं की, नदीचं निखळ पाणी आणि पाण्यात उभे राहिलेले काळे कुळकुळीत कातळ स्पष्ट दिसायचे. शेताची बाजू त्या काठाला, गावाची बाजू या काठाला. . .

पाठशाळेतनं पळालेला पोरवडा नदीच्या अलीकडच्या काठाला भैरोबाच्या शेतासमोर येऊन उभा राहिला. शेताच्या बांधावरून उड्या मारत राम येत होता. तो नदीची उतरण उतरला आणि त्याला सवंगड्यांची हाक ऐकू आली.

"राम, रामाऽऽ होऽऽ"

कानाला हात देऊन रामनंही जोरात पुकारा केला,

"कोण आहे ? वासू का ?"

"हो होऽऽ. . . आम्ही येतोय."

दूरवरून रामला ती मुलं म्हणजे पाचपन्नास ठिपके पुढे सरकताना दिसत होते.

नदीचं निवळशंख पाणी फेसाळून वाहत होतं. पात्राच्या अगदी मध्यावर एक मोठा कातळ ध्यानस्थ ऋषीसारखा बसला होता. त्या कातळावर चढून राम सवंगड्यांकडे पाहत होता. या बाजूनं नदीला उतार होता. कुठं गळ्याइतकं, कुठं कमरभर, तर कुठं गुडघाभर पाणी होतं. पोरं तडक उड्या मारून कातळावर आली.

"राम्या, तुझ्यामुळे आज आम्हाला मार बसला." अचानक वासुदेवानं त्याची शेंडी धरून म्हटलं.

"शेंडी सोड वाशा ! तुला काय सांगायचं असेल ते नीटपणे सांग. शेंडीला हात लावायचं कारण नाही." राम म्हणाला.

"शेंडीचं एवढं महत्त्व वाटतं तर पाठशाळेत का येत नाहीस ?" कुणी तरी तिरपी मान करून आणि तिरका आवाज काढून विचारलं.

"तुम्ही कोण विचारणार ?" रामनं त्या आगंतुक प्रश्न विचारणाऱ्या पोराची मानगूट पकडून विचारलं.

"तसं नव्हे रे राम ! पण अरे, आज तू बाहेरून शीळ वाजवलीस आणि गुरुजींनी मारलं आम्हाला," किरकोळ देहयष्टीच्या नारायणानं चिरचिरा आवाज काढून म्हटलं.

"अरे, एवढे विद्येचे उपासक तुम्ही ! साधी शीळ वाजवली तर तुमची एकाग्रता भंग पावते ? विद्यार्थ्यांनो, महाभारतातील एकलव्याची आणि त्याचा एकाग्रतेची गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे ना ?" शंकरशास्त्र्यांचा आवाज काढून आणि अभिनय करून रामनं विचारलं. रामच्या या नाट्यमय उद्गाराबरोबर वातावरण एकदम बदललं. मुलं खळखळून हसली. त्यांच्या मनातला रामविषयीचा राग कुठल्या कुठे पळून गेला; कारण गुरुजींनी आज सर्वांना सरसकट चोपल्यामुळे सगळ्यांच्याच मनातून ते उतरले होते. रामच्या अभिनयानं त्यांच्या नापसंतीला वाट मिळाली आणि राम सर्वांचा मित्र झाला.

नदी वाहत होती. मधल्या मोठ्या कातळावर मधे राम उभा होता आणि त्याच्याभोवती त्याचे सारे सवंगडी कोंडाळं करून उभे होते. मांडलिकांच्या मेळाव्यात त्यांचा सम्राट रुबाबदारपणे उभा असावा तसा राम दिसत होता.

"चला, आज रामच्यामुळं पाठशाळेची पिडा लवकर संपली."

"थोडासा मार बसला, पण लवकर सुटका झाली."

"मी तर मार खाल्ला नाही. मागच्या मागं पळून आलो."

मघाच्या घटनेविषयी पुन्हा चर्चा सुरू झाली.

"कोण रे तो मार न खाणारा ? म्हणे मागल्या मागं पळून आलो !" त्याला वेडावत राम म्हणाला, "भागूबाईसारखा पळून आलास त्यापेक्षा मार खाल्ला असतात तर बरं झालं असतं."

"तू खाल्ला असतात का मार ?"

"हो, हो. मार खायलासुद्धा धैर्य लागतं," राम निश्चयानं म्हणाला.

"अहो विद्वान, तुमच्या अंगी धैर्य पुष्कळ आहे, कबूल. मग असं करा. . ." तो मुलगा आव्हानात्मक आवाजात रामला म्हणाला.

"सांग, काय करू सांग ?"

"मी सांगेन ते करणार ?"

"हो हो, सांग. या कातळावरून खालच्या पाण्यात उडी मारू, का काठावरल्या वाळूतून वेगाने पळत जाऊ, त्या उंच झाडाच्या शेंड्यावर चढून बसू का ?..."

"नको नको. यातलं काही नको. पलीकडं तो डोह दिसतो आहे ना, तो पोहून जायचा."

"तो डोह ! बापरे !" विसूच्या अंगावर काटा उभा राहिला.

माहुलीपासून थोड्याच अंतरावर कृष्णेमध्ये जो डोह तयार झाला होता, त्या डोहाची ख्याती फार होती. प्रतिवर्षी या डोहाच्या पाण्यात लपेटून कुणा तरी एकाचा बळी कृष्णामाई घेत असे. हा डोह म्हणजे काळसर्पाचं तोंड, मृत्यूचा जबडा आणि राक्षसाचा पंजा ! भलेभले पट्टीचे पोहणारेसुद्धा या डोहात उडी घेताना शंभर वेळा देवाचं नाव घेऊन काठावर यायचे. या डोहात माणसं नुसती बुडत नव्हती, तर बुडालेल्या माणसांची मढीसुद्धा हाती लागत नव्हती. एकदा जो या मृत्यूच्या मुखात शिरला तो शिरला. देहप्राण दोन्ही या जगातलं त्याचं अस्तित्व नाहीसं व्हायचं. त्यामुळे या डोहाच्या वाटेला सहसा कुणी जायचं नाही. आयाबाया लहान मुलांना भीती घालत ती बुवाची नव्हे तर या डोहाची ! माहुलीच्या परिसरातली मुलं-माणसं डोहाचं नाव काढलं की क्षणभर गप्प व्हायची.

आणि आता तर ही मुलं रामला त्या डोहात उडी घ्यायला सांगत होती. राम काही पट्टीचा पोहणारा नव्हता; पण ओढाळ पाण्यात सपासप हात मारून नदी पार करणं त्याला अवघड गेलं नव्हतं. दर पावसाळ्यात तो लंगोट कसून कृष्णेच्या पाण्याशी अशी मस्ती करत होता. त्या पाण्याचा आणि त्याचा स्नेह होता. त्या पाण्याच्या लाटा अंगावरून पुढं जायला लागल्या की, रामच्या साऱ्या वृत्ती उल्हसित व्हायच्या.

मग डोहातही तेच ना पाणी ?

वाहणारं पाणी या ठिकाणी थांबलंय. एवढंच !

त्याला कशाला भ्यायचं ? ते तर जीवन... !

असे विचार रामच्या मनात आले आणि अखेर त्यानं त्या मुलांचं आव्हान स्वीकारलं. साऱ्यांनी श्वास रोखले. रामची छाती विस्तारली. त्याचे डोळे आभाळाकडे होते.

"चला, तुम्ही सगळे काठावर उभे राहा, मी डोह पार करतो," असं म्हणून रामनं कातळावरून खाली पाण्यात उडी मारली आणि साऱ्यांची अंगं शहारली.

पाहता-पाहता राम खोल पाण्यात शिरला... गळ्यापर्यंत पाणी आलं तेव्हा त्यानं आडवा होऊन पाण्यावर हात मारायला सुरुवात केली. विसू, वासुदेव, नारायण,... सगळी मुलं उताराच्या बाजूनं पलीकडल्या काठावर जाऊन उभी राहिली. आणि राम... तो तर यमुनेच्या डोहात कालियामर्दनासाठी कृष्ण शिरावा तसा या कृष्णेच्या डोहात शिरला होता.

काठाच्या बाजूला तर डोह फारच भयंकर दिसत होता. काठावर डोहाच्या बाजूला भयंकर दलदल होती. पुरुषभर उंचीचं गवत वाढलेलं... त्यात एक मोठा वृक्ष डोहावर वाकलेला. वृक्ष भरदार असल्यानं त्यानं पाण्यावर येणाऱ्या प्रवाहाला आपल्या अंगावर रोखून धरलं होतं. त्यामुळे डोहावर काहीसा अंधार होता. त्या अंधूक प्रकाशात वृक्षाच्या वेड्यावाकड्या फांद्यांचं डोहाच्या काळ्या निळ्या पाण्यात पडलेलं प्रतिबिंब भयप्रद वाटत होतं. डोहात पोहून काठाला मनुष्य लागला असता तरी तो त्या चिखलातून आणि गवतातून सुखरूप आलाच असता असं नाही. गवतात लपलेल्या कीटकांनी आणि सर्पांनी केव्हाच त्याला लोळवला असता. अशा भयंकर जागी रामनं आपल्या धाडसाचं प्रदर्शन सुरू केलं होतं. केवळ पाहूनही गर्भगळित व्हावं अशी ती जागा होती. त्या जागेच्या बाजूनं फिरकण्याची सोय नव्हती आणि राम त्या जागेवर राज्य करायला निघाला होता.

राम पाण्यावर सपासप हात मारीत होता... डोहाच्या मध्यावर भोवरा होता. भोवऱ्याला वेग फारसा नसला तरी माणसाला चक्रावून टाकण्याची ताकद त्या भोवऱ्यात होती. भोवरा पाण्याच्या पृष्ठभागावर अधिक धारदार असतो, हे रामला ठाऊक होतं. त्यामुळे भोवऱ्याच्या जवळ येताच श्वास रोधून रामनं पाण्याखाली डुबी घेतली...

आणि काठावरच्या मुलांनी कल्लोळ केला !

नारायण तर गावातच पळत गेला आणि प्रभुण्यांचा राम डोहात बुडाल्याची दुःखद वार्ता त्यानं गावात प्रसृत केली.

उरलेली मुलं एकमेकांचे हात धरून कशीबशी तिथं उभी होती. राम वर केव्हा येतो. जिवंत किंवा मृत याची वाट पाहत तिथं उभं राहणं याशिवाय त्यांना

गत्यंतर नव्हतं.

"अरे तो बघ..."

"कुठाय ! मला तर कुठं नाही दिसत तो !"

"ते काय दिसतंय ? भोवऱ्यात फिरतंय ते ?"

"रामच्या डोक्यासारखंच काही तरी दिसतंय रे !"

"हॅः अरे नारळ आहे तो. कुणी तरी वरच्या बाजूनं नदीत टाकला असेल.. वाळका असेल..."

"आणि मग राम... ?"

"मला काही वाटत नाही..."

...मुलांचे संवाद.

एव्हाना सूर्य मावळतीला गेला होता. सर्वत्र संधिप्रकाशाचा अंधुक पडदा पसरला होता.

गावातून विनायकभट्ट, शंकरशास्त्री आणि अप्पाशास्त्री तिघंही तरातरा आले. विनायकभट्टाचा चेहरा काळजीनं काळवंडून गेला होता. अप्पाशास्त्री त्रासलेले दिसत होते, तर शंकरशास्त्री मघासारखेच अजूनही दातओठ खात होते.

विनायकभट्टाला पोहण्याचा सराव नव्हता.

अप्पाशास्त्री म्हातारे झाले होते आणि शंकरशास्त्र्यांना तर पोहताच येत नव्हतं.

डोहात उडी घ्यायची कुणी ? सगळे काठावरच दिङ्मूढ अवस्थेत उभे होते आणि...

रामच्या चिंतेत सारे असतानाच त्यांच्या अंगावर शहारे आणणारी एक घटना घडून आली...

ज्या वृक्षाच्या खाली ते उभे होते त्याच्या शेंड्यावरून खदाखदा हसण्याचा आवाज आला...

आणि तो आवाजही अगदी थेट रामच्या हसण्याच्या आवाजासारखा हुबेहूब !

भुताटकी वाटावी इतकं ते सारं दृश्य विलक्षण होतं. विनायकभट्टाची चर्या तर पांढरीफटक पडली होती. त्याला काही सुचत नव्हतं.

हसण्याचा आवाज बंद झाला. . . आणि. . . एखादं झाडावर चढलेलं

रानमांजर वेगानं खाली उतरताना पानांचा आवाज व्हावा तसा आवाज आणि एक आकृती तशीच खाली येताना दिसली...

रामच ! अगदी रामसारखाच...

शंकरशास्त्री दातखीळ धरून उभे होते.

अप्पाशास्त्री डोळे विस्फारून पाहत होते.

विनायकभट्ट हतबुद्ध नजरेनं शून्यात पाहत होता.

आणि मग एकदम धप्प आवाज आला.

"काका, मी तुमचा राम !"

होय ! रामच होता तो. प्रभुण्यांचा राम ! डोहात बुडालेला, विनायकभट्टचा पुतण्या रामच होता तो !

"भू...भू...भूत..." शंकरशास्त्री चाचरले.

"भूत नाही गुरुजी. मी रामच. नाही विश्वास बसत ? हे, पाहा..."

असं म्हणून राम आणखी पुढं झाला. तो चिंब भिजलेला होता.

"अरे, पण, तू डोहातनं इथं झाडावर कसा आलास ?" विनायकभट्टानं त्याला जवळ ओढून विचारलं.

"काका, डोहावर एक लांबलचक फांदी वाकली आहे ती पाहिलीत ? ती पहा... अगदी पाण्याच्या जवळ आहे."

"अरे, पण, पण ती कशी तुला पकडता आली ?" आश्चर्यानं शंकरशास्त्र्यांनी विचारलं.

"पाण्यात असताना मी सरळ माझं कमरेचं धोतर फेडून काढलं, फांदीच्या बाजूनं पाण्यातनंच फेकलं, एका हातानं धोतर फांदीला लटकवलं, त्याचा शेव धरून मी फांदी पकडली, फांदी चांगली भक्कम आहे... फांदीवर आलो, धोतर घेतलं... आणि थेट शेंड्याच्या तिथं फांद्यांच्या तिकाटण्यावर जाऊन बसलो..."

"अरे बापरे !"

"शर्थ आहे रे रामा तुझी !"

"असलं वेड धाडस पुन्हा नको रे बाबा करू," शंकरशास्त्री आणि अप्पाशास्त्री यांनी रामला बजावलं.

"काका, वरून मी तुमची सगळी गंमत पाहत होतो. तुमचे सगळे संवाद ऐकलेत मी."

"आमचं बोलणं ऐकलंस ?"

"हो हो. अगदी सगळं ऐकलं. गुरुजी, तुम्ही शौर्याच्या गोष्टी सांगता ना त्या खोट्या आहेत तुमच्या बाबतीत," राम शंकरशास्त्र्यांना म्हणाला. शंकरशास्त्री काहीच बोलू शकले नाहीत. नुसताच तळतळाट ! नुसताच तिळपापड.

"बरं बरं ! माहीत आहे मोठा शूर. नशीब तुझं नि आमचं म्हणून जीव वाचला. आणि जीव वाचला म्हणून थोर तोंडानं या गोष्टी करतोयस. नाही तर विनायकाच्या जिवाला फास लागला असता, समजलं ?"

शंकरशास्त्री काहीतरी बोलायचं म्हणून बोलले आणि सगळी माणसं गावाकडे परत फिरली.

परतताना विनायकानं मनाशी विचार पक्का केला होता की, याचा हा अवखळपणा कमी करायचा असेल तर याच्या पायात बेडी हवी. त्याचा हूडपणा नाहीसा व्हायला हवा असेल तर तो त्याला बोहोल्यावर चढवूनच होईल.

* * *

वधूंना वाण नव्हती. लग्नासाठी वय विचारात घेतलं जातच नसे. वराला वधू आणि वधूला वर असला म्हणजे पुरेसे असे. लग्न ही मोठ्या माणसांनी ठरवून लहानांनी करण्याची बाब होती. प्रभुण्यांचा राम मुंज होऊन मोठा झाला आहे एवढं कळायचा अवकाश, वधुपिते प्रभुण्यांच्या घराभोवती रुंजी घालू लागले होते. हस्ते-परहस्ते, आडूनदडून चौकशा होत होत्या. विनायकभट्टाला सून हवी होती, चुलतीला हाताखाली कामाला एखादी चुणचुणीत मुलगी हक्काची म्हणून घरात आली तर हवीच होती. मुलींचे बाप विनायकाला गळ घालीत होतेच. अडचण फक्त एकच होती. मुलीच्या बापानं विचारलं, 'मुलाला काय-काय येतं ?' तर काय सांगायचं ? काहीच सांगता येण्यासारखं नव्हतं. घराची काही श्रीमंती नव्हती, की घराणं पिढीजात प्रसिद्ध नव्हतं. मग मुलीच्या माणसांनी— मुलगी या घरी देणाऱ्यानं द्यावी कशी ? शिवाय गावात चौकशी करावी, तर वधू पित्याला काय कळत होतं, तर मुलगा ब्रह्मकर्म करत नाही, शेतात धड खपत नाही, नुसता उनाडतो.

... आणि मग विनायकभट्टाचा बेत जसा त्याच्या मनात फुलला तसाच तो आपोआप विरला. हळूहळू घरात रामच्या लग्नाचा विषय निघेनासा झाला. रामचं तर या विषयाकडे लक्ष होतंच कुठं ! कष्ट आणि खेळ, खपणं आणि खिदळणं,

घाम गाळणं आणि हुंदडणं हेच त्याचं जीवन होतं.

त्याची आते त्याच्या लहानपणी म्हणायचीच,

"ज्या शेताचे बांध कुडलेले नाहीत, त्यातल्या पिकाची नासाडी कुणीही करावी... अगदी शेळ्यामेंढ्यांनीसुद्धा !"

तसंच झालं होतं. रामच्या जीवनाला कुणाच्या प्रेमाचा बंध नव्हता. आईबापाविना वाढलेलं पोर निसर्गानं वाढवलं म्हणून त्याचं शरीर अंगापिंडानं भरलं; पण मन ? बुद्धी ? हृदय ? यांचं पोषण कसं व्हावं ! ते तर सदा शुष्क राहिलं. विनायकभट्ट थंड गोळा, बायको आगीचा तोफगोळा ! दोघांचा अर्थाअर्थी रामच्या जीवनाला काहीच उपयोग नव्हता. असं रामचं जीवन चाललं होतं...

बिनशिडाचं तारू !

मग हे तारू वारा नेईल तिकडं भरकटायचं; पण कधी-कधी या तारवालाही स्वतःची, स्वत्वाची जाणीव व्हायची; कारण त्याला एक दिव्य आत्मा लाभला होता. त्यावरील धूळ कुणीतरी झटकायला हवी होती.

विनायकभट्टाला दिवसेंदिवस रामची चिंता अस्वस्थ करीत होती. त्यालाही स्वतःचा संसार होता. वंशवेल वाढली होती. पुतण्या झाला तरी काय झालं ! त्यानं आपल्या पायांवर केव्हा तरी उभं राहायलाच हवं. मग विनायकभट्ट रामला कधी-कधी स्वतःबरोबर नेऊ लागला. कामात उपयोगी नाही आला तरी प्रवासात सोबत करील, पडशी खांद्यावर घेईल, लघुरुद्राच्या वेळी अभिषेकपात्र घासून स्वच्छ करून देईल, पूजेला गंध उगाळून देईल, अशी वरची कामं करायला तरी उपयोगी पडेल म्हणून विनायकभट्ट रामला बरोबर नेऊ लागला.

पण कुणी विचारलं तर हा माझा पुतण्या म्हणून सांगताना त्याचीही जीभ अडखळायची; कारण रामला खरंच काही येत नव्हतं. एका यजमानानं सांगितलंसुद्धा, "हा ब्राह्मणाचा पोर वाटत नाही."

पण रामचा झरा 'मूळचाच खरा' असल्यामुळे त्यातलं झुळूझुळू जीवन केव्हा ना केव्हा प्रकट व्हायचं.

* * *

चातुर्मासाचे दिवस होते. माहुलीत चातुर्मासाचे दिवस म्हणजे ब्राह्मणांना दिवाळी वाटायची, शिपाईगडी, सरकारी अधिकारी, सरदारदरकदार आणि खुद्द

पेशवेही यांना देवधर्म आणि दानव्रते करायला याच दिवसांत फुरसत असे. पावसाळ्यात कोणत्याही मोहिमा किंवा लढाया नसत. तलवारी टाकून ताम्हण, पळी-पंचपात्र हातात घ्यायला पराक्रमी लोक याच दिवसांत माहुलीला येत. ज्या बहिरवाच्या साक्षीनं माहुली वसली तो बहिरव आता दूर शेतात होता. एक अवशेष वास्तू म्हणून त्याचं देऊळ तिथं उभं होतं. एव्हाना माहुलीत बरीच देवळं नव्यानं उभी राहिली होती. माहुलीच्या महादेवाचा परिसर चातुर्मासात गजबजून जात असे. तसा तो आजही गजबजून गेला होता. वेदशास्त्रसंपन्न दशग्रंथी ब्राह्मणापासून भटाभिक्षुकापर्यंत किती तरी ब्राह्मण त्या परिसरात गोळा झालेले होते. पेशव्यांनी श्रावणदक्षिणेचा घाट घातला होता. खुद्द पेशव्यांची छावणी माहुलीपासून थोड्या अंतरावर पडली होती. इकडे पावसानं जमीन भिजत होती आणि इकडे पेशव्यांच्या दक्षिणा दानाची वर्षा आज बरसणार होती. आपणही या वर्षावात स्वतःला भिजवून घ्यावं या हेतूनं पंडितमंडळी इथं आली होती.

पेशव्यांच्या वतीनं महादेवाला अभिषेक होत होता. महापूजा संपली होती. अभिषेक संपला. मंत्रपुष्प सुरू झालं. ब्राह्मणांचे आवाज गगनाला भिडू लागले. मंत्रस्वरांनी आसमंत भरून गेला. 'घरदार नकटं प्वार' हा सोहळा बघायला जमलं होतं. ब्राह्मण प्रत्यक्ष भाग घेत होते. अब्राह्मण पाहून संतुष्ट होत होते.

श्रावण दक्षिणेसाठी जी ब्राह्मण मंडळी आली होती, त्यातला प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या शास्त्रात, वेदवेदांगात, दर्शनात पारंगत होता. त्या पारंगततेची प्रशंसा म्हणून त्यांना दक्षिणा मिळणार होती. तरुण वयाचे विद्यार्थी जे असतील त्यांना रक्कम थोडी मिळत असे. विनायकभट्ट या मेळाव्यात रामला घेऊन सामील झाला. पेशव्यांचे धर्मप्रमुख आणि प्रतिनिधी एकेका अभ्यागताची, पंडिताची विचारपूस करून त्याची योग्य ती संभावना करीत होते.

या समुदायात सारे जण स्थिरचित्त, गंभीर, शांत आणि एकाग्र दिसत होते. फक्त एकाच व्यक्तीची अस्थिर चुळबूळ सुरू होती. त्याची नजर भिरभिरत होती. चेहऱ्यावर भीतीची पुसट छाया होती. कसल्या तरी दडपणाखाली ती व्यक्ती तिथं उभी असावी, असं पाहणाऱ्याला वाटलं असतं.

तो होता राम ! प्रभुण्यांचा राम !

राम पुढं होता. . . त्याच्यामागं काही मंडळी होती आणि मागं विनायकभट्ट होता. विनायकभट्टाची आणि रामची अधूनमधून दृष्टभेट होत होती. विनायक

रामला नजरेनं आणि हातानं काही खुणावत होता. त्या खाणाखुणांनी राम आणखीच बावरून जात होता आणि मग त्याच्या आसपासचा कोणी तरी त्याला म्हणत होता, "ए, पुढं बघ, असा वेंधळ्यासारखा मागं काय बघतोस?" या दरडावणीनं रामला आणखी संकोचल्यासारखं होत होतं. त्याचे सारे खेळगडी विसू, वासुदेव, नारायण त्याच्या आसपासच होते; पण त्याला मात्र आपणं इथं एकटे आहोत असं राहून राहून वाटत होतं.

दक्षिणादानाची वेळ झाली. एक तंबू उभारण्यात आला होता. तंबूच्या बाहेर ब्राह्मण मंडळी आणि त्यांची दक्षिणार्थी मुलं उभी होती. पाउस आता थांबला. स्वच्छ आकाशानं 'दक्षिणा द्यायला सुरुवात करा,' असा कौल दिला होता. पाणीदार डोळ्यांचे, प्रशस्त शरीराचे एक शास्त्रीबोवा तंबूतून बाहेर आले. त्यांच्या उघड्या शरीराला उंची रेशमी शाल लपेटलेली होती. त्यांची नजर चांगलीच तीक्ष्ण होती. एकवार समोरच्या समुदायावर दृष्टी फिरवून ते म्हणाले, "विशेष अध्ययन केलेल्या ब्राह्मणांनी आणि पाठशाळेत अध्ययन करणाऱ्या ब्राह्मण मुलांनीच दक्षिणा घेण्यासाठी पुढं यावं."

या वाक्यानं रामची श्रवणेंद्रियं थरारली. अंतःकरणात खोल कुठंतरी धडधड होऊ लागली. कावऱ्याबावऱ्या नजरेनं त्यानं मागं वळून विनायकभट्टाकडे पाहिलं...

'पाठशाळेत जाणाऱ्या मुलांनीच दक्षिणा घेण्यासाठी पुढं यावं,' या शब्दांनी तो धास्तावला होता. विनायकभट्टानं आपले डोळे शक्य तेवढे मोठे केले आणि दातओठ खाऊन त्याला पुढे जाण्याविषयी खुणावलं. तशी रामची अस्वस्थता अधिक वाढली. खाली मान घालून तो मुकाटपणे उभा राहिला; पण त्याच्या मनात विचारांनी थैमान घातलं होतं...

'पाठशाळेत जाणाऱ्या मुलांनीच दक्षिणा घेण्यासाठी पुढं यावं.'

'मी पाठशाळेत जात नाही.'

'पाठशाळेत जाणाऱ्यांनाच दक्षिणा घेता येईल.'

'मी दक्षिणा स्वीकारण्यास पात्र नाही.'

या विचारांनी जडावलेला राम खाली मान घालून मनाशी काही ठरवत असतानाच विनायकभट्ट मागच्या गर्दीतून वाट काढीत रामच्या जवळ आला आणि त्याच्या खांद्यावर थोपटून तो खालच्या आवाजात म्हणाला, "मी

सांगितलंय तसंच म्हण ! पाठशाळेत जातो असंच सांग. दक्षिणा मिळालीच पाहिजे.”

एकेक ब्राह्मण पुढे जात होता. त्याची संभावना होत होती. योग्यतेप्रमाणे दक्षिणा, महावस्त्र, श्रीफल मिळत होतं. मोठमोठे विद्वान, पंडित संभावना-द्रव्यानं संतुष्ट होऊन परत जात होते. आता बटुवयाच्या काही विद्यार्थ्यांचा घोळका तिथं उरला होता. विनायकभट्टालाही दक्षिणा मिळाली होती. तो दूरवर रामची वाट पहात उभा होता. राम तंबूजवळ सरकला. त्याच्या आधीही दोन-तीन विद्यार्थी होतेच. त्यातल्या कुणाला संध्या चांगली येत होती. कुणाला ऋचा पाठ येत होत्या, तर कुणी कारिका धाडधाड म्हणून दाखवत होता. सर्वांचे हात ओले होत होते. मन संतुष्ट होत होतं. दक्षिणा सर्वांना मिळत होती; कारण प्रत्येकाजवळ सांगण्यासारखं काही ना काही होतं. रामच्या पुढची सारी माणसं संपली. राम पुढं सरसावला.

“ये बाळ, कोणत्या पाठशाळेत जातोस तू ?” शास्त्रीबुवांनी प्रसन्नपणे हसून रामला विचारलं.

राम गडबडला. इकडे तिकडं पाहू लागला. त्याचे डोळे केविलवाणे झाले. काय उत्तर देणार ? कोणत्या पाठशाळेचं नाव सांगणार ? एवढ्यात विनायकभट्ट लगबगीनं पुढे आला. पुतण्याच्या मदतीला चुलता धावून आला...

वास्तविक विनायकभट्टाला खोटं बोलायची इच्छा नव्हती; पण या निमित्तानं ओशाळून राम पाठशाळेत जाऊ लागेल आणि तत्पूर्वी थोडी द्रव्यप्राप्तीही होईल, असा सोईस्कर विचार करून विनायकभट्ट खोटं हसून शास्त्रीबुवांना म्हणाला,

“त्याला ऐकायला येत नाही,” असं म्हणत असतानाच त्यांनी रामच्या कानांकडे अंगुलीनिर्देश करून दुसऱ्या हाताचा अंगठा उभारला आणि तो पूर्व-पश्चिम हलवला. शास्त्रीबुवा काय समजायचं ते समजले. सहानुभूतिपूर्वक हसून म्हणाले,

“असं होय ! मग आता याला आणखी काही विचारून उपयोग नाही.”

शास्त्रीबुवांनी हातातल्या रौप्यपात्रातून एक रुपयाचं नाणं बाहेर काढलं आणि ते रामच्या हाती ठेवलं...

विनायकभट्टानं दीर्घ निःश्वास सोडला.

ते नाणं रामच्या हाताच्या मुठीत घट्ट बसलं होतं, पण त्याचं विवेकी मन मात्र

मागं मागं रेंगाळत होतं...

विनायकभट्ट तोंड फिरवून चालू लागला. रामनं शास्त्रीबुवांना अभिवादन केलं, तेही प्रसन्न स्वरात म्हणाले, “आयुष्यमान भव !” राम विनायकभट्टाच्या मागं चालू लागला.

पण त्याचे पाय फार पुढं जाईनात. आपल्या पायात मणामणाच्या बेड्या अडकविल्या आहेत असं रामला वाटू लागलं. रामच्या मनात परस्परविरुद्ध विचारांनी गर्दी केली होती.

सदसद्विवेकबुद्धी विरुद्ध अविवेकबुद्धी !

सदाचार विरुद्ध दुराचार ! पाप विरुद्ध पुण्य !...

अखेर रामच्या मनाचा निश्चय पक्का झाला आणि मुठीत ती रौप्यमुद्रिका तशीच घट्ट धरून राम मागं फिरला, तडक तंबूकडे चालू लागला.

विनायकभट्टाला काही समजेना..राम आणखी दक्षिणा मागायला गेला की काय ! विनायकभट्ट मनातून थोडा हरखला, पण नंतर चरकलाही; कारण अधिक दक्षिणा प्राप्तीची ही खुशी फार काळ टिकली नाही.

आता सर्वांना दक्षिणा वाटून झाली होती. रौप्यपात्र घेतलेले शास्त्रीबुवा पाठमोरे उभं राहून कुणाशी तरी बोलत होते आणि ते आता तंबूच्या आत जाण्याच्या बेतात होते... रामनं त्यांना नम्र मृदू स्वरात हाक मारली. शास्त्रीबुवांनी तोंड वळवून आश्चर्यानं पाहिलं.

मघाशी दक्षिणा घेतलेला मुलगा !

हातातली रौप्यमुद्रिका शास्त्रीबुवांच्या हातातल्या रौप्यपात्रात टाकून राम म्हणाला, “ही दक्षिणा परत घ्या.”

“का रे बाळा ?”

“दक्षिणा घेण्याचा मला अधिकार नाही.”

“म्हणजे ?”

“मी पाठशाळेत जात नाही.”

“मग मघाशी तू...”

“खोटं बोललो.”

“मग आता...”

“मला खोटं बोलल्याचा पश्चात्ताप होतोय. मी कुठल्याच पाठशाळेत

शिकलो नाही, शिकतही नाही. म्हणूनच मला ही दक्षिणा घेण्याचा अधिकार नाही."

"बाळ, कुणाचा तू ?" शास्त्रीबुवांनी कौतुकानं विचारलं.

"प्रभुण्यांचा. राम माझं नाव."

"शाब्बास ! तू खोटं बोलण्याचं पाप केलंस, पण त्या पापाची कबुली देऊन पश्चात्ताप व्यक्त केलास. गुणी आहेस," शास्त्रीबुवा म्हणाले. राम त्यांच्या पाया पडला तेव्हा त्यांनी त्याला दोन्ही स्कंधांना धरून उठवलं आणि वत्सल स्वरात म्हणाले, "मग आता तरी पाठशाळेत जाऊ लाग. अरे, तेजाला बुद्धीची आणि बुद्धीला तेजाची जोड मिळाली की माणसाचं सोनं होतं."

"होय. मी जाईन पाठशाळेत," राम म्हणाला आणि तो माघारी विनायकभट्टाकडे आला.

विनायकभट्टाला रामची ही कृती आवडली नव्हती. शास्त्रीबुवांनी त्याचं कौतुक केलं असलं तरी त्याच्या कबुलीमुळे त्याच्यातली उणीव जाहीर झाली होती. विनायकभट्टाकडे, पुतण्याच्या या कृतीमुळे साऱ्यांचे डोळे रोखलेले होते. तेच विनायकभट्टाला सहन होत नव्हते.

विनायकभट्ट घरी आला तो संमिश्र भावना मनात घेऊनच. एकीकडे रामचं त्याला कौतुक वाटत होतं, त्यानं दाखवलेल्या दुर्लभ प्रामाणिकपणाबद्दल त्याला त्याचा अभिमान वाटत होता, तर दुसरीकडे त्याचा काहीसा रागही आला होता.

"मिळाली का श्रावणदक्षिणा दोघांना ?" अर्धांगीनं विचारलं.

"मिळाली; पण दोघांना नव्हे, एकालाच," विनायकानं थोड धुसफुसतच उत्तर दिलं.

"एकालाच का ? आणि ती कुणाला ?"

"मलाच. दुसऱ्या कुणाला ? याच्या कानीकपाळी ओरडून मी थकलो; पण पाठशाळेचा मार्गच टाकून दिला. . . म्हटलं आजच्या प्रसंगानं तरी त्याला शहाणपण येईल. . ."

"तरी मी तुम्हाला सारखं सांगते आहे, याचं लक्षण काही ठीक दिसत नाही. तुम्ही याची दुसरीकडे काही तरी सोय लावली पाहिजे. हा असाच इथं राहिला तर नुसता खाईल अन् हातपाय पसरेल."

"काहीतरी करायला हवं खरं," असं अस्पष्ट पुटपुटत विनायकभट्ट मागल्या

दारी पाय धुवायला निघून गेला आणि त्याच वेळी राम घरात आला...

* * *

आता पाठशाळेत जायचं असा रामचा निश्चय झाला होता. त्याच्या मनानं तसा ठाम निर्णय घेतला होता; पण या निर्णयाला फार उशीर झाला होता; कारण त्याच्याबरोबरीची मुलं आता पाठशाळेतलं अध्ययन संपवून बाहेर पडली होती. रामला तर केशवाय नमः पासून सुरुवात करायची. इतर लहान मुलांमध्ये तो कसा बसणार !

कारण...

राम आता चांगला भरला होता. ओठावर तारुण्यदर्शक काळी रेघ दिसू लागली होती. अंगापिंडानं तो चांगला होता. तारुण्यपीटिकांनी त्याच्या पुरुषी चेहऱ्यावर कुठं-कुठं स्थान मिळवलं होतं आणि झाड वाढीस लागलं याची साक्ष त्याच्याकडे पाहिल्यावर कुणालाही पटत होती. मग असा राम, बाप्यासारखा दिसू लागलेला राम बालवयाच्या मुलांत जाऊन अध्ययन कसा करणार ! स्वतंत्रपणे त्याला कोण शिकविणार ? त्याच्यासाठी एवढी मेहनत कोण घेणार ?

कारण विनायकभट्टाचा व्यापही आता वाढला होता. काकूच्या मांडीवर मूल खेळू लागलं होतं. विनायकभट्टाच्या यजमानांची संख्या वाढली होती. त्याला घरात लक्ष द्यायला मुळी फुरसतच नव्हती.

आणि काळही बदलला होता. रामला पाठशाळेत जायचं होतं; पण विद्यादान फुकट होत नव्हतं. पूर्वी अभ्यासक्रम संपला म्हणजे गुरुदक्षिणा घेत आणि तीही विद्यार्थी संतोषानं देईल तेवढीच.

विद्यादानाच्या व्यवहारात देवघेव नव्हती की विद्येचा व्यापार नव्हता; पण काळ बदलला. पाणपोयांसारख्या असलेल्या पाठशाळा कमी झाल्या आणि तिथं पाणीही विकलं जाऊ लागलं. विद्येची दुकानं निघाली. आता स्वतंत्रपणे विद्यार्जन करणं रामला शक्यच नव्हतं. अमाप उत्साहानं भरलेलं रामचं मन मग या निराशेनं काळवंडून गेलं.

लख्ख प्रकाशातून चालता-चालता एकदम एखाद्या अंधाऱ्या गुहेत प्रवेश करावा असं त्याला वाटू लागलं.

राम विचारमग्न झाला.

त्याला आज जेवणही नीट गेलं नाही. कसे तरी चार घास पोटात ढकलून तो

पानावरून उठला आणि बाहेर ओसरीवर जाऊन बसला. विनायकभट्ट मघापासून रामच्या हालचालीकडे पाहत होता. राम काही बोलत नव्हता. त्याच्या मनात कसल्या तरी विचाराचं वादळ सुरू आहे एवढं विनायकभट्टानं ओळखलं होतं. जेवण संपल्यावर अडकित्त्यानं सुपारी कातरून विनायकभट्टानं ती तोंडात टाकली आणि डोईवर पागोटं चढवलं आणि त्यानं घरात सांगितलं,

"कुळकर्ण्यांकडे जाऊन येतो गं..."

"लवकर या हो. उद्या पहाटे तुम्हाला परळीला जायचंय. सत्यनारायणाचं बोलावणं आहे ना..." आतून आवाज आला.

"हो, लवकर येतोच. फार वेळ बसणार नाही कुळकर्ण्यांकडे." असं म्हणून विनायकभट्टानं उंबरा ओलांडला. तो अंगणात आला तर राम त्याच्या पाठोपाठ होताच.

"काय रे रामा !" विनायकभट्टानं विचारलं.

"काका,.. तुम्ही सातारला..."

"साताऱ्याला नाही. परळीला जाणार आहे मी उद्या."

"ते नाही म्हणत मी..."

"मग ?"

"साताऱ्याला जहागीरदारांकडे तुम्ही जाता ना ?"

"जातो. मग ?"

"त्यांचा एक मुलगा आहे."

"त्यांना मुलगा नाही. पुतण्या आहे. तो इथंच असतो माहुलीत; पण तुला काय करायचंय त्याच्याशी ?"

"त्याला घरी शिकवायाला गुरुजी येतात."

"मग ?"

"मला त्यांच्याकडे शिकायला जायचंय. मला पाठशाळेत जायची लाज वाटते."

"तुला जहागीरदारांकडं ?. . ." विनायकभट्ट विचारात पडला. जहागीरदारांची एक मावशी त्यांच्या पुतण्याला घेऊन इथं माहुलीतच राहत होती. पुतण्याची ख्याती फारशी चांगली नव्हती. वांड आणि उनाड मुलगा म्हणून साताऱ्यात त्यानं प्रसिद्धी मिळवली होती. तेव्हा त्याच्या उनाड सवंगड्यांपासून

त्याला दूर ठेवावा, त्याचं चित्त स्थिर व्हावं आणि त्याला वळण लागावं म्हणून जहागीरदारांनी माहुलीतच त्याची व्यवस्था केली होती. त्याला पाठ देण्यासाठी, अध्ययनासाठी, संस्था देण्यासाठी, अध्यापनासाठी एक नामांकित गुरुजी येत असत. रामनं सांगितलं ते खरं होतं; पण रामच्या अध्ययनाचं तिथं कसं जमावं ?

जहागीरदार कुठं आणि प्रभुणे कुठं ? त्यांची बरोबरी कशी व्हावी ? शिवाय श्रीमंतांच्या मिजासखोर मुलाबरोबर गरिबाचा लेक अध्ययन कसा करणार ? जहागीरदारांना विचारायचं तरी कसं ?

"बरं पाहू. मी विचारीन जहागीरदारांना," असं तुटक उत्तर देऊन विनायकभट्ट निघून गेला.

राम थोडा हिरमुसला; पण करतो काय ? जहागीरदारांच्या घरात प्रवेश मिळणं हे काही तितकं सोपं नव्हतं. दुसऱ्या दिवशी पहाटेच विनायकभट्ट परळीला निघून गेला आणि रामचा कंटाळवाणा दिनक्रम सुरू झाला.

रामला आता यात स्वारस्य नव्हतं. त्याच्या मनात नवा प्रकाश पसरला होता. अंतराला एक नवी जाणीव झाली होती. आपणही शहाणं व्हायला हवं हे त्याला आता वारंवार जाणवू लागलं; पण मार्ग नव्हता. इच्छा होती पण रस्ता दिसत नव्हता; पण एक दिवस रस्ता दिसला. अगदी अचानक...

भैरोबाच्या शेतावरल्या बांधाला शेवग्याची पुष्कळ झाडं होती. काकूनं फर्मावलं होतं, "शेवग्याच्या शेंगा घेऊन ये."

अशी कामं रामला मनापासून आवडत असत. कुठं झाडावर चढायचं, कुठं नदीत उडी घ्यायची, कुठं डोंगर चढायचा, असं काही असलं की रामच्या साऱ्या वृत्ती उल्हसित होत आणि जीव झोकून देऊन तो अशा कामात पुढे होत असे. भैरोबाचं वावर हे त्याचं आवडतं ठिकाण होतं. तिथं देऊळबिऊळ काही नव्हतं. एका झाडाच्या प्रशस्त सावलीला भैरोबा शिवाराची राखण करीत असायचा. रानात खपणारे कुळवाडी, गुरं चारायला वाटेवरून जाणारे राखोळी एवढीच काय ती माणसांची वर्दळ. बाकी सारं शांत. शेवग्याची झाडंही त्या बांधावर खूप होती. पलीकडे ओळीचा आंबा अन् अलीकडे शेवगा. झाडाला शेवग्याच्या शेंगा इतक्या अमाप लागत की रात्रीच्या वेळी अंधारात पाहिलं, तर ते झाड राक्षसासारखं वाटायचं आणि लोंबत्या शेवग्याच्या शेंगा म्हणजे त्या राक्षसाची हजार बोटं वाटायची; पण त्या ठिकाणी जायला रामला फार-फार आवडायचं.

आज मात्र त्याला मुळीच उत्साह वाटत नव्हता. उगीचच चालायचं म्हणून चालत होता, जायचं म्हणून जात होता. नकळत त्याचे पाय चालत होते. भैरोबाच्या शेताला जाताना गावाकडून थोड्या अंतरावर ओढा आडवा येत होता. पावसाळ्यातले प्रत्यक्ष पावसाचे दिवस सोडले तर ओढा अगदी कोरडा ठणठणीत असायचा. कुठे-कुठे खाचखळग्यात पाणी साचलेलं तेवढंच आणि एकदोन ठिकाणी मात्र ओढ्याला डोह होते. डोह तरी कसले, दोन्ही बाजूंनी उंच डगरी आणि मधे जरा मोठा खळगा म्हणून त्याला डोह म्हणायचं एवढंच.

पण भैराबाच्या शेताला जवळची वाट मात्र या डगरीवरून गेली होती. पाण्यात मोठाले दगड टाकून माणसांनी वाट करून ठेवली होती. एखादा डुगडुगणारा दगड, एखादा शेवाळ लेपलेला, सारं काळजीपूर्वक पाहून जावं लागे. पाय घसरला तर कंबरभर पाण्यात सचैल स्नान !

अशा या प्रदेशातून राम निघाला होता. राम वाटेनं एकटाच चालला होता. त्याच्या खांद्यावर पंचाची घडी होती. ती ऊन लागू नये म्हणून त्यानं डोक्यावर घेतली होती. आता तो ओढा ओलांडणार होता. तेवढ्यात त्या बाजूच्या टेकाडावरून त्याला तीन व्यक्ती येताना दिसल्या. त्यातली एक स्त्री होती, एक रामएवढाच मुलगा होता आणि तिसरे वयस्कर गृहस्थ होते.

गृहस्थ एकंदर अंगकांतीवरून गर्भश्रीमंत आणि खानदानी असावेत असं पाहताक्षणी कुणीही ओळखलं असतं. त्यांच्या कानात मोत्याची भिकबाळी होती. उजव्या हातात दोन बोटांत दोन अंगठ्या होत्या. अंगठ्यात हिरे बसविलेले होते. ते उन्हात लकाकत होते. त्या मुलानं डोक्यावर जरीची टोपी घातली होती. त्याच्याही बोटात एक अंगठी होती. वृद्ध दिसणाऱ्या त्या बाई मात्र अगदी साध्या दिसत होत्या. स्वच्छ शुभ्र लुगडे त्यांनी नेसले होते. अंगावर दागिना कसला तो नव्हताच. कपाळ पांढरे फटक होते; पण बाईच्या डोळ्यांत तेज होतं.

तिघंही टेकाड उतरत होते. रामनं विचार केला, आठवून पाहिलं, स्मृतीची पानं चाळली. हे कोण असावेत ? आणि थोड्याच वेळात त्याला उत्तर सापडलं.

हेच जहागीरदार. तो त्यांच्या पुतण्या.

आणि त्या मावशी. त्यांच्याबद्दलच विनायकभट्टानं त्याला काही दिवसांपूर्वी सांगितलं होतं.

जहागीरदार देहानं प्रशस्त होते. त्यांच्या पायांना त्यांच्या अस्ताव्यस्त

शरीराचा भार पेलवत नव्हता, म्हणून त्यांनी हाती काठी घेतली होती; पण ती किरकोळ काठीही त्यांना सावरताना कुरकूर करीत असावी. तिघांनीही टेकाड उतरताना एकमेकांचे हात धरून साखळी तयार केली. पडले तर तिघंही पडतील. उतरणीवरून तिघं नीट उतरले; पण पुढे पाण्यातून जायचं म्हणजे कठीणच होतं. धोंड्यांची एक मांडलेली रांग वाट देत होती; पण तो काही योजनापूर्वक तयार केलेला रस्ता नव्हता. कुणी तरी कसे तरी एकापुढे एक धोंडे ठेवून पायाचा चवडा तरी निदान रोवता येईल असा मार्ग तयार केला होता. जहागीरदारांनी धोतर वर करून कमरेला खोवलं आणि त्यांनी दगडावर पाय ठेवला. दगड अगदीच अरुंद होता. त्यावरून नीट पुढे जाण्यासाठी जहागीरदारांना मोठीच कसरत करावी लागत होती. क्वचित त्यांच्या शरीराचा तोलही जात होता; पण ते मोठ्या सायासानं तोल सावरत होते.

अगदी मध्यावर आले. आता अवतीभोवती पाणी फार होतं. एका दगडावर त्यांनी पाय ठेवला मात्र, तो दगड डुगूडुगून हलू लागला. जहागीरदारांना पुढे येण्याची भीती वाटू लागली. मागंही जात येत नव्हतं. तो आडनिडा दगड पायाखालून सुटला तर देह कलंडायचा आणि फटफजिती व्हायची, म्हणून हतबुद्ध झाल्यासारखे ते तिथंच उभे राहिले. समोरच्या उतरणीवरून राम त्यांची ही तिरपीट पाहत होता. तो आणखी पुढं आला आणि त्यांना खुणेनंच त्यानं सांगितलं, "तिथंच थांबा."

मग राम मागं फिरला. आसपासचे पाच-पंचवीस लहान-मोठे धोंडे त्यानं उचलून आणले आणि एकेक करून ओढ्याच्या पाण्यात फेकले. एकेक धोंडा पाण्यात पडत होता तशी पाण्याची कारंजी उडून जहागीरदार, त्यांचा तो बावळट पुतण्या आणि त्याची मावशी हे सारे भिजत होते

"अरे, अरे, अंगावर उडतंय ना," मावशी त्रासून म्हणाल्या.

"त्याशिवाय हे दगड इथं टाकता येणार नाहीत आणि दगड टाकले नाहीत, तर तुम्हाला इथून येता येणार नाही," रामनं त्यांना ओरडून सांगितलं.

एकेक दगड उचलून राम टाकत होता आणि त्यासरशी पाणी उडत होतं. तो 'ओदेबुवा' श्रीमंत पुत्र तोंडात अंगठा घालून तो चोखत हे सर्व पाहत होता आणि 'ऑ, वा, वा, छान... ते बघा' असं वेडीवाकडी तोंडं करून ओरडत होता.

राम अगदी घामाघूम झाला होता. अखेर त्या दगडांचा खच तिथं

पडल्यामुळे पाण्याच्या पातळीवरून एक छोटा रस्ताच तिथं तयार झाला.

"हं, या आता सारे जण," असं रामनं म्हणताच तिघंही त्या दगडी पुलावरून आले. श्रीमंत जहागीरदारांना या सर्व घटनेचा फारच त्रास झाला होता, कारण त्यांचे पाय मातीला कधीच लागत नसत. आज मावशीच्या आग्रहामुळे श्रीमंतांनी शेतावर येण्याचं कबूल केलं होतं; पण त्यांच्या गुबगुबीत मुखावर जे रेषांचं जाळं तयार झालं होतं, त्यावरून असं वाटत होतं की, त्यांना बरीच शरीरपिडा सहन करावी लागली, तरी पण या भयंकर (?) संकटातून सुटका झाली, याचंच त्यांना मोठं समाधान वाटत होतं आणि त्यामुळेच हा त्रासही त्यांनी आनंदानं सहन केला होता. रामच्या धडपडीमुळेच शरीराला एकही सुरकुती न पडता तो ओढा ते पार करू शकले होते.

पलीकडच्या काठावर आले तेव्हा त्यांनी रामला नीट निरखून पाहिलं आणि विचारलं—

"कुणाचा रे तू?"

"प्रभुण्यांचा."

"विनायकभट्टाचा मुलगा का?"

"नाही. पुतण्या."

"वाटलंच मला. म्हणजे विश्वनाथाचा मुलगा."

"अगदी विश्वनाथासारखा दिसतो हो!" मावशी उद्गारल्या.

"काय करतोस बाबा तू इथं?"

"काही नाही. हेच करतो. आता केलं ते."

"आस्सं..."

काही तरी विचार केल्यासारखं करून मावशींनी विचारलं,

"विनायकभट्ट आहे का इथं? का गावाला गेलाय कुठं?"

"आहेत, उद्या जाणार आहेत पाडळीला."

जहागीरदारांनी अंगठ्यानं आपल्या बोटातल्या अंगठ्या चाळवल्या.

"जे काही हवं असेल ते सांग हो. संकोचू नको. आमचे श्रीमंत फार दिलदार आहेत. मागेल त्याला बक्षिसी देतात."

"मल बक्षिशी नको," राम ठामपणे म्हणाला.

"अरे, असं कसं. केवढं मोठं काम केलंस तू! अरे, एवढे दगड आमच्या या

चिरंजिवांनी उचललेच नसते आणि उचलले असते तर पुन्हा ते स्वतः उभं राहिले नसते," असं म्हणून फार मोठा विनोद केल्यासारखे श्रीमंत स्वतःच मोठ्यानं हसले. आपल्या अवतीभोवती खूप माणसं आहेत आणि त्यांनी विनोद ऐकला आहे अशा थाटात मग ते मान फिरवून बघू लागले आणि त्यांच्याकडे पाहून मग छोटे श्रीमंत हसू लागले.

"हे पाहा, आम्ही श्रीमंत आहोत. आमच्याकडून तुला काही तरी घेतलंच पाहिजे. काही न देणं हे आम्हाला शोभणार नाही," जहागीरदार हातातली काठी जमिनीवर आपटून पुन्हा म्हणाले.

"मला खरं काही नको; कारण बक्षीस घेण्यासारखं काम मी काय केलंय ? मी माझं कर्तव्य केलंय," राम नम्र स्वरात म्हणाला. या त्याच्या उद्गारांबरोबर आतापर्यंत केवळ थट्टेचं आणि खेळीमेळीचं वातावरण होतं ते संपलं आणि जहागीरदार त्याच्याकडे गंभीरपणे पाहू लागले. "बरं बरं. . परवा संध्याकाळी विनायकभट्टाला घेऊन वाड्यावर ये," असं ते म्हणाले आणि पुढं चालू लागले.

राम शेवग्याच्या शेंगा घेऊन घरी गेला. शेवग्याच्या पिठल्याचा खमंग वास घरभर पसरला होता. जेवणाच्या वेळी रामनं घडलेली सारी हकिकत विनायकाला सांगितली. ती ऐकंताना विनायकभट्टाला मनातून ओतप्रोत आनंद होत होता. रामला तथाकथित विद्या नव्हती; पण व्यवहार होते. पाठशाळेत तो जात नव्हता; पण या जीवनशाळेतून त्यानं किती पाठ घेतले होते आणि शेवटी 'रामनं' काहीही बक्षीस घेतलं नाही हे जेव्हा कळलं तेव्हा तर विनायकाच्या कानात दिव्य वाणी बोलून गेली—

"विनायका, तुझ्या पुतण्याचं भवितव्य फार मोठं आहे, उगाच चिंता करू नकोस."

"काका, मी जहागीरदारांकडून काही बक्षीस घेतलं नाही."

"का नाही घेतलंस ?"

"मग मी जे केलं त्याची मजुरी झाली असती ती."

"हो. तेही खरंच. परवा संध्याकाळी आपण वाड्यावर जाऊ तेव्हा तुझ्याबद्दल मी जहागीरदारांना बोलेन."

"काय ?"

"तू काल म्हणत होतास ते. त्यांच्या पुतण्याबरोबर अध्ययन."

"खरंच काका !" रामानं हातातला घास तसाच ठेवून विचारलं.

"अगदी खरं."

"पण जहागीरदार हो म्हणतील ?"

"माझी मनोदेवता सांगते, हो म्हणतील."

"मग विचारायचं त्यांना."

"विचारतो. उद्या मी पाडळीला जाऊन येतो. मग त्यांच्या निरोपाप्रमाणं परवा संध्याकाळी जाऊ. जाताना जानवीजोड घेऊन जाऊ त्यांच्यासाठी," विनायकभट्ट म्हणाला.

* * *

विनायकभट्ट अजून पाडळीहून यायचाच होता. तोच वाड्यावरून निरोप आला, "रामला बोलावलंय."

राम वाड्यावर गेला. एका उंची आसनावर जहागीरदार बसले होते आणि त्यांच्या शेजारी श्रीमंत. . . छोटे श्रीमंत बसले होते. जहागीरदार पितळी खलात जड बत्त्याने विडा कुटत होते. विडा तोंडात टाकून ते रामला म्हणाले,

"विनायकभट्ट नाही आला ?"

"ते पाडळीहून यायचेत," राम खाली मान घालून म्हणाला.

"असू दे. मी त्याला निरोप पाठवीन. हे बघ, कालच्या तुझ्या कामगिरीबद्दल तुला बक्षीस द्यायचंय. हे बक्षीस तुला आवडेल ?"

"कोणतं ?"

"तू आमच्या वाड्यावर रोज यायचं. आमच्या या छोट्या श्रीमंतांबरोबर राहायचं, त्यांच्याबरोबर अध्ययन करायचं आणि नेहमी त्यांच्यावर लक्ष ठेवायचं. कळलं ? तुझ्यासारखा चांगला सवंगडी आम्ही शोधतच होतो. अनायासे काल तू भेटलास. काय श्रीमंत, आवडेल ना तुम्हाला हा ?"

"हो, आवडेल की." तोंडातला अंगठा काढून छोटे श्रीमंत म्हणाले. रामची आकांक्षा अगदी अचानकपणे, अनाहूतपणे अशी फळाला आली होती. जहागीरदारांना नमस्कार करून तो वाड्याबाहेर पडला तेव्हा तो जमिनीवर नव्हताच. हवेत तरंगतच होता.

¤

# ५

सिद्धेश्वरशास्त्री मूळचे कर्नाटकातले. शिवाजीराजांच्या कारकीर्दीत शहाजीराजांच्या आश्रयानं कर्नाटकात वास्तव्य करून असलेली काही विद्वान ब्राह्मण घराणी महाराष्ट्रात आली. त्यांनी महाराष्ट्रात यावं म्हणून महाराजांनी त्यांना सर्व प्रकारे प्रोत्साहन दिलं होतं. कुणाला जमिनी, कुणाला इनाम, कुणाला वर्षासन. . . या ना त्या प्रकारे विद्वानांना उत्तेजित करून त्यांचा प्रवाह महाराजांनी महाराष्ट्राकडे वळविला. सिद्धेश्वरशास्त्र्यांचा विवाह बालवयातच झाला आणि दैवगतीनं त्यांना संसार असा करू दिलाच नाही. पती म्हणजे काय हे पत्नीला आणि पत्नी म्हणजे काय हे पतीला समजण्याच्या आधीच दोघांची नियतीनं फारकत केली. परलोकात पत्नी आणि पृथ्वीवर पती. मग सिद्धेश्वरशास्त्री पुन्हा विवाह करण्याच्या फंदात पडले नाहीत. पोथ्यापुराणांचं वाचन, शास्त्रेदर्शने यांचा अभ्यास आणि परमेश्वरचिंतन हेच त्यांचं जीवन झालं होतं. शिवाय एका ठिकाणी न राहणं हे आणखी व्रत होतं. अटन आणि विजन ही जी संन्याशाची लक्षणं ती सिद्धेश्वरशास्त्र्यांच्या ठायी पूर्णतः होती.

जहागीरदारांची आणि सिद्धेश्वरशास्त्र्यांची जुनी ओळख होती. खरं तर जहागीरदारांच्या वडील बंधूंची आणि सिद्धेश्वरशास्त्र्यांची. सिद्धेश्वरशास्त्री आता थकले होते. त्यांना आता कुठं तरी एकाच सावलीला वास्तव्य करून राहणं आवश्यक होतं आणि हे समजल्यावर जहागीरदारांनी त्यांची योजना माहुलीला केली— धाकट्या श्रीमंतांची देखभाल करायला आणि त्यांना शिकवायला.

असे सिद्धेश्वरशास्त्री ! गाढे पंडित, खाष्ट विद्वान आणि तर्कट ब्राह्मण. अवघं

आयुष्य एकाकी काढल्यामुळे त्यांच्या जीवनाला आणि वागणुकीला एक प्रकारचा तिरकसपणा आला होता; पण ते अध्यापनकार्यात कुशल होते. आजपर्यंत त्यांनी अनेक उधळलेली वासरं नीट दावणीला बांधली होती. धाकट्या श्रीमंतांना त्यांच्या हवाली करण्यात जहागीरदारांचा तोच हेतू होता.

* * *

राम जहागीरदारांच्या वाड्यात जाऊ लागला. वाड्याचा व्याप मोठा होता, विस्तार प्रचंड होता. देवडीवर एक अगडबंब पहारेकरी सतत पहारा देत असायचा. हंड्याझुंबरांनी वाड्याचा महाल सजलेला होता. उंच-उंच जोती, शिसवीच्या लाकडावर कोरीव नक्षीकाम केलेल्या चौपाया, बैठकीच्या खोलीत मऊ-मऊ रुजामा, असं वाड्याचं वातावरण कसं लख्ख आणि प्रसन्न होतं. अशा या वाड्यात राम प्रथमच प्रवेशत होता. तेव्हा तिथली स्वप्ननगरी पाहून क्षणभर तो स्तिमित झाला. दिवाणखान्यात उत्तरेला एक मोठी लांबसडक पडवी होती. या पडवीतच श्रीमंतांचं अध्ययन चालायचं. जहागीरदारांची संमती घेऊन आणखी पाच-सहा मुलं सिद्धेश्वरशास्त्र्यांकडून श्रीमंतांबरोबर शिक्षण घेण्यासाठी तिथं येऊ लागली होती. शंकरशास्त्र्यांच्या पाठशाळेसारखीच तिथं एक लहान पाठशाळा तयार झाली होती. फक्त इथं सारे श्रीमंतांचे-- जहागीरदारांचे-- आश्रित होते, निदान श्रीमंत तरी त्यांना तसे समजत होते. सारी मुलं गरीब आईबापांची होती.

धाकटे श्रीमंत रामपेक्षा वयानं लहान होते. डोक्यानं दुबळे असले तरी अंगापिंडानं मजबूत होते आणि त्यांना श्रीमंतीचा ताठा होता. आपल्याबरोबर शिकणाऱ्या इतर गरीब विद्यार्थ्यांनी नेहमीच आपल्या ताटाखालचं मांजर होऊन वागलं पाहिजे असं त्यांना वाटे आणि कळत नकळत, प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे त्यांच्या घरची इतर माणसं त्यांच्या या वृत्तीला खतपाणी घालत होती. एवढासा पोर, पण त्याला सर्वांनी 'श्रीमंत' म्हटलं पाहिजे असा दंडक मावशींनी घालून दिला होता. श्रीमंतांचे श्रीमंती चोचले पुरवलेच पाहिजेत, असा तिथला कायदा होता. श्रीमंतांच्या मेंदूवर बुद्धिदर्शक रेषा नव्हत्याच. त्यामुळे विद्वतेचं, व्यासंगाचं किंवा अभ्यासाचं आणि त्यांचं उभं वैर होतं; पण बुद्धीच्या अनुपस्थितीमुळे तिथं जी पोकळी निर्माण झाली होती तिची जागा कमालीच्या आढ्यतेनं भरून काढली होती. आपल्याबरोबरीची इतर मुलं आपली चाकरमानी आहेत, अशा

तऱ्हेनं श्रीमंत त्यांना वागवीत होते. 'श्रीमंत' म्हणजे जणू सम्राट आणि इतर म्हणजे त्यांचे दुबळे मांडलिक.

सिद्धेश्वरशास्त्र्यांसारख्या तत्त्वनिष्ठ आणि खाष्ट पंडितालाही श्रीमंतांच्या या अहंकारी व अस्वीकार्य वृत्तीची कधी-कधी चीड येत असे. त्यांना स्वतःलाही त्रास झाल्यानं ते जाणवत असे; पण केवळ मागले संबंध लक्षात घेऊन श्रीमंतांच्या मूर्ख चाळ्यांकडे 'बाललीला' या दृष्टीनं पाहून सिद्धेश्वरशास्त्री समाधान मानून घेत असत; पण या पोराची लक्षणं काही ठीक नव्हेत, हे मात्र त्यांना वारंवार जाणवत होतं.

आश्रिताची लाचारी पत्करणं सिद्धेश्वरशास्त्र्यांना शक्य नव्हतं, त्यामुळे कधी कधी त्यांना वाटे. 'जहागीरदारांचा वाडा सोडून जावं,' पण पुन्हा ते विवेक करून राहत.

श्रीमंतांबरोबर राम अध्ययन करू लागला आणि सिद्धेश्वरशास्त्र्यांना जरा बरं वाटलं. श्रीमंतांना ठणकावून सांगणारा, त्यांच्या आढ्यतेचा फुगा फोडणारा, त्यांना अहंकाराच्या उच्चासनावरून खाली खेचणारा कुणी तरी आला होता, तो रामच्या रूपानं. पहिल्याच दिवशी रामनं चुणूक दाखविली.

पडवीत बाकीची मुलं जमा झाली होती. बसण्यासाठी आपापली आसनं गुंडाळ्या करून काखोटीला मारून त्यांनी आणली होती. गुरुजींसाठी एक उच्चासन होतं, खरं तर त्यावर फक्त गुरुजींनीच बसायचं; पण श्रीमंत त्या आसनावर गुरुजींशेजारी बसत आणि इतर मुलं जमिनीवर खाली. शिवाय सगळी मुलं आधी वेळेवर येत आणि त्यांच्या मागून श्रीमंत माडी उतरून येत.

* * *

त्या दिवशी असंच झालं. राम जाऊन बसला. इतर मुलं आली होती. गुरुजीही अजून मागल्यादारी असलेल्या त्यांच्या मठीतून यायचे होते. श्रीमंत आले. . . आणि गुरुजींच्या उच्चासनावर बसले. सगळी मुलं चुपचाप बसली होती. . . पण राम उठला आणि श्रीमंतांना म्हणाला, "ते गुरुजींचं आसन आहे. तुम्ही उठा."

श्रीमंतांनी चमकून पाहिलं. अशा प्रकारे दुसऱ्या कुणाचं काही ऐकण्याची त्यांना कधीच सवय नव्हती. काहीशा गुर्मीतच आपल्या जरीच्या टोपीला फिरवत श्रीमंत म्हणाले, "आम्ही नेहमी इथंच बसतो."

"नेहमी बसत असलात तरी आजपासून खाली बसा." राम अगदी चढ्या आवाजात बोलला.

"मला खाली बसायला सांगणारा तू कोण ?"

"मी तुमचा सहाध्यायी. राम प्रभुणे."

"असशील ! आम्हाला त्याचं काय ?"

"पण आम्हाला आहे ना. गुरुजींच्या उच्चासनावर विद्यार्थ्यानं बसणं हा विद्येचा अपमान आहे," राम म्हणाला.

"ते आम्हाला माहीत नाही. आम्ही इथंच बसणार."

"मग आम्ही सगळे मिळून तुमची उचलबांगडी करू. चला रे सगळे उठा. श्रीमंत कसे खाली बसत नाहीत ते बघू." रामनं असं म्हणताच उरलेली सारी वानरमंडळी खरंच उठली. त्यांनाही श्रीमंतांचं आतापर्यंतचं वागणं पसंत नव्हतं; पण गरिबांच्या मुलांना बोलता येत नाही. त्यांना कुणी तरी असा धट्टाकट्टा, बेडर नेता हवाच होता. तो रामच्या रूपानं मिळाला.

सगळी मुलं श्रीमंतांच्या दिशेनं कोंडाळं करून पुढं-पुढं येऊ लागली.

"पुढं येऊ नका. . . आम्ही इथंच बसणार. . . मी सगळ्यांना हाकलून देईन. . . मागं व्हा," असं श्रीमंत म्हणत होते; पण त्यांचा चेहरा भेदरलेला होता. आवाजाला कंप होता. डोक्यात भीती गोळा झाली होती. त्यामुळे शब्दही चाचरतच येत होते.

"श्रीमंत, मुकाट्यानं खाली बसा, नाही तर आम्ही तुमची खरोखरीच उचलबांगडी करणार आहोत," राम दरडावून म्हणाला आणि थोडा आणखी पुढं झाला.

"ए, ए. . . मागं हो. . . ए. . . अंगाला हात लावू नको," असं श्रीमंत म्हणतात तोच रामनं श्रीमंतांची बखोटी धरली आणि मग श्रीमंत उठलेच. थेट खाली जाऊन बसले.

थोड्या वेळानं गुरुजी आले. त्यांना आश्चर्य वाटलं. आज श्रीमंत उच्चासनावर नाहीत ?. . . आणि चक्क खाली. त्यांनी केवळ स्मित करून अध्यापनाला सुरुवात केली.

अमरकोशातला काही भाग शिकवायचा होता. रामला तर काहीच येत नव्हतं; पण गुरुजी सांगतील ते लक्ष देऊन तो ऐकत मात्र होता. काही कळो न

कळो, चित्ताची एकाग्रता करून श्रवण करायचं असं रामनं मनापासून ठरवलं होतं.

* * *

अजून जहागीरदारांच्या वाड्यात जायला लागून महिनासुद्धा लोटला नव्हता; पण अशी एक घटना घडली की, रामला त्या वाड्यातून बाहेर पडावं लागलं. या महिनाभराच्या अवधीत रामच्या स्वाभिमानी मनावर प्रहार होतील अशा किती तरी घटना घडल्या होत्या; पण मनाला आवर घालून रामनं त्यांचा स्फोट कधी होऊ दिला नाही. येऊ म्हटलं तरी स्वाभिमानाच्या अंकुराला त्यानं वर डोकावू दिलं नाही. घेऊ म्हटलं तरी मनाला पेट घेऊ दिला नाही; पण असं किती दिवस चालणार होतं ? आग धुमसली तरी आतल्या-आत किती दिवस धुमसणार होती ? केव्हा तरी ठिणगीचा जाळ होणारच, केव्हा ना केव्हा धुमसत्या निखाऱ्याचा वणवा होणारच. त्याचं असं झालं...

सारी मुलं ओळीनं बसली होती. व्याकरणाचे धडे घेत होती. विभक्तींचा अभ्यास सुरू होता. मोठे श्रीमंत. . . जहागीरदार . . आज मुक्कामासाठी माहुलीला आले होते. महिनापंधरा दिवसांतून ते केव्हा तरी विश्रांतीसाठी नाही तरी पुतण्याची चौकशी करायला येत. वाड्यात मोठ्या श्रीमंतांचा मुक्काम होता. विद्यार्थ्यांचं पठण होत होतं. एवढ्यात सिद्धेश्वरशास्त्र्यांना मोठ्या श्रीमंतांकडून बोलावणं आलं. गुरुजी गेले आणि विद्यार्थी मोकळे सुटले. शास्त्रीबुवांना यायला बराच वेळ लागणार होता. ते परत येईपर्यंत काय पठणच करीत राहायचं ? छे...

"विटीदांडू खेळू या !" कोणी तरी म्हणाला.

"चला रे, चला," श्रीमंत म्हणाले.

मग काय, श्रीमंतांच्या पाठोपाठ ती पडवी सोडून सारेच शेजारच्या विस्तीर्ण मैदानावर धावले. मैदानावर मधेच कुठं-कुठं चिंचेची झाडं खुरटी सावली देत उभी होती; पण खेळायला जागा भरपूर मोकळी होती. गुरुजी परत येईपर्यंत विटीदांडूचा खेळ खेळायचा असं ठरलं.

नित्याच्या रीतीप्रमाणं श्रीमंतांचा डाव पहिला. श्रीमंत खेळू लागले. विटी झेलण्यासाठी दुसऱ्या बाजूला मुलं उभी राहिली. श्रीमंत हातात दांडू घेऊन उभे राहिले आणि त्यांनी डोळे वेडेवाकडे फिरवून विचारलं,

"कोलवू का ?"

"कोलवा ना." रामसकट सारी मुलं म्हणाली.

श्रीमंतांनी कोलवलेली विटी एका मुलानं झेलली. आता खरं तर विट्टी झेलणाऱ्या मुलाचा डाव होता; पण श्रीमंत डाव देईनात. बाकीची मुलं त्यांच्यापुढे काहीच बोलेनात. विटी झेलणाऱ्या मुलानं डाव मागताच हवेत दांडू फिरवून श्रीमंत म्हणाले, "पहिला डाव भुताचा." राम दूररवरून हे सर्व पाहत होता. ऐकत होता. तो शेजारच्या मुलाच्या कानात पुटपुटला, "खरोखरीच पहिला डाव भुताचा झाला."

"तो कसा काय ?" त्या मुलानं विचारलं.

"श्रीमंत आणि भूत यात काय फरक आहे ?" असं रामनं म्हणताच सारी मुलं खळाळून हसली. श्रीमंतांचं आणि विटी झेललेल्या मुलाचं डावासाठी अजून भांडण सुरूच होतं. श्रीमंतांनी हातातला दांडू रपकन त्याच्या पाठीत मारला. तो बिचारा कळवळला. पाठ चोळत मागं आला. त्याच्या डोळ्यांत पाणी जमा झालं होतं; पण आपण रडतो हे इतरांना दाखवायचं नाही म्हणून डोळे पुसून तो पुढं आला. आता मात्र रामला राहवलं नाही.

आता राम विटी झेलायला पुढंच उभा राहिला.

श्रीमंतांनी विटी कोलवली आणि रामच्या मागच्या मुलानं ती अलगद झेलली. मग तो मुलगा पुढे गेला. त्यानं डाव मागितला तर श्रीमंत जमिनीत पुरलेल्या खांबासारखे घट्ट उभेच. सगळेच मनातून रागावले होते, चिडले होते; पण करतात काय !

श्रीमंतांच्या कुत्र्यांचे सुद्धा चोचले पुरवायचे असतात. मग इथं तर स्वतः श्रीमंतच होते.

"श्रीमंत, दांडू द्या. आता डाव माझा आहे. . ." असं तो मुलगा म्हणाला, तरी श्रीमंत काहीच बोलेनात. उलट ते वाकून विटी कोलवू लागले. मग मात्र रामनंच विटी झेलली. मग रामच पुढे झाला आणि म्हणाला, "श्रीमंत, आता माझा डाव आहे."

"असला तरी मीच खेळणार आहे," श्रीमंत म्हणाले.

"श्रीमंत, डाव माझा आहे."

"असला तरी मी खेळणार आहे."

"मी तुम्हाला जिंकलंय श्रीमंत," राम तीव्र स्वरात म्हणाला.

"तू ? तू आम्हाला जिंकलंय ? हॅ..."

"श्रीमंत, हा अन्याय आहे. डाव द्या."

"न्याय-अन्याय एकच. तो म्हणजे आम्ही खेळणार."

"श्रीमंत, बऱ्या बोलानं दांडू द्या."

"नाही देणार. काय करशील ?"

"हिसकावून घेईन," राम म्हणाला.

"जा, जा, आलाय मोटा ! भिकार भटुकडा आणि मिजास केवढी !"

असं श्रीमंत म्हणाले मात्र. रामच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याची कानशिलं गरम आणि लाल झाली.

मग झोंबाझोंबी झाली. श्रीमंत हे श्रीमंत असले तरी पैलवान थोडेच होते ! शिवाय कधीही खेळात काय किंवा तालमीत काय त्यांनी मस्ती अशी केलीच नव्हती. रामही काही मोठा आडदांड गडी नव्हता; पण पुढे येणाऱ्या रामची करारी मुद्रा पाहून ते आधीच गळाठले होते. ते झोंबाझोंबी सुरू झाल्यावर आणखी भेदरले. हातातला दांडू त्यांनी फेकून दिला आणि आसऱ्यासाठी ते घराकडे पळाले.

रामचा विजय झाला होता. न्यायासाठी झगडून त्यानं विजय संपादन केला होता. अन्यायाचा खंबीरपणे प्रतिकार केला होता; पण हा विजय त्याला फार महागात पडला. सिद्धेश्वरशास्त्री आले. त्यांच्या मागोमाग थोरले श्रीमंत आले. धाकट्या श्रीमंतांची रडवी तक्रार त्यांच्या कानी गेलीच होती आणि त्यामुळे ते संतापले होते.

रामनं जहागीरदाराच्या मुलाशी भांडायचं ?

म्हणजे पर्वताशी टेकडीनं झुंज द्यायची !

सागराशी ओढ्यानं स्पर्धा करायची !

धाकट्या श्रीमंतांचा आढ्यताखोर, भित्रा, घमेंडखोर, पळपुटा, हेकेखोर स्वभाव मोठ्या श्रीमंतांना माहीत नव्हता असं नाही; पण रामनं जे धाकट्या श्रीमंतांशी वर्तन केलं होतं, त्यामुळे पर्यायानं मोठ्या श्रीमंतांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला होता. न्याय्य गोष्टीसाठीसुद्धा गरिबानं मान वर करता कामा नये, असा त्यांचा परंपरागत समज होता आणि त्यामुळेच खेळातल्या भांडणात रामची बाजू बरोबर आहे हे त्यांना मनोमन पटलं होतं तरीही मोठे श्रीमंत

दातओठ खात आणि रागाचं आकांडतांडव करीत बाहेर आले आणि त्यांनी पळत सरळ रामचा कान जोरात पकडून पिरगाळला. कळ मस्तकात गेली; पण रामनं हूं का चूं केलं नाही.

"बोल, तू भांडण केलंस ?"

"मी भांडण केलं नाही," जहागीरदारांच्या पंजातून स्वतःला सोडवून घेत राम स्पष्टपणे म्हणाला.

"मग तक्रार का आली ? कशी आली ?"

"ते तक्रार करणाऱ्यालाच विचारा."

"अस्सं ? तुझी जीभ आणि अक्कल फारच चालू लागली हं."

"माझी काहीच चूकच नाही. मी खरंच सांगतो."

"चूक कोणाचीही असो. श्रीमंतांची तक्रार आली की ज्याच्याविषयी तक्रार असते, त्यानं त्यांची माफी मागायची असते."

"मी माफी मागणार नाही."

"मागावी लागेल."

"मी माफी मागणार नाही. कारण मी चूक केलेली नाही."

ही शब्दांची आणि प्रश्नोत्तरांची जोरदार लढाई होत असताना इतर मुलं सशाच्या पिलांसारखी आकुंचित होऊन भेदरल्या चेहऱ्यांनी बाजूला उभी होती. धाकटे श्रीमंत मोठ्या श्रीमंतांच्या आश्रयानं उभे होते. प्रत्येक शब्दाबरोबर त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा एक उर्मट आनंद प्रकट होत होता.

"शास्त्रीबुवा, आमचीच चूक झाली," मोठे श्रीमंत सिद्धेश्वरशास्त्र्यांना म्हणाले, "पायदळी पडलेल्या फुलाला आम्ही डोक्यावर बसवलं. मग ते फूल आमचं पागोटं उडवणारच."

"ते फूल आहे. हे आपणाला मान्य असेल तर आपण एवढा अविचार करू नये. पागोटं उडविण्याची ताकद फुलात कुठली ?" शास्त्रीबुवा संथपणे जहागीरदारांच्या डोळ्याला डोळा देत म्हणाले.

"ते काही नाही. हा मुलगा म्हणजे आमच्या प्रतिष्ठेला आव्हान आहे. बघा कसा गुर्मीत आहे अजून तो. ए, माफी मागतोस का नाही ?"

राम काहीच बोलला नाही, जणू काही त्याच्या मूक दृष्टीला म्हणायचं होतं, 'मी एकदाच सांगितलंय. पुन्हा-पुन्हा काय विचारता ?' अखेर मोठे श्रीमंतच

आणखी पुढे झाले आणि त्यांनी रामचं डोकं धरून जबरदस्तीनं धाकट्या श्रीमंतांसमोर ते वाकविण्याचा प्रयत्न केला. तशी रामनं एक हिसडा मारला आणि तो दूर झाला. आता मात्र मोठ्या श्रीमंतांना राहवेना. हा त्यांचा धडधडीत अपमान. त्यांनी आपल्या कणखर हातांनी रामच्या एक श्रीमुखात दिली आणि अकांडतांडव करीत म्हणाले,

"चालता हो. या घराची पायरी पुन्हा चढू नको. भिकाऱ्याला भरजरी वस्त्रं देण्यात चूक आमचीच. त्या दिवशी ओढ्यावर भेटला नसतास तर बरं झालं असतं."

"मी जातो पण जाताना पुन्हा सांगतो, आपण कोणतंही कारण नसताना मला देहदंड केला आहे. शिवाय आपण मला चालता हो म्हणालात ! श्रीमंत, मी आपणहून आपणाकडे येण्याआधीच आपण मला सन्मानानं निमंत्रित केलं होतं; म्हणून तर मी आलो. या घराचं तोंड पुन्हा बघणार नाही. चाललो मी," असं म्हणून राम ताडताड निघून गेला. त्यानं एकदाही मागं वळून पाहिलं नाही. त्याच्या पाठमोऱ्या जात्या आकृतीकडे सारे जण अवाक होऊन पाहत होते. सिद्धेश्वरशास्त्री, त्यांचे विद्यार्थी, धाकटे श्रीमंत, मोठे श्रीमंत, सारेच !

कारण प्रत्येकाच्या मनात आताच्या या घटनेनं भावनांच्या विविध ऊर्मी निर्माण झाल्या होत्या. प्रेम, जिव्हाळा, माया, तिरस्कार, विजयोन्माद, विषाद, कणव. . . साऱ्या साऱ्या भावना, कोणत्या ना कोणत्या हृदयाच्या पणतीत त्यांच्या ज्योती पाजळल्या होत्या.

सिद्धेश्वरशास्त्र्यांचा लाडका विद्यार्थी राम गेला होता.

सवंगड्यांचा धीट आणि प्रेमळ सोबती राम गेला होता.

धाकट्या श्रीमंतांचा प्रतिस्पर्धी राम गेला होता.

मोठ्या श्रीमंतांचा आश्रित राम आता येणार नव्हता. किती तरी वेळ हे सारेच तसे उभे होते. . . त्यांच्या डोळ्यांसमोर होता फक्त राम !

ज्या दुर्दैवाची रामनं कल्पनाही केली नव्हती तेच पुढं उभं ठाकलं. जहागीरदारांचा दरवाजा त्याच्यासाठी कायमचा बंद झाला. अध्ययन आटोपलं. महिन्यापूर्वी निर्माण झालेल्या अंतरातल्या ऊर्मी कुठल्या कुठे विलयाला गेल्या. महत्त्वाकांक्षेचा उभारलेला पिसारा पुरा विस्कटला. स्वप्नं धुळीनं माखून गेली.

* * *

राम घरी आला तेव्हा विनायकभट्ट देवघरातून नुकतेच बाहेर येत होते. रामचा उतरलेला चेहरा, चेहऱ्यावर उजव्या गालावर तांबूस वळ आणि त्याच्या डोळ्यांतली उदास विषण्णता हे सारं पाहून विनायकभट्टाला वाटलंच की काही तरी चमत्कारिक घडलंय.

"काय झालं रे राम ?" जवळ येत विनायकभट्टानं विचारलं.

सहसा डोळ्यांत पाणी कधीही न आणणारा राम स्फुंदून-स्फुंदून रडू लागला आणि त्याला भावनांचा आवेग आवरता आला नाही.

स्वयंपाकघरातून काकू ऐकत होतीच. भाकरी थापता-थापता ती तशीच उठली आणि ज्वारीच्या पिठानं माखलेले हात तसेच कमरेवर मुडपून ती बाहेर येत म्हणाली,

"दिवे लावले असतील कुठं तरी ! त्याशिवाय एवढं रडू यायचं नाही. घ्या, जवळ घ्या त्याला आणि सांत्वन करा."

"तू जरा गप्प बैस गं. काय झालंय ते तरी कळू दे."

"काय व्हायचंय ! मी सांगते. जहागीरदारांच्या घरी भांडण !"

"हो का रे राम ?"

"हो," राम कसाबसा म्हणाला.

"बघा. मी तर्क केलाच होता. कुठं टिकायचा नाही म्हणून."

"भांडण का झालं ?"

"मी नाही केलं, काका."

"मग जहागीरदार तुझ्याशी आपणहून भांडायला आले ?" काकूनं हात नाचवीत कठोर स्वरात विचारलं.

"थांब ग. त्याला सांगू दे, काय सांगायचं ते."

"बसा तुम्ही त्याच्या फिर्यादी ऐकत आणि स्वतःचा वेळ वाया घालवत. माझी भाकरी करपली बघा," असं म्हणून काकू आत गेली.

आणि अंगणातून सिद्धेश्वरशास्त्री आत आले. व्यथित चित्त दिसत होते. आधीच थकलेल्या त्यांच्या चेहऱ्यावर विषण्णतेची छाया पसरली होती. कमरेवर हात देऊन एका चौपाईवर बसत सिद्धेश्वरशास्त्र्यांनी विनायकभट्टला विचारलं,

"रामनं सारं सांगितलंच असेल ना रे तुला ?"

"सांगितलं, पण नेमकं काय घडलं हे मला कळलं नाही."

"काहीही घडलं असलं तरी न्यायाची बाजू रामची आहे एवढं खरं; पण विनायका, मदांध सत्ता आणि उन्मत्त श्रीमंती यांच्यापुढे रोकडा न्याय टिकाव धरू शकत नाही रे बाबा."

"असं का म्हणता शास्त्रीबुवा ?"

"नाही तर आज रामच्या बाबतीत जे घडलं ते घडलंच नसतं. अरे, जहागीरदारांचा तो पुतण्या खरं तर राममुळे चांगला सुधारू लागला होता; पण मूळचा माथेफिरूपणा त्याचा. तो काही केल्या गेला नाही. मलासुद्धा आता त्या घरात राहावंसं वाटत नाही. राम अध्ययनासाठी पुढे बसलेला असला ना की बरं वाटायचं. जिवंत चैतन्याला आपण हळूहळू फुलवीत, आकार देत मोठं करतो आहोत असं वाटायचं. या धोंड्याला रे आता मी काय शिकवणार ? आणि खरं सांगू, आता माझ्याच्यानं पूर्वीसारखं अध्यापन होत नाही. जरा जास्त बोललो तर धाप लागते."

"बरं झालं शास्त्रीबुवा, तुम्ही आलात म्हणून राम निरपराध आहे मला कळलं तरी. नाही तर आम्ही असंच म्हणणार . ."

"म्हणून तर मी आलो. उठतो आता. सायंसंध्येची वेळ झाली. पुढच्या महिन्यात वऱ्हाडात जाणार आहे माझ्या नातीकडे. कदाचित पुन्हा परत येणारही नाही."

"मग जाताना आशीर्वाद द्या मला," असं म्हणून राम शास्त्रीबुवांच्या पाया पडला. "आयुष्यमान भव !" असा भरल्या कंठानं आशीर्वाद देऊन शास्त्रीबुवा निघून गेले.

आणि रामचा दिनक्रम पूर्वीसारखाच सुरू झाला. बिनशिडाचं तारू ! दिशा नसलेल्या मार्गावरचा प्रवास !

पुन्हा तेच !

नदीचं पाणी, गुरांची देखभाल, हिंडणंफिरणं, काकूंच्या शब्दांच्या माऱ्याला मूक प्रतिकार !

आता पुन्हा पाठशाळेऐवजी गोठ्यात फेऱ्या जास्त. अमरकोशाऐवजी कुऱ्हाडीचा दांडा हातात आणि अध्ययनाऐवजी घरची उदंड कामं !

घराच्या मागच्या बाजूला मोकळं मोठं अंगण होतं. एक-दोन जांभळीची झाडं, चार-दोन चिंचेची आणि त्याच्या पलीकडं बरीचशी बाभळीची झाडं तिथं

होती. जांभळीच्या झाडाखाली दुपारची गर्दगार सावली असे. झाडाखाली बसायला जागाही रामनं आणि विनायकानं चांगली चापूनचोपून तयार केली होती. दुपारी घरात लाहीलाही व्हायची. पश्चिमेकडून वाऱ्याची झुळुक आली तरी ती उन्हाच्या भट्टीतनं पुढं यायची. मग ती झुळुक कुठली ! गरम उष्ण वारेच ते. अशा वेळी दुपारी जांभळीखाली पडायला बरं वाटायचं.

* * *

सकाळीच काकूनं सरपणाची लाकडं संपल्याचं सांगितलं. दुपारी विनायकभट्टानं एक बाभळी तोडली आणि तिचा एक ओंडका तो कुऱ्हाडीनं फोडू लागला. इतक्यात राम आला आणि विनायकाच्या हातातली कुऱ्हाड घेऊन तो म्हणाला,

"काका, मला नाही का सांगायचं? मी असताना तुम्ही नाही ही कामं करायची. बसा तिथं जांभळीखाली."

विनायकभट्ट जांभळीखाली बसला. गेले दोन-चार दिवस त्याला रोज दुपारच्या वेळी थकवा वाटत असे. तापाची कणकण वाटत होती. आज आता तसंच वाटू लागलं. शरीर विश्रांतीची मागणी करीत होतं. मऊ मुलायम जमीन खाली होती. हातांची घडी करून त्यावर डोकं टेकून विनायकभट्ट आडवा झाला.

दूरवर समोर राम लाकडं फोडत होता. त्याच्या शरीराची एकेका घावाबरोबर होणारी वर-खाली हालचाल पाहत विनायकभट्ट पडला होता. रामच्या त्या रूपात त्याला भावाची मूर्ती दिसली.

विश्वनाथ !

थोरला भाऊ. अगदी अंतकाळी त्यानं व्यक्त केलेली आर्त इच्छा !

"मुलाचा संभाळ कर."

आपण दिलेलं वचन. त्या वचनाचं पालन आपण किती केलं ?

आपण त्याचा सांभाळ केला म्हणजे काय केलं ?

विनायकभट्टाच्या मनात या विचारांचे आवर्त वेगानं उठले...

"रामला निसर्गानं वाढवला म्हणून तो वाढला. त्याला वाढवण्यासाठी आणि आकार देण्यासाठी आपण काय केलं ? काहीच नाही. किती मी दुबळा ! लव्हाळ्यासारखा; वारा आला की हलतो, पूर आला की वाकतो. फक्त अस्तित्व ! स्वत्व काहीच नाही. आपल्या या अस्तित्वप्रियतेनं आपण आपल्या

अवतीभवतीच्या किती जणांवर अन्याय करतो... का नाही मी कठोर बोलत ! का नाही मी डोळा वर करून पाहत ! छे ! रामच्या बाबतीत माझं फार दुर्लक्ष झालं.

किती चांगला पोर आहे; पण त्याला वळणच नाही देता आलं. परमेश्वरानं पाऊस पाडला; पण शेताला बांध घालून तो वाढवायचा कुणी. पाऊस वाहून गेला. त्याचा ओढा झाला आणि नदीला मिळाला. बस्स ! तसंच रामचं आयुष्य. विद्या नाही, अध्ययन नाही, लग्नकार्य नाही... बुद्धी नाही असं आहे का ? बुद्धी आहे. प्रखर आहे. तीव्र आहे; पण बुद्धीला वळण नाही. सिद्धेश्वरशास्त्री तेच म्हणत होते. शंकरशास्त्री तेच म्हणत होते. ही प्रखर बुद्धी केवळ वळण नाही म्हणून वाया चालली. वळण मी द्यायचं तर मी हा असा...

विश्वनाथाच्या आत्म्याला काय वाटेल ? पार्वतीला स्वर्गातही उचकी लागेल... माझा राम लाकडं फोडतोय... माझा राम नदीवरून पाण्याच्या घागरी आणतोय... माझा राम गुरांना वैरण चारतोय... हेच का त्याचं आयुष्य ! असंच का त्याचं जीवन."

समोर वर अथांग पसरलेल्या निळ्या आभाळाची निळाई छेदून दोन पांढुरके ढग डोकावत होते आणि त्यावर दोन काळसर आकृती उमटल्या होत्या... विनायकाला वाटलं विश्वनाथ आणि पार्वती आपणाकडे डोळे रोखून बघताहेत आणि विचारत आहेत, 'बोल, अंतकाळी दिलेलं वचन पाळलंस ? नाही ? वचनभंग केलास ?...'

"नाही नाही... विश्वनाथ, असा रोखून पाहू नकोस माझ्याकडे. वहिनी, नका डोळे फाडू. मला ठाऊक आहे तुम्ही माझ्यावर रागावला आहात; पण वहिनी, मी खरंच सांगतो, मी त्याच्यासाठी जे जे करायचं ते करण्याचा अगदी मनापासून प्रयत्न केला हो; पण माझी शक्ती कमी आहे. मी दुबळा आहे हो... विश्वनाथ, तूसुद्धा रागावलास ! तुझं तरी काय चूक आहे... पण नाही ... आता मी माझी चूक सुधारेन. मी रामला शिकवीन, मोठा करीन... हो विश्वनाथ... विश्वनाथ !"

राम फोडलेल्या लाकडांचा भारा खांद्यावर घेऊन येत होता आणि त्याला हाका ऐकू आल्या...

"विश्वनाथ... विश्वनाथ..."

"काका, कुणाला हाक मारताय ?" रामनं विचारलं.

"कुणाला नाही बाबा. तुझ्या वडिलांची आठवण झाली."

"काका, तुमचे डोळे पाणावलेत."

"त्याच्या आठवणीनंच."

"आजच का आठवण झाली ?" भारा खाली टाकून रामनं विचारलं. तेव्हा विनायकानं त्याला जवळ बसवून घेतलं आणि सद्गदित आवाजात तो म्हणाला,

"राम, तुला माझ्या हवाली करून दादा-वहिनी निघून गेले. मी तुझ्या आयुष्याचं सोनं करीन अशी त्यांना खात्री होती; पण. . . मी त्याची माती केली. . ."

"काका. . ." राम भारावलेपणानं म्हणाला.

"होय राम. . . पिल्लाच पोषण प्रेमानं करावं लागतं. . . आम्ही तुझं कसं केलं. . . तू जगलास म्हणून वाढलास आणि वाढलास म्हणून जगलास. राम, विश्वनाथाची इच्छा होती की. . ."

"काय इच्छा होती, काका ?"

"तू मोठा शास्त्री-पंडित व्हावंस. वेदविद्यासंपन्न ब्राह्मण व्हावंस."

"मी अजूनही होईन."

"कसा होशील ? तुझ्या वयाची दोन दशकं आता होत आली."

"काका, मी प्रतिज्ञेवर सांगतो, बाबांची इच्छा मी निश्चयपूर्वक पूर्ण करीन. मला कोणतेही कष्ट सोसावे लागले, आयुष्य कशाही प्रकारे वेचावं लागलं, तरी विद्यासंपादनात मी यश मिळवीन. काका, मला ठाऊक आहे, माझ्यामुळे तुम्हाला फार मनस्ताप होतो, त्रास होतो, वेदना होतात; पण काका. . ."

"नाही नाही. . . राम, असं नको बोलू."

"मी खरं तेच बोललो काका; पण काका, आज हे ठरलं. . . आता तुम्ही रामच्या काळजीतून मुक्त झालात. यापुढे राममुळे तुम्हाला त्रास होणार नाही. काका, बाबांची इच्छा पूर्ण करण्यासाठी, तुमचा मनस्ताप नाहीसा करण्यासाठी, तुम्हाला मोठेपणा प्राप्त करून देण्यासाठी आणि स्वतः मोठा होण्यासाठी, काका, हा तुमचा राम उद्या सूर्योदयापूर्वीच इथून जाणार आहे. . . अज्ञात स्थळी. . . यशाच्या शोधात !"

विनायक केवळ ऐकत होता. त्याचे शब्द संपले होते.

¤

## ६

'**मी** विद्वान शास्त्री-पंडित होणार; बाबांची इच्छा पूर्ण करणार. उद्या सूर्योदयापूर्वी राम तुम्हाला या घरात दिसणार नाही,' असं रामनं विनायकभट्टाला सांगितलं खरं; पण समोर सगळा अंधारच दिसत होता. करायचं काय ? जायचं कुठं ? जगायचं कसं ? या प्रश्नांची उत्तरं मिळाली नव्हती. या अनुत्तरित प्रश्नांच्या गुंतवळ्यातच राम गडबडून गेला होता; पण त्याला प्रतिज्ञा खरी करायची होती. बाबांची इच्छा पुरी करायची होती. महत्त्वाकांक्षा पुरी करायची होती.

रात्रभर त्याला झोप नाही आली. बाकी काही करता आलं नाही तरी एक गोष्ट करता येणार होती, ती म्हणजे घर सोडणं. आणि तेवढंच करण्याचा रामनं निश्चय केला होता. एकदा घराची सावली संपली म्हणजे रणरणत्या उन्हात शरीर आपोआप दुसरी सावली शोधण्यासाठी धडपडेल. नाही तर भाजून खाक होईल; पण ही सावली तोडायला हवी. कठोरपणे, धडाडीनं.

घर सारं निद्रेच्या आधीन झालं होतं. अंधाराच्या दुलईत जग गपगार झोपलं होतं. कुठंकुठं तांबुस-पिवळ्या प्रकाशाच्या समया किलकिले डोळे करून लुकलुकत होत्या. रामची तळमळी वाढली. या कुशीवरून त्या कुशीवर . . त्या कुशीवरून या कुशीवर . . अंथरूण अंगाला टोचू लागलं. विनायकभट्टाला रामनं काल सांगितलं होतं तरी त्याला ते फारसं खरं वाटलं नाही, गंभीर तर नाहीच वाटलं. राम म्हणाला घर सोडून जाईन; पण असा कुठला जातोय तो, असंच त्याला वाटलं. म्हणून तोही निश्चिंतपणे झोपी गेला होता. पहाटे कोंबडा आरवला तरी घराला जाग आली नाही...

काकूनं काल पोहे कांडण्याचा घाट घातला होता. त्यामुळे ती दमून भागून झोपली होती. विनायकभट्टाला रात्री उशिरापर्यंत झोपच आली नव्हती. त्यामुळे पहाटेस तो झोपला तो गाढच. अवतीभवती ढोल बडवले असते तरी त्याला जाग आली नसती का नाही कुणास ठाऊक ! कोंबडा आरवल्यावर राम उठला. अंथरुणाची गुंडाळी करून ठेवली. हलक्या पावलानं मागल्या दारी गेला. कोरांटीच्या आळ्याशी जाऊन त्यानं खळखळून चुळा भरल्या. रोज पहाटे या कोरांटीला तो अशा तऱ्हेनं जीवनदान करायचा. आता ती कशी जगेल ? तिला पाणी कुणी देईल का ? का शुष्क होऊन ती मान टाकेल ? कोरांटीचं एक फूल रामच्या दिशेनं झेपावल्यासारखं करीत वाऱ्यावर हलत होतं. अर्धस्फुट होतं बिचारं. रात्रीपर्यंत उमललं असतं; पण त्याचं उमलणं बघायला रात्री राम नव्हता.

मग राम घरात आला. देवघरात देवासमोर उभा राहिला. नागेशभट्टानं प्रभुण्यांच्या घरात जेव्हा एक शाडूची मूर्ती आणली होती, तेव्हापासून ती देव्हाऱ्यात होती. ती लाभदायी आहे अशी घरातल्या सर्वांची श्रद्धा होती. लहानपणी रामनं हट्ट केला तेव्हा विश्वनाथानं त्याला खेळवण्यासाठी एक पितळी लंगडा बाळकृष्ण आणला होता, तोही देव्हाऱ्यात होता.

देवापुढे रामनं साक्षात लोटांगण घातलं. समई रात्रभर तेवली होती. वातीवर काजळी धरली होती. तेल पिऊन वात फुगली होती; पण समईतलं तेलं संपलं होतं. रामनं काजळी झटकली. शेजारीच ठेवलेल्या बरणीतून लाकडी चमच्यानं समईत तेल घातलं. वातीनं पुन्हा प्रकाश फेकला. देवघर पिवळसर प्रकाशात दिसू लागलं. रामनं भक्तिभावानं पुन्हा हात जोडले आणि तो मनात म्हणाला,

'देवा, मला धीर दे. शक्ती दे. प्रतिज्ञेचं पालन करण्यासाठी सामर्थ्य दे. माझ्या जीवनावरील काजळी अशी झटकायची आहे मला. प्रभो, मला सामर्थ्य दे.'

राम मागं फिरला. अजून घर निद्रिस्त होतं. आता तर सारेच गोड साखरझोपेत होते. अंधार संपणार असल्याची प्रसादचिन्हं पूर्वेवर उमटत होती. सत्वाचा जणू तमाशी सामना होत होता आणि हळूहळू सत्याचा विजय होत होता. पूर्वकडा रक्तिम झाली होती. गाई-म्हशींना अंधारात पानवलं जात होतं. त्यांच्या हंबरण्याचे आवाज शांततेचा वेध घेत होते. राम उंबऱ्याच्या बाहेर पडला. पूर्वी त्यानं विनायकभट्टाच्या पायाला हात लावून प्रणाम केला होता. झोपलेल्या

माणसाला नमस्कार करू नये म्हणतात. . . प्रणामासाठी जोडलेले हात त्यानं खाली घेतले. त्याला कुणाला जागं करायचं नव्हतं.

पलीकडे काकू आपल्या तान्ह्याला कुशीत घेऊन गाढ झोपली होती. वात्सल्याचं ते मूर्तिमंत चित्र पाहून रामला आपल्या आईची आठवण झाली.

'माझ्या आईनं मला असंच लहानपणी कुशीत घेतलं असेल,' आणि तो मनाशी म्हणाला, 'काकू, जातो मी. तू मला त्रास दिलास, माझा दुस्वास केलास तरी तूच मला भुकेच्या वेळी घास भरवला आहेस हे मी विसरणार नाही. काकू, राम उनाड आहे, निर्बुद्ध असेलही, चंचल आहे, पण कृतघ्न खास नाही. काकू, तू मला आईच्या ठिकाणी आहेस. मला आशीर्वाद दे.'

याच वेळी काकूनं कूस बदलली व राम बाहेर पडला. अंगणात येताच त्यानं आपलं घर डोळे भरून पाहून घेतलं. ज्या घराचा आणि आपला इतक्या वर्षांचा स्नेह, ते घर आता फार काळ अंतरणार होतं. हा रेशीमधागा सहजासहजी तोडून फेकून दूर जाणं रामला कठीण वाटू लागलं. 'इथंच मी खेळलो, वाढलो, रडलो, भांडलो, हट्ट केला, कामं केली. या उंबरठ्यावर मी कितीदा तरी बसलो. या घराला मी अंतरणार,' असे विचार त्याच्या मनात येऊ लागले आणि पाय लवकर निघेना.

पण छे ! भावनेचे हे पाश कितीही नाजूक असले, कितीही हृद्य वाटले तरी ते तडातड तोडून टाकणं हेच याच वेळी योग्य आहे. त्यांच्या बंधनात मी राहिलो तर रामच राहीन आणि त्यांची बंधनं तोडली तर शास्त्री होईन, मोठा होईन, स्वप्न साकार करीन. या विचारांबरोबर त्याला त्या भावसमाधीतून खडबडून जाग आली आणि भरकन् मागं वळून राम गेला. . . तो गेलाच !

घराचा त्याग करून नात्यागोत्यांच्या माणसांचा त्याग करून, ध्येयसिद्धीसाठी, स्वप्नपूर्तीसाठी, महत्त्वाकांक्षेच्या साधनेसाठी, प्रभुण्यांचा राम माहुली सोडून गेला. माहुलीच्या मातीचा त्यानं निरोप घेतला.

* * *

तसं पाहिलं तर माहुली आणि सातारा यात फारसं अंतर नाही. सातारा हे मोठं नावाजलेलं नगर. माहुली साताऱ्याच्याच सावलीला राहिलेली. साताऱ्यानं माहुलीचं भरणपोषण पुष्कळ केलं होतं. सातारा नगरातली लहानमोठी धार्मिक कार्ये माहुलीच्याच आधिपत्याखाली होत होती. साताऱ्यातील नगरवासीयांना

धर्मकार्याचं पुण्य प्रदान करण्याची महनीय कामगिरी माहुली करीत होती. सकाळी साताऱ्याहून उठावं, माहुलीला जावं, माहुलीच्या कर्तव्यतत्पर उपाध्याय मंडळींकडून अभिषेक, पूजा, लघुरुद्र, उद्यापन, व्रतसांगता करून घ्यावी आणि सायंकाळी साताऱ्यात परतावं अशी वहिवाट होती, तरीही ही दोन गावं वेगवेगळी होती. माहुलीनं स्वतःचं असं वेगळेपण जपून ठेवलं होतं.

राम माहुलीतून निघाला अन् साताऱ्याची वाट चालू लागला. एकटाच. पुढे कुठं जायचंय, काय करायचंय हे त्याला काहीच माहीत नव्हतं, तरी तो वाट चालत होता. माहुलीहून साताऱ्याला जाणाऱ्या आणि साताऱ्याकडून माहुलीला येणाऱ्या माणसांची वर्दळ मार्गाला एव्हाना सुरू झाली. दूर सभोवतालच्या डोंगरावर प्रकाशपुंज दिसू लागले. शिखरं सुवर्णानं मढली. रात्रीच्या स्थिरचित्राला गतिचित्राचं रूप आलं. मुलं-माणसं जागी झाली. गावकरी कामाला लागले आणि याच वेळी रामनं साताऱ्याच्या वेशीत प्रवेश केला. माहुली केव्हाच मागं राहिली होती. आता पराक्रमी सातारा रामच्या पुढ्यात आला होता. रामला खुणावीत होता. हो; पण जायचं कुठं ? कुणाकडे ? कशासाठी ?...

पाय नेतील त्या वाटेनं राम चालतच होता. आसरा ना आडोसा. ओळख ना पाळख. अशा अवस्थेत गर्दीत हरवलेल्या लहानशा मुलासारखा राम साताऱ्याच्या रस्त्यावर उभा होता. कधी चालत होता. कधी कुठं बसत होता. असाच चालता-चालता उगाच एका ठिकाणी थबकला. डाव्या हाताला समोर एक भला मोठा वाडा दिसत होता. एखाद्या डोंगराची दरड दिसावी तशी वाड्याची भिंत दिसत होती. वाडा ओळखीचा वाटला; वाट परिचयाची दिसली...

होय. तोच वाडा. रामच्या स्मृतीनं रामला मदत केली. 'लहानपणी.... एकदा नव्हे, दोनदा नव्हे, तीन-चार वेळा, काकांबरोबर या वाड्यात आलो होतो. दक्षिणा घेतली होती. आशीर्वाद मिळवला होता. तोच हा वाडा.' मग राम इथंच थांबला. आपल्या नशिबाची परीक्षा इथंच घ्यायची असं त्यानं ठरवलं. पण. . . आत जायचं कसं ?

देवडीवर एक दांडगोबा उभा होता. मोठा कुर्रेबाज दिसत होता. त्याच्या ओठावरलं मिश्यांचं जंगल खाली ओघळलं होतं. डोळ्यांत जरब होती. हातात दंड होता. राम त्याच्या सरळ पुढे गेला आणि काही न बोलता, जणू काही त्याला

आपण पाहिलंच नाही अशा थाटात आत जाऊ लागला. त्यानं अडवलंच.

"ए, आत कुठं निघालास ?" रानबोक्यासारखा गुरगुरून तो म्हणाला.

"मला सावकारांना भेटायचंय," राम धीटपणे म्हणाला.

"सावकारांना भेटायचंय ? वा रं भेटनार ! तू कोन पेशवा हायेस व्हय रं सावकारांना भेटायला."

"मी माहुलीहून आलोय. गरीब ब्राह्मणाचा मुलगा आहे."

"असशील. हितं रोज शे-शंभर गरीब ब्राह्मण येत्यात."

"होय ना ? मग मलाही त्यांच्यात जाऊ द्या ना."

"अं हं. . . तसं न्हाई जाता येनार. कुनीबी यायला हा काई पानवठा हाय गावचा का भाजीचा मळा हाय ? अनगळ सावकारांचा वाडा हाय ह्यो."

"मला त्यांनाच भेटायचंय."

रामनं कितीही कळवळ्यानं सांगितलं, विनवण्या केल्या तरी त्याला पाझर फुटेना. तो काळा फत्तर तसाच उभा रामची वाट अडवून. एवढ्यात आतून खणखणीत शब्दांत कुणी तरी बोललं,

"शिदबा, कोण आहे त्याला आत पाठवून द्या. . ."

"जा बाबा, तुझं नशीब शिकंदर हाय."

देवडीवाल्याचं नाव शिदबा आहे, हे यावरून रामनं जाणलं आणि शिदबाकडं एक हसरा कटाक्ष टाकून राम आत गेला. आतल्या त्या खणखणीत, तिखट आणि तीव्र आवाजानं ही जादू केली होती. शिदबा देवडीवाला मागं झाला होता. रामच्या वाटेतला अडसर दूर झाला होता.

हा आवाज कुणाचा ? सावकाराचा ?. . असेलही. . . दडपल्या उरानंच राम आत गेला.

"कोण रे बाळ, तू कोणाचा ?" केशरी शाल पांघरलेल्या एका वृद्ध पण तेजस्वी व्यक्तीनं रामला विचारलं.

"मी माहुलीच्या प्रभुण्यांचा राम."

"अस्सं. मग इथं का आलास ?"

"अन्नाची आणि मनाची भूक भागवायला," चटकन राम उत्तरला आणि त्या शालधारी वृद्धानं चमकून रामकडे पाहिलं. इतकं बुद्धिमान उत्तर एवढ्या कोवळ्या तरुणाकडून त्यांना आजवर कधीच मिळालं नव्हतं, म्हणून त्यांना

आश्चर्य वाटलं.

ते कोण होते ? अनगळ सावकारांचे प्रमुख उपाध्याय होते. वेदशास्त्रसंपन्न होते. शुद्धाचरणी म्हणून त्यांचा लौकिक होता. केशवशास्त्री त्यांचं नाव. रामनं दिलेलं उत्तर 'अन्नाची आणि मनाची भूक भागवायला आलो' हे ऐकून केशवशास्त्री त्याच्यावर निहायत खूष झाले होते. इतकं मार्मिक आणि तेजस्वी पण प्रामाणिक उत्तर त्यांना क्वचितच ऐकायला मिळालं होतं. ते म्हणाले,

"ते पाहा. नानासाहेब सावकार बसलेच आहेत तिथं. त्यांना नम्रपणे अभिवादन कर. तुझी अडचण त्यांना सांग. नानासाहेब दयाळू आहेत. तुझं काम खात्रीनं होईल असं मला वाटतं."

केशवशास्त्र्यांनी दूरवरूनच नानासाहेब अनगळांकडे अंगुलीनिर्देश केला आणि नंतर ते निघून गेले. जाताना म्हणाले,

"बाळ नंतर भेटून जा हो मला."

मोठ्या आत्मविश्वासानं राम पुढे गेला. अंतःकरणात मात्र भीतीनं प्रवेश केला होता. ऊर धडधडत होता, नाही असं नाही; पण वरकरणी तसं काही न दाखवता राम पुढे गेला. उच्चासनावर लोडाला टेकून सावकार बसले होते. सावकारांचा देह प्रशस्त होता. हातात अंगठ्या, कानी भिकबाळी, गळ्यात मोत्यांचा हार . . लोडावर मखमली रंगीत आवरण होतं. सावकारांना लवून नमस्कार करून राम म्हणाला,

"माहुलीहून आलो आहे."

"हेतू ?" तोंडामध्ये विडा ठेवीत सावकारांनी विचारलं.

"आपली सेवा," नम्रतापूर्वक राम म्हणाला.

"पंक्तीला जेव आणि दक्षिणा घे. माध्यान्हीला ये."

"एवढ्यानं काय व्हायचंय, श्रीमंत ?"

"मग काय हवंय तुला ?"

"चाकरी, कामधंदा."

"तू ? तू कसली चाकरी करणार इथं ?" सावकारांची प्रश्नमुद्रा.

"कसलीही."

"कसलीही ?". . . थोडं थांबून सावकार म्हणाले, "कसलीही चाकरी खरंच चालेल तुला ? इतकी निकड आहे ?"

“हो.”

“तर मग शागिर्दी करशील ?” रामच्या डोळ्यांत रोखून पाहत सावकार नानासाहेबांनी विचारलं.

“चालेल. करीन मी,” विनम्रपणे राम म्हणाला.

“मुला, पुन्हा विचार कर नीट. शागिर्दीचं काम कटकटीचं आहे.”

“मी सगळा विचार केलाय श्रीमंत, आणि मला कोणतंही काम कटकटीचं वाटणार नाही.”

“ठीक आहे. असं कर, आतापासूनच रुजू हो. भिकोबा. . . इकडं या.” असं म्हणून त्यांनी आपले खासगी कारभारी भिकोबांना बोलावलं.

किरकोळ देहयष्टीचे आणि लाचार मुद्रेचे भिकोबा तत्काळ आले आणि खोटं हसून म्हणाले, “हुकूम श्रीमंत. . .”

“हे पाहा, हा मुलगा आजपासून आपल्या खासगीत आला आहे. शागीर्द म्हणून. त्याला त्याचं काम सांगा आणि सगळं दाखवा.”

“हो हो दाखवतो. चल बाबा.” असं म्हणून भिकोबा पुन्हा एकदा सावकारांकडं पाहून लाचार हसले.

* * *

त्यांच्या त्या उगीचच हसण्याची रामला गंमत वाटली. या वाड्यात आल्याबरोबर रामला चित्रविचित्र तऱ्हांची, नाना स्वभावांची माणसं भेटत होती. देवडीवाला, शास्त्रीबुवा, भिकंभट, सावकार ही सगळी भिन्न-भिन्न स्वभावांची, शरीरयष्टीची माणसं पाहून रामला एका अगदी वेगळ्या जगात आल्याचा प्रत्यय आला.

माहुलीचा राम प्रभुणे आता श्रीमंत अनगळ सावकार यांच्या वाड्यावरचा शागीर्द झाला होता. रामचं नवं आयुष्य सुरू झालं. शागीर्द म्हणून का होईना त्याला कुठं तरी आसरा मिळाला होता. ‘आज पहाटेस घर सोडलं. . . आणि रात्रीला नव्या घरात आपण जुने झालो,’ असा विचार मनात येताच राम स्वतःशीच हसला. दैवगती म्हणतात ती हीच, याचा प्रत्यय त्याला आला. आतापर्यंत रामनं खूप डाव खेळले होते. खेळातले आणि प्रत्यक्ष जीवनातलेही. आजपासून तो एक नवा डाव खेळत होता.

त्याच्या आधीचे बरेच ‘शागीर्द’ त्या वाड्यात होते. त्यात हा एक नवा

शागीर्द. सावकार, कुटुंबीय, पाहुणे मंडळी, अतिथी यांबरोबरच या जुन्या शागिर्दांचीही शागिर्दी कधीकधी रामला करावी लागे. हो, तसा तिथला अलिखित नियम होता. जुने शागीर्द हे नव्या शागिर्दांचे ज्येष्ठ अधिकारीच जणू ! मग सांबाबरोबर या नंदींचीही सेवा करावी लागे.

सूर्य उगवण्यापूर्वीच दिवसाची सुरुवात आणि रात्री धरणीला अंग टाकावं तेव्हा प्रहरभर रात्र टळून गेलेली असायची. दिवसभर कष्ट, काम, सेवा आणि चाकरी. माहुलीच्या मस्त मोकळ्या वातावरणातून राम आता या सातारी रुक्ष वातावरणात आला होता. कित्येकदा कुणाची बोलणी खावी लागत. अपमान सहन करावे लागत. तिरस्कार आणि उपेक्षा ही तर शागिर्दांच्या कपाळी लिहिलेलीच. त्या घरातली यच्चयावत मंडळी दिवसभर आपलं लक्ष एकच ठेवत, ते म्हणजे शागीर्द. शागिर्दाला केवळ शरीरपीडा फार असं नव्हे, तर मानसिक यातनाही मोठ्या. त्यानं सर्वांना सांभाळायचं; पण त्याला मात्र कुणीच सांभाळायचं नाही.

इकडं सावकारांचा खास शागीर्द त्यांच्यासाठी आंघोळीला पाणी काढायला सांगेल, तर स्वयंपाकघरातला आचारी मोठं पातेलं घासून देण्याबद्दल फर्मावेल; पाणी संपलं आहे अशी ओरड येईल म्हणून खांद्यावरून पाण्याची कावड घेऊन यावं, तर दारात देवडीवाला सांगेल 'चिलीम ओढायची आहे, फडकं भिजवून आणं;' असे एक ना दोन अनेक कामाचे प्रकार आणि काम सांगणाऱ्यांचे प्रकार ! काम करणारा मात्र एकटाच.

माहुलीत राम एकदा घरचं काम केलं की उरलासुरला वेळ मनमानीपणे घालवायला मोकळा होता. इथं तसं नव्हतं. सूर्य मावळतो आणि अंधार होतो म्हणूनच इथलं जग शांत होतं. तसं नसतं तर या श्रीमंती जगतात कामं आणखी वाढली असती आणि मग शागिर्दीचा त्रास तितक्या पटींनी वाढला असता. रामला हे जाणवत होतं; पण दूरवर दिसणाऱ्या उज्ज्वल भवितव्याकडे दृष्टी ठेवून रामनं हे पायाखालचं रणरणतं वाळवंट तुडवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. सारं सहन केलं. जाणीवपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक. त्यातच सुख मानलं रामनं.

नोकरी मिळाली. पोटाचा प्रश्न सुटला. आसरा मिळाला. सावलीचा प्रश्न सुटला; पण राम साताऱ्याला आला होता तो काही पोटाला तुकडा मिळत नव्हता म्हणून नव्हे. ती वीतभर खळगी भरायला माहुलीत त्याला खूप मिळत होतं.

माहुलीतही त्याला घरी उपेक्षा सहन करावी लागली; पण भुकेची वेळ कधीच टळली नाही किंवा काकूनं कधी आखडता हात घेतला नाही. तेवढं माहुलीत मिळतच होतं. मग साताऱ्यात तेवढंच मिळवून कसं भागेल ? राम इथं आला तो कर्तृत्व उभारण्याच्या दुर्दम्य आकांक्षेनं. मनाला महत्त्वाकांक्षेचे गरूडपंख लावून. स्वप्नांचा मोरपिसारा उभारून राम इथं आला होता. तो इथं आला होता त्यानंच क्षितिजावर रेखाटलेल्या स्वतःच्या आयुष्याच्या चित्राकृती मनासमोर ठेवून !

सावकारांच्या वाड्यात रुजू होऊनही आता किती तरी काळ लोटला होता; पण मनाची भूक भागवली जाईल असं कुठं त्याला दिसत नव्हतं. तशी लक्षणं प्रत्ययात येत नव्हती. आणि तेही बरोबरच आहे... लोकांच्या मनात हा विचार येईलच कसा ? शागिर्दाला शिक्षण ? पाणक्याला पाणिनीय सूत्रं ? हरकाम्याला कौमुदी ? सेवकाला संध्या आणि सूक्ते ? छे, कुणाच्या ध्यानीमनीसुद्धा येणार नाही; पण हा सेवक आगळा होता. हा हरकाम्या इतरांपेक्षा वेगळा होता. तो शागीर्द होता सरस्वतीचा !

राम चाचपडत होता; पण त्याला रस्ता अजून सापडला नव्हता. पण एक दिवस त्याला आशेचा अंधुक किरण दिसला. किट्ट काळोखात काजवा चमकावा तसं झालं. सावकारांचे उपाध्याय केशवशास्त्री ! त्यांनी भेटायला सांगितलं होतं. त्यांनीच या वाड्यात प्रथम प्रवेश मिळवून दिला होता.

एक दिवस केशवशास्त्री सकाळचेच हातात परडी आणि पूजापात्र घेऊन चालले होते. समोरून राम सावकारांच्या कपड्यांचा गठ्ठा घेऊन येत होता. राम थबकला आणि हेतुपूर्ण नजरेनं त्यानं केशवशास्त्र्यांकडे पाहिलं.

"काय हवं बाळ तुला ?" केशवशास्त्र्यांनी मृदू स्वरात विचारलं.

"मी... प्रभुण्यांचा राम... तुम्ही मला भेटायला सांगितल होतं."

"हो, मग भेटला नाहीस ?"

"नाही भेटलो. संकोच वाटला. मी एक शागीर्द आणि आपण..."

"अस्सं. मग आता नाही संकोच वाटत ?"

"वाटतो; पण मला आपल्याला काही..."

"सांगायचंय ? सांग ना. मोकळेपणानं सांग. इथं काही त्रास होतो का तुला ? खाणंपिणं व्यवस्थित मिळतं ना ?"

"हो. त्रास काहीच नाही; पण मला... मला आपणाकडून..."

"स्पष्ट बोल. चाचरू नको."

"मला पूजा शिकायची आहे. शिकवाल ?"

केशवशास्त्र्यांना आश्चर्य वाटलं. एक शागीर्द पूजा शिकायची म्हणतो. त्यांना वाटलं हा काही तक्रार सांगेल, सावकारांकडे कसली तरी शिफारस करण्याची मागणी करील; पण याची मागणी अगदीच अनपेक्षित; याची आकांक्षाच अपूर्व ! सामान्य सेवकानं सरस्वतीच्या उपासनेची व्यक्त केलेली आकांक्षा ! केशवशास्त्र्यांना रामचं कौतुक वाटलं. त्यांनी विचारलं,

"तुला संध्या तरी येते का ?"

"येत होती. आता विसरलो," राम प्रामाणिकपणे म्हणाला.

"मग कठीण आहे. मुला, ही संस्कृत भाषा. लहानपणीच जिभेला तिचं वळण द्यावं लागतं. आता मोठेपणी जड जाईल."

"मी प्रयत्न करीन. वाटेल ते कष्ट करीन."

"कसं सांगू बाळा तुला... ही गीर्वाण भाषा म्हणजे खडतर व्रत."

"आपण कितीही कडक व्रत करायला सांगा. मी पालन करीन." हे बोलणं चाललंय तोच कुणाची तरी हाक आली, "राम्या. . ." हाक मारणाऱ्यानं ती दातओठ खाऊन मारली असणार इतकी जोरात होती. सावकार नानासाहेब बाहेरून येण्याची वेळ झाली होती. आज त्यांना यायला नेहमीपेक्षा उशीरच झाला होता. त्यांच्या स्नानाची, स्नानोत्तर संध्येची जय्यत तयारी ठेवणं आवश्यक होतं. या तयारीत, कुठं तसूभरही उणीव दिसली असती तर नानासाहेबांचा संताप झाला असता. त्यामुळे त्यांच्या खास शागिर्दानं इतकी घसा खरवडून हाक मारली होती.

"राम्या, नानासाहेब आले. घंगाळात ऊन पाणी तयार ठेव पाय धुवायला. लक्षात ठेव, गार पाण्याचं घंगाळही भरलेलं असू दे."

"ठेवतो, दोन्हीही तयार ठेवतो," असं म्हणून राम तयारीसाठी सरसावला. केशवशास्त्री त्याच्याकडं सहानुभूतीनं पाहत आपल्या कामाला निघून गेले.

* * *

नानासाहेब आले. वाड्यात धावपळ झाली. नानासाहेबांच्या समवेत आज एक जवाहिऱ्या आला होता. या जवाहिऱ्याकडून नानासाहेब नेहमी मौल्यवान हिरे, मोती, खडे, सोने, अलंकार खरेदी करीत असत. फार पूर्वी त्यानं

नानासाहेबांना एक भिकबाळी दिली होती. ती नानासाहेबांच्या कानात होती. नानासाहेब अंगरखा काढून उघड्या अंगानं चौरंगावर बसले. थोड्या अंतरावर दुसऱ्या एक चौरंगावर जवाहिऱ्या बसला होता. दोघांचं काही तरी बोलणं होत होतं.

जवाहिऱ्या नानासाहेबांच्या कानातील भिकबाळीची वारेमाप स्तुती करीत होता. या स्तुतीनं सुखावलेले नानासाहेब आणखी स्तुतीची अपेक्षा करीत होते.

"खरं सांगतो श्रीमंत, आपल्या कानात आहे अशा प्रकाराची भिकबाळी फक्त एकाच ठिकाणी आणखी आढळेल," जवाहिऱ्या म्हणाला.

"कुठं ?" नानासाहेबांनी उत्सुकतेनं विचारलं.

"पेशव्यांच्या कानात," जवाहिऱ्यानं हळू आवाजात सांगितलं.

अनाहूतपणे आणि योगायोगानं का होईना, पण पेशव्यांच्या बरोबरीनं आपलं नाव घेतलं गेलं यामुळे तर नानासाहेब कमालीचे सुखावले. नानासाहेबांना आपल्या मोठेपणाच्या मंदिलात आणखी एक तुरा खोवला गेल्यासारखं वाटलं आणि त्याच तंद्रीत त्यांनी पाय धुण्यासाठी पुढे केले.

रामनं खाली एक मोठं खोलगट तरसाळं धरलं. प्रथम घंगाळातलं पाणी त्यानं तपेलीनं नानासाहेबांच्या पायावर घातलं. पाय चोळून-चोळून धुतले. इकडं नानासाहेबांच्या जवाहिऱ्याशी गोष्टी चालूच होत्या. मध्येच भाजल्यासारखं वाटून नानासाहेब म्हणाले, "अरे अरे, पाणी फार गरम आहे." मग रामनं दुसऱ्या घंगाळातलं पाणी ऊन पाण्यात मिसळलं आणि पुन्हा तो पायांवर पाणी घालू लागला.

पायांवर पाणी घालता-घालता तो संवाद ऐकतच होता. जवाहिऱ्या सांगत होता, "श्रीमंत, उत्तरेमध्ये असल्या भिकबाळ्या विद्वान शास्त्री-पंडितांच्या कानांत दिसतात. जयपूरचा राजा विद्येचा भोक्ता आहे. त्यानं अशा किती-तरी भिकबाळ्या विद्वानांच्या कानी घातल्या आहेत. त्यांच्या विद्वतेचा सन्मान म्हणून."

रामच्या कानात हे शब्द सनईच्या सुरासारखे शिरले आणि तेथून अंतःकरणात गोड गुंजारव घालू लागले. 'जयपूरचा राजा विद्वानांचा भोक्ता आहे... तो अशा भिकबाळ्या दान करतो..'

याच वेळी नानासाहेबांच्या कानातली हालती भिकबाळी रामच्या डोळ्यांना आकृष्ट करीत होती. त्या भिकबाळीतल्या मोत्यांचं पाणी त्याच्या नजरेला

सुखवीत होतं. त्या भिकबाळीच्या रूपानं त्याची महत्त्वाकांक्षा त्याला साद घालीत होती. खुणावत होती आणि मग पाहता-पाहता राम स्वप्नांच्या दुनियेत शिरला. आता त्याचा तो राहिलाच नाही.

* * *

राम प्रभुणे... माहुलीचा राम... उनाड राम... वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत 'रामो हरिः'सुद्धा न येणारा राम. आता वेदशास्त्रसंपन्न विद्याविभूषित, प्रकाण्डपंडित, व्याकरणकोविद, तर्कतीर्थ रामशास्त्री प्रभुणे झाला आहे. गुरुजींनी पाठ थोपटून त्याला कृपेचं महावस्त्र दिलं आहे. सर्वत्र त्याचं कौतुक होत आहे. माहुली त्याच्याकडे सकौतुक आणि साश्चर्य नजरेनं पाहत आहे. सहाध्यायांना त्याचा अभिमान वाटत आहे. सिद्धेश्वरशास्त्री व विनायकभट्ट यांच्या डोळ्यांत आसवं दाटली आहेत. काकूच्या डोळ्यांतला राग मावळला आहे. तिथं आता माया साकळली आहे, जहागीरदारांच्या धाकट्या श्रीमंतांच्या तोंडाचा 'आ' वासला आहे.

जयपूरच्या महाराजांचा दरबार भरला आहे. भरतवर्षातल्या निवडक विद्वान-पंडितांचा सत्कार होत आहे. एकेक नाव पुकारलं जात आहे. प्रत्येकाला महावस्त्र, श्रीफल, सुवर्णमुद्रा, रौप्यमुद्रा आणि एखादा घसघशीत अलंकार सत्कार भेट म्हणून दिला जात आहे. महाराजांच्या दोन बाजूंना दोन चोपदार आहेत. डाव्या बाजूला त्यांचे मंत्री उभे आहेत. मंत्री एकेका नावाचा पुकारा करीत आहेत.

... आता मंत्र्यांनी नाव उच्चारलं—

'रामशास्त्री प्रभुणे... माहुलीकर..'

आपली धीमी पावलं टाकीत आपण पुढे गेलो आहोत. . . महाराजांच्या दृष्टीत कौतुक, आदर, स्नेह. . . सर्व भावनांचा आशय दाटला आहे. अवघ्या दरबाराचं लक्ष आपल्याकडे खिळून राहिलं आहे. आपण नम्र अभिवादन करून उभे राहिलो.

महाराजांनी खुणावलं.

सन्निध उभं केलं.

महाराज म्हणाले...

"आज या प्रकाण्डपंडिताचा आणि शास्त्रपारंगत बुद्धिमंताचा सत्कार

करताना मला माझाच सत्कार होत असल्याचा आनंद होत आहे. यांचा सत्कार करण्याचं भाग्य मला लाभावं हे मीच माझं सुदैव मानतो. रामशास्त्री. . . आपण माहुलीचे; पण आम्ही आपणास जयपूर दरबारात येण्याविषयी निमंत्रित करीत आहोत आणि आपल्या विद्वत्तेविषयी अतीव आदर प्रकट करण्यासाठी आम्ही ही खास वस्तू आपणाला भेट देत आहोत. नगरजन, दरबारी आणि अन्य विद्वान शास्त्रीजनांनो, अशी ही वस्तू आम्ही केवळ काही निवडक व्यक्तींना आणि आपापल्या क्षेत्रात अत्युच्चपदावर असणाऱ्या व्यक्तींनाच देतो. रामशास्त्री सरस्वतीच्या दरबारात उच्चासनी आहेत, म्हणून जयपूर दरबार ही मानाची भिकबाळी त्यांना अर्पण करीत आहे."

. . . अवघं सभागृह चित्रासारखं स्तब्ध ! सर्वांना फक्त डोळेच आहेत, आणि त्यांना केवळ पाहण्याचीच शक्ती आहे. . . रामशास्त्री पुढे गेले. महाराजांच्या हातात ती मानाची भिकबाळी म्हणजे श्रीमंतांनी विद्वत्तेचं केलेलं कौतुक ! ती भिकबाळी म्हणजे राजसत्तेनं सरस्वतीच्या दरबारातील मानकऱ्यांचा केलेला गौरव. . . महाराजांनी स्वतःच्या हातांनी ती भिकबाळी रामशास्त्र्यांच्या कानात घातली. . . टाळ्यांचा कडकडाट !. . . डोळे लकाकले. . . नव्हे, डोळ्यांपुढे काजवे चमकले. . . मेंदूला मुंग्या आल्या. स्वप्नांची दुनिया नष्ट झाली, मनातले मनोरे कोसळले आणि जमीनदोस्त झाले.

* * *

"राम्या". . . एक जोराची हाक कान बधिर करून गेली. नसानसांतून वाहणारं रक्त त्या हाकेसरशी अधिक जोरानं खेळू लागलं. राम भानावर आला. . .

कुठे आहेत ते जयपूरचे महाराज ! समोर तर बसले आहेत नानासाहेब अनगळ सावकार. कुठे आहे तो मंत्री ? इथे दिसतो जवाहिऱ्या.

"राम्या, लक्ष कुठं आहे तुझं ?" नानासाहेब संतापून विचारत होते. त्यांनी आपले पाय आता दूर केले होते. "राम्या, अरे वेडाचा झटका आला की काय तुला ?" काड्कन आवाज झाला कानाच्या मागं आणि पुन्हा एकदा काजवे चमकले डोळ्यांसमोर.

"राम्या, मूर्खा, कामात लक्ष नाही तुझं," नानासाहेब कडाडले. भिकोबा शेजारी उभेच होते. ते म्हणाले, "गधड्या, श्रीमंतांचं धोतर भिजवलंस. पाण्याची

धार पायावर धरायच्या ऐवजी पिंढरीवर धरलीस, कामात लक्ष नाही तुझं."

हो. झालं होतं खरं तसं. कामात लक्ष लागलंच नाही. सारी दुनियाच जर बदलून गेली तर कुठलं काम न् कुठलं काय ! नानासाहेबांचं तलम धोतर भिजल्यानं पिंढरीला चिकटून बसलं होतं. रामची नजर कुठं तरी शून्यात होती. त्याच्या गालावर वळ उमटले होते आणि जवाहिऱ्या हे सारं आश्चर्यानं पाहत होता.

"राम्या, ऊठ. वेंधळ्यासारखा बघतोस काय ?" नानासाहेबांनी त्याचा कान हातात धरून त्याला उठवलं. "मूर्खा, असं काय करतोस ? कुठं पाहत होतास ? धोतर भिजलं ना माझं."

"क्षमा करा मला; पण मला भानच राहिलं नाही."

"का ? तुझं भान कशानं हरपलं ?"

"भिकबाळीमुळे," शांतपणे रामनं उत्तर दिलं.

"भिकबाळी ? कुठली भिकबाळी ?"

"आपल्या कानात आहे ती."

"माझ्या कानातली भिकबाळी ? ती तू पाहत बसलास ?"

"हो. मला असं वाटलं..."

"काय वाटलं तुला ?"

"मला असं वाटलं की, अशी भिकबाळी माझ्या कानात असावी."

रामच्या उत्तराबरोबर नानासाहेब, जवाहिऱ्या, भिकोबा, बाकीचे शागीर्द सारेच चमकले, आश्चर्यचकित झाले. का नाही होणार ? एका सामान्य शागिर्दानं भिकबाळीची आस धरावी ? सशाच्या पिलानं सिंहाची आयाळ मानेवर असावी अशी आकांक्षा धरावी ? टेकडीनं उत्तुंग नगाची उंची गाठण्याची इच्छा करावी ? तसंच झालं होतं. नानासाहेब सावकारांच्या अवतीभवती, इष्टमित्रांत, आप्तस्वकीयांत अनेक श्रीमंत, विद्वान, घरंदाज लोक होते; पण त्यांच्यापैकी कुणीही ही आकांक्षा केली नव्हती आणि एक सामान्य शागीर्द, पाणक्या, हरकाम्या गडी भिकबाळी कानात असावी असं म्हणतो !

खरं तर नानासाहेबांना रामचा मनस्वी राग आला होता. त्याच्या आणखी दोन श्रीमुखात देऊन त्याच्या या पोरकट उत्तराबद्दल त्याला येथून अर्धचंद्र द्यावा असं त्यांना क्षणभर वाटलं; पण त्यांच्या विवेकी मनाच्या कोपऱ्यातून कुठून तरी

कौतुकही झिरपत होतं. त्यामुळे रामला मारण्यासाठी त्यांचा हात धजावला नाही. कटू उच्चार करायला शब्द अडखळू लागले. त्यामुळेच त्यांना जे बोलायचं ते नेमकं बोलता आलं नाही. ना कौतुक, ना उपहास. उपहासालाही कौतुकाची किनार होती, तर कौतुकाला उपहासाचा लेप होता. नानासाहेब हसून म्हणाले,

"कशी मिळवणार बाबा भिकबाळी तू ? चोरून ?" नानासाहेबांनी चोरीचा केलेला उल्लेख रामच्या वर्मी झोंबला. मनातली चीड फार वर येऊ न देता; पण तितक्याच ठामपणे तो म्हणाला, "चोरून कशाला ? मी स्वकर्तृत्वावर मिळवीन." रामनं आत्मविश्वासानं दिलेलं हे उत्तर सावकारांनाही चांगलंच झोंबलं. त्यांच्या डोळ्यांत क्रोध अवतरू लागला. एक यःकश्चित शागीर्द भिकबाळीच्या गोष्टी करतो, ती स्वपराक्रमानं मिळवीन म्हणतो, यात त्यांचा अभिमान दुखावला होता. ते रागानं म्हणाले, "मग आता भिकबाळी मिळवायला आणि पराक्रम करायला कुठं तरी बाहेर जा. शागिर्दी कशाला करतोस ?"

"शागिर्दी करतो पोटासाठी; पण संधी मिळालीच तर पराक्रमही करीन आणि मिळवीन."

रामचे हे उद्गार तेजस्वी होते; पण हे तेज सावकारांना सहन झालं नाही. त्यांचा चेहरा रामविषयीच्या क्षुद्रतेनं आणि संतापानं क्रुद्ध झाला, लाल झाला.

"उर्मट कुठचा !" ते म्हणाले आणि त्यांनी कारभाऱ्याला खूण केली. कारभाऱ्यांनी रामची बकोटी धरली आणि त्याला ते दरवाजाकडे ओढू लागले. तशी रामनं त्यांच्या हाताला हिसडा मारला आणि तो तीव्र आवाजात म्हणाला, "थांबा, तुम्ही कशाला मला बाहेर काढता ? मीच जातो. माझ्या वडिलांच्या पावन स्मृतीला स्मरून सांगतो, एक दिवस माझ्याही कानात असली भिकबाळी दिसेल, ती मी मिळवीन... तरच नावाचा राम प्रभुणे..."

* * *

राम बाहेर पडला.

सावकार, त्यांचे शागीर्द, कारभारी, जव्हेरी ही सगळी मंडळी अवाक होऊन या पोराकडं पाहत होती; पण रामनं मान वळवून मागं पाहिलंही नाही. त्याच्या दूरवर जाणाऱ्या, लहान होत जाणाऱ्या तेजस्वी आकृतीकडे वाड्याच्या मोठ्या दारातून सगळी मंडळी डोळे फाडफाडून पाहत होती.

राम वाड्याच्या दरवाजाशी आला. आज त्याला देवडीवाल्यानं हटकलं

नाही आणि तो पायऱ्या उतरू लागला. त्या उंच दगडी पायऱ्यांवरून विरुद्ध दिशेनं केशवशास्त्री येत होते. केशवशास्त्री थकलेले दिसत होते. हळूहळू दमानं ते एकेक पायऱ्या चढत होते. त्यांची नजर खाली असल्यानं त्यांनी रामला पाहिलं नाही; पण रामलाच वाटलं, केशवशास्त्र्यांना थांबवून त्यांना नमस्कार केला पाहिजे. त्यांचा आशीर्वाद मिळवला पाहिजे.

रामनं त्यांना सद्गदित आवाजात हाक मारली, "गुरुजी !"

"का रे बाळ ? तुझा चेहरा असा का ? कान लाल झालाय ?"

"गुरुजी, मी वाडा सोडून चाललो."

"का ?"

"अपमानाची भरपाई करून सन्मान मिळवायला."

"कुणी केला अपमान ?"

"सर्वांनीच; आणि खास करून नानासाहेबांनी." असं म्हणून रामनं अश्रुपूर्ण नयनांनी केशवशास्त्र्यांकडे पाहिलं. केशवशास्त्र्यांनी त्याचे दोन्ही दंड धरून प्रौढ पण मवाळ आवाजात विचारलं,

"अरे, पण असा रागराग करून तू जाणार कुठं ?"

"कुठंही, जगाच्या पाठीवर. मन म्हणेल तिकडं. आजची रात्र इथं समर्थांच्या मठात राहणार. आणि उद्या पहाटे सातारा सोडणार."

"काहीही कर; पण विवेकानं कर. तुझ्यासारख्याला आम्ही काही सांगायचं म्हणजे सूर्याला प्रकाश नको असं सांगण्यासारखं आहे. तसं काही मी सांगत नाही; पण जे पाऊल टाकशील ते खळगा पाहून टाक एवढंच या वृद्धाचं सांगणं आहे."

"आपल्या शब्दाबाहेर मी जाणार नाही," असं म्हणून रामनं तिथंच वाकून केशवशास्त्र्यांना नमस्कार केला. केशवशास्त्री पुढं निघून गेले खरे; पण जाताना ते भारावल्यासारखे दिसत होते. मणाचं ओझं पाठीवर असलेला माणूस चालावा तसं ते चालत होते.

राम दृष्टिआड झाला.

* * *

आणि इकडं अनगळांच्या वाड्यात...

केशवशास्त्र्यांनी श्रीमंत नानासाहेब अनगळ सावकारांची चांगलीच

कानउघाडणी केली. केशवशास्त्री तडक नानासाहेबांकडे गेले. आजपर्यंत केशवशास्त्र्यांनी मंत्रोच्चार, जपजाप्य आणि क्षेमकुशल विचारपूस याशिवाय कशासाठीही वाड्यात तोंड उघडलं नव्हतं; पण आज...

आज आपण थोडंसं बोललंच पाहिजे असं केशवशास्त्र्यांना वाटलं. अनगळांच्या घरी केशवशास्त्री पिढीजात परंपरेप्रमाणे येत होते. त्यांच्या घरच्या सर्व धर्मकृत्यांचं उपाध्येपण त्यांनी निष्ठेनं आणि नीतीनं सांभाळलं होतं. केशवशास्त्र्यांची निर्लोभी आणि निःस्पृह वृत्ती सर्वांनाच ठाऊक होती. त्यामुळे त्यांच्याबद्दल एक प्रकारचा दरारा आणि वचक होता. अनगळांच्या वाड्यात सतत कार्यरत असणारी, मोजकंच बोलणारी पण चाणाक्ष व्यक्ती म्हणून केशवशास्त्र्यांचा लौकिक होता. असे केशवशास्त्री रामविषयी घडलेल्या घटनेनं व्यथित झाले होते. केशवशास्त्री नानासाहेबांकडे गेले. नानासाहेबांनी त्यांना उत्थापन दिलं आणि ते म्हणाले...

"शास्त्रीबुवा, आज अचानक येणं केलं आमच्या भेटीला ?"

"यावं लागलं, श्रीमंत."

"का ? आपणाला यावं लागलं असं आमच्या हातून काय घडलं ?"

"पाप... नाही; पण पुण्य जोडण्याची संधी होती ती घालवलीत."

"आपण काय म्हणता आहात ते आम्ही समजलो नाही."

"माहुलीच्या प्रभुण्यांचा राम..."

"तो शागीर्द ?"

"हो. तेजस्वी आणि उज्ज्वल भविष्यकाळ असलेला मुलगा आहे तो. योगायोगानं त्याचं कल्याण करण्याची संधी आपणाला प्राप्त झाली होती. आपण ती हिरावून बसलात."

"शास्त्रीबुवा, क्षमा करा मला; पण आपण या शागिर्दाची कुंडली वगैरे पाहिली होती काय ?"

"त्याच्या बापाचा-माझा स्नेह होता. त्याची कुंडली मी पाहिली होती. अकाली मृत्यू पण कीर्तिवान पुत्र असे योग त्याच्या कुंडलीत होते."

"असतील. मग हा विशीला येईपर्यंत असाच कसा राहिला ?"

"योगच. आताच त्याचे ग्रह उदित होणार असतील. श्रीमंत, काही झाडं लवकर फळ धरतात, काही झाडांना फळं यायला उशीर लागतो; पण येतात तेव्हा

त्यांचा फलभार डोळे दिपवून टाकणारा असतो."

"मग ? आपणाला हा शागीर्द तसा वाटतो, केशवशास्त्री ?"

"अलबत ! मी त्याची परीक्षा केली आहे. माझ्याजवळ अध्ययनाची इच्छा त्यानं व्यक्त केली होती. मीही त्याची परीक्षा पाहण्यासाठी प्रथम नकार दिला होता. आता मी त्याची इच्छा पूर्ण करणार होतोच आणि आपण. . . श्रीमंत. . . एखादी विहीर बरेच दिवस खणत राहावं, पाण्याची धार प्रकट व्हावी आणि ती न दिसल्यानं खणणाऱ्यानं वरून माती लोटून कंटाळून विहीर बुजवावी तसं झालंय. श्रीमंत, एका उनाड मुलाच्या आयुष्याची उभारणी करण्याचं श्रेय आपोआप पदरी पडत असताना आपण पदरच सावरून घेतलात हे योग्य नाही झालं."

"खरं आहे, आपण म्हणता ते. . ." नानासाहेबांचा स्वर आता केवळ उपहासावरून कौतुकाकडे झुकला होता, त्यांना केशवशास्त्र्यांचं म्हणणं पटलेलं दिसत होतं. आपण रामची उपेक्षा फार केली, नको एवढी केली हे त्यांना जाणवलं आणि म्हणूनच त्यांनी केशवशास्त्र्यांना विचारलं, "गुरुजी, मग मी काय करावं असं आपल्याला वाटतं ?"

"आपण त्याच्या अध्ययनाची जबाबदारी घ्या. व्यवस्था करा."

"पण तो आहे कुठं ?"

"आहे. आज, या घटकेला तरी तो इथं साताऱ्यातच आहे. मठात आहे. श्रीमंत, सहज म्हणून दाराशी अतिथी आला, तर आपणाकडून मिळणाऱ्या दानानं त्याची ओंजळ भरून जाते. वाढलेल्या झाडांना जाता-जाता पाणी घालणं जितकं महत्त्वाचं, तितकंच एखाद्या रोपट्याला विचारपूर्वक वाढवून त्याची जोपासना करणं हेही महत्त्वाचं. आपणासारख्या लोककल्याणेच्छू श्रीमंतांनी हेही करावं," केशवशास्त्र्यांनी नानासाहेबांना मृदू आवाजात सांगितलं.

थोडा वेळ नानासाहेब विचारात पडले. काहीच बोलले नाहीत; पण हळूहळू त्यांची विचारी चर्या निश्चयी; पण आनंदी दिसू लागली आणि आपल्या गळ्यातील मोत्यांच्या हारावरून बोटं फिरवत ते केशवशास्त्र्यांना म्हणाले, "शास्त्रीबुवा, विचारांती आम्हाला पटलेलं आहे की, आमचं थोडंसं चुकलंच. संतापाच्या भरात आमच्या हातून अनवधानानं घडलेली ही चूक आम्ही निस्तरणार आहोत. हा पोर आहे कुठं ते आपण जाणता ?"

"हो, जाणतो."

“मग भिकोबांना पाठवतो.”

“कशाला ?”

“ते त्याला घेऊन येतील.”

“आणि त्याला पुन्हा नोकरीवर ठेवणार ?”

“नाही. या मुलाला विद्येची तळमळ असेल, ज्ञानसंपादनासाठी त्याचा जीव तडफडत असेल, तर त्याला पुन्हा पाणक्या म्हणून राबविण्याची आमची इच्छा नाही.”

“मग काय करणार ?”

“त्याला अध्ययनाची सुसंधी प्राप्त करून देणार. त्याची वाट मोकळी करून देणार. त्याला मार्ग दाखवणार. सहाय्य करणार.”

“श्रीमंत, आपले हे विचार आपल्या मोठेपणाला साजेसेच आहेत.”

“केवळ आमच्या मोठेपणासाठी नव्हे, तर त्याला मोठेपणा प्राप्त व्हावा म्हणून आम्ही जाणीवपूर्वक हे करणार आहोत शास्त्रीबुवा. भिकोबा. . . भिकोबा. . .”

बरीच धांदल झाल्यामुळे डोक्यावरून घसरू पाहणारे पागोटे सावरीत भिकोबा आले आणि म्हणाले, “आज्ञा श्रीमंत.”

“भिकोबा, सातार्‍यात चहूबाजूला माणसं पाठवा. मठात एक माणूस पाठवा आणि प्रभुण्यांच्या रामला वाड्यावर घेऊन या. आणि हे पाहा भिकोबा, या कामात कसूर होता कामा नये. तुम्ही जातीनं लक्ष घाला. राम सापडलाच पाहिजे.”

“होय श्रीमंत. मी जातीनं लक्ष घालतो. राम प्रभुणेला आणल्याशिवाय मी स्वतःच वाड्यावर येणार नाही,” भिकोबा म्हणाले.

आणि केशवशास्त्र्यांच्या डोळ्यांत समाधान दिसलं. अनगळांना आपण एक कर्तव्य पार पाडल्याचा आनंद झाला.

आणि. . .

एक प्रहरभरानंतरच. . . भिकोबा रामसह वाड्यात आले. आपल्याला वाड्यात पुन्हा कशाला बोलावलं असावं याविषयी रामला काहीच कल्पना नव्हती. घटकेपूर्वी आपणाला या वाड्यातून जवळजवळ घालवून दिलं जातं काय आणि आता सन्मानपूर्वक बोलावणं येतं काय, रामला काहीच उलगडा होईना, तरी पण अनगळांविषयी त्याच्या मनात आदरभावच असल्यानं त्यांनी बोलावलं

आहे असं म्हणताच रामनं कोणतेही आढेवेढे घेतले नाहीत. मठातून तो तडक वाड्याकडे आला. भिकोबा बरोबर होतेच. वाटेत रामनं भिकोबाला विचारलं,

"कारभारी, मला आता परत कशाला बोलावलंय ?"

"ते मला काय ठाऊक."

"तुम्ही श्रीमंतांचे कारभारी."

"हो; पण या कारभारातलं मला काही ठाऊक नाही."

"तुमचा अंदाज ?"

"मला काहीच सांगता येणार नाही."

"माझ्यावर चोरीचा आळ तर नाही ? तसा संशय..."

"छे छे, राम्या, तसलं मनातसुद्धा आणू नको. तुला खरोखरीच सन्मानानं बोलावलं आहे श्रीमंतांनी."

"श्रीमंतांनी मला कोणत्याही प्रकारे बोलावलं असतं, तरी मी आलो असतो. भिकोबा, मी स्वाभिमानी आहे, पण कृतघ्न नाही."

एवढं बोलताहेत तोवर वाडा आलाच.

नानासाहेब लोडाला टेकून बसले होते. भिकोबा आणि राम आलेले पाहताच नानासाहेब उठले आणि पुढं येत ते म्हणाले,

"ये, ये रामा. मुद्दामच मी तुला बोलावणं पाठवलं."

रामनं नानासाहेबांना वाकून नमस्कार केला. नानासाहेबांनी आशीर्वाद दिला, "आयुष्यमान भव !" डाव्या बाजूला केशवशास्त्री उभे होतेच. त्यांच्या मुद्रेवर वेगळेच भाव होते. जणू त्यांना म्हणायचं होतं... मघाशी हेच नानासाहेब 'चालता हो' म्हणाले असतील आणि आता ते आयुष्यमान भव असा आशीर्वाद देताहेत.

"रामचंद्रा, मघाशी आम्ही संतापाच्या भरात टाकून बोललो ते मनावर घेऊ नकोस," नानासाहेब मृदू स्वरात म्हणाले.

"नानासाहेब, आपण वडीलधारे, श्रीमंत आणि आम्हासारख्या गरिबांचे पोशिंदे. मी आपलं बोलणं मनावर घेतलेलं नाही," राम म्हणाला.

"आमची तुझ्याकडून हीच अपेक्षा होती. आम्हाला केशवशास्त्र्यांनी तुझ्याविषयी खूप सांगितलं आहे. तुझी विद्यार्जनाची तळमळ त्यांनीच आमच्या नजरेस आणली."

"नानासाहेब, मी शागीर्द आहे याचा मला अपमान कधीच वाटला नाही.

कोणतंही काम करण्याबद्दल मी कधीच लाज बाळगली नाही; पण मला असं वाटतं की मी विद्या संपादन करावी... "

"हो; तेच आम्हाला समजलं आणि आमची चूक दुरुस्त करण्यासाठी तुला बोलावलं. राम, आम्ही पूर्ण जाणून आहोत की, हलकीसलकी कामं करण्यासाठी तुझा जन्म नाही. तुझ्या मनाची झेप मोठी आहे. आम्हाला त्याबद्दल कौतुक आहे."

"आपला आशीर्वाद असला की मला मोठं बळ मिळेल."

"आशीर्वाद ! आशीर्वाद तर आम्ही देऊच; पण नुसत्या आशीर्वादाच्या शब्दांवर आमचं कर्तव्य संपलं असं आम्ही मानत नाही. भिकोबा, इकडं या."

नानासाहेबांनी बोलावताच भिकोबा पुढे आले. त्यांना नानासाहेबांनी खुणावलं. भिकोबा आत गेले. आणि लगेच बाहेर आले. त्यांच्या हातात एक थैली होती. थैली चांगली जड आणि फुगलेली दिसत होती. भिकोबांच्या हातून नानासाहेबांनी ती थैली घेतली आणि रामकडे स्नेहभरानं पाहत ते म्हणाले,

"राम, आम्हाला ठाऊक आहे, केशवशास्त्र्यांनी सांगितलंय, तुला काशीला जायचंय, होय ना ?"

"होय श्रीमंत. काशी मला अप्राप्य आहे; हे मला ठाऊक आहे; पण मी प्रयत्न करणार आहे. काशीला जाणार आहे."

"जा बाळ, अवश्य जा. आमचा तुला आशीर्वाद आहे. आणि हे घे... तुझ्या वाटचालीस तुला हे सहाय्य करील... "

"हे काय श्रीमंत ?"

"द्रव्य."

"हे कशाला ?"

"असू दे. अनगळांच्या घरची ही लक्ष्मी तुला सावली देईल. घे, संकोच करून नकोस. हे दान नाही. पारितोषिक आहे." रामनं ती थैली घेतली. सुवर्णमुद्रिका, रौप्यमुद्रिका तोंडापर्यंत असल्यानं ती जडशीळ लागत होती.

रामनं श्रीमंतांना पुन्हा नमस्कार केला. तेही जडावल्या स्वरानं म्हणाले, "यश तुझी वाट पाहतंय राम. मोठा हो !" केशवशास्त्र्यांच्या खोल डोळ्यांत पाणी तरळत होतं.

¤

## ७

एवढा द्रव्यसंचय बरोबर घेऊन एकट्यानं दूरवर प्रवास करायचा ! रस्ता माहीत नाही. वाट ठाऊक नाही, माणसं ओळखीची नाहीत, प्रदेश पाहिलेला नाही, ओळख होती फक्त ध्येयाची. ठाऊक होती फक्त महत्त्वाकांक्षा. केशवशास्त्र्यांनी रामला एक कोपरी दिली होती. तिला आतून खिसा असावा तसं कापड शिवून खिसे तयार केले होते. त्यात थैलीतल्या सगळ्या द्रव्यमुद्रा भरून ठेवल्या. वरनं अंगरखा, गुडघ्यापर्यंत धोतर ! डोईला पागोटं कुठलं ? खांद्यावरचा पंचाच डोक्याचं उन्हापासून संरक्षण करायचा.

राम प्रभुणेची यात्रा सुरू झाली. ज्ञानयात्रा. वाटेत साऱ्याच हालअपेष्टा. हा प्रवास सुखाचा नव्हता की चैनीचा नव्हता; पण रामला काही भली माणसं भेटली. कुणी भोजन दिलं, कुणी वस्त्र दिलं. कुणी निवारा दिला. कुणी मार्गदर्शन केलं. चोराचिलटांची भीती होतीच. अशा वेळी कुणी सोबत दिली. धर्मशाळा, मठ, मंदिरं अशा ठिकाणी उतरावं, विश्रांती घ्यावी, पुढला मुक्काम गाठावा, मार्ग चालावा.

सातारा, पुणं, नाशिक, त्र्यंबकेश्वर, खानदेश, नागपूर किती तरी गावं रामनं पाहिली. किती तरी क्षेत्री त्यानं वास केला. त्र्यंबकेश्वरी गेल्यावर तर रामला वाटलं आता इथंच राहावं. हा परिसर रम्य आहे. पुण्यपावन आहे; पण तो आता परिक्रमा करणारा संन्यासी झाला होता जणू. कुठल्याही एकाच स्थळाविषयी अशी ओढ नसावी परिक्रमा करणाऱ्याला. प्रवास संपेपर्यंत प्रवास आणि प्रवास.

नागपुरावरून राम निघाला. नागपूरच्या धर्मशाळेतून प्रस्थान ठेवलं. माहुलीपासून किती तरी दूर आला होता. हळूहळू वेगळीच माणसं भेटू लागली.

डोळ्यांना अपरिचित भूमी दिसू लागली. मराठी भाषा बोलणारे भेटेनासे होऊ लागले. क्वचित कुणी भेटलाच तर रामला घरचा माणूस भेटल्याचा आनंद होई. या प्रवासात किती एक बुवा-बैरागी, गोसावी-संन्यासी, महानुभवी, नाथपंथी-सगळ्या धर्मांचे व पंथांचे फिरस्ते रामला भेटले आणि मग रामला आपल्या एकाकी प्रवासाबद्दल काहीच वाटेनासं झालं. आयुष्यभर ही माणसं अटन अन् विजन करतात. मग आयुष्यात एकदाच आपल्याला असा प्रवास घडला तर काहीच नाही, हे त्याला जाणवलं.

पण काशीत पाऊल ठेवायचं कसं, तिथं जायचं कुणाकडे, अध्ययन कुणाकडे करायचं ? यासाठी आपलं बोट धरून मार्ग दाखवणारा कुणी तरी हवा असं रामला सतत वाटू लागलं. आणि योगायोगानं, . . . हो, अगदीच योगायोगानं. . . असा पथदर्शक मार्गदीप त्याला सापडला. अगदी अनाहूतपणे, वादळवाऱ्यात सापडलेल्या नावेच्या नाखव्याला जवळच दीपस्तंभ दिसावा तसं झालं. राम संभ्रमात होता, गोंधळात होता. . .

* * *

अशीच एक रात्र ! एका धर्मशाळेत मुक्काम होता. मुक्काम म्हणजे काय तर पंचाची पथारी एका कोपऱ्यात पसरलेली आणि त्यावर जुडी करून शरीर लोटून दिलेलं. दिवसभराच्या चालीनं रामला रात्री लवकर झोप लागली. रात्री तो निद्रावश झाला तेव्हा त्या धर्मशाळेत उणीपुरी दहा-पाच माणसं होती आणि तोंडावर जोत्याशी एक हडकुळं कुत्रं अंगाची वळकटी करून पडलं होतं. त्या दहा-पाचातले एक-दोन वाटसरू शेतकरी असावेत. दोन-चार भिकारीच होते. रामच्या समोरच्या काटकोनाच्या कोपऱ्यात मात्र एकच बैरागी दिसत होता. डोळ्यांवरून वाटत होता गांजेकस. त्याची ती वाढलेली दाढी, केसांच्या जंगलातून बाहेर दिसणारे निबर ओठ, मोठे बटबटीत डोळे आणि उग्र चेहरा. . . रामला भीतीच वाटली; पण आपल्याला काय करायचंय. . . असं म्हणत राम झोपी गेला.

पहाटे अवचित त्याला जाग आली. पाहतो तर धर्मशाळेत तो स्वतः आणि गोसावीबुवा याव्यतिरिक्त कुणीच नव्हतं. कुत्रंसुद्धा नव्हतं. बाकीची तुरळक दिसणारी माणसंही निघून गेली. त्यामुळे एवढ्या मोठ्या त्या धर्मशाळेत ही दोनच माणसं. अंधार. . . कधी एखादा वाऱ्याचा झोत घोंघावत जाणारा. . .

छातीशी बिलगलेला द्रव्यसंचय. . . रामला आणखीच भीती वाटू लागली. मधूनमधून तो गोसावी रामकडे कानोसा घेतल्यासारखा पाहत होता. रामला वाटलं, नको या माणसाची सोबत. इथनं असंच उठावं आणि दूर पळत जावं; पण तसं केल्यामुळे त्याच्यामागचा त्या गोसाव्याचा ससेमिरा थोडाच चुकणार होता ? त्यानं पाठलाग केला असता तर ?

म्हणून राम तसाच पडून राहिला. किलकिले असणारे डोळे त्यानं मिटले आणि आपल्या अंगावर काळ्या घोंगडीचं नखशिखान्त पांघरूण आहे अशी कल्पना करून तो पडून राहिला. त्याला वाटलं, त्या गोसाव्याची दृष्टी आता त्याच्याकडे वळणार. . . गोसावी त्याला बळजोरीनं उठवणार आणि. . . त्याच्याजवळचं असेल नसेल ते हिसकावून घेऊन त्याला घालवून देणार. . . आणि. . . खरोखरीच गोसावीबुवांनी जरा वेळानं त्याला जाड्याभरड्या आवाजात हाक मारली. . .

"ए पोरा, ऊठ . . . "

राम खडबडून जागा झाल्यासारखा उठून बसला. . .

"ऊठ, केव्हाचा वाट बघतोय मी तू जागा होशील म्हणून."

"अरेच्या ! म्हणजे मी जागा होण्याची वाट बघतोय. . . " राम.

"जा, त्या समोरच्या विहिरीवरून तोंड धुऊन ये."

आज्ञाधारक सेवकासारखा राम त्याचे शब्द बोलतील ते हुकूम पाळत होता. राम उठला, विहिरीवर जाऊन तोंड धुऊन आला. गोसावी पुन्हा जाड्याभरड्या आवाजात ओरडला,

"इकडं ये. . . "

राम पुढे गेला. गोसाव्याच्या हातात एक हिंदुस्थानी गडवा होता. स्वच्छ लखलखीत. तो गडवा रामच्यापुढे करून गोसावी म्हणाला,

"घे, गाईचं दूध आहे. शेजारच्या वाडीतून आणलंय."

रामला आश्चर्यच वाटलं. त्यानं स्वतःलाच दोष दिला. गोसाव्याबद्दल अकारण आपण संशय घेतला.

"ए, लवकर घे दूध. . ." तो पुन्हा ओरडला.

रामनं गडवा तोंडाला लावला. कित्येक दिवसांनी स्वच्छ, ताजा गोरस पोटात जात होता. पोटाला थंडावा मिळेल, मवाळी मिळेल असं सातारा सोडल्यापासून

फारसं काही मिळालंच नव्हतं. गोसावीबुवांनी रामचा चांगलाच अपेक्षाभंग केला होता. रामनं घटाघटा पिऊन संपवलं दूध आणि ओठाभोवती तयार झालेलं दुधाचं पांढर वर्तुळ पंचानं पुसून त्यानं गडवा धुऊन आणला.

"आवडलं का दूध ?"

"हो."

"भीती गेली ना ?"

"कुणाची ?"

"तुझीच. माझ्याविषयी." गोसावीबुवा हसून म्हणाले.

राम थक्क झाला. गोसावीबुवांनी बरोबर ओळखलं होतं.

"मी नाही भ्यालो."

"खोटं बोलू नकोस. तुझे डोळेच बोलत होते. मी ओळखलं बरोबर बेटा, पण त्यात तुझा दोष नाही. आम्ही हे असे बैरागी. कोवळ्या पोरांनी आम्हाला भिऊन पळणं हे अगदी स्वाभाविक आहे."

"पण मी भ्यालोच नाही."

"बरं बरं. नाही भ्यालास; पण मला सांग निघालास कुठं ?"

"काशीला."

"कशाला ?"

"विद्या संपादन करण्यासाठी"

"काशीत कुणी ओळखीचं ?"

"नाही."

"मग जाणार कसा आणि कुणाकडे ?"

"काशीच्या सीमेवर जाऊन थांबणार आणि जो आपला म्हणेल त्याच्याकडे जाणार. धर्मशाळा आहेतच."

गोसावीबुवांच्या निबर ओठावर कौतुकाचं हसू फुललं आणि ते म्हणाले, "बेटा, कौतुक वाटतं तुझ्या साहसाचं. मी तुला एका पाठशाळेचं नाव सांगतो. तिथं जा आणि फटिंगबाबांनी पाठवलंय म्हणून सांग. तुला प्रवेश मिळेल. सहाय्य मिळेल."

"फटिंगबाबा कोण ?"

"मीच. दुसरा कोण ?"

“तुम्हाला फटिंगबाबा म्हणतात ?”

“हो. लोक म्हणतात.”

“लोक का म्हणतात फटिंगबाबा ?”

“मी फटिंगासारखाच वागतो म्हणून. ते जाऊ द्या. तू आलास कोठून ? कोणत्या गावाहून ?”

“साताऱ्याजवळच्या माहुलीहून.”

“कुणाचा तू ?”

“प्रभुण्यांचा.”

“विनायकाचा मुलगा ?”

“नाही. पुतण्या.”

“म्हणजे विश्वानाथाचा ?”

“हो.”

फटिंगबाबा हे ऐकताच अंतर्मुख झाला. त्याच्या डोळ्यांसमोरून काही चित्रं गतकालाच्या पटावरून सरकत असावीत असं रामला वाटलं. फटिंगबाबांचा क्रूर चेहरा काहीसा सौम्य दिसू लागला. डोळ्यांत शून्यत्वाच्या जागी भावना तरळू लागल्या.आवाज मृदू झाल्यासारखा वाटला.

“तुझ्या बापाला मी ओळखतो पोरा. अरे, मी त्याच भागातला आहे चाफळच्या अलीकडे माजगाव आहे ना तिथला मी.”

“बरं झालं, मला आता ओळख मिळाली. सोबत झाली.”

“नाही बेटा, मी तुझ्याबरोबर काशीला नाही येणार. तिकडे आता नर्मदेच्या काठानं जायचंय मला. तुझी आते मला चांगली ठाऊक आहे. आहे का ती ?”

“आते गेली केव्हाच.”

“आणि विश्वनाथ ?”

“तेही. बाबा, आईचा चेहरा मला आठवत नाही. आईच्या मागोमाग बाबाही. . .” रामच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.

“बरं बरं. . . बेटा, तू काही काळजी करू नको आता. तुला काशीला पाठवून विद्यासंपन्न करून आणीन मी. . . म्हणजे होशील तूच. . . मी फक्त रस्ता दाखवीन.”

“दाखवा. उपकार होतील माझ्यावर.”

"उपकाराची भाषा नाही बोलायची."

"बरं, नाही बोलणार."

"काशीला जा आणि बाळंभट्ट पायगुंडेशास्त्र्यांची पाठशाळा कुठं आहे विचार. कुणीही सांगेल. ख्यातनाम आहे."

"फटिंगबाबा, माझं वय वाढलेलं. मला घेतील तिथं ?"

"फटिंगबाबानं पाठवलंय म्हणून सांग. कुणी तुला अडवणार नाही. बाळंभट्ट माझे सहाध्यायी आहेत."

"बाबा, तुमची भेट झाली. योगायोग मोठा. मी अंधारात चाचपडत होतो. दिवा तुम्ही दाखवलात."

"हो. पण चालायचंय तुला."

"मी चालेन. माझं ध्येय पूर्ण होईपर्यंत चालेन. कंटाळणार नाही."

"आशीर्वाद आहे तुला माझा."

"बाबा, तुम्ही माझ्या वडिलांचे मित्र, स्नेही. आता मला वडिलांच्या ठायी आहात. नमस्कार करतो."

"आयुष्यमान भव ! यशस्वी हो !"

"बाबा..."

"भीती वाटली ? मघासारखी ?"

"भीती गेली; पण माया वाटली. तुम्हाला सोडून जाताना आता पाय निघत नाही."

"निघाला पाहिजे. भावनेचे कोश फोडून बाहेरच्या वास्तव जगात भरारी मारायला पाहिजे."

"फटिंगबाबा, तुमची एखादी आठवण असू द्या माझ्याजवळ."

"आठवण ? ती मनातच ठेवायची. वस्तू आठवण म्हणून दिली तर वस्तू हरवली की, आठवणही नाहीशी होईल."

"खरं आहे; पण मला हवीय. अजून बरीच वाट चालायची आहे मला. तुम्ही आता नर्मदाकाठी जाणार. मला कुणाची तरी सोबत नको का ?"

"ही घे माळ. यातले रुद्राक्ष मी पशुपतिनाथाकडे गेलो होतो तेथून आणलेत. गळ्यात असू दे."

"बाबा, ही माळ नाही. ही स्मरणमाला आहे. तुमची, माझ्या बाबांची, आतेची.

.. साऱ्यांची आठवण, साऱ्यांची सोबत मला या माळेच्या रूपानं लाभणार आहे."

"चल, तुला त्या डोंगरमाथ्यापर्यंत पोचवायला येतो."

दोघंही उठले. वाट चालू लागले. घटकेपूर्वी दोघं अपरिचित होते. आता तेच जिवाभावाचे झाले. एकमेकांचे. आणि मग रामला आठवण आली...

त्याला बोलताही येत नव्हतं तेव्हा विश्वनाथ त्याला फटिंगबाबाची गोष्ट सांगायचा. तेव्हा त्याला फटिंगबाबा म्हणजे एक राक्षस, जादूगार, गारुडी असा कुणी तरी वाटायचा. बाळपणीच्या पुसट स्मृतींना उजाळा दिला रामनं...

फटिंगबाबा म्हणजे कुणी निराधार, अनाथ आणि पोटार्थी बैरागी गोसावी नव्हता. चांगला दशग्रंथी ब्राह्मण होता. विद्याविभूषित शास्त्री होता; पण. . . मनावर काही तरी असा विलक्षण परिणाम झाला. . . अपमान झाला. मानहानी झाली. . . आणि तो फटिंग बनला. फिरस्ता झाला. त्यानं माणसं, प्रदेश, संबंधित, सगेसोयरे. . . सारी सारी बंधनं तोडली आणि सत्याला सामोरे जाण्यासाठी, विश्वरूपदर्शनासाठी त्यानं हा मार्ग पत्करला. . . डोंगराचा माथा आला. धर्मशाळा खेळातल्या घरासारखी दिसू लागली. तेव्हा फटिंगबाबांनी रामला थांबवलं.

"आता मला जायला हवं मुला. असाच सरळ जा. . . उत्तरेला तुला मोठा रस्ता दिसेल. आणि पुढं मग तू व्यवस्थित जाशील."

"बाबा, पुन्हा भेट ?"

"ध्येयसिद्धी झाल्यावर. शास्त्री होऊन ये."

"पण पुन्हा भेट ?"

"काल झाली तशीच होईल. कुठंही. लक्षात ठेव. बाळंभट पायगुंडे हे नाव विसरू नकोस. शुभास्ते पंथानः सन्तु..."

एवढं म्हणून फटिंगबाबा त्या डोंगराच्या पायथ्यानं माळरान होतं, तेथून चालता झाला. फटिंगबाबाच्या दूरदूर जाणाऱ्या आकृतीकडे राम किती तरी वेळ पाहत उभा होता. एखाद्या देवदूतासारखा फटिंगबाबा अचानक रामच्या आयुष्यात आला काय आणि रामला आधार देऊन निघून गेला काय. . . सारंच काही आश्चर्यकारक होतं...

* * *

एका ओढ्याकाठी राम बसला होता. पाय दमले होते. शरीर भागलं होतं. ओढ्याच्या काठाला मोठा खडक होता. सोबतीनं वसलेल्या गावातल्या

गावकऱ्यांनी धुणी धुण्यासाठी तो मुद्दामच मांडून ठेवला असावा; कारण एवढ्या खडबडीत खडकाचा पृष्ठभाग गुळगुळीत होता. आणखी काही दिवसांनी तर तो संगमरवरासारखा वाटला असता.

ओढ्याच्या पैलतीराला लागून निवडुंगाचं रान माजलं होतं. त्यापलीकडे कुणाच्या तरी शेताचा बांध पहारा देत पसरला होता. आसमंत रानझुडपांनी हिरवागार झालेला होता. राम पाण्यात पाय सोडून बसला होता.

बांधाला हिरवं कोवळं लुसलुशीत गवत होतं. स्पर्शाला मखमालीसारखं, बघायला पाचूसारखं, एक गोंडस इवलं इवलं सशाचं पिलू कुठून आलं कुणास ठाऊक. . . पांढरंफक्क. . . तांबुस माणकासारखे डोळे. . . नजर भिरभिरी, इकडून-तिकडं हिरव्या गवतावरून फिरताना असं वाटत होतं की, जणू हिरव्या मखमली रुजाम्यावरून पांढरा कापसाचा पुंजका वाऱ्याबरोबर हलतोय. . . मग सशाला लागली भूक ! ती हिरवी दळं होतीच. ससा अगदी निवांतपणे, एकतानतेनं त्या हिरव्या कोंभांशी खेळू लागला. खेळता-खेळता खाऊ लागला. रामला गंमत वाटत होती बघायला. . .

इतक्यात. . . सशाच्या मऊ लुसलुशीत शरीराभोवती विळखा पडला. दणकट . . . क्रूर . . . सशाची तडफड. . . तोंडात धरलेले हिरवे कोंभ तसेच बाहेर आले. विळखा जास्त आवळला जाऊ लागला. ज्या बांधानं त्याला खाऊ घातलं त्याच बांधाला— त्याच गवताच्या गारव्याला भला मोठा सर्प होता. सशाच्या निरुपद्रवी हालचालींनं सर्पाला उपद्रव झाला होता. फूत्कार सोडत त्यानं सशाला विळखा घातला होता.

ससा एकटा होता. . . एकटा. . . निराधार. . . आणि त्याची प्राणांतिक तडफड सुरू होती. . . त्याचा आर्त आवाजही आता क्षीण होत चालला होता. रामला वाटलं, जावं असंच पुढं. . . पण काही उपयोग नव्हता. साप वेगळा असता तर धोंड्यानं ठेचला असता; पण सापाच्या विळख्यात ससा. . . कसा सोडवणार. . . इवला मृदू-मुलायम जीव. . . त्या क्रूर विळख्यात अवचित गवसला आणि शेवटचा श्वास मोजू लागला.

आणि निवडुंगाच्या फडातून दोन डोळे लुकलुकले. दोन ठिणग्याच जणू. त्यांच्याखाली लाल विस्तवाचा गोळा. . . मुंगूस. . . मुंगूस पुढे आलं आणि त्यानं विळखा घातलेल्या सर्पावर हल्ला केला. . . सशाच्या अंगाभोवतीचा विळखा

सैल झाला. . . सशाला रक्षक भेटला. प्राणदाता गवसला. . . त्याच्या रूपानं परमेश्वर प्रसन्न झाला. . . आणि मग त्या अहिनकुलांचे युद्ध पेटलं. . . फूत्कार. . . उड्या. . . विळखे. . . फटकारे. . . ससा बिचारा धपापल्या उरानं कडेला उभा राहून बघत होता. . . त्याला हलण्याचीही शक्ती उरली नव्हती. नाही तर तो पळूनच गेला असता. . . त्याच्या शुभ्र अंगावर सापाच्या विळख्यानं पडलेले चट्टे स्पष्ट दिसत होते.

सर्पानं आपली ताकद पणाला लावली; पण नकुलानं त्याचा शांतपणे प्रतिकार केला. सर्पानं त्यालाही विळखा घालण्याचा प्रयत्न केला; पण नकुलानं जणू अंगात चिलखत घातलं होतं. अखेरचा प्रयत्न म्हणून सर्पानं सारी शक्ती एकवटून फडा काढला आणि. . . नकुलाच्या अंगावर प्रहार केला. . . चावा घेतला. . . पण छे. . . नकुलानं सफाईनं तो चुकवला आणि आपल्या तीक्ष्ण दातांनी त्याचं शरीर विद्ध करून टाकलं. सर्पाची वळवळ वाढली. . . कारण ती प्राणांतिक तडफड होती. पालथं-उलथं होणारं त्याचं चमकदार शरीर. . पोटाकडला भाग पांढऱ्या कवड्यांसारखा दिसत होता. अखेर त्यानं शेवटचा श्वास टाकला. . . उन्मत्त फणा जणू गळून पडली. . . वेडंवाकडं होत त्याचं शरीर त्या गवताच्या रुजाम्यावर पडून राहिलं. . . आणि क्षणार्धात त्या विद्ध शरीराचा, निर्जीव वेटोळ्याचा ताबा हजारो मुंग्यांनी घेतला. . .

हे सारं पाहत दूरवर थांबलेल्या सशाकडे तो नकुल गेला. . . एक नजर फेकून ऐटीत निघून गेला. . . जणू त्याला म्हणायचं होतं, 'बघ, तुला सोडवलं का नाही !'

सशाचं मन आता पुष्कळ जाग्यावर आलं होतं. त्याचा धपापणारा ऊर स्थिरावला होता. तो जितक्या अवचितपणे त्या विळख्यात सापडला होता तितक्याच अवचितपणे त्याची विळख्यातून सुटका झाली होती. त्याला संरक्षक मिळाला होता, जीवनदाता गवसला होता. जणू परमेश्वरानंच त्याला पाठवला होता. . .

हे दृश्य केव्हाच नाहीसं झालं होतं. आता तिथं मुंगूस नव्हतं, तो ससाही नव्हता. होतं फक्त ते निर्जीव वेटोळं. . . मुंग्यांनी त्याच्यावर वारूळ केलं होतं. . .

पाण्यात पाय सोडून बसलेल्या रामला या चित्रमय दृश्यानं अंतर्मुख केलं. . . या दृश्यानं त्याला जितकी भीती वाटली तितकाच त्यानं धीरही दिला. . .

जीवनात संकटं आहेत; पण त्यातून सुटकाही आहे. आयुष्यात अडचणी आहेत; पण त्यातून मार्गही काढता येतो. या विश्वजीवनात ससे आहेत, त्यांना मृत्यूची वाट दाखवू पाहणारे सर्प आहेत. आणि त्यांना संकटमुक्त करणारे नकुलही आहेत. राम उठला. . . आता मार्गस्थ व्हायला हवं होतं. अशी किती तरी चमत्कारिक दृश्यं यापुढं बघायची होती. . . राम मनाशीच म्हणाला. . . 'चल राम, यापुढं तुला असे किती तरी ससे, किती तरी अहिनकुल भेटायचे आहेत.'

* * *

राम उठला. . . मार्गस्थ झाला. . . मजल दरमजल. . . मार्गक्रमणा होत होती. ध्येयसिद्धीच्या पर्वतशैलावर त्याला जायचं होतं. त्याला भिडलेलं क्षितिज दिसू लागलं. काशीचा परिसर जवळ येऊ लागला. त्या पुण्यक्षेत्रावरून येणारे वारे त्याच्या अंगावरून वाहू लागले. . . देवळांचे उंच-उंच कळस, आकाशाला भिडणारे, दूरवरून दिसू लागले. घंटानाद श्रवणेंद्रियांना सुखवू लागले.

तीच काशी. . . जिथं पुण्य जोडायला, पुण्य जोडण्यासाठी केलेल्या कृत्यांची सांगता करायला, पापक्षालन करायला लोक येतात. तीच काशी, जिथं विद्येच्या पेठा विद्यार्थ्यांसाठी खुल्या असतात आणि ज्ञानाची सदावर्तं उघडी असतात. आणि काशीची गंगा. . . कोट्यवधी भारतवासीयांचं श्रद्धास्थान. गंगेचं पाणी म्हणजे जीवनधारा ! गंगेचं पाणी म्हणजे अमृतसंचय. . . आणि योगायोग असा की, महाराष्ट्रगंगा कृष्णेच्या काठावरून काशीच्या गंगेच्या शोधात निघालेला प्रभुण्यांचा राम काशीत आला तो अगदी अवचितपणे गंगेच्या काठीच ! माहुलीचा षोडशवर्षा पुत्र काशिक्षेत्री येऊन पोचला. . . काशीचा इतक्या दूरवरचा प्रवास रामनं जिद्दीनं पुरा केला होता. . .

गंगेचं विशाल पात्र दिसू लागलं तसं रामचं मन आनंदानं भरून आलं. ठिकाणावर तर पोचलो. . . गंगेचा अथांग प्रवाह वाहत होता. दोन्ही काठांवर सहस्रावधी भक्त-भाविक मेळले होते. कुणी पाण्यात बुचकळ्या मारीत होते, कुणी कमरेइतक्या पाण्यात उभे राहून जप करीत होते, कुणी उपाध्यायांच्या मंत्रोच्चारणाच्या मार्गदर्शनानं संकल्पविधी करीत होते. . . कुणी नुकतेच आलेले, स्नानाची तयारी करीत होते. एकूण ते सारंच दृश्य कसं लोभसवाणं होतं. अंतःकरणाचं उदात्तीकरण होईल असं होतं. राम गंगेच्या काठी जाऊन उभा राहिला. . .

समोर विशाल जीवनसागर...

वर विशाल आकाशगंगा...

पाठीशी विस्तृत वाळवंट... वाळवंटात कुठं-कुठं प्रशस्त घाट आणि मंदिरं... भक्तांची गर्दी... मंत्रोच्चारांचे स्वर... रामला वाटलं, पलीकडच्या घाटावर जावं... पण नकोच... तिथं माणसं पुष्कळ होती. खांद्यावरची पडशी तिथंच वाळूत ठेवून दिली. अंगातली कोपरी काढून पडशीत ठेवली. ती ठेवताना मन जरा चरकलं... अनगळांची देणगी होती ना... पण इथं या पुण्यक्षेत्री चोराचिलटांचा विचार कशाला करायचा, म्हणून रामनं ती तशीच ठेवली आणि तो पाण्यात शिरला...

गंगेच्या पाण्याचा शरीराला पहिला स्पर्श !...

रामची तरुण काया थरारली. एक अननुभूत संवेदना सर्व शरीरभर उमटून गेली. चित्त प्रफुल्लित, प्रसन्न झालं. एका रोमांचकारी अनुभवाचा प्रत्यय आला.

तसं आजवर रामनं पाणी खूप पाहिलं होतं. पाण्याशी मस्ती खूप केली होती. नदीत पोहला होता, ओढ्यात डुंबला होता. पूर पार केले होते, डोह तळाशी जाऊन शोधले होते; पण ते नुसतंच पाणी... ही गंगा... जीवनं कृतार्थ करणारी जीवनधारा ! म्हणून रामला तो स्पर्श रोमांचित करीत होता.

'हरगंगे भागीरथी !', 'जयगंगे भागीरथी !'

असं म्हणत त्यानं बुडी मारली. शरीर आणखी शहारलं, मोहरलं. खरं तर ते पाण्यासारखंच पाणी; पण त्याला भावनेचं पुण्य होतं ना. रामला जणू एक नवचैतन्य प्राप्त झाल्यासारखं वाटलं. गंगेचं ते विशाल पात्र. काठावरले भाविक, त्यांच्या तोंडून येणारे मंद मंत्रोच्चार... दूरवर पाण्याच्या प्रवाहाला टेकलेलं विशाल क्षितिज... ती देवळांची उंच शिखरं... मंदिरातील घंटानाद...

रामचं हृदय हेलावून गेलं. त्या विशाल भव्य आणि मनोहारी दृश्याशी तो तदाकार झाला होता. आपण काशीला आलो याबद्दल त्याला धन्यता वाटली. स्नान उरकून सूर्याच्या स्वच्छ सोनेरी उन्हातच त्यानं आपलं अंग वाळवलं. पडशीतलं नवं धूतवस्त्र परिधान करून तो उभा राहिला...

"माते, आजवर तुझ्या लक्षावधी आश्रितांना तू ज्ञानगंगा पाजलीस. मीही ज्ञानाचा भुकेला होऊन तुझ्या चरणांशी आलो आहे. मला ज्ञान देऊन शहाणा कर ! गंगामाते, मला आईचं रक्षण दे. लाथाडू नकोस."

रामच्या तोंडून अवचितपणे हे उद्गार बाहेर पडले, पुटपुटल्यासारखे. या शब्दांना त्याला ओठाशी थांबवता आलं नाही. गंगेला पहिला मानाचा मुजरा करून हा ज्ञानयात्री मार्ग शोधायला चालू लागला. दिसेल त्या वाटेला जाऊ लागला.

* * *

बाळंभट पायगुंडेशास्त्री ! कुठं शोधायची यांची पाठशाळा आता ? काशी म्हणजे माहुली नव्हे की सातारा नव्हे. विस्तृत पसरलेली नगरी ती. किती तरी पाठशाळा, किती तरी धर्मशाळा, किती मंदिरं आणि किती रस्ते ! फटिंगबाबानं फक्त सांगितलं होतं नाव... कुणाला विचारावं तर ओळखपाळख नाही.

आणि शिवाय... पोटात आता भूक भडकली होती. आतापर्यंत पांथस्थ असल्यानं मिळणाऱ्या शिदोरीवर, अन्नछत्रातल्या अन्नावर काम भागलं होतं; पण आता काशीनगरीत कुणाच्या घरात शिरायचं ? कुणाला अडचण सांगायची ? कुणापुढे हात पसरायचा ? भीक मागायची नाही, अन्न मोलानं मिळण्याची सोय नाही, पोट तर अन्नाची मागणी करतंय...

(पोटातला आगडोंब आता माथ्यापर्यंत जाऊन पोचला.) डोकं भणाणू लागलं; पण राम चालत होता. पोटानं कितीही तक्रार केली, डोक्यानं काहीही सांगितलं, तरी अंतःकरण प्रसन्न होतं. काशीविश्वेश्वराचं दर्शन घेऊन मग रामनं तिथंच देवळाच्या आवारातल्या समुदायात काशीतल्या पाठशाळांची चौकशी केली.

विश्वेश्वराच्या देवळाबाहेर एका वटवृक्षाखाली पारावर एक बैरागी ध्यानस्थ बसला होता. रामला वाटलं, आपण ज्याला काही विचारावं असा हाच माणूस योग्य. पुढे होऊन रामनं त्याला प्रणाम केला; पण बैरागीबुवांची समाधी उतरेना की ध्यान संपेना. राम मोठ्या आवाजात म्हणाला, "प्रणाम मुनिवर !"

तेव्हा मात्र डोळे किलकिले करून मुनिवरांनी रामकडे पाहिलं आणि हातानं खूण करूनच विचारलं, 'काय हवंय ?'

"मी दक्षिणेतल्या माहुली क्षेत्राहून आलोय. मला बाळंभट पायगुंडेशास्त्र्यांची पाठशाळा कुठं आहे ती माहीत नाही. तिथं जायचंय मला."

मुनिवरांनी डोळे शून्यात लावून थोडा वेळ विचार केल्यासारखं केलं; पण त्यांच्या तोंडून एकही शब्द मात्र बाहेर पडला नाही. मग मुनिवरांनी रामला खुणेनंच जवळ बोलावलं आणि एका दर्भाच्या जुडीनं जमिनीवरील मातीत

आडव्या उभ्या रेषा काढून एक नकाशा काढला आणि त्यांनी न बोलता नजरेच्या सहाय्यानं, खुणांनी, त्या नकाशावरून रामला पाठशाळेचा रस्ता समजावून सांगितला आणि पुन्हा ते पुतळ्यासारखे बसले.

"प्रणाम मुनिवर. जातो मी," राम म्हणाला, तसं त्यांनी 'तथास्तु' असं हात दाखवून एकच शब्द उच्चारला. . . राम पुढं गेला. मुनिवरांनी दाखवलेल्या रस्त्यानं तो जाऊ लागला. काशीतले रस्ते म्हणजे चक्रव्यूह ! देवळं आणि बोळ ! अरुंद आणि वळणावळणांचे. . . मोठे,.रुंद, सरळ असे रस्ते फारच थोडे. अशा रस्त्यांनी रामला पाठशाळा सरळपणे कशी सापडावी. . . पण सापडली. बाळंभट्ट पायगुंडेशास्त्री यांची पाठशाळा सापडली.

पाठशाळेचं आवार तसं मोठं नव्हतं, की विस्तृतही नव्हतं. भव्य मोठ्या इमारती नव्हत्या किंवा मोठा गजबजाटही नव्हता; पण अवती-भवतीचं शांत वातावरण पाहून मात्र असं वाटायचं की, इथं विद्यार्जन आणि विद्यादान हीच कामं चालत असली पाहिजेत. पुरुषभर उंचीची दगडी भिंत पाठशाळेच्या आवाराचं रक्षण करीत होती. भिंतीला मधोमध लाकडी उंच दरवाजा होता. दरवाजासमोरच अंगणात एक पिंपळ वृक्ष विस्तारलेला दिसत होता, त्याखाली शे-शंभर माणसं सहज सावलीला बसतील एवढा पार ! त्यामागं पाठशाळेची साधीच पण टुमदार इमारत दिसत होती.

पारावरच काही विद्यार्थी पोथ्यांची पानं उलगडून बसलेले होते, तर काही विद्यार्थी ये-जा करीत होते. कुणाच्या हातात कमंडलू, कुणाच्या हातात पूजापात्र, कुणाच्या काखोटीला मृगाजीनाची गुंडाळी आणि रेशमी वस्त्रात बांधलेली पोथी, तर कुणाच्या हाती दंड. . . वातावरण शांत आणि प्रसन्न ! जणू बाहेरच्या व्यवहारी विश्वाशी या दगडी भिंतीच्या आतील माणसांचा आणि मुलांचा काही संबंधच नव्हता. हे विद्याविश्व, ज्ञानविश्व. . . यातले ग्रहगोल म्हणजे विद्यार्थी. . . यातला सूर्य म्हणजे त्यांचे गुरुजी. . . पायगुंडेशास्त्री !. . . दारापर्यंत तर आलो. . .

आत प्रवेश कसा करायचा, कुणाला विचारायचं, की सरळ आत जायचं. . . रामच्या मनाचा हिय्या होईना. . . बरं सावकार, सरदार यांच्या वाड्यावर पहारेकरी असतात तसं इथं कुणीच नव्हतं. मग विचारायचं तरी कुणाला ? न विचारता आत जावं तर अवमान व्हायचा, विचारून जावं तर दारावर कुणीच नाही . . . आतील प्रत्येक जण आपापल्या कामात इतका गढून गेला होता की,

सहजासहजी कुणाचं लक्ष रामकडे जाण्याची मुळीच शक्यता नव्हती. आत पाऊल तर टाकवेना आणि बाहेरच दाराशी घुटमळावं, तर कुणी नवखा म्हणून कसलाही संशय घेणार !

दूरवरून कुणी येताना दिसलं. ती व्यक्ती पाठशाळेतच जाणारी असली तर फार बरं असं रामला वाटलं. उंच पहाडी व्यक्तिमत्त्व, गहूवर्णी भरदार देहयष्टी, उघड्या अंगावरून जानव्याची रेघ, हातात कसलीशी पोथी . . . दारातून आत शिरतानाच त्या व्यक्तीनं रामला पाहिलं आणि विचारलं– कोण पाहिजे आपल्याला ?"

"मला गुरुजींना भेटायचंय."

"कशासाठी ? कारण ?"

"विद्यार्थी आहे मी."

"आत ये."

ज्यासाठी राम इतका वेळ थांबला होता तो आत जाण्याचा परवाना त्याला मिळाला. राम आत गेला. त्याच्या मागोमाग गेला. आत शिरताच आपण एखाद्या तपोभूमीत प्रवेश केला आहे असं रामला वाटलं, पिंपळावरून येणाऱ्या वाऱ्याची एक झुळुक अंगावरून गेली तेव्हा ती त्याच्या कानात काही तरी कुजबुजून गेली. थोडंसं चालून पुढं गेल्यावर उतरत्या छपराची एक साधी झोपडी होती. झोपडीचं खुजं दार उघडंच होतं.

"जा आत. गुरुजी इथंच असतात. झोपडीच्या बाहेर थांब. काही बोलू नकोस. तुला आतून निरोप येईल," असं सांगून त्याचा तो अनोळखी मार्गदर्शक आश्रमातच कुठं तरी अन्यत्र निघून गेला. त्याला आपलं नावगाव सांगण्याचं किंवा त्याचं विचारण्याचं रामला भानच राहिलं नाही आणि मग त्यानं सांगितल्याप्रमाणे राम त्या गुरुद्वारापुढे जाऊन उभा राहिला. यजमानादारी याचक उभा राहतो तसा. बराच वेळ झाला. आतून कसला आवाज येत नव्हता की आत काही हालचाल दिसत नव्हती. रामला वाटलं जावं तसंच, किंवा विचारावं तरी; पण. . .

मघाशी त्यानं सांगितलं होतं, 'बोलू नकोस. बोलावणं येईल' आणि तसंच झालं. आतून एक कुमारवयाचा, म्हणजे रामएवढाच विद्यार्थी आला आणि अगदी परिचयाचं हसू हसून तो रामला म्हणाला, "आत या. गुरुजींनी

बोलावलंय."

रामला आश्चर्यच वाटलं. निरोप नाही. कुणी येऊन आपल्याला पाहिलेलं नाही. मग आत काय गुप्त संदेश गेला ?...

राम झोपडीच्या झापवजा दारातून आत गेला. झोपडी तिला म्हणायचं एवढंच. आतून चांगली प्रशस्त होती. स्वच्छ सारवलेली जमीन होती. दर्शनीच एका चंदनी पाटावर फुलांचा सुबक हार घातलेली गणरायाची बैठी मूर्ती होती. तिच्यासमोर उजव्या कोपऱ्यात मृगाजीनावर ऋषितुल्य दिसणारी एक व्यक्ती ध्यानस्थ बसल्यासारखी. झोपडी धूपानं आणि गंधानं भरून गेलेली. वातावरण प्रशान्त आणि गंभीर.

"प्रणाम गुरुवर्य." रामनं त्या शांततेचा भंग केला.

"आयुष्यमान भव ! कोण, कुठला तू ?" गंभीर आवाज.

"दक्षिणेतला— साताऱ्याजवळील माहुलीचा."

"येण्याचा हेतू ?"

"विद्यार्जन."

"वय ?"

"सोळा उलटली."

"इथंच कसा आलास ?"

"फटिंगबाबांनी पाठवलं."

... आणि हे ऐकताच गुरुजींची निर्विकार मुद्रा एकदम बदलली. त्यांच्या डोळ्यांत आपलेपणाची भावना दिसू लागली. स्थितप्रज्ञता संपून रामविषयीची आपुलकी त्यांच्या वयस्कर चेहऱ्यावर दिसू लागली आणि त्यांचा स्वर अधिक स्नेहमय झाला. ओळख पटल्याची खूणच होती जणू.

"आधी कोणत्या पाठशाळेत होतास ?" गुरुजींनी विचारलं; पण या प्रश्नाचं उत्तर रामजवळ नव्हतं. काय सांगणार ? त्यानं उत्तरच दिलं नाही. त्याच्या मौनाचा अर्थ गुरुजींनी जाणला आणि ओठात हसून ते म्हणाले,

"तुला अगदी रामोहरिपासून-रूपावलीपासून सुरुवात केली पाहिजे. तुला सारी विद्या देईन, पण एक गोष्ट लक्षात ठेव..."

"आपला शब्द शिरोधार्य मानून त्याप्रमाणे वर्तन करीन. त्यासाठी तर मी येथवर आलो आहे," राम नम्रतेनं म्हणाला.

"कष्ट आणि सेवा यात कुठं कमी पडायचं नाही."

"गुरुवर्य, कष्टाला मी सदैव पुढेच असेन आणि आपली सेवा कधीच अंतरू नये यासाठी दक्ष राहीन."

"मग आजपासूनच, नव्हे, आतापासूनच तू आमच्या पाठशाळेचा विद्यार्थी झालास. अरे अनंता, . . ."

त्यांच्या या हाकेसरशी मघाचा तो तरुण पुढं आला. . .

"याला मागच्या ओवरीत याची पडशी ठेवायला सांग. त्याला आपली पाठशाळा दाखव आणि माहिती सांग. जा याच्याबरोबर."

राम आणि अनंता पुढे जाऊ लागले. एवढ्यात रामला कसलीशी आठवण झाली, म्हणून तो तिथंच थबकला.

"काय बाळ, का थांबलास ?" गुरुजींनी विचारलं.

"गुरुवर्य, साताऱ्याहून निघताना साताऱ्याच्या अनगळ सावकारांनी मला वाटखर्चासाठी द्रव्य दिलं होतं. त्यातला फारच थोडा भाग मी खर्च केला. उर्वरित द्रव्य आपण स्वीकारावं."

"तुला दिलेलं द्रव्य तू आम्हाला का देतोस ? शिवाय या द्रव्याचा आम्हाला काहीच उपयोग नाही."

"गुरुवर्य, मी आता आपलाच नव्हे का ? या द्रव्यावर आता पाठशाळेचा हक्क आहे. पर्यायानं आपणच त्याचे स्वामी," असं म्हणून रामनं ती छोटीशी थैली गुरुवर्यांच्या हाती दिली. बाळंभट त्याच्या या निर्लोभी वृत्तीनं त्याच्यावर निहायत खूष झाले. त्यांनी ती थैली अनंतभट्टाच्या हवाली करून सांगितलं,

"पाठशाळेच्या कोशात हे द्रव्य जमा करायला सांग कोषाध्यक्षांना."

* * *

रामला एवढ्या लांबचा कष्टदायक प्रवास कारणी लागल्याचं समाधान झालं. हेतू सफल झाला. त्रासाला सुखाचं रूप आलं. आकांक्षेला अवसर मिळाला आणि कर्तृत्वाला भूमी लाभली. आता रामचा ध्यास एकच. एकाग्रता आणि विद्यार्जन. . . केवळ ज्ञानसाधना. माहुलीचा उनाड राम काशीच्या पायगुंडेशास्त्र्यांच्या पाठशाळेचा विद्यार्थी झाला. अनगळांच्या घरी शागिर्दी करणारा राम सरस्वतीचा उपासक बनला. जहागीरदारांच्या घरी विद्यार्जनाच्या आशेनं जाऊन निराश झालेला राम काशीत येऊन प्रमुदित झाला. . .

रामचं सारंच आयुष्य या घटनेनं बदललं. गुहेत अनेक दिवस निद्रिस्त असलेला वनराज खडबडून जागा व्हावा आणि अरण्यात सतत संचार करीत सुटावा त्याप्रमाणेच रामची इतकी वर्षं सुप्त असलेली विद्यार्जनशक्ती जणू आता उफाळून वर आली होती. या कार्यशक्तीला आता थांबायला अवसर नव्हता. अडसर दूर झाला होता, वाट मिळाली होती. कर्तृत्वाचे आणि पराक्रमाचे एकेक प्रदेश जिंकून तिला पुढे जायचं होतं.

भल्या पहाटे उठावं; स्नान करून प्रथम विश्वेश्वराचं दर्शन घेऊन यावं. गुरुजींना मनोभावे वंदन करून संथा घ्यायला बसावं, रामो हरिः, कारिका, व्युत्पती, षड्लिंगे, कौमुदी. . . सारं-सारं पाठ करावं. माध्यान्हीचा सूर्य तळपू लागला की, पाठशाळेच्या पाकगृहातून आणलेले पदार्थ सेवन करावेत. दुपारी गुरुजींची सेवा करावी आणि सायंकाळी गंगाघाटावर जावं. . . असा रामचा दिनक्रम दुसऱ्या दिवसापासूनच सुरू झाला. यात पुढं कधीच खंड पडला नाही.

गुरुजींनाही रामचं कौतुक वाटे. शेकडो मैलांवरून, दक्षिण देशातून केवळ विद्येच्या लालसेनं हा मुलगा एकटा आला आहे, कष्ट करतो आहे, सेवा करतो आहे आणि चलाखही आहे, याची बुद्धी मुळीच कमी नाही. या विचारांनी गुरुजीही त्याच्यावर संतुष्ट झाले होते. आणि एकदा गुरुकृपा झाल्यावर जीविताचं सोनं व्हायला किती अवकाश असणार आहे !

पाठशाळेतलं रामचं सारंच आयुष्य मोठं सुखाचं गेलं, असं मुळीच नाही. तिथंही मनाला बोचणी देणारे प्रसंग घडलेच. अगदी सुरुवातीलाच घडले. होतं काय की राम इतर विद्यार्थ्यांच्या मानानं चांगला प्रौढ, अंगापिंडानंही थोराड आणि मजबूत. इतर विद्यार्थी त्याचे सहकारी म्हणून त्याच्यासमोर उभे राहिले, तर हा अगदी कुणी वेगळाच वाटायचा. तबकात चमेलीची फुलं असावीत आणि वर एखादंच मोठं झेंडूचं फूल असावं तसा. मग कुणी त्याला वासरातला पोळ म्हणत, तर कुणी त्याला ओंडका म्हणून चिडवत. चिडायचं म्हणून नाही हा तर रामचा निश्चय होता.

पाठशाळेतले विद्यार्थी स्वभावानं तसे चांगले होते. गुरुजींची त्यांच्यावर करडी नजरही होती; पण बालवयातला टवाळखोर स्वभाव कुठं लपतो ! आपला सहकारी राम बाप्या दिसतो एवढी गोष्ट त्यांना टवाळीला पुरेशी होई. एक दिवस असंच झालं. गुरुजींनी सकाळीच सांगितलं होतं की, वैदिक मंत्रांचे

उच्चार शुद्ध करावयाचे असतील तर पदाध्ययन, संधिनियमन आणि स्वररक्षण यांचा अभ्यास करायला हवा. रामला हे जे सांगितलं त्याचा काही अर्थबोध झाला नाही. म्हणून गुरुजींनी त्याला एक श्लोक पाठ करायला दिला. श्लोक होता ऋक्प्रातिशाख्यातला...

*गुरुत्वं लघुता साम्यं ह्रस्वदीर्घप्लुतानि च ।*
*लोपागम विकारश्च प्रकृतिर्विक्रमः क्रमः ॥*
*त्वरितोदात्त नीचत्वं श्वासो नादस्तथोभयम् ।*
*एतत्सर्वं च विज्ञेयं छान्दोभाषामदीयता ॥*

... गुरू, लघु, साम्य, ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, लोप, आगम, विकार, प्रकृती, विक्रम, क्रम, स्वरित, उदात्त, नीच, श्वास व नाद हे सर्व वैदिक भाषेचा अभ्यास करणाऱ्याला माहीत असले पाहिजेत...

राम पाठशाळेच्या एका भागात हा श्लोक पाठ करत बसला होता. काही केल्या त्याला या श्लोकातील अक्षरांचे बिनचूक उच्चार जमत नव्हते. 'ह्रस्वदीर्घप्लुतानि च' या ठिकाणी तर जीभ कुठं तरी अडखळायची नाहीतर वेडीवाकडी व्हायची. इतरांनी हा श्लोक केव्हाच पाठ करून टाकला होता आणि आता त्याचे सहाध्यायी क्रीडाविहाराला मोकळे झाले होते.

"चला रे आता जरा गंगाघाटावर जाऊ या."

"चला. राम कुठं आहे पण ?"

"तो बसलाय श्लोक पाठ करत."

"त्याच्याशिवाय खेळाला मजा नाही."

"पण तो यायचा नाही."

"का ?"

"श्लोक पाठ झाल्याशिवाय येणार नाही असं मघाशीच म्हणाला."

"कसा येत नाही बघू. आपण त्याला चिडवू."

"चला. ओढून आणू त्याला."

"पण चिडवायचं काय आणि कसं ?"

"अरे, त्याला मिशा आल्या आहेत ना ! आपण खोट्या मिशा लावून जाऊ त्याच्यापुढे आणि सांगू, राम, या बघ आम्हाला पण मिशा आल्या तुझ्यासारख्या."

"गुरुजी रागावतील."

"आहेत कुठं गुरुजी ? ते गेलेत वाराणसीला."

"तो आहे ना, अनंतभट्ट..."

"त्याला कोण विचारतो ! चला, मिशा लावू या."

आणि मग सारी वानरसेना मिशा लावून रामपुढे हजर. कुणी हसतोय, कुणी कसला आवाज काढतोय, कुणी खोट्या मिशीला पीळ भरतोय, कुणी हातातला दंड जमिनीवर आपटतोय ..रामची एकाग्रता भंग करायला आले होते सारे..

राम म्हणतच होता... "एतत्सर्वं च विज्ञेयं..."

"अहो, एतत्सर्वं च विज्ञेयं, येता का घाटावर ?"

"मला हा श्लोक पाठ करायचा आहे."

"पाठ व्हायचा नाही."

"का ?"

"मिशा आल्या की पाठांतर होत नाही."

कुणी सहाध्यायी हे थट्टेनं बोलला; पण ही थट्टा रामच्या वर्मी लागली. आपण वयानं मोठे आहोत, तरी आपल्याला हे येऊ नये, इतक्या वयापर्यंत मामुली विद्याध्ययनही होऊ नये याचं आधीच त्याला मनातून वाईट वाटत होतं. त्यात हे टोमणे ! राम व्याकुळला आणि अजीजीनं म्हणाला,

"तुम्ही सारे गेलात तर बरं..

"का ?"

"मला हे पाठ करू द्या."

"पण मिश्यांचं काय ! या बघ आम्हालाही तुझ्यासारख्या मिशा आल्यात. आता आम्हालाही पाठांतर अशक्य ! म्हणून तर घाटावर चाललो आहोत आम्ही. चल, ऊठ. आज गुरुजी नाहीत. मौजमजा करू."

हसण्या-खिदळण्याचे स्वर; चेष्टा-टिंगलीचा आवाज; टवाळी... हा उपहास रामला सहन होत नव्हता; पण करतो काय ! जे प्राप्त ते भोगणे... म्हणून रामनं मनाचा निर्धार केला. तो चिडला नाही. अस्वस्थ झाला नाही. मन आंदळू दिलं नाही त्यानं. तो आपल्या टवाळ सहाध्यायांना म्हणाला,

"मित्रांनो, मी तुमचा सहाध्यायी. तुमच्या फार मागं पडलोय मी. होय, मला मिशा आल्या तरी कारिका येत नाहीत. माझं वय वाढलं तरी कौमुदी म्हणता येत

नाही. तुम्ही म्हणता ते खरं आहे. तुम्ही आज स्वतःला मिशा लावून माझी टवाळी केलीत; पण मला मात्र तुमची टवाळी करण्यासाठी तुमच्यापेक्षा जास्त विद्या प्राप्त केली पाहिजे. म्हणूनच मला तुमच्याबरोबर खेळायला यायची इच्छा असूनही येता येत नाही. तुम्ही जा. मौज करा... जा."

रामच्या या भावपूर्ण भाषणाचा त्या कोवळ्या अंतःकरणावर चांगलाच परिणाम झाला. हातातले दंड त्यांनी भराभर कोपऱ्यात ठेवून दिले. स्वतःच्या हातांनी त्या नकली मिशा दूर केल्या आणि त्यांतला एक पुढे होऊन म्हणाला,

"राम, आम्हाला क्षमा कर. आम्हाला तुला दुखवायचं नव्हतं. तुझी फक्त टवाळी करायची होती. पुन्हा कधी कुणी असं बोलणार नाही. आमच्यावर रागावू नको."

"मित्रा, माझे काका सांगत, राग हा बुद्धीचा शत्रू आहे. रागानं शहाणपण जातं आणि दुर्बुद्धीला प्रवेश मिळतो."

"मग नाही ना आमच्यावर रागावलास ?"

"मुळीच नाही. तुम्ही माझे सहाध्यायी; शिवाय लहान."

"मग येतोस खेळायला घाटावर ?"

"नाही. खेळायलाही येणार नाही. मला तुमच्याबरोबर यायचं असेल, तर आधी तुमच्यासारखं व्हायला हवं. जा तुम्ही."

* * *

... सगळे सहाध्यायी निघून गेले. रामचं पठण पुन्हा सुरू झालं. एकच सहाध्यायी तिथं होता. तो बाहेर पिंपळाच्या पारावर बसला होता. तो होता अनंतभट्ट ! रामसारखाच. वयानं वाढलेला. बुद्धीनं मंद म्हणून लोकांनी टाकलेला आणि गुरुजींनी जवळ केलेला. अनंतभट्टानं थोड्या वेळानं आपली पोथी गुंडाळली. पाठशाळेत आता या दोघांशिवाय कुणीच नव्हतं.

अनंतभट्ट रामचा आता जिवाभावाचा स्नेही झाला होता. दोघंही एकाच मार्गाचे प्रवासी होते. दोघांचेही स्वभावधर्म जुळले होते. पाठीमागं एका ओवरीत राम तो श्लोक पुन्हा पाठ करत बसला होता. अनंतभट्टानं डोकावून पाहिलं... राम पाटावर बसला होता. त्याच्या शेजारी उजव्या बाजूला एका तबकात टपोऱ्या सरबती गव्हाचा ढीग होता. एकदा श्लोक म्हणून झाला की गव्हाचा एक टपोरा दाणा डाव्या बाजूच्या तबकात राम टाकत होता. अनंतभट्टाला आश्चर्य वाटलं...

त्यानं आत येऊन रामला विचारलं,

"राम, हे काय करतोस ?"

"प्रयत्न, परिश्रम."

"असे का करतोस ?"

"अनंता, या वयात असे परिश्रम केल्याशिवाय मला ही भाषा अवगत व्हायची नाही. ज्ञान प्राप्त व्हायचं नाही याची मला जाणीव आहे. मला असेच कष्ट करायला हवेत."

"होय राम, मलाही. तू न् मी, या पाठशाळेत आपण दोघं सहप्रवासी. दोघंच. . . बाकीच्यांपेक्षा वेगळे."

"आपणही त्यांच्यासारखे होऊ."

"आपला निश्चय आहे. तो तडीस जाणार आहे."

"गुरुदेवांचा आशीर्वाद आहे. मग चिंता कसली."

. . . दोघंही हातात हात घालून ऊर्ध्वेच्या आकाशाकडे पाहत होते.

¤

# ८

पाठशाळेची म्हणून असलेली पाकशाळा आता जवळजवळ बंद झाली होती; कारण पाठशाळेच्या सन्निध एक अन्नछत्र उघडलं होतं जयसिंगराजानं. जयपूरचा राजा पराक्रमी आणि उदार. दातृत्वाला कधी मागं न पाहणारा. राजाला समजलं की काशीक्षेत्रात देशोदेशीचे विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येतात आणि पाठशाळांना म्हणजेच त्यांच्या गुरुजींना त्यांची उदरभरणाची व्यवस्था करावी लागते; पण सरस्वतीच्या उपासकांची धनरेषा उसवलेली असते. ते कसंबसं पोट भरतात आणि अर्धपोटी राहूनही विद्या जिवंत ठेवतात. राजानं मनावर घेतलं. विद्येचे उपासक अर्धपोटी राहता कामा नयेत. म्हणून त्यानं आपला खजिना रिकामा केला. कशीला बाळंभट्टाच्या पाठशाळेशेजारीच राजा जयसिंगाच्या दातृत्वाची खूण म्हणून हे अन्नछत्र उभं राहिलं. राजानं त्यासाठी काही कमी केलं नाही. सारी व्यवस्था चोख ! खजिनदार, कारकून, शिपाई, प्यादे यांच्या खास नेमणुका अन्नछत्रासाठी केल्या आणि जयसिंगानं जणू विद्यार्थ्यांना दिलासा दिला. 'विद्येच्या उपासकांनो, तुमची ज्ञानाची भूक मोठी आहे. ती भागवा, अन्नाची भूक मी भागवतो. चिंता करू नका.'

राजानं बाळंभट्टांना विनंती केली की, "तुमच्या पाठशाळेतले विद्यार्थी इथं भोजनाला येऊ द्यात." राजानं उदारमनस्क होऊन केलेल्या या विनंतीला बाळंभट्टांनी मान्यता दिली आणि पायगुंडेशास्त्रींच्या पाठशाळेतले विद्यार्थी मग जयपूरच्या अन्नछत्रात जेवू लागले. सगळे मिळून पाच-सहाशे विद्यार्थी सकाळ-सायंकाळ तिथं क्षुधाशमन करीत. त्यांत रामही होताच. रामबरोबर त्याचा

जिवलग मित्र अनंतभट्ट होता. आत पाठशाळेत फक्त गुरुजी, गुरुपत्नी आणि त्यांचे कुटुंबीय व अभ्यागत जेवत. बाळंभट्टांच्या खांद्यावरलं पुष्कळ ओझं आता कमी झालं होतं, त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांकडे त्यांना आता अधिक लक्ष देता येत होतं.

बाळंभट्टाचे गुरू नागोजीभट्ट काळे हे प्रकाण्डपंडित होते आणि महान विद्याव्यासंगी होते. आपल्या सुविख्यात गुरूची परंपरा बाळंभट्ट पायगुंड्यांनी मोठ्या निष्ठेनं संभाळली होती. विद्येचा व्यापार कधी करायचा नाही. व्यासंगाचा परिपाठ कधी सोडायचा नाही हे त्यांच्या गुरूचं तत्त्व. म्हणून तर त्यांना 'वैद्यनाथ बाळंभट्ट पायगुंडे' असं म्हटलं जात होतं. बाळंभट्टांनी व्याकरण आणि स्मृती या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले; पण त्यांच्या सर्व ग्रंथांमध्ये ग्रंथराज म्हणता येईल असा एक ग्रंथ होता. तो म्हणजे 'बाळंभट्टी'. बाळंभट्टी म्हणजे काय तर मिताक्षरेवर बाळंभट्टांनी लिहिलेली टीका. ही म्हणजे अभ्यासकांचा आदर्श ! उपासकांचा मार्गदर्शक ! मिताक्षरेच्या व्यवहारखंडावरची त्यांची टीका न्यायालयात प्रमाणभूत मानली गेली होती. नुसती आपल्याच नव्हे तर आंग्लांच्या न्यायासनालाही ही टीका आधारासाठी हाती धरावी लागे. असे हे बाळंभट्ट पायगुंडे !

* * *

जयसिंगाच्या अन्नछत्राच्या आधारानं बाळंभट्टांची पाठशाळा आता जोम धरू लागली होती. सरस्वतीच्या वीणेच्या तारा छेडल्या जात होत्या. कळ्या उमलत होत्या, फुलांचा विकास होत होता. कोवळे जीव पायगुंड्यांच्या पायाशी बसून शहाणे होऊन जात होते. त्यांतच हे दोघे होते— अनंतभट्ट आणि रामशास्त्री.

सगळेच आता अन्नछत्रात जेवायला होते. पाठशाळेत फक्त गुरुजींच्या घरी स्वयंपाक व्हायचा. काही विशेष प्रसंगी, सणासुदीला, उत्सवाच्या निमित्तानं, किंवा दीक्षान्त समारंभाच्या वेळी पाठशाळेत भोजनावळ व्हायची. त्या वेळी पद्धत अशी की पाहुणे, विद्यार्जन पूर्ण झालेले विद्यार्थी आणि निमंत्रित यांना रुप्याची ताटं जेवायला असायची. बाकीचे सारे केळीच्या पानांवर जेवत. रुप्याचं ताट हा केवळ एक सन्मान होता. अन्न तेच, रुची तीच. मात्र पात्रात फरक.

रामला पाठशाळेत जाऊन आता तीन वर्षं पूर्ण होत आली होती. प्रतिवर्षी

होणाऱ्या दीक्षान्त समारंभाच्या वेळी रामचं लक्ष जेव्हा विद्या पूर्ण केलेल्या स्नातकांकडे जाई तेव्हा त्याचं अंतःकरण भरून येई. त्या प्रत्येकाच्या ठिकाणी त्याला स्वतःची प्रतिमा दिसे. 'आपण पाठशाळेचे स्नातक झालो आहोत. . . विद्याविभूषित शास्त्री झालो आहोत, आपले कनिष्ठ सहाध्यायी आपणाला निरोप देत आहेत, गुरुजींचं अंतःकरण जड झालं आहे,' असा सुरम्य स्वप्नांचा मनोरा त्यांच्या दृष्टीसमोर बघता बघता आकार घेई. . .

पण रामला अजून बरीच मजल गाठायची होती. अनंतभट्टाला अजून त्याच्याबरोबर मोठा पल्ला गाठायचा होता; पण दोघं मिळून स्पर्धेनं आणि चढाओढीनं अभ्यास करीत. दोघं मिळून गंगाकिनारी जात. हितगुज करीत. अनंतभट्ट आणि राम यांच्यात सौहार्दाचा एक नाजूक रेशीमधागा गुंफला गेला होता.

मधल्या काळात अनंतभट्टाचा विवाह झाला होता. अनंतभट्ट जामात झाला होता. कुणाचा, तर खुद्द बाळंभट्टांचाच. बाळंभट्टांनी कन्यादान करून अनंतभट्टाला शिष्यत्वावरून नेऊन जामातपदावर बसविलं होतं. अर्थातच अनंतभट्टाचं अध्ययन काही थांबलं नव्हतं आणि विद्याध्ययन पूर्ण झाल्याशिवाय गृहस्थाश्रमी जीवनाला सुरुवात करायचीच नव्हती; पण तरीही जावई झाल्यामुळे अनंतभट्टाची दृष्टी, या पाठशाळेकडे पाहण्याची, थोडी बदललीच होती. गुरुवर्य आणि गुरुपत्नी याकडे पाहण्याची दृष्टीही बदलली. अहंकाराचा कोंभ उगवला होता. प्रतिष्ठेचं पीक त्याच्या मनोभूमीवर उभारी धरू पाहत होतं. रामला हे फार कधी जाणवलं नाही. इतर सहाध्यायी अनंतभट्टाला कधी 'या जामात, या जावई, आता तुम्हाला पदोन्नती मिळाली, तुमची बढती झाली, असं चिडवीत; पण या पलीकडे अनंतभट्टालाही आपण काही विशेष आहोत असं वाटू लागलंय याची जाणीव रामला नव्हती; पण ती जाणीव होईल असा प्रसंग घडून आला. त्याचं असं झालं. . .

* * *

काही विशेषप्रसंगी, उत्सवाच्या निमित्तानं पाठशाळेत विशेष भोजनप्रबंध केला जात असे. सर्व विद्यार्थी, निमंत्रित, गुरुवर्य आणि इतर अध्यापकवर्ग यांचं सामुदायिक भोजन पाठशाळेत होई. भोजनावळीचा थाट खास असे. रांगोळ्या, उदबत्त्या, रंगीत पाट यांनी पंगत सिद्ध असे. विद्यार्थ्यांना भोजनासाठी केळीची

पानं; चांगली लांबरुंद, आणि निमंत्रित व अध्यापकवर्गासाठी रुप्याची ताटं मांडण्यात येत. अशाच एका विशेष प्रसंगी बाळंभट्टांनी भोजनप्रबंध केला होता. दीक्षान्त समारंभ होता. निरोपच एक प्रकारे स्नातकांना. स्नातक उत्साहित होते. निमंत्रित पंडितगण आले होते. पंगती मांडल्या होत्या.

. . . एका दालनात रुप्याच्या ताटांची खास पंगत होती. दुसऱ्या दालनात हिरवीचार सव्वाहात केळीची पाने रांगोळ्यांच्या महिरपीत मानानं मिरवत होती. वाढप झालं. मंडळी पाटावर बसली. बाळंभट्टांनी संकल्प सोडला. पार्वतीपते हरहर महादेऽऽव. . . पण केळीच्या पानांच्या पंगतीत सर्व विद्यार्थी होते. राम आणि अनंता दोघंही शेजारी बसत. . . आज रामच्या जवळ अनंता नव्हता.

. . . रामच्या शेजारचं पान रिकामं होतं. . . अनंतभट्ट जेवायला आला नव्हता. त्याचा पाठशाळेत कुठं ठावठिकाणाही नव्हता. चौकशी झाली. एका बटूनं पाठशाळेत सर्वत्र हिंडून पाहिलं. कुठंही अनंता नव्हता. शेवटी बाळंभट्टांनी सर्वांना आपोष्णी घ्यायला सांगितलं. लोकांनी पहिला घास तोंडात घेतला आणि अनंतभट्ट आत आला. त्याची मुद्रा अस्वस्थ दिसत होती. त्याच्या डोळ्यांत असमाधान होतं आणि चर्याही अतृप्त होती.

"अनंता, ये ना रे," रामनं नेहमीप्रमाणे हाक मारली.

"मला भूक नाही," अनंतभट्टानं कुर्ऱ्यात उत्तर दिलं.

"का ? कुठं काही खाल्लंस ?"

"नाही."

"मग ? भूक नसायला काय झालं ?"

"पोट भरलंय. अपमानानं."

"अपमानानं ? कुणी केला अपमान तुझा ?"

"यजमानांनीच."

"म्हणजे ? मी नाही समजलो," रामनं आश्चर्यानं विचारलं.

"बाळंभट्टांनी. . ."

आजपर्यंत अनंतभट्टाच्या तोंडून आपल्या गुरुवर्यांचं नाव अशा तऱ्हेनं कधीच आलं नव्हतं. प्रत्यक्ष नावाचा असा उपमर्दकारक उच्चार कधीच झाला नव्हता. तो आज झाला. रामला आश्चर्य वाटलं; पण तो बुचकळ्यातही पडला. 'असं झालं तरी काय' तेच समजेना. एवढ्यात रुप्याच्या ताटाच्या पंगतीतल्या

काही ज्येष्ठ व्यक्तींनी खूपच आग्रह केला आणि अगदी नाइलाजानं अनंतभट्ट केळीच्या पानावर रामच्या शेजारी जेवायला बसला; पण त्याचं जेवणात लक्ष नव्हतं. हातातोंडाची गाठ पडत होती तरी त्या स्वादिष्ट अन्नाच्या सेवनानं त्याला समाधान झाल्याचं दिसत नव्हतं. जेवणं संपली. निमंत्रित निघून गेले. पाठशाळेचं जीवन पूर्ववत सुरू झालं तरी अनंतभट्ट अजून पूर्वपदावर आलेला नव्हताच. त्याच्या क्रोधाचं कारण कुणालाच समजलेलं नव्हतं.

सायंकाळी राम आणि अनंतभट्ट गंगेवर गेले. घाटावर एका ठिकाणी दोघंही बसले. अंतःकरणं मोकळी करायची होती. सुखसंवाद घडायचा होता. मन मोकळं करायचं होतं; पण संवादाला सुरुवात कुणी करायची ? फुगा फोडायचा कुणी ? अखेर रामनंच तो फोडला.

“अनंता, आज भोजनाच्या वेळी असा का वागलास ?”

“माझ्या वागण्याचं कारण तुला समजलं, तर तूही माझ्यासारखाच रागावशील. तुला कारण सांगू ?”

“सांग ना. मी तर ते ऐकायला केव्हापासूनचा उत्सुक आहे.”

“राम, आज माझा अपमान झाला हे तुला जाणवलं नाही ?”

“नाही.”

“तुला दृष्टीच नाही.”

“माझी दृष्टी केवळ मानापमानाचा शोध घेत बसत नाही अनंता. मानापमानापेक्षा मी औचित्यानौचित्याचा विचार अधिक करतो.”

मित्राचे हे परखड आणि स्पष्ट उद्गार ऐकून अनंता मनातून थोडा वरमला; पण वरून तसं काही न दाखवता तो म्हणाला,

“राम, भोजनप्रबंधात इतका भेदभाव असावा ? कुणाला केळीची पानं तर कुणाला रुप्याची ताटं ?”

“अरे, ती इथली प्रथा आहे. त्यात गैर काय ?”

“परंपरा ? मग ती तरी पूर्णपणे कुठं पाळली ?”

“का बरं ? कुणाची काही चूक ?”

“होच. परंपरेप्रमाणे मानाच्या माणसांना रुप्याच्या ताटावर बसवायला हवं होतं. . .”

“सर्वांना तर बसवलं होतं.”

“पण मला नव्हतं बसवलं,” अनंतभट्ट तोऱ्यात म्हणाला.

“तुला ? तू मानाचा ? तू आमच्यासारखा विद्यार्थीच ना ?”

“हो; पण मी बाळंभट्टांचा जामात... मला रुप्याचं ताट...”

“समजलो. मित्रा समजलो. तुझ्या साध्याभोळ्या अंतःकरणात आज अहंकाराचा अग्नी फुललाय... बरं नव्हे.”

“काय बरं नव्हे ? मी त्यांचा जावई नाही ?”

“आहेस ना. पण प्रथम तू विद्यार्थी आहेस, मग जावई.”

“नाती अशी क्रमानं असतात वाटतं कधी ?”

“नसतात; पण एकच माणूस अनेक नाती वागवू लागतो तेव्हा क्रम लावावा लागतो. अनंता, स्त्री ही कन्या, पत्नी आणि माता एकच वेळी असते, तेव्हा तिला मातृत्वाला अग्रक्रम द्यावाच लागतो.”

“आज पांडित्य फार झालंय तुझं.”

“मी तुझ्यासमोर मित्र या नात्यानं बसलो आहे.”

“आणि बोलतोयस उपदेशकासारखा.”

“मित्र तसाच असतो, निदान असावा.”

“कळलं; पण माझी चूक ध्यानी नाही आली.”

“आज तू अजाणतेपणे गुरुजींचा उपमर्द केलास.”

“उपमर्द ? तो कसा काय ?”

“सरळ बाळंभट्ट म्हणालास.”

“ते जावयाच्या नात्यानं म्हणालो.”

“नाही मित्रा,

*आत्मानाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च*
*प्राणान्तेऽपि न वक्तव्यं ज्येष्ठपुत्रकलत्रयोः’*

“अशी सुवचने सांगून तुला काय सुचवायचंय ?”

“सुवचनातील सुविचार. स्वतःचं, गुरूचं, कृपणाचं, ज्येष्ठ पुत्राचं आणि पत्नीचं नाव प्राणांतीही मनुष्यानं घेऊ नये.”

“हा श्लोक कुठला ?”

“कर्मलोचन ग्रंथातला.”

“हा गुरुजींनी शिकवला नव्हता.”

"आता प्रत्येक ग्रंथ गुरुजी शिकवणार नाहीत."

"आपण बरोबरीनं अध्ययन करायचं ठरलं होतं."

"हो; पण अलीकडं तुझ्यातला जावई तुझ्यातल्या विद्यार्थ्याला अधिक अध्ययन करू देत नाही. मी कुठं अजून कुणाचा जावई झालोय."

दोघंही यावर खळखळून हसले. अनंतभट्टाच्या मनातलं किल्मिष दूर झालं. अहंकारानं पळ काढला. अनंतभट्टाच्या मनातली ही काजळी झटकून त्याला स्वच्छ सूर्यप्रकाशात उभा करण्याचं कठोर मित्रकर्तव्य रामनं त्या दिवशी केलं.

आणि त्या दिवसापासून अनंतभट्ट आणि राम अधिकच जवळचे झाले. अन्य सहाध्यायीही आता या दोघांशी मिळूनमिसळून वागत. केवळ वयामुळे येऊ पाहणारा त्यांच्यातला दुरावा आता केव्हाच संपला होता. सारेच आता सहाध्यायी; सारेच एकमेकांचे मित्र. या घटनेमुळे बाळंभट्टाच्या पाठशाळेला आता नवं रूप प्राप्त झालं होतं. एकजुटीनं, एकभावानं पाठशाळेतले विद्यार्थी वागत. गुरूला आणि त्या गुरुगृहाला, पाठशाळेला प्रतिष्ठा प्राप्त करून देत.

* * *

दिवस, सप्ताह. . . महिने, वर्ष. . . काळ पुढं चालला होता. पंचांगाची पानं उलटत होती. सूर्याचं दक्षिणायन, उत्तरायण सुरू होतं. ऋतुचक्र फिरत होतं. अमावास्या, पौर्णिमा येत होत्या. निश्चय आणि अविश्रांत श्रम या दोन चाकांवर रामच्या प्रगतीचा रथ भरधाव पुढे जात होता. दिवस उगवतो कसा आणि रात्र होते कशी हे विचारायलाही वेळ नव्हता. दिवसाची रात्र झालेली जाणवत होती फक्त आणि रात्रीचा दिवस झालेलाही. या अवधीत रामला कधी घरी जावंसं वाटलं नाही. उलट एक-दोन वेळा त्याला माहुलीला जाण्याची अनावर ओढ लागली, पण भावनेचे आवेग त्यानं आवरले. काशीहून माहुलीला मधेच जाणं हे इतकं सोपं नव्हतं. घरच्या आठवणींना रामनं स्मृतीच्या कोशात ठेवून दिलं. त्यांना कृतीत उतरवायला त्यालाच सवड नव्हती.

* * *

बारा वर्षं झाली. एका तपाचं अध्ययन पुरं झालं. बारा वर्षं विद्येची उपासना घडली आणि मग ते कठोर तपाचरण फळाला आलं आणि माहुलीचा राम वेदविद्यापारंगत झाला. बाळंभट्ट रामवर निहायत खूष होते. त्यांनी विद्या देताना हातचं म्हणून काही राखून ठेवलं नाही. शास्त्रे, वेदवेदांगे, दर्शने यांचा सर्वांगीण

अभ्यास त्यांनी रामकडून करवून घेतला आणि मग ज्या दिवसाची वाट राम गेली बारा वर्षं पाहत होता तो दिवस सोन्याच्या पावलांनी उगवला.

रामच्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा, सर्वांत मंगल दिवस तो. पाठशाळेचं आवार विलक्षण प्रफुल्लित होतं. आज अन्नछत्रातलं भोजन बंद होतं. पाठशाळेच्या पाकगृहात पाकयोजना होत होती. पाठशाळा रंगीबेरंगी फुलांच्या माळांनी सजवली-नटवली होती. पहाटेलाच स्वच्छ सडा घालून अंगणं सारवली होती. त्यावरल्या सुबक रांगोळ्या वातावरणाची प्रसन्नता वाढवत होत्या. पाठशाळेत प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कामात दंग होती. नवप्रविष्ट पाठक ज्येष्ठ सहाध्यायी सांगतील ती कामं करत होते. गुरुजी आपल्या आसनावरूनच सर्वांना सूचना देत होते.

आज दीक्षान्तविधी होता. अभ्यासक्रमाची सांगता होती. तपाचं उद्यापन होतं.

पाठशाळेच्या मुख्य इमारतीसमोर जो पिंपळ होता त्याला घेरून एक दगडी पार होता. गुरुदेवांनी आपल्या सर्व शिष्यांची आज सभा बोलावली होती. काशीतील विख्यात विद्वान आणि प्रकाण्डपंडित या सभेला उपस्थित राहणार होते. पारावर मध्यभागी एका चौरंगावर व्याघ्राजीन पसरलं होतं. अवतीभवती असेच लहानमोठे चौरंग होते. खाली शिष्यसमूहाला बसण्यासाठी स्वच्छ जागा तयार केलेली होती. त्यावर दर्भासनासारख्या चटया पसरल्या होत्या.

सकाळची कोवळी किरणं आता जरा तापू लागली; पण त्यांची प्रखरता आश्रमातल्या या जागी जाणवत नव्हती. कारण वृक्षवेलींनी हा परिसर फुलारलेला होता. जागोजाग पानांच्या पुंजक्यांतून प्रकाशकिरणं प्रवेशतील तेवढीच. तीही येताना हिरव्या पानांना भेटून येत असल्यानं मवाळ होत.

निमंत्रित आसनस्थ झाले. शिष्यगण शिस्तीत बसले... आजच्या समारंभाचं स्वरूप आगळं होतं. तो केवळ दीक्षान्तविधी नव्हता. ते समावर्तन होतं. तो गुणगौरव होता. तो कृतज्ञता व्यक्त करण्याचा विधी होता.

अनंतभट्ट आता संस्कारशास्त्रात पारंगत झाला होता. त्यानंच रामला सगळं काही सांगितलं. आदल्या दिवसापासून आवश्यक त्या वस्तू गोळा केल्या होत्या. दोऱ्यात ओवलेले मणी, कंठी, कर्णफुलं, धोतर, पादत्राणं, वेळूची काठी, करंजाचं बी वाटून तयार केलेलं उटणं, चंदनाची उटी, शिरोभूषण...

समावर्तन करू इच्छिणाऱ्यानं तो ज्या ठिकाणी अध्ययन करतो त्या

स्थानाच्या ईशान्येला जाऊन उंबराच्या किंवा पिंपळाच्या समिधा आणायच्या असतात. राम आणि अनंतभट्ट दोन दिवसांपूर्वीच वाराणसीला जाऊन आले होते. येताना नेमका दिशेचा वेध घेऊन त्यांनी काशीबाहेरच्या पिंपळाच्या समिधा आणून ठेवल्या होत्या.

आणि मग समावर्तनाचा होम झाला...

समावर्तन संस्कार म्हणजे गृहस्थाश्रमी होण्याची अनुज्ञाच. राम काही आता दक्षिणेतून इतक्या दूरवर काशीला येणार नव्हता. म्हणून गुरुजींनीच समावर्तनविधी करण्याची आग्रहाची सूचना केली होती. केवळ गुरुवर्यांच्या आग्रहाला मान द्यावा म्हणूनच रामनं हा प्रपंच करण्याचं मान्य केलं होतं.

धार्मिक विधी होते ते सारे संपले. राम आणि अनंतभट्ट काशीविश्वेश्वराचं दर्शन घेऊन आले...

आणि मग ज्ञानमूर्ती बाळंभट्ट पायगुंडे आले... गुरुवर्यांना साऱ्या सभेनं उत्थापन दिलं. गुरुवर्यांनी या उचित बहुमानाचा स्वीकार करून हातांनीच सर्वांना बसायला सांगितलं.

सभा सगळी चित्रासारखी बसली होती. गुरुजी बोलू लागले. त्यांची अमृतवाणी आतुरपणे ऐकण्यासाठी साऱ्यांनी कान टवकारले होते. गुरुवर्यांच्या मुखातून येणारे ते अमृताचे शब्द !...

"माझ्या शिष्यवरांनो ! आज ही विशेष सभा का भरवली तुम्हाला ठाऊक आहे ? ऐका तर मग... बारा वर्षांपूर्वी माहुलीचा एक मुलगा माझ्याकडे आला आणि विद्याध्ययनाची इच्छा त्यानं व्यक्त केली. तो आला तेव्हा वयानं वाढलेलाच होता; पण त्या मुलानं कष्ट केले. व्यासंग केला... त्याचे कष्ट, त्याची एकाग्रवृत्ती आणि त्याचा विनम्र सेवाभाव यामुळेच इतक्या उशिरा सुरुवात करूनही त्याला हे यश मिळालं आहे. त्याचा सोबती अनंतभट्ट... म्हणजे आमचे जामात. यांनीही बरोबरीनंच अध्ययन केलं. राम आणि अनंत आता रामशास्त्री आणि अनंतशास्त्री झाले आहेत. या माझ्या दोन शिष्योत्तमांचा मला सदैव अभिमान वाटेल. त्यांच्यासारखंच उज्ज्वल आणि धवल यश तुम्हालाही विद्याध्ययनात मिळावं हीच माझी या प्रसंगी प्रभुचरणी प्रार्थना आहे..."

गुरुजींनी हाताच्या खुणेनंच रामला समीप बोलावलं. अनंताला बोलावलं. शेजारी एक बटू मोठं तबक घेऊन उभा होता. त्यात दोन मोठी श्रीफळं, दोन

शाली होत्या. कुंकवाचा करंडा होता.

गुरुवर्यांनी आपल्या हातांनी त्या श्रीफळाला कुंकुम लावलं आणि ते त्याच्या हाती देऊन त्याच्या दोही खांद्यांवरून ती शालजोडी पांघरवली. अनंतालाही तसंच...

रामचा कंठ दाटून आला. यशपूर्तीचा आनंद, गुरुप्रेमाची पाखर, सहाध्यायांचा सहवास, अध्ययनाचा असीम उल्हास. . . साऱ्या भावभावनांनी आणि स्मृतींनी मनात कल्लोळ केला होता. गुरुवर्यांनी स्वतःच्या हातांनी पांघरवलेली ती शाल... ती शाल नव्हती, ते प्रेमाचं महावस्त्र होतं. ते कृपेचं छत्र होतं. ती कर्मयोग्यानं प्रयत्नोपासकाला दिलेली शाबासकी होती. कर्तृत्वाला मिळालेली पावती होती ती. म्हणून राम सद्‌गदित झाला. ज्ञानी होऊनही भावनेला आवरता आलं नाही त्याला.

"तुमचा सहाध्यायी राम आज रामशास्त्री झाला."

गुरुवर्यांच्या मुखातून आलेले शब्द. . . सकाळच्या वेळी ताज्या टवटवीत प्राजक्ताचा वर्षाव अंगावर व्हावा तसं रामला वाटलं. एक अलौकिक सुखद संवेदना शरीरभर उमटून गेली. गुरुजींच्या हातून श्रीफळाचा प्रसाद घेऊन रामनं त्यांना वाकून नमस्कार केला. गुरुवर्यांनी पूर्ण प्रसन्नचित्तानं त्याला आशीर्वाद दिला–

"आयुष्यमान भव ! यशवंत व्हा ! कीर्तिवंत व्हा !"

सहाध्यायांनी आणि अन्य शिष्यांनी रामचा जयजयकार केला. . . या जयजयकारातील ते शब्द 'वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री' त्याला विलक्षण सुखवत होते.

सारेजण खाली बसले. आणि भारावलेले रामशास्त्री बोलायला उभे राहिले... बुद्धीचं तेज डोळ्यांत, मुद्रेवर विनम्रता, शरीर कांतिमान आणि आवाज सुस्पष्ट पण लाघवी...

"गुरुवर्यांच्या चरणी, तुमच्या साक्षीनं मोठ्या विनम्रभावानं मी आदरांजली वाहतो. मी अडाणी आणि निर्बुद्ध, मानवरूपी कीटक. दक्षिण देशातून इतक्या दूरवर ज्ञानसंपादनाच्या इच्छेनं आलो. पखालीचं पाणी वाहून शागिर्दी करणारा आणि श्रीमंतांचे पाय धुऊन पोट भरणारा एक यःकश्चित शूद्रवृत्ती ब्राह्मण मी. आज मला शास्त्रीपद प्राप्त होत आहे, ही केवळ गुरुकृपा. गुरुमाऊलीच्या मायेची

पाखर, तुमच्यासारख्या सहाध्यायी सन्मित्रांचा सुखद सहवास आणि पुण्यक्षेत्रीचा निवास. . . माझी बारा वर्षं आनंदात गेली. विद्येची उपासना करतानाच मी जीवनाची उपासना करायला इथं शिकलो. गुरुवर्यांनी या फत्तराचा परिस बनविला. गुरुवर्य, आपण दिलेल्या या विद्याधनाचा उपयोग मी स्वतःबरोबरच समाजासाठीही करीन आणि आपल्या शिकवणुकीप्रमाणे निःस्पृहपणे आणि निःस्वार्थ वृत्तीनं वागेन."

अवघं वातावरण रामच्या या शब्दांनी भारून गेलं होतं. रामला अजून बोलायचं होतं. थोडा वेळ थांबून रामशास्त्री म्हणाले...

"सुहृदांनो, विद्याध्ययन पूर्ण होतं तेव्हा शिष्यानं गुरुदक्षिणा द्यावी असा प्रघात आहे. मी तर दरिद्रीनारायणाचा सेवक. अन्नछत्रात जेवलो, गुरुवर्यांच्या सावलीला राहिलो. गुरुवर्यांना दक्षिणा देण्यासाठी माझ्याजवळ काहीच नाही; पण मला तर त्याचं उतराई व्हायचं आहे. म्हणून त्यांनीच दिलेली ही शाल..."

"थांब रामशास्त्री, शाल काढू नकोस. रामशास्त्री प्रभुणे. . . तुझ्याकडून गुरुदक्षिणा आम्हाला मिळाली. तू इथं पहिल्याच दिवशी आलास तो गुरुदक्षिणा घेऊनच. आठव. सुवर्णमुद्रांनी आणि रौप्यमुद्रांनी भरलेली थैली तू आमच्या स्वाधीन केली होतीस. गुरुदक्षिणा मिळाली. ही शाल म्हणजे आम्ही तुझा केलेला सत्कार ! तोच परत घेणं आम्हाला शोभादायक नाही, रामशास्त्री."

गुरुवर्यांच्या या शब्दांनी रामबरोबरच सभेतले सारे अवाक् झाले होते. बारा वर्षांपूर्वी राम इथं आला तेव्हा साताऱ्याच्या नानासाहेब अनगळांनी दिलेलं द्रव्य त्यानं गुरुजींच्या स्वाधीन केलं होतं आणि त्याच द्रव्याचा उल्लेख गुरुजींनी आता गुरुदक्षिणा म्हणून केला...

किती विशाल हृदय ! केवढं अपार ममत्व... !

सभा विसर्जित झाली. जाताना प्रत्येक जण मनात रामशास्त्र्याची मूर्ती बसवून गेला होता.

आज पाठशाळेतल्या सर्वांना मिष्टान्न भोजन होतं. पंगत मांडलेली होती. केळीच्या पानाभोवती रांगोळी सजली होती. उदबत्त्या वातावरण सुगंधित करीत होत्या.

अनंतभट्टानं भोजनाच्या वेळी भैरवीतून एक श्लोक म्हटला. घास तोंडात अडले... पाणी डोळ्यांत तरारलं... कंठ दाटून आले... वाढप थांबलं. विनोद

मावळला... वातावरण गंभीर झालं...

आपल्या ज्येष्ठ सुहृदाचा सहवास संपला म्हणून इतर सहाध्यायी व्याकूळ झाले होते. आपल्या शिष्योत्तमाच्या विरहाच्या कल्पनेनं गुरुवर्यही धीरगंभीर झाले होते...

सगळ्यांची पोटं काही न खाताच कशी भरली! पाकशाळेच्या स्वयंपाक्याला त्या दिवशी आश्चर्यच वाटलं. . . अन्न संपलं नाही. दुसऱ्यांदा वाढप करावं लागलं नाही. भोजनावळ संपली. तांबूलभक्षण करून निमंत्रित घरोघर निघून गेले.

* * *

आज राम परत माहुलीला जाणार होता. वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री आज काशीचा निरोप घेणार होते. दुपारी सगळी पाठशाळा पुन्हा प्रवेशद्वाराशी आली.

तो पिंपळ स्थिर उभा होता. पान हलत नव्हतं त्याचं. त्याच्याच छायेखाली राम शास्त्री झाला होता. पाठीमागल्या बाजूला असलेली केळ. . . तिनं मान टाकली होती. रामनंच तिला इथं वाढवली होती. अनंतभट्ट येणार नव्हता; पण म्हणूनच त्याला आवेग येत होता.

हा सांदीपनींचाच आश्रम, हो. तोच आणि तसाच. बाळंभट्ट म्हणजे सांदीपनीच. अनंतभट्ट कृष्ण आणि राम सुदामा... आज या आश्रमाला अंतरणार. आपण... आताच...

सगळ्यांच्या पुढं गुरुवर्य होते. रामनं गुरुवर्यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. गुरुवर्यांनी चिंब आवाजात आशीर्वाद दिला.

"आयुष्यमान भव ! शुभास्ते पंथानः सन्तु !" आणि पुढे तुटक शब्दांत ते म्हणाले,

"विद्या विकू नकोस. स्वार्थ पाहू नको. तू सरस्वतीचा उपासक आहेत. तिला अभिमान वाटेल असाच वाग आणि लक्षात ठेव... निःस्पृहस्यच तृणं जगत् ।"

राम निघाला.

टप् टप् टप्. . . किती तरी आसवं जोडीजोडीनं तिथल्या जमिनीवर ओघळली... किती अंतःकरणं थरारली... पाठशाळेबाहेर रामनं पाऊल ठेवलं... आता समोरचं विस्तृत आकाशपटल त्याला खुणावत होतं. . . विशाल क्षितिज त्याला आव्हान देत होतं. . . त्याला टेकून उभं असलेलं काशीविश्वेश्वराच्या

देवालयाचं शिखर त्याला काही सांगत होतं. क्षितिजावर उतरलेले ढग आडवेतिडवे पडले होते आणि त्यांच्या त्या प्रशस्त पुंजकेदार शरीरावर अक्षरं कोरलेली वाटत होती—

'निःस्पृहस्य च तृणं जगत्...'

* * *

काशीचा परिसर रामनं मागं टाकला. शेकडो मैलांवरूनही रामला आता दिसत होता तो महाराष्ट्राचा परिसर ! त्यातही माहुलीचं शिवार.. बारा वर्षांनंतर घरी जायचं होतं. या अवधीत घरची काहीच वार्ता त्याला कळली नव्हती. विनायककाकांचं काय झालं, काकू कशा आहेत, शंकरशास्त्री, अप्पाशास्त्री कसे आहेत... आणि आते... छे.. ती तर केव्हाच गेली... साताऱ्याला जाऊन सावकारांच्या घरचे केशवशास्त्री त्यांना बघायचे होते. त्यांना भेटायचं होतं.

तशी त्याला माहुलीची वार्ता यात्रेकरूंकडून एक-दोन वेळा समजली होती. महाराष्ट्रात चाललेल्या घडामोडीही समजल्या होत्या. बाळाजी विश्वनाथाचा पराक्रमी पुत्र बाजीराव यांनी उत्तरेतही तलवार गाजवून तेथेही मराठी राज्याचे झेंडे घटकेत रोविले होते. हे रामला माहीत होतं आणि त्यांच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशव्यांनी अधिकारग्रहण केलं. बाजीरावाच्या मृत्यूनंतर या कर्तबगार पुत्रालाच पेशवाईची वस्त्रं द्यावीत, हे शाहूमहाराजांनी आधीच ठरवलं होतं.

हिंदुपदपादशाही उभारण्याच्या कामात बाजीरावाला प्रचंड खटाटोप करावा लागला होता. या खटाटोपानं यश जितकं मिळालं तितकाच आर्थिक बोजा वाढला. कर्जाचे डोंगर उभे राहिले. नानासाहेब पेशवे झाले आणि प्रथम त्यांनी कर्जफेडीची व्यवस्था केली. काशीला असताना रामशास्त्र्यांना नानासाहेबांविषयी अधून-मधून काही ऐकायला मिळे आणि त्यांच्याविषयी मनात आदर वाढे.

नानासाहेबांना एकदा तरी पाहावं असं मनातून अनेक वेळा वाटलं तरी रामशास्त्री कोण होते त्या वेळी ? एक साधा विद्यार्जनेच्छू ब्राह्मण. याचक म्हणून गेला असता तर दक्षिणेनं हात ओले केले असते नानासाहेबांनी; पण या ब्राह्मणाची अन् त्या पेशव्यांची गाठ कशी पडावी अन् बोलणं कसं व्हावं ?

* * *

छत्रपती शाहूराजे कैलासवासी झाले. तोवर पेशवे केवळ कारभारी होते, छत्रपतींचे प्रतिनिधी होते; पण शाहूराजांच्या पश्चात पेशवे राज्याचे सर्वतोपरी

मुखत्यार झाले. नानासाहेब पेशवे हे केवळ वस्त्रे मिळाली म्हणून पेशवे झाले असे नव्हते. थोर मुत्सद्दी, उत्तम संस्कृततज्ज्ञ, कलमबहाद्दर, धोरणी आणि हिशेबी असे नानासाहेब पेशवे झाले आणि पेशवाई बहरास आली. सर्वांगांनी तिला कोंभ फुटले, ते विस्तारले, वाढले. राज्याच्या सर्व व्यवहारावर नानासाहेबांचं बारीक लक्ष होतं. श्रीरंगपट्टणहून दिल्ली आणि बुंदेलखंडातून कर्नाटकाचा कारभार पाहण्याचं कसब आणि कौशल्य नानासाहेबांच्या ठायी होतं. तडजोडीची वृत्ती असली तरी प्रसंगी कडकपणा धारण करणं आणि विरोध उखडून काढणं यात श्रीमंत नानासाहेब तरबेज होते. आणि म्हणून तर बाबूजी नाईक, रामचंद्रबाबा पुरंदरे, दमाजी गायकवाड या विरोधी सरदारांवर वचक बसवून त्यांना काबूत आणण्यात नानासाहेब यशस्वी ठरले.

नानासाहेबांचे पराक्रमी पितृदेव श्रीमंत बाजीरावांनी उत्तरेत मराठी राज्याचा पाया घातलाच होता. तिथलं मराठ्यांचं वर्चस्व कमी होऊ नये, याची सतत खबरदारी नानासाहेबांनी घेतली होती. नानासाहेबांनी उत्तरेत लागोपाठ तीन स्वाऱ्या केल्या. माळव्यावर स्वारी केली, बुंदेलखंड काबूत आणलं, बागलखंडाचा बंदोबस्त केला आणि नानासाहेबांनी दिल्लीवर जरब बसवली. काशीक्षेत्रालाही आपलंसं करण्याचा नानासाहेबांनी प्रयत्न केला. तसंच प्रयागच्या बाबतीत. बंगाल आणि बिहारातही हस्तकांकरवी आपले हात पसरण्याची धूर्त कारवाई नानासाहेबांनी केली.

उत्तरेकडे सत्ता दृढ व्हावी असं नानासाहेबांना मनापासून वाटे. त्यासाठी उत्तरेत महाराष्ट्रीय कोण-कोण आहेत याची त्यांनी कसून चौकशी केली. पायगुंड्यांची पाठशाळा म्हणूनच नानासाहेबांना आपली वाटत होती. जवळची वाटत होती. बाळंभट्ट पायगुंड्यांच्या पाठशाळेत अनेक ब्राह्मण विद्यार्थी आहेत, हे कळल्यावर नानासाहेबांनी त्यांची सविस्तर माहिती मिळवली. या खटाटोपात 'रामशास्त्री प्रभुणे' हे नाव श्रीमंतांच्या कानावर गेलं. पुढं एकदा नानासाहेबांनी भेलशावर स्वारी केली आणि एकदा नेवाईवर. भेलसा आणि नेवाईच्या स्वाऱ्यांनी नानासाहेबांच्या पराक्रमाचा झेंडा उत्तरेत फडकवला आणि पेशव्यांची कीर्ती तिथं वाऱ्यासारखी पसरली. नेवाईच्या स्वारीच्या वेळीच रामशास्त्र्यांची कीर्ती नानासाहेबांच्या कानी गेली होती. वडिलांनी हिंदुपदपादशाहीचं मंदिर उभारलं होतं. त्यावर नानासाहेबांना कळस चढवायचा होता. या कामगिरीसाठी

त्यांना पराक्रमी सेनानायक, जिवावर उदार होणारे शिलेदार, चाणाक्ष राजकारणपटू आणि प्रकाण्डपंडित या साऱ्यांचीच आवश्यकता होती. म्हणून श्रीमंत माणसं टिपत होते. अचूक हेरत होते. हेरलेलं माणूस आपल्या सेवेत रुजू करून घेण्यास त्यांनी विलंब कधीच लावला नाही.

अशा हेरलेल्या माणसांत रामशास्त्र्यांची गणना होती. श्रीमंतांनी याबाबत कुणाला काही आधी सांगितलं नव्हतं; पण श्रीमंत मनात ठेवून होते. तसं श्रीमंतांनी रामशास्त्र्यांना कधीच पाहिलं नव्हतं; पण रामशास्त्र्यांचं नाव मात्र त्यांच्या कानी दहा-पाच वेळा तरी आलं होतं.

* * *

रामशास्त्री काशीहून माहुलीला आले होते. माहुलीनं रामशास्त्र्यांचं उबदार स्वागत केलं होतं. विनायकभट्टाचा ऊर अभिमानानं भरून आला होता. विनायकभट्ट आता चांगला वयस्कर दिसू लागला होता. वयाबरोबर त्याचं दुःखही वाढलं होतं. त्याला विधुरावस्था प्राप्त झाली होती. रामशास्त्र्यांना आपल्या चुलतीला डोळे भरून बघायचं होतं. त्यांच्या मनात चुलतीविषयी आदरच होता. किती केलं तरी बाळपणी घास भरवले होते तिनं. खायला दिलं होतं तिनंच. तिला नक्कीच आनंद झाला असता, पण होती कुठं ती ! राम्याचा रामशास्त्री झालेला बघायला ती राहिलीच नाही. विनायकभट्टालाही वाटेवरच सोडून ती चालती झाली.

“काका, मला का कळवलं नाहीत ?” एका रात्री राम विनायकभट्टाला म्हणाला. विनायकभट्ट कोपऱ्यात जपमाळ ओढत बसला होता.

“काय कळवायचं बाबा तुला ! तुझ्या विद्याध्ययनात खंड कशाला ?”

“काका, काकू मला आईसारखी. हे बघा मी तिच्यासाठी काय-काय आणलंय ते...”

“बनारसी रेशमी शालू, फणीकरंड्याची पेटी आणि बरंच काही.”

“ठेव बाळा, तसंच ते. तुझ्या बायकोला होईल,” सुरकुतल्या गालांवर ओघळलेली आसवं पुशीत विनायकभट्ट म्हणाला.

“काका, माझी बायको येईल तेव्हा येईल; पण काका, मी आणलेला हा आहेर काकूच्या नावानं कुणा तरी सवाष्णीला दान करा.”

* * *

. . . माहुलीत येऊन अजून एक सप्ताहसुद्धा लोटला नव्हता. पावसाळा सुरू झाला होता. माहुलीचं शिवार हिरवंचार झालं होतं. काळी आई पावसाच्या धारांनी भिजून तृप्त झाली होती. तिनं नव्या कोंभांना आणि अंकुरांना जन्म दिला होता. भैरोबाचं शेत, देशमुखांचं शिवार, कृष्णाबाईचा घाट, ओढा. . . सगळ्यासगळ्या ठिकाणी रामशास्त्री आपल्या जुन्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी जात होते. उणीव एकच होती, त्यांचे बालपणीचे सारे खेळगडी आता त्यांना दुरावले होते. कुणी गाव सोडून गेले. कुणी संसारी झाले. कुणी अकाली मरण पावले, कुणी अकाली वृद्ध झाले आणि राहिलेले. . . ते बिचकूनच वागत रामशास्त्र्यांशी बोलताना.

रामशास्त्र्यांना वाटलं, ही विद्वत्तेची पगडी डोक्यावर येऊन बसली की स्नेहाचे बंध तुटतात. प्रेमाचं पाखरू या हृदयफुलावर येऊन बसत नाही. कारण डोईवरच्या पगडीची त्याला भीती वाटते; पण करणार काय ! मग रामशास्त्री एकटेच जायचे; तसेच. . . लहानपणी बसत तसे ओढ्याकाठी. . .

केव्हा तरी एकदा कृष्णाबाईत शरीर झोकून द्यायचं होतं, पूर्वीसारखंच, बेगुमानपणे; पण आता प्रतिष्ठेची वस्त्रं अंगावर होती ना, ती काढून कृष्णाबाईला शरण जायला हवं. . .

* * *

श्रावण उजाडला होता. डोंगर हिरवे, रानं हिरवी. . . न्हाऊन ओलेती झालेली पृथ्वी प्रसन्न होती. शेतकरी आनंदात होते. वैश्य व्यापाराचे हिशेब मांडत होते. ब्राह्मण चातुर्मास विधी करण्यात दंग होते. सैनिक-शिलेदारांना पाऊसकाळाची सुटी मिळाली होती. गावशिवारं फुलली होती. रामशास्त्री असेच एकदा नदीवर गेले होते. ते परत आले तो वाड्यावर गर्दी. . . कसली गर्दी असावी, तर्क काही चालेना. बुद्धीला काही सुचेना. रामशास्त्र्यांच्या काळजात एकदम चर्रऽ झालं. . . विनायकभट्टाला काही तरी. . . हा अशुभ विचार मनात येईपर्यंत शास्त्रीबुवा वाड्याच्या आत आलेदेखील. लोकांच्या घोळक्यात विनायकभट्ट होता. त्याला पाहून रामशास्त्र्यांनी सुस्कारा सोडला. काकांची चर्या आज विशेष प्रफुल्लित झाली होती. त्याच्या अधू डोळ्यांतून आनंद ओसंडून वाहत होता. हातवारे करून तो लोकांना काही सांगत होता. . .

“आहेच आमचा राम तसा. गुणी आणि कर्तृत्ववान. . .”

रामला दूरवरून येताना पाहून विनायकभट्ट उठला आणि पुढं येऊन म्हणाला,

"अरे रामा, गेला होतास कुठं इतका वेळ ?"

"नदीवर."

"नदीवर कशाला ? आता तुला वाड्यावर बोलावलं आहे."

"कुठल्या ?"

"पेशव्यांच्या."

"म्हणजे ?"

"पेशव्यांचा हरकारा येऊन सांगून गेला. साताऱ्यास छत्रपतींकडनं आला होता. तसाच इकडं आला. रामा, अरे श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनी तुला खास निमंत्रण धाडलंय."

"कसलं ? कशाचं ?"

"ते काही सांगितलं नाही. निरोप एवढाच आहे की, रामशास्त्र्यांना म्हणावं श्रावणमासाच्या देकाराच्या वेळी पुण्यास येऊन आमची भेट घेणे."

पेशव्यांचा निरोप म्हणजे बहुमानच. आठवण ठेवून नावानिशी पेशव्यांनी सांगावा धाडला. . . शुभयोगच ! ही वार्ता माहुलीत पसरली तेव्हा लोक प्रभुण्यांच्या वाड्यावर गोळा झाले. म्हातारेकोतारे त्याला शाबासकी द्यायला, तरुण त्याचं कौतुक करायला आणि रोपीटोपी पोरं त्याला पाहायला. . . हो. . . 'रामशास्त्री'ला बघायला ! पेशव्यांचं सन्मानपूर्वक निमंत्रण गावकऱ्याला आलं होतं ना !

* * *

श्रावणमासाचा रमणा. . .

रामला काही वर्षांपूर्वीचा तो प्रसंग आठवला. दक्षिणेचं द्रव्य परत केलं. तोच. आणि आता याच प्रसंगानं पेशव्यांच्या समोर जायचं होतं; पण सन्मानानं. . . रामशास्त्री मनातून आनंदले, फुलले. कर्तृत्वाला साद आली होती. गुणपूजकानं गुण ओळखले होते. विनायकभट्टाची मान अभिमानानं उंच झाली होती. माहुलीची माती मोहरली होती. . . आणि रामशास्त्री पुण्याला गेले.

पर्वती रमण्यात विद्वान ब्राह्मणांना देकार होणार होता. रामशास्त्री पर्वती रमण्याकडे गेले, तर तिथं माणसांचं नुसतं मोहोळ ! इथं कशी दाद लागावी ?

श्रावणमासाचा देकार म्हणजे दक्षिणादान असं त्याचं स्वरूप असलं तरी ज्या पद्धतीनं तो देकार चालला होता त्यावरून रामशास्त्र्यांना देकारात सामील होऊ नये असंच वाटलं. दक्षिणा म्हणजे काही भिक्षा नव्हे नि ब्राह्मण म्हणजे भिकारी नव्हेत; पण तिथला गोंधळ, तिथली बेशिस्त वर्दळ आणि अधिकाऱ्यांची मग्रुरी पाहून रामशास्त्री आल्यापावलीच परत फिरण्याच्या बेतात होते. जवळजवळ सर्व ब्राह्मण देकारानं तृप्त होऊन निघून गेले होते. आता अगदी मोजकेच लोक उरले होते. इतक्यात...

पेशव्यांच्या तंबूतून माहुलीचेच कृष्णंभट्ट धावतपळत बाहेर आले आणि घाईघाईनं रामशास्त्रींना म्हणाले,

"राम, ए प्रभुण्या, अरे पेशवे तुझीच आठवण काढीत होते."

"कशावरून ?"

"मला नाव गाव विचारलंनी. मी माहुलीचा म्हणून सांगितल्यावर म्हणाले रामशास्त्री प्रभुणे आले नाहीत का ? मी म्हटलं चौकशी करतो नि पाठवतो. जा, जा लवकर आत. अरे, नशीब उघडणार तुझं. दैव उजळणार. आणि तू उभा राहिला आहेस खांबासारखा इथं. जा आत. हो पुढे."

कृष्णंभट्ट निघून गेले आणि रामशास्त्री तंबूच्या बाजूनं पुढं गेले. तंबूतून नानासाहेबांचा खास सेवक तुकोजी बाहेर आला आणि म्हणाला,

"आपन रामशास्त्री ना ? म्हाउलीचं ?"

"हो."

"चला. शिरिमंत तुमचीच वाट बघत्यात."

रामशास्त्र्यांनी आत पाऊल ठेवलं आणि समोर मखमली आसनावर बसलेल्या पेशव्यांना त्यांनी अभिवादन केलं. पेशव्यांनी त्याचा स्वीकार केला. डाव्या बाजूला दफ्तरदार उभे होते. त्यांना वाटलं देकारासाठीच आलेला ब्राह्मण... पुढे होऊन त्यांनी तबकातले काही रुपये उचलले आणि...

"मी दक्षिणेसाठी आलो नाही श्रीमंत," रामशास्त्री रुपयाच्या खणखणीत आवाजात म्हणाले.

"आम्हाला याची पूर्ण जाणीव आहे शास्त्रीबुवा. दफ्तरदार, तबक मागं घ्या," नानासाहेब हसून म्हणाले.

"आपला निरोप आला म्हणून आलो श्रीमंत. आपल्या दर्शनाला. मनसुबा

सांगावा, आज्ञा करावी," रामशास्त्री विनम्रतेनं म्हणाले.

"रामशास्त्री, आम्ही उत्तरेत स्वारीवर आलो होतो तेव्हापासून तुमची कीर्ती आम्ही ऐकत होतो."

"श्रीमंतांनी माझा केलेला हा गौरव श्रीमंतांच्या गुणग्राहकतेला साजेसाच आहे."

"आम्ही तुमचा आणखी गौरव करू इच्छितो, रामशास्त्री."

"काय सेवा करू ? आज्ञा श्रीमंत."

"रामशास्त्री, विद्वानाला आज्ञा करण्याची चाल या राज्यात नाही. आम्ही इथले सत्ताधीश असलो तरी सरस्वतीच्या दरबारात तुम्हीच सत्ताधीश आहात याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे, रामशास्त्री. आम्हाला तुमची सेवा हवी आहे."

"श्रीमंत रामशास्त्र्याला करता येण्यासारखी अशी कोणती सेवा ?"

"शास्त्रीबुवा, सध्या तुम्ही आमच्या धर्मखात्यात रुजू व्हा. नंतर आम्ही सावकाश केव्हा तरी विचारपूर्वक योग्य ठिकाणी तुमची नेमणूक करू."

"धर्मखाते हेही मला मुळीच अयोग्य वाटत नाही, श्रीमंत."

"मग उद्यापासूनच रुजू व्हा."

"एक आठवडा मुदत द्यावी."

"काही अडचण ?"

"वडिलांचं श्राद्ध आहे, एकदा कामावर रुजू झालो, की, या कामासाठी निष्कारण कर्तव्यात कसूर नको."

"एक आठवड्यानं या. रामशास्त्री, आता लवकर तुमची भेट होणार नाही. आम्ही मोहिमेच्या तयारीत आहोत. तुमची योजना आमच्या धर्मखात्यात झाली आहे. याची आम्हाला याद आहे."

"श्रीमंत, मराठी राज्यवैभवाचे प्रतिनिधी आहात आपण. आपली सेवा मी निष्ठेनं करीन आणि माझ्या विद्याव्यासंगाचा उपयोग राज्यहितार्थ करीन, असं मी आपणाला अभिवचन देतो."

"संतोष, परमसंतोष."

"आज्ञा असावी श्रीमंत."

"आता तरी आमच्या देकार दक्षिणेचा स्वीकार करणार ?"

"मी दक्षिणेचा स्वीकार करायला कधीच नकार दिला नव्हता. श्रीमंत, इथं

येऊन दक्षिणा घेण्यास नकार देणं म्हणजे आपला अवमान करणं हे मी जाणतो; पण माझा इथं येण्याचा हेतू तो नसल्यानं मी मघाशी दक्षिणा घेतली नाही."

"आम्ही जाणून आहोत, रामशास्त्री."

* * *

. . . रामशास्त्री परतले. आता रामशास्त्री पेशव्यांचे अधिकारी झाले होते. पुण्यात कुणाच्या घरी मुक्काम करण्यापेक्षा धर्मशाळेत राहावं म्हणून शास्त्रीबुवांनी आपला मुक्काम शनिवारवाड्यापासून थोड्याच अंतरावर असलेल्या एका धर्मशाळेतच ठेवला होता. अगदी पहाटे ओंकारेश्वराचं दर्शन घेऊन शास्त्रीबुवा निघाले. बरीच मजल गाठायची होती. म्हणून भराभर पाय उचलत चालू लागले.

तोच. . .

"ओळखलं नाहीस मला ?" एक वृद्ध आवाज.

ओंकारेश्वराबाहेरच्या ओवरीतून आवाज आला. पहाटेचा अंधार असल्यानं काही स्पष्ट दिसत नव्हतं. आवाजाच्या बाजूला एक धुनी पेटली होती. धुनीच्या तांबूस प्रकाशात कुणाचा तरी केसाळ उग्र चेहरा. रामशास्त्री पुढे गेले.

"हां हां हां. . . नाहीच ओळखणार तू."

"कोण आपण ? आपण मला ओळखता ?" रामशास्त्र्यांनी साशंकतेनं पण नम्रपणे विचारलं.

"आपण नाही ना मला ओळखत !" त्या बैरागीसदृश दिसणाऱ्या उग्र पण वृद्ध व्यक्तीनं विचारलं.

"नाही. खरंच नाही मी ओळखलं."

"कसं ओळखशील ? बारा-तेरा वर्षं झाली."

"कशाला झाली बारा-तेरा वर्षं ?"

"आपली भेट होऊन !"

"आपली भेट झाली होती ?"

"नाही ना आठवत. नाहीच आठवणार."

"आपण सांगा."

"कशाला ? लक्षात तू ठेवायला हवं होतंस. नाही राहिलं, विषय संपला. तू जा. ."

"नाही, नाही. मी आपल्याला खरंच सांगतो. आठवूनही मला आठवत नाही. कुठं भेट झाली होती आपली ?"

"झाली नव्हती असंच समजू."

"तुमच्यासारख्या दिसणाऱ्या एका व्यक्तीची तेव्हा नागपूरजवळ भेट झाली होती; पण ते तरुण होते. फटिंगबाबा... त्यांनीच मला जीवनाचा मार्ग दाखवला."

"एवढं तरी लक्षात आहे ! आश्चर्य आहे."

"बाबा, फटिंगबाबांना मी विसरलो, तर मला स्वतःलाच विसरावं लागेल. कृतघ्नपणा त्याहून वेगळा नाही. फटिंगबाबाला ओळखता तुम्ही ?"

"हो, चांगला ओळखतो."

"कुठं आहेत आता ते ?"

"इथंच. पुण्यात."

"पुण्यात ? कुठं ? मला भेटायचंय त्यांना," रामशास्त्री उतावीळपणे म्हणाले.

"इथंच. तुझ्यासमोर आहे फटिंगबाबा," असं म्हणून तो वृद्ध बैरागी ढग गडगडल्यासारखा हसला.

"काय ? तुम्ही फटिंगबाबा !" रामशास्त्री आश्चर्यानं जवळजवळ ओरडलेच आणि पुढे होऊन त्यांनी फटिंगबाबांना आलिंगन दिलं. फटिंगबाबांच्या डोळ्यांत पाणी दाटलं.

"बाबा, त्या दिवशी तुम्ही मार्ग दाखवला नसता तर हा राम आज रामशास्त्री झाला नसता. बाबा, चला माझ्याबरोबर माहुलीला. नंतर पुण्याला या. मी आता पेशव्यांच्या धर्मखात्यात रुजू होणार आहे."

"नाही रे बाबा. कुठली माहुली आणि कुठलं पुणं."

"का ? इथं तरी तुम्ही राहणारच ना ?"

"छे छे. आज जरा बरं वाटत नव्हतं म्हणून राहिलो. दुपारी निघणार मी दक्षिण यात्रेला. बेलूर, रामेश्वर, कन्याकुमारी. . . खूप ठिकाणी जायचंय. तू भेटलास आनंद झाला. मोठा हो ! नामवंत हो ! कीर्तिवंत हो !"

"बाबा, तुमच्या डोळ्यांत पाणी ?"

"अरे मोठ्या झालेल्या झाडाला रोपटं असताना आपण एक दिवस पाणी घातलंय याची आठवण झाली आणि झाड पाहून आनंद झाला."

. . . धुनीतल्या विस्तवाची राख झाली होती. तरी एखादी ठिणगी अजून फुणफुणत होती. तिच्यावर फुंकर घालत बाबा म्हणाले, "जा, रामशास्त्री जा. उंच उडू पाहणाऱ्यानं जमिनीला इतकं कवटाळू नये, जा."

¤

# ९

शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजावर, नगारखान्याच्या माथी नेहमी दिमाखात डोलणारा आणि फडफडणारा मराठी दौलतीचा इभ्रतदार भगवा जरीपटका कळाहीन दिसत होता. शनिवारवाड्यातला नेहमी गजबजलेला खलबतखाना रिकामा दिसत होता. पानिपतचा प्रलय घडून आला होता. आणि मराठी दौलतीचा महावृक्ष या भयंकर प्रलयाघातानं गदगदा हलला होता. कितीएक बिनीचे वीर, शिलेदार, तिरंदाज, बरकंदाज मारले गेले. कितीएक जन्माचे लुळेपांगळे झाले. पानिपतावर लक्ष बांगडी पिचली. पळून तर किती जणांना यावं लागलं. जीव वाचविण्यासाठी नव्हे, राज्य चालविण्यासाठी.

गणेश दरवाजातून गणपती-महालात जाण्यासाठी नेहमी राजकारणी, मुत्सद्दी, सरदार, मानकरी, फिरंगी व इंग्रज यांचे वकील यांची सतत वर्दळ असे. तो गणेश दरवाजा माणसांची वाट पाहत होता. गणपती-महाल तसा अजून बांधून पुरा व्हायचा होता; पण त्याआधीच तिथं वर्दळ सुरू झाली. गणेश-महालाचं काम पूर्ण होताच नानासाहेब पेशव्यांनी तिथं मोठ्या उमेदीनं गणेशोत्सव साजरा केला आणि गणरायाच्या उपस्थितीनं आणि आशीर्वादानं पानिपताच्या खाईतून मराठी दौलत वर येईल असा सबळ विश्वास होता श्रीमंत नानासाहेबांना. नानासाहेबांच्या अवतीभवती जे शास्त्रीमंडळ आता सतत वावरत होतं त्यात रामशास्त्री प्रमुख होते. शास्त्रीमंडळ म्हणजे पेशव्यांचे हात. स्वारी-शिकारीचा मनसुबा असो, प्रजाकल्याणाच्या विविध योजना असोत, की फिरंग्यांशी खलबत असो, शास्त्रीमंडळाचा सल्ला घेणं पेशव्यांना अगत्याचं वाटे.

नाना फडणीस, सखारामबापू, रास्ते, पेठे, पटवर्धन या सरदार मुत्सद्दी मंडळींबरोबरच रामशास्त्री हे आता शनिवारवाड्यात वजनदार असामी म्हणून प्रसिद्धीस येत होते. नानासाहेब पेशव्यांच्या जवळच्या माणसांत आता रामशास्त्र्यांची गणना होऊ लागली होती.

नानासाहेबांनी पानिपतप्रलयाची हाय खाल्ली आणि हळूहळू ते मनानं खंगत चालले. विश्वास आणि सदाशिवरावभाऊ यांचे युद्धात विव्हळ झालेले चेहरे नानासाहेबांना दिसत, तेव्हा ते स्वतःच व्याकुळ होत. मराठी राज्याच्या मंदिरावर कळस चढवू पाहणारा ज्ञानवंत, प्रज्ञावंत सेनानी आणि राजाचा प्रतिनिधी पाया खचलेल्या इमल्यासारखा खचू लागला. खचता-खचता एक दिवस तो कोसळला आणि कोसळून गतप्राण झाला. शनिवारवाडा गदगदला. दिल्ली दरवाजात आक्रोश झाला. पर्वती कासावीस झाली. रमण्याला रडू कोसळलं आणि पुणं शोकसागरात बुडालं.

* * *

श्रीमंतांच्या निधनाचं दुःख गिळून रामशास्त्री पुढला काही विचार करीत आपल्या घरी बसले होते. शास्त्रीबुवा आता गृहस्थ झाले होते आणि गृहस्थीपाठोपाठ त्यांना पितृपदही प्राप्त झालं होतं. शास्त्रीबुवांची पत्नी जानकी एक साधीभोळी स्त्री होती. शास्त्रीबुवा मराठी राजकारणात एवढे वजनदार असामी झालेले; पण त्यांची बायको मात्र उंबरा ओलांडायला धजावत नव्हती.

रामशास्त्र्यांची मिळकतही आता बऱ्यापैकी होती. तैनात, श्रावणमास दक्षिणा आणि रोजमुरा, शिवाय वर्षाला कापड; आणि सरकारी पागेतला घोडा. शास्त्रीबुवा मोठे झाल्याचीच ही खूण होती. श्रीमंतांचा मृत्यू झाला आणि शास्त्रीबुवांना उगीचच वाटलं की आता खूप मोठी जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. श्रीमंत नानासाहेबांच्याच पश्चात कोवळ्या वयाच्या माधवरावाला पेशवाईची वस्त्रं घ्यावी लागली आणि कोसळता डोलारा सावरण्याचं कठीण काम त्याच्यावर येऊन पडलं. माधवराव तसे अजून लहानच होते. तरुण होते; पण अननुभवी होते. गरम रक्ताचे, उदार दिलाचे, कडक शिस्तीचे म्हणून माधवरावांची ख्याती होतीच शनिवारवाड्यात; पण एवढे सगळे गुण असले तरी राज्यशकट चालवायचा म्हणजे जरा कठीणच ! आणि तेही आधीच्या संभ्रमित पार्श्वभूमीवर ! पण माधवरावांनी माणसं जोडली होती. त्यांना आपलं केलं होतं.

रामशास्त्र्यांना माधवरावांनी जवळ केलं होतं ते केवळ पंडित म्हणून नव्हे, केवळ शास्त्री म्हणून नव्हे, केवळ संकटातील सल्लागार म्हणून नव्हे, तर एक कार्यकुशल कर्मयोगी म्हणून. आज रामशास्त्र्यांना शनिवारवाड्यातून असाच निरोप आला होता. त्यांना जायचं होतं; पण त्यापूर्वी एक गृहकृत्य त्यांना उरकायचं होतं.

कोणी एक विणकर येणार होता. जानकीबाईसाठी त्याच्याकडून आज सणंग घ्यायचे होते. तो एवढ्यात येणार होता म्हणून रामशास्त्री तयार होऊन बसले, उपरणं खांद्यावर घेऊन. तोच आतून आवाज आला,

"पेशव्यांचा निरोप आला असेल तर जावं म्हणते मी. आमची लुगडीबिगडी राजकारणाच्या आड यायला नकोत."

"अहो, निदान आम्हाला एवढं तरी कुटुंबसुख घेऊ द्या."

"कुटुंबाची आठवण आहे म्हणायची !"

"म्हणून तर पेशव्यांचा निरोप येऊनही थांबलो. खरं तर पेशव्यांचा निरोप येण्याआधीच मी वाड्यावर जायचा..."

"म्हणूनच म्हणत्ये, जिवाची एवढी तगमग नको. खुश्शाल जावं आपण. लाज झाकण्याइतकं वस्त्र आहे माझ्या अंगावर."

...एवढं बोलणं होत आहे तोच खांद्यावर गासडी घेऊन तो विणकर आला. त्यानं गासडी सोडली आणि रंगीबेरंगी पातळं-लुगड्यांच्या घड्या पुढे केल्या.

"किती घ्यायची असतील तेवढी घ्या. आज आम्ही तुमच्या शब्दाबाहेर नाही," रामशास्त्री जानकीला म्हणाले.

"उंबऱ्याच्या आत असलेल्या माणसाला उंबऱ्याच्या आतलेच अधिकार असतात. आपण घ्यावा माल निवडून," जानकी म्हणाली.

...रामशास्त्री अलीकडे संसारात कमी लक्ष घालत होते, याची त्यांनाही जाणीव होती. आपण शनिवारवाड्याइतके आपल्या वाड्यात कधीच राहू शकत नाही हे त्यांच्या ध्यानी आलेलं होतं म्हणून आज ते मुद्दामच घरी थांबले होते. जानकीनं नव्या लुगड्याची घडी मोडून देवाला नमस्कार केल्यावर मग पायात जोडा सरकवून शास्त्रीबुवा निघाले.

घाईघाईनं शनिवारवाड्यापर्यंत आले. हुजरातीच्या चौकात चौकीदार मुजरा करून पुढे आला आणि म्हणाला,

"श्रीमंत आपलीच वाट पाहत आहेत."

रामशास्त्र्यांना वाटलं, आज श्रीमंतांभोवती बरीच मंडळी असणार. त्यात काही बुजुर्ग असणार; पण प्रत्यक्षात तिथं कुणीच नव्हतं. श्रीमंत माधवराव लोडाला टेकून बसले होते. डोक्याचा मंदील, शिरपेच त्यांनी जवळच एका बुटक्या चौपाईवर काढून ठेवला होता. त्यांची मुद्रा विचारी दिसत होती. रामशास्त्र्यांना महालाच्या दारात पाहताच त्यांनी रामशास्त्र्यांचं स्वागत केलं.

"या रामशास्त्री. आज आम्हाला तुमची तीव्रतेनं याद आली."

"आपला निरोप मिळाला तेव्हाच आम्ही निघालो होतो, श्रीमंत..."

"मग ?"

"माजघरी अडकलो. कितीएक दिवसांनी तिथं डोकावून पाहिलं."

"रामशास्त्री, तेही ठीकच आहे," माधवराव हसून म्हणाले. "राजकारणाचा रखरखीत सूर्य कौटुंबिक आयुष्याची कोमल फुलबाग केव्हाच करपवून टाकतो."

"तसं नाही श्रीमंत... मी वेळेवर निघालोच होतो..."

"रामशास्त्री, तुम्हाला ज्या राजकारणासाठी इथं यायला वेळ लागला ते कारण आम्हालाही महत्त्वाचं वाटतं. आमच्या कलत्रांची कदर आम्ही इतपत केली पाहिजे. रामशास्त्री, आपणाला ठाऊक असेल कदाचित..."

"काय श्रीमंत ?"

"श्रीमंत नानासाहेबांनी हयातभर उसाभरी कष्ट केले; पण ते ऐन मोहिमेतही आमच्या मातुःश्रींना विसरले नाहीत कधी. कर्नाटकाच्या एका स्वारीत मातुःश्री त्यांच्याबरोबर नव्हत्या."

"मी जाणतो श्रीमंत. मलाही ठाऊक आहे. श्रीमंतांनी एक खास फर्माइषी जिन्नस बाईसाहेबांसाठी पाठवला होता."

"कोणता ?"

"तांब्याचा पेला."

"आणि समवेत मूगदळाचा लाडू पाठविला आणि तो भक्षून पाहावा असं लिहिलं होतं."

"तांब्याचा पेला तो काय आणि मूगदळाच्या लाडवाची मातबरी ती किती ! कदाचित पेला विशेष घाटदार असेल आणि मूगदळाच्या लाडवात मालमसाला

खुमासदार घातला असेल; पण या जिनसा श्रीमंतांकडून मिळाल्यावर बाईसाहेबांना श्रीमंतांचं दर्शन झाल्याचा आनंद मिळाला असणार खास.”

“ठीक बोललात शास्त्रीबुवा. आम्ही याच कारणासाठी आपणाला पाचारण केलं. शास्त्रीबुवा, तुमच्या आणि आमच्या अंतर्गृहाचं बरंच येणं-जाणं आहे, स्नेहसंबंध आहेत हे तुम्ही जाणताच. आज तुमच्या विरुद्ध तक्रार पेश झालीय आमच्या खाजगीत,” रावसाहेब माधवराव हसून म्हणाले.

“माझ्याविरुद्ध ? आमच्या घरातून ? आश्चर्य आहे !”

“रामशास्त्री, तुम्हाला थोडंसं कर्ज आहे असं ऐकतो. आणि ते थोडं असलं तरी तुमच्या दृष्टीनं त्याची परतफेड हे जिकिरीचं काम असणार. रामशास्त्री, तुमचं कर्ज वारण्याची व्यवस्था आम्ही आमच्या खजिन्यातून करणार आहोत,” श्रीमंत माधवराव म्हणाले.

रामशास्त्री थक्क होऊन ऐकत होते. श्रीमंतांना ही गोष्ट समजली कशी, त्यातील तीव्रता त्यांना जाणवली कशी, रामशास्त्र्यांना काहीच कळेना. गोष्ट मात्र खरी होती. मोठेपणाबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या नित्य वाढतच होत्या. स्वतःचा कुटुंबकबिला अगदीच आटोपता असला, तरी प्रभुणे घराण्यातला कर्तबगार कर्ता पुरुष या नात्यानं येईल जाईल त्याला सावली-विसावा आणि सहाय्य देण्याचं काम रामशास्त्र्यांना करावंच लागे. विनायकभट्टही आता नव्हते. त्यांचा वंशवेल विस्तारला होता. माहुलीला जाऊन त्यांची वास्तपुस्त करणं, दादबाजी काकाला काही लागलं सवरलं तर विचारणं या गोष्टी अपरिहार्यतेनं रामशास्त्र्यांना कराव्या लागत होत्या. घरातील ऊठबस वाढली होती. वर्दळ वाढली की, आगतस्वागत वाढलं, आणि खर्चही वाढला. अशा या चक्रात रामशास्त्र्यांना थोडंफार कर्ज झालं होतं. स्वभाव मानी असल्यामुळे कर्जाची चिंता सतत पोखरत होती आणि हीच हकिकत जानकीबाईकडून रमाबाईंना समजली. रमाबाईंनी श्रीमंतांना निवेदिली. रामशास्त्री कर्जाच्या बोजानं विचलितचित्त झाले आहेत, हे ऐकल्यावर श्रीमंतही अस्वस्थ झाले. राज्यव्यवहारात नित्य उपयोगी असणाऱ्या बुद्धिमंतांची बुद्धी कोणत्याही चिंतेच्या काजळीनं ग्रासून गेली असेल तर ती झटकणं आणि पुन्हा त्या बुद्धीला प्रकाशू देणं हे ‘स्वामी’चं कर्तव्यच आहे, याची जाण माधवरावांना होती आणि म्हणूनच त्यांनी रामशास्त्र्यांना बोलावून आणि आपला मनसुबा सांगून त्यांना थक्क करून सोडलं होतं. आपल्या आश्रितांच्या

निर्वाहाची आणि कल्याणाची या कोवळ्या पेशव्याला वाटणारी चिंता पाहून रामशास्त्री मनात सकौतुक आनंदले आणि भारावलेल्या अवस्थेतच ते घरी परत आले.

* * *

रावसाहेबांची कारकीर्द सुरू होऊन आता काही महिने लोटले होते. अविरत उद्योग आणि परिश्रम करून रावसाहेब दौलतीला बळकटी आणण्यासाठी प्रयत्न करीत होते. शनिवारवाड्यातले चिरेबंदी चौक पुन्हा गजबजू लागले होते. हिरकणी चौकातलं कमलाकृती कारंजं पुन्हा उसळ्या मारून उडत होतं. हस्तिदंती दिवाणखाना आणि अस्मान महाल आता बोलू लागले होते.

पानिपतानं ओढवलेलं संकट एवढं भीषण होतं की, उजाड रानावर फुलबाग फुलविण्याचं विश्वकर्म्याचं कार्य माधवरावाला करायचं होतं. सारीच टंचाई— माणसांची, वस्तूंची, नाण्यांची, प्राण्यांची. पेशव्यांच्या टांकसाळी नाशिक, चांदवड, वसई, नागोठणे इथं होत्याच. माधवरावांनी पुण्याला टांकसाळ घालून दुल्लभशेट या नगरशेटकडं तिची व्यवस्था दिली. टांकसाळ घातली खरी, पण नाणी पाडायची कशाची? धातू कुठला? मग पेशव्यांनी काय केलं? राज्य तर चाललं पाहिजे ना. सोन्या-रुप्याचे दागदागिने आणि भांडीकुंडी मोडून नाणी पाडली. मोहरा, रुपये, अधेल्या ही पातशाही शिक्क्याची नाणी पाडली. कारखाने पुन्हा सुरू केले. जामदारखाना, दप्तरखाना यांची पुनर्रचना केली.

या सगळ्या उलथापालथीत, व्यवस्थेत आणि पुनर्रचनेत माधवरावांना निकटचे साहाय्यक होते रामशास्त्री. तसे नाना-बापू होतेच; पण रामशास्त्री आणखी काही होते. नाना-बापू श्रीमंतांच्या पुढे असत तर रामशास्त्री मागं असत.

* * *

उन्हाळा संपत आलेला होता. वैशाख वणव्याची आग ओसरत चालली होती. मृगाच्या किड्यांची चाहूल लागली होती. शेतं भाजून भाजून खरपूस झाली होती. त्यावर नांगर फिरवून शेतकऱ्यांनी पेरणीची जय्यत तयारी ठेवली होती. रामशास्त्री चार दिवस विश्रांतीला आले होते माहुलीला. रामशास्त्र्यांना माहुलीला आता वारंवार येणं जमत नसे. पालखी परवडायची नाही. घोड्यावर मांड ठोकली आणि कोस दोन कोस रपेट झाली की, मणका ठणकू लागे. मग पायीच प्रवास. म्हणून रामशास्त्री वर्षातून एकदा तरी सवड काढून चांगले चार-आठ दिवस

राहण्याच्या उद्देशानं माहुलीला येत. विश्रांतीनं ताजेतवाने होऊन पुण्याच्या रामरगाड्यात रमण्यासाठी चालते होत; तसेच ते आताही आले होते. सहकुटुंब आले होते.

माहुली गावात आता स्वाभाविकच त्यांच्याविषयी आदब वाढली होती. मागच्या पिढीतली फारशी माणसं आता माहुलीत राहिलीच नव्हती. जी काही राहिली होती त्यांनाही रामशास्त्र्यांबद्दल अभिमानच वाटत होता आणि नव्या पिढीची पोरं तर दबकूनच असत. अप्पाशास्त्री, शंकरशास्त्री केव्हाच कैलासवासी झाले होते. त्यांच्या पाठशाळा आता दुसरे कोणी चालवीत होते. एव्हाना कृष्णामाईचं रूपही बदललं होतं. गावालगतच्या वळणावर कृष्णाबाईला अनगळांनी छोटासा घाट बांधला होता. नदीच्या अल्याड-पल्याड संगममाहुली आणि क्षेत्रमाहुली अशी दोन गावं हळूहळू आकार घेत होती. घाट बांधतानाच सावकारांनी एका उथळ जागी मोठमोठे धोंडे आणून टाकून नदीतून पलीकडे जायला एक तात्पुरता रस्ता केला होता. संगममाहुली आणि क्षेत्रमाहुलीचं दळणवळण आता चांगलं वाढलं होतं.

चातुर्मासात दोन्ही काठांनी नदी माणसांनी फुललेली असायची. रामशास्त्र्यांना आपल्या गावाचा हा विकास पाहून मनी आनंद व्हायचा. ते एकटेच कधीकधी नदीवर जात; अगदी अडनिड्या वेळी. त्या वेळी समोरचा तो अथांग पण खळाळता जीवनप्रवाह पाहून गतायुष्याच्या आठवणी नजरेसमोर साकार व्हायच्या. . . ते नदीत पोहणं. . . ते पाठशाळेत जाणं. . . देशमुखांच्या शेतातली दांडगाई. . . बहिरोबाच्या शेतातले ते खेळ. . . निसर्गानं केलेली उधळण अंगावर झेलत, एका धुंदीत दिवस काढले तिथं. . .

दर मुक्कामात हे व्हायचं. मन भारावायचं. पावलाजवळची माती गदगदायची. . . पुण्याला प्रयाण करताना उपरण्याचं टोक दरवाजाला अडकून बसायचं. प्रयासानं ते सोडवायचं आणि मागं न बघता पुढं कूच करायचं.

* * *

प्रातःकालची नित्यकर्मं आटोपून शास्त्रीबुवा वाड्याच्या सदरेवर येऊन बसले. सकाळच्या वेळी त्यांच्याकडे कुणी ना कुणी सल्लामसलतीला, चौकशीला किंवा निव्वळ सुखसंवाद करायला येत. शास्त्रीबुवाही येणाऱ्याचं यथोचित समाधान करून त्यांना परत पाठवीत. आज ते असेच लोकचर्चेत रंगले

होते. रस्त्यावरून स्त्री-पुरुषांचा एक मोठा घोळका जात होता. खूप गलका आणि आवाज करूत ते लोक जात होते. शास्त्रीबुवा अस्वस्थ झाले. त्यांच्या मनानं त्यांना ग्वाही दिली, 'काही तरी आगळीक घडली आहे खास !'

शास्त्रीबुवा समोर दरवाज्यात येऊन उभे राहिले आणि त्यांनी त्या घोळक्यातल्या एका म्हाताऱ्याला जवळ येण्यासाठी खुणावलं. म्हातारा जवळ आल्यावर शास्त्रीबुवांना त्यानं रामराम केला आणि घाबरलेलं कबूतर दांडीवर धपापत बसतं तसा तो उभा राहिला. शास्त्रीबुवांनी स्मरणशक्तीला आवाहन केलं... कोण हा... आणि मग त्यांना आठवलं, त्यांनी विचारलं,

"गुजाबा का रे ?"

"जी."

"औताड्याचा गुजा ?"

"जी."

"किती थकलास रे गुजा ?"

"वय झालं द्येवा."

"गुजाबा, कसली गडबड आहे ?"

गुजाबाच्या जीर्ण शरीराची धनुकली एकवार पुन्हा ताठ झाली. खोल-खोल गेलेल्या डोळ्यांत काही तरी आशय उतरला आणि सुकला सुरकुतलेला चेहरा क्षणभर फुलला.

"शास्त्रीबाबा, म्होरं येऊन पगा... त्ये बगा..."

म्हाताऱ्या गुजाबानं पुढं होऊन दक्षिणेच्या बाजूला उंच हात केला. शास्त्रीबुवा रस्त्यावर थोडं पुढे आले आणि त्यांनीही समोर निरखून पाहिलं. दूरवरच्या शेतात काहीतरी गडबड चालली होती.

"गुजाबा, काय चाललंय ते सांगशील का नाही ?"

"शेस्त्रीबाबा, तुमी सवताच बगा की."

रामशास्त्र्यांनी आणखी थोड पुढे जाऊन वाड्याच्या शेवटच्या उंच जोत्यावरून पाहिलं आणि शेतात चाललेलं युद्ध त्यांना दिसलं.

काही ढालाईत आणि शेतकरी यांची झोंबाझोंबी चालली होती. जवळजवळ मारामारीच होती ती. ढालाईत शेतकऱ्यांना सपाटून चोपून काढत होते. मधे पडणारी बायकापोरं मार खात होती, ओरडत होती. शेतकरी ढालाइतांच्या

बेगुमान अत्याचाराशी अटीतटीचा सामना देत होते. विरोध करीत होते, तर ढालाईत चेवल्यासारखे खवळून त्यांच्या अंगावर धावून जात होते.

रामशास्त्री तडक धावत धावतच पुढे गेले.

तोपर्यंत ढालाइतांनी चारचौघांच्या मुसक्या बांधून त्यांना जाड काढण्या लावल्या होत्या.

"काय रे, काय दंगा मांडलाय ?" शास्त्रीबुवांनी करड्या आवाजात विचारलं. ढालाईत आणि त्यांचा नाईक अजून अधिकाराच्या तोऱ्यात आणि गुर्मीतच होते. रामशास्त्री साध्या घरगुती वेशात होते. त्यांनी रामशास्त्र्यांकडे नीट पाहिलंदेखील नाही. चारचौघांसारखाच हा अशा बेफिकीरीनं ते बोलत होते. नाईक म्हणाला,

"शिरिमंतांची आज्ञा आहे."

"काय आज्ञा आहे श्रीमंतांची ?"

"पन्नास येटं हवीत."

"मग ?"

"म्हनून तर यांना धरून नेतोय."

"शेतकऱ्यांना वेठीला धरून नेणार ?"

"व्हय. हुकूमच आहे तसा."

"अरे बाबांनो, पेरण्यांचा हंगाम आहे. अशा वेळी कर्त्या पुरुषांना पकडून नेलं तर शेतं पिकतील कशी ?" रामशास्त्र्यांनी नाईकाला समजावणीच्या स्वरात सांगितलं.

"त्ये आम्हाला म्हाईत न्हाई. हुजुरातीच्या हुकमाचे आमी बंदे. शिरिमंताचे ताबेदार. शेस्त्रीबुवा, तुमी बाजूला व्हा. शेतं पिकतील न्हाई तर पिकवणारे टाचा घासत मरतील. तुमाला न् आमाला काय करावयाचं हाय. व्हा बाजूला," असं म्हणून नाइकानं आपल्या ढालाइतांना खूण केली. ढालाईत शेतकऱ्यांना बंदिवान करण्यासाठी पुढे सरसावले.

"थांबा. एक पाऊल पुढं टाकू नका," रामशास्त्री तीव्रतेनं म्हणाले.

"शेस्त्रीबुवा, तुमी नका आड येऊ."

"श्रीमंताना सांगा वेठे येणार नाहीत."

"शेस्त्रीबाबा, शिरमंतांना सांगणारे आमी कोन ?"

"मी सांगतो म्हणून सांगा."

"तुमी तरी कोन ?"

"अस्सं. नाईक, तुमची मजल वाढत चालली."

"शास्त्रीबुवा, सरकारी कामाच्या आड येऊ नगा."

"वेठे येणार नाहीत. मी पुन्हा सांगतो," पुन्हा रामशास्त्री म्हणाले.

"अस्सं ! मग येठ्यांनाबी बांधतो न् तुमला बी काढण्या लावतो," असं म्हणून नाईकानं सगळ्या शेतकऱ्यांना काढण्या लावल्या आणि रामशास्त्र्यांनाही जेरबंद केलं. आपण कुणाला जेरबंद केलं आहे, याची त्या नाईकाला मुळीच कल्पना नव्हती.

* * *

श्रीमंतांचा मुक्काम या वेळी साताऱ्यालाच होता. छत्रपतींच्या भेटीसाठी श्रीमंत माधवराव पेशवे खास लवाजम्यानिशी साताऱ्याला आले होते. सखारामबापू समवेत होतेच. सखारामबापूंनीच साताऱ्याला आल्यावर वेठे धरून आणण्याची आज्ञा केली होती. तसं फर्मान नाईकाच्या हवाली केलं होतं. सखारामबापू मुख्य कारभारी म्हणजे पेशवे दरबारातील ज्येष्ठ मान्यवर व्यक्ती.

मुख्य कारभाऱ्यानं दिलेल्या हुकमाची तामिली करताना रामशास्त्र्यांसारख्या सामान्य सेवकानं आड यावं ? आणि तेही त्या वेठ्यांना चिथावणी देऊन ? रामशास्त्र्यांनी वेठे पकडताना मनाई करावी ? सखारामबापू या घटनेमुळे फार चिडले.

आणि मग सर्वांच्या आधी सखारामबापूच ही तक्रार घेऊन श्रीमंतांच्या भेटीस गेले. श्रीमंत माधवराव पेशव्यांना सखारामबापूंनी नमस्कार केला आणि काहीशा रागाच्या सुरातच ते म्हणाले,

"श्रीमंत, राज्याच्या संरक्षणासाठी काही निकडीची कामं करावीत म्हणून वेठे धरून आणण्याची आज्ञा फर्मावली होती. तिची कारवाई करताना पेशव्यांच्या एखाद्या सेवकानं अडथळा आणला तर आम्हाला कारभार करणं जड जाणार आहे."

"मतलब ?" माधवरावांनी बापूंकडे रोखून पाहत विचारलं.

"श्रीमंत, सरकारी कामात अडथळा आणणाऱ्यानं राज्याच्या आणि खास करून श्रीमंतांचा अवमान केला आहे, गुन्हा केला आहे, असाच त्याचा अर्थ होत नाही काय ?"

"गुन्हा कोणी केला ?"

"रामशास्त्री प्रभुणे," बापू ठासून म्हणाले.

"काय रामशास्त्री प्रभुणे यांनी !" चेहऱ्यावर आश्चर्याची छटाही न दाखवता पेशवे शांतपणे म्हणाले, "पण बापू, आपणाला इतकं संतापायचं काय कारण ? गुन्हा असेल त्याचा इन्साफ आपण करूच; पण तत्पूर्वी अशा रीतीनं..."

"श्रीमंत, आमचा संताप थोडा अतिरेकी असेल; पण गुन्हा त्याहूनही मोठा आहे."

"बापू, शास्त्रीबुवांचंही काही म्हणणं असेल तर ते ऐकून घेतलं पाहिजे. तुम्हाला काय वाटतं ?" श्रीमंतांनी खोचकपणे विचारलं.

"शास्त्रीबुवांचं काही म्हणणं असेलच तर श्रीमंतांनी अवश्य ऐकून घ्यावं; पण श्रीमंत, या मामल्याचा इन्साफ करताना आपण एक गोष्ट मात्र ध्यानी घ्यावी, असं मला वाटतं."

"कोणती ?"

"रामशास्त्री आपली पायरी सोडून वागले आहेत आणि या गुन्ह्याची मुळीच गय होता कामा नये. हा गंभीर गुन्हा आहे. सरकारी गुन्हा आहे श्रीमंत," बापू घाईघाईने बोलत होते.

"बापू, एखादं कृत्य गुन्हा आहे हे ठरवण्याआधीच गुन्हा म्हणणं योग्य नाही," श्रीमंत काहीशा तीव्र स्वरात म्हणाले, "आणि बापू, गुन्हा असेलच तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. कोण आहे रे तिकडं ? रामशास्त्र्यांना हजर करा," श्रीमंतांनी फर्मावलं.

नाईकानं जेरबंद केलेले रामशास्त्री ढालाइतांच्या पहाऱ्यात पुढे आले. काढण्या लावलेले हात जोडूनच रामशास्त्र्यांनी श्रीमंतांना आणि बापूंना नमस्कार केला. रामशास्त्र्यांपाठोपाठ जेरबंद केलेले काही शेतकरीही ढालइतांनी आणून उभे केले. आता त्या जेरबंद जमावाचे रामशास्त्री जणू म्होरकेच दिसत होते.

शास्त्रीबुवांकडे एकवार कटाक्ष टाकून श्रीमंत म्हणाले,

"शास्त्रीबुवा, आपण अशा तऱ्हेनं आमच्या समोर यावं हे आम्हाला बरं वाटलं नाही. नाईक, सोडा जेरबंद ते."

"मी आपल्या बोलण्याचा भावार्थ समजलो नाही, श्रीमंत," रामशास्त्री उत्तरले.

“ढालाइतांच्या कामात अडथळा केलात ?”

“होय श्रीमंत, केला.”

“पाहा. गुन्हा कबूल केला यांनी,” बापू लगबगीनं म्हणाले.

“बापू, मी फक्त काय घडलं ते कबूल केलं. तो गुन्हा आहे किंवा काय ते अजून ठरायचंय. न्याय ठरवील.” रामशास्त्री बापूंना म्हणाले.

“न्याय ठरवील ? म्हणजे ?” सखारामबापूंनी भुवया उंचावून विचारलं.

“श्रीमंत, माझं स्पष्ट मत आहे की, वेठपद्धती हीच मुळात अन्याय्य आहे. वेठीला धरणं न्यायाचं नाही.”

“रामशास्त्री, तुम्ही केवळ पढिक पंडित आहात. त्या ग्रंथगत पांडित्याचा व्यवहारात आणि राजकारणात काहीच उपयोग नाही. पांडित्य वेगळं, व्यवहार वेगळा. आम्हाला राज्य चालवायचंय हे लक्षात असू द्या,” सखारामबापू विलक्षण उपहासानं म्हणाले.

सखारामबापूंचा उपरोध शास्त्रीबुवांच्या ध्यानी आला होता. मनातून त्यांना बापूंचा रागही आला होता.

पण चेहऱ्यावरून तसं मुळीच न दाखवता ते कमालीच्या शांतपणे म्हणाले, “श्रीमंत, बापूंचं म्हणणं गृहीत धरूनसुद्धा मला असं सांगायचंय की, राजकरण आणि व्यवहार यांचा जेव्हा प्रजेशी संबंध येतो तेव्हा व्यवहार वा राजकारण न्याय्य तत्त्वांवरच आधारलेलं असलं पाहिजे.”

“मंजूर आहे रामशास्त्री; पण वेठे धरले यात अन्याय कसा झाला ते सांगा,” श्रीमंत माधवरावांनी विचारलं.

“लक्षावधी लोकांच्या कल्याणासाठी शे-पन्नास लोक वेठीला धरले, तर ते न्यायाचंच होईल, रामशास्त्री,” सखारामबापू उद्गारले.

“मुळीच नाही. श्रीमंत, पेरण्यांचा हंगाम आहे. शेतकऱ्यांचे कामाचे दिवस. अशा वेळी त्यांना तुम्ही अन्य कोणत्या कामासाठी वेठीला धरलंत तर शेती पिकेल ? शेती पिकली नाही. सारा मिळेल ? महसूल जमा होईल ? लोकांना धनधान्य मिळेल ? याची जबाबदारी कोणावर ? म्हणून म्हणतो श्रीमंत, वेठीचा कायदा अन्याय्य आहे. वेठीची पद्धत म्हणजे शुद्ध जुलूम आणि जबरदस्ती आहे.”

मनातून श्रीमंतांना रामशास्त्र्यांचं बोलणं पटलं होतं. त्यांच्या युक्तिवादाला

तोड नव्हती. रामशास्त्र्यांनी मांडलेला मुद्दा राज्यव्यवहाराच्या दृष्टीनं आणि प्रजाहिताच्या दृष्टीनं चिंतनीय होता; पण वरकरणी रामशास्त्र्यांच्या विचारांबद्दल कोणतीही सहानुभूती न दाखवता अगदी त्रयस्थपणानं श्रीमंत माधवराव म्हणाले, "शास्त्रीबुवा, मराठी राज्याच्या सेवेसाठी कुणाही माणसाला सेवेला बोलाविण्याचा आम्हाला हक्क नाही ?"

"आहे ना. जरूर आहे," रामशास्त्री म्हणाले.

"मग तो हक्क आम्ही बजावला तर अन्याय कसा ?"

"श्रीमंत, वेलीचं फूल तोडणं हा त्या वेल वाढवणाऱ्याचा हक्क असला तरी अवेळी फूल तोडलं, कळी खुडली तर तो त्या वेलीवर आणि फुलावर अन्याय होतोच ना ? श्रीमंत, प्रजेवरील आपला हक्क बजावताना राजानं सारासार विवेक केलाच पाहिजे."

"नेमक्या शब्दांत सांगा, रामशास्त्री."

"राज्यावर संकट आलं तर अवघ्या प्रजेला राजानं हाक द्यावी आणि प्रजेनंही तोंडचा घास दूर ठेवून धावून यावं; पण प्रजेला वाटेल तेव्हा हाक देण्याचा अधिकार सत्तेला असू नये."

श्रीमंतांच्या डोळ्यांत कौतुक ओसंडत होतं. त्यांना रामशास्त्र्यांचं म्हणणं पूर्ण पटलं होतं. शास्त्रीबुवांच्या सावलीला उभे असलेले ते गरीब शेतकरी तर कमालीचे आनंदून गेले होते. त्यांच्या बाजूनं बोलणारा, त्यांचे संरक्षण करणारा कुणी तरी एक 'त्राता' त्यांना आज लाभला होता. आता कुणाला चाचपडण्याची गरज नव्हती, म्हातारा गुजाबा त्या जमावात होताच. तो डोईच्या रुमालानं हात बांधून पुढं आला आणि उमाळ्यानं म्हणाला, "शिरिमंत, वाईच बोलतु, माफ करा. शिरिमंत, गरिबाला बोलन्याची परवानगी द्यावी."

"परवानगी आहे. बोला," माधवराव म्हणाले.

"शिरिमंत, संकटयेळंला फुड्यातली भाकर दूर सारून आमी धावून येऊ. नुसते बाप्येच नव्हं तर बायामानसंबी येतील; पण येठीचा कारबार बंद करावा जी. मायबाप सरकार, ह्ये शेस्त्रीबुवा आमच्या काळजातलंच बोलले. आमाला बोलता येत न्हाई. शिरिमंत-पदर पसरतो. ल्येकराचं ऐकावं. येठीचा कायदा काढून टाकावा."

गरीब गुजाबाचे कळवळ्याचे शब्द श्रीमंत माधवराव मोठ्या तन्मयतेनं

ऐकत होते. मग रामशास्त्री म्हणाले,

"पाहा श्रीमंत, या गरीब शेतकऱ्यांचे शब्द म्हणजे नुसती पोकळ आश्वासनं नव्हेत. नुसत्या गप्पा नव्हेत. छत्रपतींच्या कारकीर्दीपासूनचा इतिहास हेच सांगतो की, याच मावळ्यांनी, याच रांगड्या वीरांनी आपला शब्द खरा करून दाखविला आहे. असे राजनिष्ठ शूर लोक वेठीच्या अन्यायानं गांजलेले असावेत हे राज्याला भूषण नव्हे, तो शाप आहे शाप !"

श्रीमंत, सखारामबापू, हुजरे, ढालाईत. . . सारी सभा चित्रासारखी स्थिर आणि स्तब्ध होती. सखारामबापू चेहऱ्यावरनं मात्र संत्रस्त झाल्यासारखे दिसत होते. . . श्रीमंतांची स्थितप्रज्ञ मुद्रा आता बदलू लागली होती. तिथं कसला तरी नवा विचार दिसू लागला होता. काही वेळानंतर श्रीमंत सस्मित वदनानं म्हणाले, "रामशास्त्री, आपले विचार आम्हाला सर्वांशानं मंजूर आहेत. आपलं कर्तव्य आपण चोख बजावलं आहे. राजाचं प्रजेविषयीचं कर्तव्य आम्ही विसरत होतो. आणि पर्यायानं अन्यायाला प्रोत्साहनच देत होतो, याची जाणीव आपण आज करून दिलीत. रामशास्त्री, सखारामबापू, सर्व वेठ्यांना आम्ही आज मुक्त केलं आहे."

लोकांचे चेहरे आनंदले. गुजाबाच्या चेहऱ्यावरच्या सुरकत्या क्षणभर मावळल्या. श्रीमंत बोलत होते. लोक जिवाचा कान करून ऐकत होते.

". . .आणि प्रजाजनहो, याप्रसंगी मी एक ग्वाही देतो."

कोणती ग्वाही करणार होते श्रीमंत ? लोकांमध्ये कमालीचं औत्सुक्य पसरलं. श्रीमंतांची ग्वाही काही तरी नवीन असली पाहिजे. श्रीमंतांनी एकवार बापूंकडे पाहिलं आणि ते म्हणाले,

"यापुढं कोणत्याही पेशव्यांकडून असा अन्याय होऊ नये म्हणून आजपासून, नव्हे, अगदी आतापासून आपल्या राज्यातून वेठबिगार बंद केली आहे. वेठीचा शिरस्ता आता रद्दबातल झाला आहे."

बापूंनी डोळे विस्फारले.

रामशास्त्रीही आश्चर्यचकित झाले.

श्रीमंतांची घोषणा क्रांतिकारी होती. वेठीचा कायदाच रद्द केला. कलमच काढून टाकलं. आता लोकांचे श्रम फुकट कोणी घेणार नव्हता. ऐन वेळी शिपाई-शिलेदारांच्या जुलमाला बळी पडण्याची पाळी कोणावर येणार नव्हती

आणि म्हणूनच लोक कमालीचे आनंदले होते.

वेठ बंद म्हणजे एक प्रकारे पारतंत्र्य बंद. वेठीचा कायदा रद्द म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीचा सोनियाचा दिवस. गुजाबा, त्याचे ते सगळे शेतकरी, शेतकऱ्यांच्या बायका, मुलं... सगळे-सगळे अंतर्बाह्य उजळले, फुलले.

"श्रीमंत माधवराव पेशव्यांचा–"

"विजय असो !"

"रामशास्त्री प्रभुणे की–"

"जय !"

सगळ्या वेठ्यांनी औचित्यभंगाचा मुलाहिजा न ठेवता आनंदानं आरोळ्या ठोकल्या. प्रत्येकाच्या मुखावर स्वातंत्र्याचं आणि अस्मितेचं तेज अवतरलं होतं. त्यांची गुलामगिरी संपली होती. जोखड गळून पडलं होतं. जीवनाच्या नव्या क्षितिजाचं दर्शन त्यांना घडलं होतं. केवळ रामशास्त्र्यांमुळे !

एकटे बापू मात्र गच्च डोकं धरून उभे होते.

¤

# १०

रामशास्त्रांच्यामुळे वेठबिगार रद्द झाली. गुलामगिरीचं निदर्शक असलेल्या या कायद्याच्या जोखडाखालून सर्वसामान्यांची मुक्तता झाली म्हणून मराठी राज्यातल्या सहस्रावधी शेतकऱ्यांना रामशास्त्री देवासमान वाटू लागले. ज्या कोणा शेतकऱ्याला रामशास्त्री प्रभुणे या नावाचा मागमूसही ठाऊक नव्हता, त्याच्या घरातल्या रोप्याटोप्या पोरांनाही रामशास्त्री प्रभुणे ठाऊक झाले. रामशास्त्र्यांनी स्वत:कडे औद्धत्याचा दोष पत्करून, मोठया धैर्यानं आणि निश्चयानं या जुलमी कायद्याची अन्याय्यता पेशव्यांना पटवून दिली होता. श्रीमंत माधवराव पेशवे यांना राज्यकारभारात अनेक सुधारणा करावयाच्या होत्या; पण सर्वत्र इतके बारीक लक्ष देऊन त्या घडवून आणणं दुरापास्त होतं. रामशास्त्र्यांनी या प्रसंगाच्या निमित्तानं राजा आणि प्रजा यांच्यात सामंजस्य निर्माण केलं म्हणूनही श्रीमंत माधवराव पेशवे रामशास्त्र्यांवर प्रसन्न होते. प्रभुण्यांविषयी त्यांच्या मनात जो आदर होता तो शतपटीनं वाढला. श्रीमंत माधवरावांना गरीब शेतकऱ्यांचा, बाया-बापड्यांचा आणि त्यांच्या पोराबाळांचा दुवा मिळू लागला.

रामशास्त्र्यांना आणि पर्यायानं श्रीमंतांनाही या बाबतीत भल्याभल्यांचा आणि बड्यांचाही विरोध झाला होता. सखारामबापूंसारखे मुरब्बी कारभारी हा कायदा रद्द करायला राजी नव्हते. 'रामशास्त्र्यांच्या विनंतीनुरूप वेठबिगार रद्द करणं म्हणजे शेतकऱ्यांना मोकळं सोडणं आणि रामशास्त्र्यांचं वजन दरबारी वाढवणं हेच व्हायचं, या विचारानं बापू अस्वस्थ होते. पण श्रीमंतांनीच मनावर घेतलं होतं आणि रामशास्त्र्यांनी ताणून धरलं होतं. अन्यायाचा प्रतिकार

करण्यासाठी, न्यायासाठी दाद लावून घेण्यासाठी कोणाचीही भीडमुर्वत न ठेवता, कसलाही मुलाहिजा न ठेवता रामशास्त्री खंबीरपणे एकटेच उभे होते. त्यासाठी त्यांनी अब्रूची पर्वा केली नाही की प्रतिष्ठेचा विचार केला नाही.

स्वतःला जेरबंद करून घेऊन सामान्य शेतकऱ्यांबरोबर पेशव्यांच्या शास्त्रीमंडळातले रामशास्त्री प्रभुणे पेशव्यांच्या समोर गेले होते.

अन्यायाशी इतका खंबीरपणे झुंज देणारा, निर्भीड, निरपेक्ष आणि स्पष्टवक्ता असा हा पंडित श्रीमंत माधवरावांच्या मनात भरला होता. गुणि: गुणं वेत्ति या न्यायानं माधवरावांनी या हिऱ्याची पारख केली होती. या तेजस्वी रत्नाला योग्य ठिकाणी बसवलं पाहिजे, त्याला शोभिवंत कोंदण दिलं पाहिजे, हा विचार श्रीमंतांच्या मनात अलीकडे बरेच दिवस घर करून होता.

श्रीमंतांच्या मनात रामशास्त्र्यांविषयी हे विचार यायला आणखीही अनेक कारणं होती. पानिपताच्या मोठ्या आघातातून मराठी राज्य नुकतंच कुठं वर येत होतं. खाईतून डोकं वर निघत होतं. राज्याचा पसारा मोठा, पण कुठं एकसंधत्व नव्हतं. कारभाराची घडी विस्कळित होती. सरदार, जहागीरदार आणि इनामदार मनमानी कारभार गावागावातून करीत होते. प्रजेला दारिद्र्याची गांजणूक होतीच; पण ही त्यात भर. त्यात असले हे वेठीसारखे जुलमी अन् राक्षसी कायदे ! छत्रपती साताऱ्यास, पेशवे पुण्यास आणि सरदार आपल्या गावी किंवा मोहिमेवर. या साखळीतले दुवे कच्चे आणि खिळखिळे झाल्यामुळे कुठे सरदार मुजोर झाले होते, तर कुठे कारभारी राजालाही जड होऊ पाहत होते आणि यामुळे राज्याच्या विकासात मोठाच अडथळा येऊ पाहत होता. हा विस्कळितपणा घालविण्यासाठी, चोख कारभाराची ग्वाही प्रजेला देण्यासाठी श्रीमंत माधवरावांनी आपल्या दफ्तरातील सर्व खात्यांची पुनर्रचना करण्याचं ठरवलं होतं. न्यायखातं हे तर सर्वांत अधिक महत्त्वाचं खातं. सामान्य-असामान्य, राव-रंक, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, सेवक-स्वामी यांपैकी कुणीही, कसलीही फिर्याद न्यायासनासमोर गुदरावी आणि अन्यायाची दाद लावून घ्यावी असं ते खातं. या न्यायखात्याचा अधिपती मुख्य न्यायाधीश, तोलामोलाचा असला पाहिजे. निर्भीड आणि निःस्वार्थी असला पाहिजे. निःस्पृह असला पाहिजे. अशी एकच व्यक्ती श्रीमंत माधवराव पेशव्यांना दिसली होती. . . रामशास्त्री प्रभुणे !

श्रीमंतांचा मनसुबा पक्का झाला होता. रामशास्त्र्यांबाबत काही निर्णय घेण्याआधी श्रीमंत माधवरावांनी कारभाऱ्यांशी सल्लामसलत घ्यायचं ठरवलं. नाना आणि बापू दोघांनाही पाचारण केलं.

शनिवारवाड्यात एके दिवशी दुपारीच मसलत झाली. मसलतीस नाना आणि बापू जातीनं उपस्थित होते.

"बापू, नाना, न्यायखात्याबाबत आपणाशी काही मसलत करावी म्हणून आम्ही आपणाला बोलावलं. नाना, छत्रपतींच्या कारकीर्दीत न्यायखातं कोणाकडं असे ?" श्रीमंतांनी सवाल पुसला.

"छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकी पंडितरावाकडं न्याय खात्याचं प्रमुखत्व होतं श्रीमंत." नानांनी तत्काळ उत्तर दिलं.

"पण पेशवाईत तशी प्रथा नाही. पेशवाईत न्याय राजानं किंवा त्याच्या प्रतिनिधीनं-पेशव्यांनी द्यायचा असतो असाच रिवाज आहे. पेशव्याला न्याय देण्यास शास्त्रीमंडळ सहाय्य करतं," सखारामबापूंनी आपली माहिती निवेदिली.

"नाना, प्राचीन ग्रंथांतून ऋषिमुनीनी न्यायदानाच्या पद्धतीविषयी काही सांगितलं आहे ? आपल्या शास्त्रीमंडळाला विचारून सांगा," श्रीमंतांनी नानांना विचारलं.

"शास्त्रीमंडळीपैकी मी कुणाला तरी बोलावणं धाडतोच; पण श्रीमंत, मला जितपत ज्ञान आहे त्यावरून मीही आपणाला सांगू इच्छितो..."

"सांगा नाना."

"याज्ञवल्क्य म्हणतात, राजानं स्वत: न्याय द्यावा; पण राज्यकारभारामुळे राजाला न्याय देण्यास फुरसत नसेल तर त्यानं धर्मशास्त्र जाणणारा न्यायाधीश नेमावा. त्याच्या मदतीला सभ्य म्हणजे पंच असावेत. ते धर्मज्ञ, वेदज्ञ आणि सत्यवादी नेमण्यात यावेत. अशा पंचांच्या सहाय्याने न्यायाधीशानं न्याय द्यावा. राजानं त्यास अनुसरून अपराध्याला शासन करावं," नानांनी निवेदन केलं.

"राजानं स्वतः न्याय द्यावा हे महत्त्वाचं आहे," सखारामबापू घाईघाईनं म्हणाले; कारण त्यांना साधारण कल्पना होतीच की, श्रीमंत रामशास्त्र्यांना न्यायाधीश नेमण्याच्या बेतात आहेत. सखारामबापूंना मनातून रामशास्त्री नकोच होते; पण वरकरणी तसं दाखवता येत नव्हतं म्हणून सखारामबापूंनी या कलमाचा आधार घेतला.

"पण बापू, त्यानंतर असंही म्हटलं आहे की, राजाला फुरसत नसेल तर न्यायाधीश नेमावा." श्रीमंत बापूंना म्हणाले.

"हो, असं आहे. न्यायाधीशाची स्वतंत्रपणे नेमणूक न्यायखात्यात करायला हरकत नाही." बापूंनी सावरतं घेतलं.

"पेशवाईचा मुख्य न्यायाधीश होईल अशी एखादी व्यक्ती सुचवा, नाना. बापू, आपणही." श्रीमंतांनी मुद्दामच नाना-बापूंना प्रश्न केला. त्यांच्या तोंडून रामशास्त्र्यांचं नाव यावं ही श्रीमंतांची अपेक्षा होती. नानांनी रामशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल ग्वाही दिली. बापूंनी त्यांच्या गुणांचा गौरव केला; पण श्रीमंतांच्या मर्मग्राही प्रश्नाचं उत्तर म्हणून कोणीही असं म्हणेनात की, रामशास्त्री प्रभुणेच न्यायाधीश व्हावेत.

खलबत गणेश-महालातच एका बाजूला शांत वातावरणात चाललं होतं. समोर श्री गजाननाची भव्य प्रतिमा होती. तीकडे एकवार नजर टाकून श्रीमंत माधवराव म्हणाले,

"रामशास्त्री प्रभुणे यांना मुख्य न्यायाधीश हे पद द्यावं, असा आमचा मनसुबा आहे."

श्रीमंतांचे हे निर्णयात्मक शब्द ऐकताच बापू चमकले. त्यांनी चटकन् मान वर करून श्रीमंतांकडे पाहिलं. दोघांची दृष्टभेट झाली. नानांच्या चेहऱ्यावर मात्र मघापेक्षा अधिक समाधान दिसत होतं. कदाचित, श्रीमंतांना जे वाटतं तेच मघा आपल्यालाही म्हणायचं होतं असं नानांना वाटत असावं.

अखेर बापूंसह सर्वांनी संमती दिली. बापू तर म्हणालेसुद्धा,

"असा न्यायाधिकारी आपल्या राज्यात असला तर राज्य सुखी होईल. आदर्श होईल."

आणि मग फर्मान निघालं.

खलिता तयार झाला. कारण या वेळी रामशास्त्री आपल्या वाड्यात पुण्याला नव्हते. ते होते माहुलीला; पण शुभकार्याला विलंब नको म्हणून श्रीमंतांनी खलिता आणि वस्त्रं देऊन माहुलीला स्वार पाठविले. बरोबर कारभारी मंडळाचे एक ज्येष्ठ सेवकही गेले होते.

पेशव्यांचे स्वार माहुलीत येऊन दाखल झाले आणि ते प्रभुण्यांच्या वाड्यावर गेले. माहुली गावात ही वार्ता वाऱ्याबरोबर पसरली. रामशास्त्री

आपल्या घरात स्वस्थ विश्रांती घेत पहुडले होते. तोच वाड्यावर खलिता येऊन धडकला. पेशव्यांकडून आलेल्या खलित्याचा रामशास्त्र्यांनी आदरपूर्वक स्वीकार केला आणि स्वारासह साऱ्या अतिथींचं स्वागत उत्तम प्रकारे करून भोजनप्रबंधही केला.

खलित्यातल्या आदेशाप्रमाणे रामशास्त्र्यांना दुसऱ्या दिवशी साताऱ्यास जाऊन छत्रपतींची भेट घ्यायची होती आणि मग पुढे पुण्याला प्रयाण करायचं होतं. आता स्वतंत्रपणे प्रवास करण्याची चिंता नव्हती. पेशव्यांनी पालखी पाठवली होती. भोई पाठवले होते. त्याचप्रमाणे एक उत्तम घोडा मोतद्दारासह पाठवला होता. रामशास्त्र्यांनी मनास येईल त्याप्रमाणे प्रवास करावा.

'पालखीचा मोईन एक सहस्त्र रुपये. खासा जातीस एक सहस्त्र रुपये आणि दसऱ्याचे कापड शंभर रुपये' अशी नक्त नेमणूक देण्यात आली होती. याशिवाय खास कचेरीसाठी दोन उपन्यायाधीश नेमून देण्यात आले होते. हे उपन्यायाधीश म्हणजे शिरस्तेदारच. मोरो हरी आणि बाळाजी धोंडदेव यांची नेमणूक या पदावर झाली होती.

आता अधिक जबाबदारीच्या आणि महत्त्वाच्या जागेवर काम करण्यासाठी शास्त्रीबुवा जाणार होते. मग माहुलीच्या गावकऱ्यांनी मोठा घाट घातला. गावच्या सुपुत्रानं गावाचं नाव मोठं केलं, देशात नाव झालं, गावानं रामशास्त्र्यांचा समारंभपूर्वक सत्कार करण्याचं योजलं. या कामातही पुढे होऊन भाग घेतला होता तो गुजाबासारख्या गरीब शेतकऱ्यानंच.

हो, शेतकऱ्यानंच; कारण रामशास्त्री एकेवेळी त्यांचे पुढारी झाले होते ना. रामशास्त्र्यांच्या खंबीर नेतृत्वामुळेच या गरीब शेतकऱ्यांच्या दीन मौनाला कणखरपणे वाचा फुटली होती. त्यांच्यामुळेच शेतकऱ्यांना पेशव्यांपुढं तक्रार गुदरण्याचं धैर्य मिळालं होतं. माहुलीचा परिसर आनंदला होता. साताऱ्यापासून माणसं आली होती. पंचक्रोशीतून कौतुकासाठी लोक आले होते.

हा सोहोळा कृष्णाबाईच्या साक्षीनंच व्हावा असं गावकऱ्यांनी ठरवलं होतं. कृष्णाबाईच्या घाटावर सायंकाळच्या वेळी तोबा गर्दी उसळली होती. त्यापूर्वी ग्रामस्थांनी सत्यनारायणाची पूजा केली होती.

घाटावरचं वातावरण प्रसन्न होतं. कृष्णाबाईच्या खळाळत्या प्रवाहाच्या साक्षीनं, सायंकाळचा प्रसन्न वारा अंगावर घेत-घेत, लोक दाटीवाटीनं बसले होते.

मावळत्या सूर्याची किरणं अधूनमधून कुणाशी खेळत होती, कुणाला चुकवत होती, कुणाला बिलगत होती.

शिंग, तुतारी, ताशा, चौघडा...

निनादाची दुनिया तिथं जणू साकार झाली होती.

उत्साही तरुण पोरांनी उधळलेल्या गुलालानं वातावरण तांबूस झालं होतं. मंडळींच्या उत्साहाला खरोखरीच पारावार नव्हता. शेकडो लोकांनी आपापल्या कुवतीप्रमाणे रामशास्त्र्यांना आहेर केले. रामशास्त्र्यांसाठी लोकांनी खास एक उच्चासन बनविलं होतं. त्यावर एक मोठा चौरंग मांडून त्यावर शास्त्रीबुवांना बसवलं होतं. शेजारीच जानकीबाई ! गळ्यात फुलमाळा आणि हार पडत होते. लोक कुंकवाचे टिळे लावत होते. शास्त्रीबुवा प्रत्येकाला हसून प्रणाम करत होते. कुणी वृद्ध समोर आला, तर रामशास्त्री आणि जानकीबाई दोघंही उठून वाकून नमस्कार करीत होते. तरुण आणि लहान पोरांच्या पाठीवर शाबासकी, किती तरी वेळ हे असं स्वागत चाललं होतं. आता सर्वांचे आहेर देऊन झाले होते.

एक जराजर्जर वृद्ध गर्दीतून वाट करून पुढं आला. त्याच्यामागं एक तरुण स्त्री. तिच्या हातात एक टोपली...

रामशास्त्र्यांनी निरखून पाहिलं. गुजाबाच होता तो. त्याच्या चेहऱ्यावर कौतुक ओसंडत होतं. त्याच्याबरोबरची तरुण स्त्री त्याची सून होती. तिनं जानकीबाईंना सौभाग्यवायन दिलं. गुजाबानं रामशास्त्र्यांच्या हातात एक करवतकाठी धोतर जोडी दिली आणि मोठ्या फुलांचा एक गलेलठ्ठ हार त्यानं त्यांच्या गळ्यात घातला आणि वाकून नमस्कार करणार एवढ्यात गुजाबाचे दोन्ही खांदे धरून रामशास्त्री म्हणाले,

"गुजाबा, तुम्ही नाही आमच्या पाया पडायचं. आम्हीच पाया पडायला हवं तुमच्या." असं म्हणून रामशास्त्री जोडीनं गुजाबाच्या पाया पडणार तोच गुजाबा म्हणाला, "हे वळचणीचं पाणी आढ्याला चाललं, हे खरं न्हाई." गुजाबाच्या डोळ्यांत मेघ दाटले आणि ते लगेच फुटले. त्या अश्रुवर्षावानं गुजाबाची पैरण भिजली.

आता शेवटचे दोन मानाचे आहेर— माहुलीच्या पाटील आणि कुलकर्ण्यांचे आहेर झाले आणि मग रामशास्त्री बोलायला उठले. त्यांच्या उजव्या हाताला हारांचा ढीग पडला होता. गळ्यातला शेवटचा हार त्यावर ठेवून रामशास्त्री

म्हणाले,

"माहुलीकर ग्रामस्थांनो, तुम्हा सर्वांच्या आशीर्वादानंच मला पेशव्यांच्या दरबारी मुख्य न्यायाधीशाचं महत्त्वाचं पद लाभलं. मी रामशास्त्री प्रभुणे म्हणून कितीही उंच गेलो, मोठ्या पदाला पोचलो तरी अखेर मी आहे या माहुलीचा राम ! मी तुम्हाला कधीही विसरणार नाही. माहुलीच्या मातीतच मी खेळलो-वाढलो. या मातीचा विसर पडण्याचा कृतघ्नपणा माझ्याकडून कधीच होणार नाही. माझे बाळपणीचे सवंगडी, इथली शेतंशिवारं, इथली पाठशाळा, हा कृष्णाबाईचा प्रवाह आणि प्रवाहाशी हितगुज करणारा हा घाट. . . या सर्वांनीच मला घडवलं आहे. सर्वांचा मी कृतज्ञ राहीन."

रामशास्त्र्यांच्या या बोलण्यानं श्रोते भारावून गेले होते. रामशास्त्रींनी आपल्या बोलण्याच्या शेवटी एक उदात्त घोषणा केली—

"आपण मोठ्या प्रेमपूर्वक मला हे इतके आहेर दिलेत. ते मला दिले असले तरी अखेर या साऱ्या वस्तूंवर, द्रव्यावर तुमचाच हक्क आहे. माझी आपणाला विनंती आहे की, या निमित्तानं जमलेलं हे मानद्रव्य पंचमंडळींनी ताब्यात घ्यावं. या वर्षीपासून कृष्णाबाईचा उत्सव साजरा करण्यासाठी या द्रव्याचा विनियोग करावा आणि या प्रसंगी जमा झालेली वस्त्रं, पात्रं आणि अन्य वस्तू गोरगरिबांना वाटून टाकाव्यात."

रामशास्त्र्यांच्या या उद्गारांनी तर त्या सभेत त्यांच्याविषयीचा आदर शतपटींनी वाढला. किती निःस्वार्थी वृत्ती ! किती मोठं अंतःकरण ! केवढी समाजाभिमुखता ! साऱ्या लोकांना असंच म्हणायचं होतं. चित्रासारखी स्तब्ध होती सभा. बोलत होते ते फक्त सर्वांचे डोळे आणि सर्वांची अंतःकरणं !

आणि हो ! ज्यांनी बाळपणी रामचा उपहास केला होता, तेही सारं विसरून या सत्कार सोहोळ्यात सामील झाले होते.

शंकरशास्त्री, केशवशास्त्री, विनायकभट्ट, काकू यांतलं कुणीच आता नव्हतं. जहागीरदार केव्हाच कैलासवासी झाले होते; पण नानासाहेब अनगळ हयात होते— सावकार अनगळ. सावकारही आजच्या या सभेला उपस्थित होते.

सावकार आता थकले होते. बरेच वृद्ध दिसू लागले होते. मात्र गर्भश्रीमंतीचं तेज त्यांच्या अधू डोळ्यांतही दिसून येत होतं. सभा संपताच गर्दीतून वाट काढत सावकार पुढं गेले आणि त्यांनी स्नेहभरानं मिठी मारली— "रामशास्त्री !"

शास्त्रीबुवा त्वरित आसन सोडून परत आले आणि त्यांनी सावकारांच्या पायाला हात लावून विनम्रपणे त्यांना नमस्कार केला.

"रामशास्त्री, आम्हाला असे लाजवू नका," सावकार अनगळ म्हणाले.

"नानासाहेब, आपला अधिकार मोठा आहे. आम्ही आपणाला नमस्कार केला; कारण आपण ज्येष्ठ, वयोवृद्ध आणि अनुभवी."

"रामशास्त्री, याच वयोवृद्धानं तुम्हाला दुखवलंय," खेदपूर्वक सावकार म्हणाले.

रामशास्त्री आणि नानासाहेब दोघांपुढेही तो प्रसंग उभा राहिला जसाच्या तसा— चित्रवत !

पायावर पाणी घालणारा शागीर्द राम !

पाण्याची धार चुकली... भिकबाळीकडे लक्ष...

खाड्कन मुस्काडीत... काजवे चमकले...

ही स्मृतिचित्रांची दृश्य मालिका नानासाहेबांच्या नजरेसमोरून किती तरी वेळ सरकत होती. अखेर नानासाहेब भानावर आले तेव्हा न राहवून त्यांनी रामशास्त्र्यांना कडकडून पुन्हा मिठी मारली. सावकारांना बोलवत नव्हतं. त्यांचे ओठ मात्र बोलण्यासाठी फुरफुरत होते. भावनेचा आवेग ओसरल्यावर ते म्हणाले...

"राम, नव्हे रामशास्त्री, तुम्ही आपली प्रतिज्ञा खरी करून दाखवलीत. राम, शास्त्री झालास, विद्वान झालास, पंडित झालास. आता पेशव्यांच्या दरबारी मुख्य न्यायाधीशही झालास. कीर्ती संपादन केलीस. चिरंजीव हो ! विजयी हो ! रामशास्त्री, मला खूप-खूप आनंद होतोय. माझा आशीर्वाद स्वीकाराल ?"

"अवश्य ! नानासाहेब, आपल्या आशीर्वादानं तर या पदावर मी आलो. आपण जर माझ्यातली अस्मिता जागृत केली नसती, तर हा राम राम्या म्हणूनच जगला असता आणि राम्या म्हणूनच त्याचा अंत झाला असता. रामचा रामशास्त्री झाला ही आपलीच कृपा आहे, नानासाहेब," रामशास्त्री कृतज्ञतेनं म्हणाले.

"तू काहीही म्हण; पण मी अपराधी आहे राम. आता मी तुझा गौरव तरी कसा करू ?"

"आपण दिलेला आशीर्वाद हाच माझा गौरव आहे. मला अधिक कोणत्याही गौरवाची आपणाकडून अपेक्षा नाही. आपल्या आशीर्वादाचे वत्सल

शब्द ऐकायला मिळाले, मी धन्य झालो !"

"हा तुमचा मोठेपणा आहे, रामशास्त्री."

"मला आपण अजूनही रामच म्हणावं."

"रामशास्त्री, मला तुझा खराखुरा गौरव करायचा आहे. ज्या कारणासाठी तुझा माझ्या घरी अपमान झाला त्याच कारणानं, आज लोकांच्या साक्षीनं मी तुझा बहुमान करणार आहे. रामशास्त्री, पुढं ये, सर्व लोकांना दिसू दे."

तसे रामशास्त्री पुढे आले. सर्व लोक पाहत होते. नानासाहेबांना आता नीट दिसतही नव्हतं; पण आपली सर्व शक्ती डोळ्यांत एकवटून ते तिथं उभे होते. नानासाहेब काय करणार आहेत याची कुणालाच कसलीही कल्पना नव्हती. रामशास्त्री सावकारांच्या डाव्या हाताला उभे होते. पलीकडे पत्नी जानकीबाई होत्या. अवतीभवती लोकांचा मेळा होता. लोक उत्सुक होते. रामशास्त्री विनम्रपणे उभे होते.

नानासाहेबांनी आपल्या कानातली भिकबाळी काढली आणि पुढे होऊन रामच्या कानात अडकवली आणि नानासाहेब पुन्हा भरल्या आवाजात म्हणाले,

"ज्या भिकबाळीसाठी तुझा अपमान झाला त्याच भिकबाळीनं मी रामशास्त्र्यांचा सन्मान करतोय."

सर्व लोकांनी रामशास्त्र्यांचा आणि नानासाहेब अनगळांचा जयजयकार केला.

रामशास्त्री तर या सत्कारानं भारावून गेले. ते जोडीनं पुन्हा सावकारांच्या पाया पडले आणि म्हणाले,

"आपलं अंतःकरण उदार आहे. विशाल आहे."

"नाही राम. आमचं अंतःकरण पूर्वी होतं तसंच आज आहे. आम्हाला माणसाची पारख नाही झाली, म्हणून आजच्या निमित्तानं मी मागं केलेल्या चुकीचं प्रायश्चित्त घेतलं."

"कुणाची चूक आणि कसलं प्रायश्चित्त, नानासाहेब ! आपण तर मला काशीला जाण्यासाठी शेवटी द्रव्य दिलंत आणि तेही बोलावून."

"दिली थैली; पण आधी तुला बोलून घेतलं. तूच आम्हाला लाजवलंस. पाहा ही भिकबाळी तुझ्या कानात कशी शोभून दिसते," असं म्हणून नानासाहेबांनी आपल्या डोळ्यांना उपरणं लावलं. त्यांना होणारा पश्चात्ताप आणि तो व्यक्त

केल्याचं होणारं समाधान त्यांच्या डोळ्यांत अश्रुरूपानं वाहत होतं. त्यांना अश्रू थांबवता आले नाहीत.

नानासाहेबांना आज या प्रसंगी फार हलकं हलकं वाटत होतं. काही वर्षांपूर्वी त्यांनी या रत्नाला उकिरड्यावर फेकून दिलं होतं. या परिसाला दगड म्हणून भिरकावून दिलं होतं; पण त्या अभावितपणे केलेल्या चुकीची भरपाई त्यांनी नंतर केली होती. रामला काशीला जायला प्रोत्साहन आणि सहाय्य त्यांनीच दिलं होतं. आज त्यांना यश आलं होतं. म्हणून तर रामशास्त्र्यांच्या सत्काराचा सोहळा डोळे भरून बघायला नानासाहेब आपणहून आले. मानापानाचा प्रश्न दूर करून ते आले होते. अंतःकरण मोठं करून या सोहोळ्यात आनंदानं सहभागी झाले होते. त्यांच्या मनावरला ताण आता नाहीसा झाला होता. ते आता नानासाहेब अनगळ सावकार नव्हते, की राम त्यांचा शागीर्द नव्हता.

एक ज्येष्ठ हितचिंतक एका कर्तबगार सुपुत्राला भेटला होता आणि हा अपूर्व भेटसोहोळा पाहण्यात इतरांनी धन्यता मानली होती.

* * *

न्यायाधीश रामशास्त्र्यांचा न्यायनिष्ठुर कारभार पेशव्यांच्या न्यायमंदिरात सुरू झाला. प्रकरणांवर प्रकरणं झटपट निकालात निघू लागली. रामशास्त्र्यांनी न्यायदानात सूत्र असं ठेवलं होतं की, ग्रामस्थांनी शक्यतो न्यायनिवाडा पंचायतीमार्फत करून घ्यावा. तो नच झाला तर मामलतदाराकडे फिर्याद गुदरावी आणि त्यानंतर पेशव्यांच्या न्यायमंदिराकडे धाव घ्यावी. त्यामुळे न्याय मागण्यासाठी अगदी निवडक लोकच रामशास्त्र्यांकडे येत. न्यायदानाच्या या पद्धतीमुळे लोकांना अगदी स्वस्तात व झटपट न्याय मिळू लागला. शेपन्नास रुपयांचा तंटा असला तर महिना-पंधरा दिवसांत त्याचा निकाल लागे. पाच हजार वा त्यावरील कज्जा चालला तर तो दोन वर्षांच्या आत संपायला पाहिजे, असा दंडक न्यायसंस्थेला रामशास्त्र्यांनी घालून दिला. न्यायदान सोपं व्हावं म्हणून न्यायदानाच्या दप्तराची नवी व्यवस्था रामशास्त्र्यांनी लावून दिली.

रामशास्त्र्यांच्या हाताखाली अमीन आणि दप्तरदार असे दोन मुख्य अधिकारी होते. फिर्यादीची अर्जी व प्रतिनिधीची जबानी ज्याची त्यानं लिहून आणावी असं फर्मान काढलं. अमीन यांनी जबानी आणि अर्जी पाहून दप्तरदाराच्या हवाली करावी. दप्तरदारांनी अर्जी पाहून प्रतिवादीस पुसायाचे

सवाल निवडून काढावेत, त्याचे जाब लिहून घ्यावेत; साधनाचे कागदपत्रं वादी-प्रतिवादी यांचे असतील ते अमीन यानं पाहून त्यांच्या नकला दप्तरी ठेवाव्यात. त्या पुराव्याची चौकशी अमीन आणि दप्तरदार यांनी करावी.

प्रतिवादी हजर होऊन खटल्याला सुरुवात झाली तरी आरंभापासून खटला ऐकण्यास न्यायाधीशाने येऊन बसण्याची गरज नव्हती; परंतु काही महत्त्वाच्या खटल्यात रामशास्त्री जातीनं लक्ष घालीत आणि स्वतः तो खटला आरंभापासून लक्षपूर्वक ऐकत.

* * *

शनिवार पेठेतला शास्त्रीबुवांचा वाडा. रमणबागेत कबूतरखान्याजवळ. शेजारीच सखारामबापू बोकील कारभारी. मुख्य कारभारी आणि मुख्य न्यायाधीश शेजारी-शेजारी राहत असले तरी त्यांची भेट व्हायची ती शनिवारवाड्यातच. शास्त्रीबुवा सकाळचे आन्हिक आटोपून वाड्यावर जात. दुपारी उशिरा घरी येत. भोजनोत्तर वामकुक्षी झाल्यावर पुन्हा काही खलबतं, मसलती, कागदपत्रांची पाहणी यासाठी जावं लागे. संध्याकाळच्या देवदर्शनाचा नित्यनेम शास्त्रीबुवांनी कधी चुकवला नाही.

* * *

संध्याकाळच्या वेळी एकदा असाच निरोप आला. वाड्यातून शास्त्रीबुवा देवदर्शनाला जाण्यासाठी पायात जोडा सरकवीत होते. एवढ्यात हुजऱ्या येऊन थडकला. शास्त्रीबुवांना कल्पना होतीच; कारण गेले कित्येक दिवस शनिवारवाड्यातलं वातावरण पेशव्यांच्या घरातल्या बेदिलीनं तापून गेलं होतं. त्याचा एक लहानसा भडका आज सकाळीच वाड्यावर झाला होता. रघुनाथराव व माधवराव या काका-पुतण्यांचं सूत तितकं जमत नव्हतं आणि ते जमू नये असा प्रयत्न आनंदीबाईनं चालवला होता.

चुलत्या-पुतण्यांच्या हर्षामर्षात खरं तर बाहेरच्या लोकांचा काही संबंध नाही; पण हा तंटा केवळ कौटुंबिक नव्हता. सत्तालालसा, राजकारण आणि मत्सर यातून हा बखेडा जन्माला आला. राघोबादादा चक्क निजामाला जाऊन मिळाले. स्वराज्यातला मुलूख त्यांनी निजामाला देऊन टाकला. गृहछिद्र लोकांसमोर येऊ नये आणि घरभेदेपणाचा फायदा हितशत्रूंनी घेऊ नये म्हणून श्रीमंत माधवरावांनी चुलत्यापुढे शरणागती पत्करली. पडते धोरण घेऊन माधवरावांनी त्यांच्याशी

मिळतेजुळते घेण्याचा प्रयत्न केला. राघोबादादांची आणि आनंदीबाईंची मोठेपणाची हौस माधवरावांनी पुरी केली. मनाला न पटणाऱ्या गोष्टीही केवळ काकांसाठी केल्या.

पण काकांनी काय केलं ?

काकांनी घरालाच चूड लावली. घराचं रक्षण करणाऱ्यांवर सूडभावनेनं हत्यार चालवलं. पटवर्धनादी सरदार खरं तर स्वकीय आणि कमालीचे एकनिष्ठ; पण राघोबादादांनी पटवर्धनांना जिणं मुष्किल केलं. स्वराज्यातही स्वराज्याच्या स्वामिनिष्ठ सेवकांना जिवाची भीती असावी ना ! पण राघोबांनी हे केलं आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. विपरीत झाला. पटवर्धनांनी नाइलाजानं निजामाचा आश्रय घेतला.

मराठी राज्याचं घर फुटलं आहे हे निजामानं हेरलं आणि सर्व शक्तीनिशी निजाम निघाला महाराष्ट्रावर चाल करून. पेशवाई नष्ट करण्याच्याच उद्देशानं.

* * *

निजामाच्या स्वारीचं संकट फार मोठं होतं. तीन सैन्ये एकत्र करून तो सर्व बाजूंनी मुलूख आवळीत-आवळीत पुण्यावर चाल करून आला. दहा हजार सैन्याचा पहिला विभाग होता. सेनापती होता राजा विनायकदास. दुसरा सैन्य विभागही दहा हजारांचा होता. त्याची सरदारी गमाजीबाबाकडे. तिसऱ्या विभागाचा सेनापती स्वतः निजाम. ढग कोसळावे तसं सैन्य पुण्यावर कोसळलं. भोसले, धायगुडे, पटवर्धन सारे बेदिल मराठे सरदार निजामासाठी लढत होते. पेशव्यांच्या विरुद्ध.

आणि पेशवे ! पेशव्यांनी आपल्या मुलखाची आशा सोडून देऊन गनिमी काव्यानं मोगलाला ताण देण्यासाठी त्याच्या मुलखात आणि त्याच्या राजधानीवर स्वाऱ्या करण्याचा कहर केला.

मोगल दर मजल पुण्याजवळ आला. पुणेकरांची त्रेधातारांबळ नुसती. ज्यास जिकडे वाट सापडली तिकडे तो पळून गेला. कोणी तोरण्यात तोंड घालून बसला, तर कोणी लोहगडाचा आसरा घेतला. कुणी राजमाचीला गेला. कुणी घाटबंधारीच्या किल्ल्यांच्या आश्रयाला, गेला, तर कोणी मावळात जाऊन जागोजाग दडून बसला. काही घाट उतरून तळकोकणात भटकू लागले.

पेशव्यांचा जवाहीरखाना आणि कुटुंबकबिला पुरंदरावर गेला.

बाकीचे कारखाने किल्ल्याच्या पायथ्याशी सासवडात राहिले. गोपिकाबाई हिय्या करून पुण्यातच राहिल्या होत्या. मोगलानं धमकी दिलीच होती. पुण्याचे अधिकारी नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांना, पुण्याचे देशमुख-देशपांडे यांना आणि खुद्द गोपिकाबाईलाही धमकीचं पत्र आलं—

"तुम्ही बऱ्या बोलानं आम्ही सांगू तितकी पुण्याच्या खंडणीची रक्कम पाठवून द्या, नाहीतर सर्व पुणे प्रांत लुटून फस्त करून टाकू."

माधवराव बाहेर स्वारीवर होते. गोपिकाबाईनं धीर केला. पत्रास भीक घातली नाही. विनायकदासाच्या सैन्यानं नाशिक लुटलं. जाळपोळ करीत तो मावळात शिरला. ठिकठिकाणी मोठे छापे घालून त्यानं भली मोठी लूट मिळवली. आंबेगाव-शेडाणीपर्यंत लूट झाली.

नाना फडणीसांनी लोहगडाच्या माचीस आश्रय घेतला आणि मोगलानं तिथंच छापा घातला. वीस लक्ष रुपयांची जिनगानी लुटली. नाना फडणीस खासे एका वस्त्रानिशी जीव वाचवून लोहगडावर पोचले.

इकडं निजामानं पुणं लुटून आणि जाळून फस्त केलं. पुण्याच्या तोफखान्यातून तोफा नेल्या. फरासखाना जाळला. देवळातल्या मूर्ती छिन्नविच्छिन्न केल्या. तोफखानेवाले पानशांच्या वाड्यास आग लावली. ती नागझरीला येऊन मिळाली, पर्वतीचा विध्वंस केला. तिथला सरकारी वाडा आणि चाळीस हजार ब्राह्मणांच्या बसायच्या धर्मशाळा होत्या त्या जाळून टाकल्या. पुण्यात हलकल्लोळ माजला.

रामशास्त्री या वेळी विसापूरच्या किल्ल्यावर जाऊन राहिले. लोहगडची पेठ लुटण्याची वार्ता पुण्यास नारो अप्पाजीला शास्त्रीबुवांनी कळविली. नारो अप्पाजींनी लिहिलं—

"उपाय काय ? दिवसच सर्वांस एक प्रकारचे आले आहेत."

अशी ही निजामाची सर्वविध्वंसक स्वारी झाली आणि पानिपतानंतर पेशवाईवर पुन्हा एकदा जबरदस्त आघात झाला. हा आघात खुद्द पुण्यावर मोठाच होता. सुंदर फुलबागेचं उजाड माळरान व्हावं तसं पुणं झालं होतं. तुडुंब जलाशयाचं पात्र कोरडं ठणठणीत व्हावं तशी पुण्याची वस्ती झाली होती.

या संकटाच्या संहारातून वर यायचं होतं पेशवाईला आणि म्हणून पेशव्यांनी विचारविनिमयासाठी रामशास्त्र्यांना निरोप धाडला होता.

विचारविनिमयाबरोबरच रामशास्त्र्यांना काही खुलासा विचारायचा होता श्रीमंतांना. अलीकडं-अलीकडं रामशास्त्र्यांविषयी लोक उणंदुणं बोलू लागले होते.

राजापूर सुभ्यातला वाटदचा सैतवडा आणि कौठेकर यांचा खोतीचा कजिया पडला होता. त्याची मनसुबी शास्त्रीबुवांनी मनास आणली. खटला उभा राहणार तोच वाटदकराची तक्रार पेशव्यांकडे दाखल झाली. तक्रार होती रामशास्त्र्यांविषयीच. शास्त्रीबुवा पक्ष धरून मनसुबी करतात असं वाटदकराला वाटत होतं म्हणून ती शास्त्रीबुवांनी न करता दुसऱ्याकडे सांगावी असं त्याचं म्हणणं होतं.

श्रीमंत माधवरावांकडे तक्रार गेली तेव्हा श्रीमंतांनीही असा हुकूम केला की, मनसुबीचे काम शास्त्रीबुवांकडून काढून वसईचे सुभेदार शंकराजी केशव फडके यांजकडे सोपवावे आणि कज्जाचे कागद तिकडे पाठवावेत.

शास्त्रीबुवांना हे समजलं तेव्हा शास्त्रीबुवांचा संताप अनावर झाला. श्रीमंतांचं बोलावणं आलंच होतं. तेव्हा याबाबत रुजवात आताच करावी या उद्देशानं शास्त्रीबुवांनी पायात जोडा सरकवला आणि काहीशा संतप्त मुद्रेनं ते वाड्याच्या बाहेर पडणार एवढ्यात...

"ऐकलं का ?"

जानकी उभी होती.

"काय म्हणता ?"

"एवढं खाऊन जावं."

असं म्हणून तुपात भिजवलेली खारीक एका चांदीच्या वाटीतून तिनं पुढे केली.

"हे आता कशाला ?"

"डोकं शांत राहतं," शांतपणे जानकी म्हणाली.

पत्नीच्या म्हणण्याचा आशय रामशास्त्र्यांच्या ध्यानी आला आणि खारीक तोंडात टाकीत ते म्हणाले,

"डोकं शांतच असतं आमचं. न्यायाधीशाला माथा भडकवून चालत नाही. येतो आम्ही. रात्री उशीर होईल."

* * *

रामशास्त्री वाड्यावर गेले. श्रीमंतही नुकतेच पर्वतीवरून आले होते. त्यांनी रामशास्त्र्यांना आणि नानांना खाशा महालातच बोलवलं. स्वारी, लुटालूट, राज्यकारभार यावर खलबतं झाली. श्यामा बटकीनं केशरी दुधाचे पेले आणून ठेवले. दुधाचा घोट घेता-घेता श्रीमंतांनी विचारलं, “न्यायमंदिराची वार्ता काय रामशास्त्री ?”

“श्रीमंत, या पदावरून मला मुक्त करावं,” रामशास्त्री म्हणाले आणि श्रीमंत माधवरावांसह सारे चमकले.

“मतलब ?”

“आमच्यावर पेशव्यांचा विश्वास नाही.”

“असा कोणता प्रसंग घडला ?”

“वाटदकराची कजियात श्रीमंतांनी माझ्याकडून मनसुबी काढून घेऊन शंकराजी फडकेंना देण्याचा हुकूम केला.”

“वाटदकराची तशी तक्रार होती.”

“असेल; पण त्यातील तथ्य जाणून न घेताच श्रीमंतांनी निर्णय केला. अशानं न्यायसंस्थेवरचा आणि न्यायासनावरचा लोकांचा विश्वास कमी होतो, श्रीमंत.”

“श्रीमंत, शास्त्रीबुवा पक्ष धरून मनसुबी करीत नाहीत. यास्तव त्याजकडेच मनसुबी करण्याची आज्ञा करावी,” नाना मध्येच म्हणाले.

“रामशास्त्री, अशा तक्रारींची दखल आम्ही यापुढे परस्पर घेणार नाही. अमीन आणि दप्तरदार यांनी त्या तुमच्याही कानी घालाव्यात आणि मगच आम्ही त्यावर तुमच्या मसलतीनं निर्णय करू.”

“श्रीमंत, न्यायासनाला हेच हवं आहे.”

प्रसन्न मनानं रामशास्त्री त्या रात्री वाड्याच्या बाहेर पडले.

* * *

दमाजी गायकवाड कैलासवासी झाले. दमाजी दरबारचे मातब्बर असामी; पण मातब्बरीबरोबर मखलाशीतही पटाईत. दादांच्या पक्षाचा माणूस. धूर्त आणि चतुर. दमाजीला चार औरस पुत्र होते. गोविंदराव, सयाजी, फत्तेसिंग आणि मानाजी. गोविंदराव धाकट्या बायकोचा. दमाजीनं माधवरावांविरुद्ध दादासाहेबांस कुमक पाठविली होती. त्या वेळी गोविंदराव कुमक घेऊन गेला होता. मग श्रीमंतांनी पुण्याजवळ दावडीस त्याला कैद करून ठेवलं. दमाजीचा

देहान्त झाला आणि सयाजी आणि गोविंदराव या दोघा सावत्र भावांनी सत्तेसाठी आपलं घोडं पुढं दामटायला सुरुवात केली.

सयाजी होता वेडसर. त्याचा धाकटा भाऊ फत्तेसिंग शहाणा व शूर होता. फत्तेसिंगाच्या मनात कावा आला. सयाजीच्या नावे सरदारी करून घ्यावी आणि भोगावी आपणच. अखेर पेशव्यांसमोर फत्तेसिंग आणि गोविंदराव दोघेही उभे राहिले.

श्रीमंत माधवरावांनी गोविंदरावास सरदारी देण्याचा मनसुबा केला. गोविंदरावानं दादासाहेबांना कुमक केली म्हणून तेवीस लक्ष रुपये दंड आणि सरदारीच्या वस्त्राबद्दल नजराणा म्हणून पेशव्यांस एकवीस लक्ष रुपये द्यावेत, असं ठरलं. आधीच्या वर्षांच्या खंडणीची बाकी म्हणून पाच लक्ष रुपयेही गोविंदरावानं पेशव्यांना द्यायचे होते. साडेपन्नास लक्ष रुपये; शिवाय पेशवे सरकारच्या नोकरीकरिता मुलुखगिरी नसेल तेव्हा पुण्याला तीन हजार स्वार आणि मुलुखगिरी असेल तेव्हा स्वारीत चार हजार फौज ठेवणे या अटीवर गोविंदरावाची सरदारी मान्य केली.

आणि मग फत्तेसिंग पुणेदाखल झाला. सयाजीला सरदारी मिळाली पाहिजे म्हणू लागला. श्रीमंत माधवरावांनी एकदा निर्णय दिला होताच; पण शास्त्रदृष्ट्या न्यायाचा पक्ष कोणता असं रामशास्त्र्यांना पुसलं. तेव्हा श्रीमंतांच्या निर्णयाचा कोणताही मुलाहिजा न ठेवता रामशास्त्र्यांनी निर्णय दिला की, "फत्तेसिंगाचा पक्ष न्यायाचा आहे."

श्रीमंत माधवरावांनी निर्णयाचा सन्मानपूर्वक स्वीकार केला. आपला निर्णय बदलला. फत्तेसिंग सयाजीच्या सरदारीचा मुख्यत्यार झाला.

* * *

बेलबागेतली एक संध्याकाळ. रात्र भरलेली आहे. सायंकाळचे प्रवचन-पुराण संपलं आहे. पुराणिकबुवा प्रसन्न होत्साते मंदिरात बसले आहेत. दर्शनाला येणाऱ्यांची वर्दळ आहे. ये-जा सुरू आहे. देवळातील घंटा मधूनच वाजत आहे. पागोटी घातलेले काही ब्राह्मण आसपास सुखसंवाद करताहेत. कुठं धर्मशास्त्रचर्चा होत आहे, तर कुठं राजकारणावर गलबला आहे. देवळात येणाऱ्या स्त्रिया आणि मुलं यांचं त्याकडे लक्ष नाही. देवाचं मनोभावे दर्शन एवढाच त्यांचा त्या देवळात येण्याचा हेतू.

एक स्त्री येते. समवेत एक मुलगा. तिचाच तो. मुलाच्या डोईला लहानसंच पागोटं आहे. त्यानं ते मुद्दाम हट्टानं घातल्यासारखं दिसत आहे. देवळातले इतर भाविक त्याच्याकडे कौतुकानं पाहत आहेत आणि त्यांना हसू फुटतंय. मुलाची आईही मग कौतुकभरल्या नजरेनं पाहत आहे. आई-मुलगा पुढे जातात. देवदर्शन घेतात. मुलगा देवापुढे संगमरवरी कासव मंडपात आहे, त्याच्याशी खेळतो आहे. आई देवाचिये द्वारी क्षणभर बसावं म्हणून तिथं बसली आहे आणि आईच्या कानावर बाजूच्या हळू आवाजातल्या बोलण्याचे शब्द पडत आहेत. त्या बोलण्याशी तिला मुळीच कर्तव्य नाही; पण...

या संवादात रामशास्त्री प्रभुणे, न्यायाधीश— असे शब्द येत आहेत आणि म्हणून त्या स्त्रीला कान टवकारावे लागत आहेत.

"कोण म्हणतो रामशास्त्री न्यायनिष्ठुर आहे ?"

"पक्ष धरून मनसुबी करतात."

"पण माणूस मोठा विद्वान हो !"

"विद्वत्तेला लाचखोरी करता येत नाही असं थोडंच आहे ?"

"पण रामशास्त्र्यांबद्दल असा संशय म्हणजे..."

"माणूस हा स्खलनशील असतो..."

"पण शास्त्रीबुवा तसे असतील तर त्यांना कर्ज का व्हावं ?"

"शास्त्रीबुवांना कर्ज आहे ?"

"हो, आणि ते कर्ज पेशवे फेडतात असंही आहे."

"आश्चर्याची गोष्ट आहे. सगळाच मामला विपरीत आहे."

"शास्त्रीबुवांची मूठ दाबली की त्याच्यासारखा कज्जा होतो."

"अहो, हळू बोला पंत... पेशव्यांची माणसं सर्वत्र असतात."

"मग भितो काय कुणाच्या बापाला. अरे, हा माहुलीचा उंडगा ब्राह्मण. विशी उलटेपर्यंत याला ज्ञान कशाशी खातात ते ठाऊक नव्हतं आणि आता एकदम न्यायाधीश म्हणून मिरवतो !"

"अहो, त्यांना पेशव्यांनी नेमलंय न्यायाधीश म्हणून."

"अरे वा ! म्हणे नेमलंय. या न्यायशास्त्र्याचाच न्याय कुणी तरी करायला हवा. अगदी श्रीमंतांसमोर."

"आणि काय हो, तुम्ही त्या रामशास्त्र्याच्या निःस्पृहतेची एवढी थोरवी

सांगता, मग पाध्ये-जोशी वादाच्या वेळेस त्यांनी आपला निःस्पृहपणा काय विश्रांतीसाठी खुंटीवर काढून ठेवला होता ?"

"त्या वादाचं काही सांगू नका. . पंत. तो जरा वेगळा प्रश्न आहे."

"वेगळा कसला. . . अहो, या जोशी-पाध्ये वादात पेशवे चक्क जात्याभिमानी झाले. त्यांनी रामशास्त्र्यांवर दडपण आणलं आणि त्यांच्यावरती पाध्यांच्या वतनवादात पाध्यांविरुद्ध निकाल देवविला. बहात्तर गावची ज्योतिष, धर्माधीकरण, उपाध्येपण ही पाध्यांची वृत्ती बुडवून त्यांना भिकेला लावलं. या पापाचा धनी कोण ? रामशास्त्रीच की नाही ? बोला !"

"असं आहे पंत, कोणताही निवाडा दिला तरी एक बाजू संतुष्ट होणार, दुसरी बाजू रुष्ट होणार. या बाबतीत तसंच आहे."

"अहो, ते आम्हाला ठाऊकच आहे; पण तुम्ही रामशास्त्र्याची त्याच्या निःस्पृहतेबद्दल तरफदारी करता म्हणून म्हटलं, हा तुमचा निःस्पृह शास्त्री पेशव्यांसमोर पाघळला कसा ?"

"पाघळला असं तुम्ही म्हणता; पण त्यांना तसंच वाटलं असलं तर ?"

"ते काही सांगू नका तुम्ही. . . पंत. . . या रामशास्त्र्याचे निर्णय काही जगावेगळेच असतात, म्हणून संशयाला जागा राहते. आता तुम्हीच सांगा, एवढा हा विद्वान धर्मपंडित, पण काही काही वेळा चक्क धर्मशास्त्राविरुद्ध निकाल देतो. आहे का नाही मजा !"

"अहो, पाणी मुरतंय दुसरं काय ?"

"वरकड प्राप्ती काही नसली तर पोथीचा आधार घेऊन आपल्या निःस्पृहपणाची ग्वाही फिरवायची. मूठ दाबली गेली की, लगेच स्वयंनिर्णयाचा डंका पिटायचा. मोठा कावेबाज माणूस आहे हो !"

"उगीच का पेशव्यांचा नाकातला बाल झालाय !"

"नाना फडणीस आणि सखारामबापूलादेखील पेशवे आताशी दूर ठेवतात; पण या माहुलीच्या भटाला फार जवळ करतात म्हणे."

"दुसरं असं— इकडं देवदेव करायचा आणि इकडं पुनर्विवाहाला संमती द्यायची. आहे का नाही आक्रित ?"

"कुणाच्या पुनर्विवाहाला संमती दिली ?"

"नाहीच का ऐकलं काही तुम्ही ? अहो, परशुरामभाऊंच्या मुलीच्या."

“परशुरामभाऊ कोण ?”

“पटवर्धन.”

“हो हो, ऐकलं होतं खरं.”

“लगीन झालं पोरीचं आणि वर्षार्धात विधवा झाली.”

“च् च्... दैवगती ! दुसरं काय !”

“खरं दैवगती, पुढंच आहे.”

“परशुरामभाऊला वाटलं, कोवळी पोर. पुनर्विवाह लावून द्यावा.”

“शान्तम् पापम् ! शान्तम् पापम् !”

“कारण एकदम कुणाला काही विचारल्याशिवाय भाऊंचं धाडस होईना, पोरीचं दुसरं लगीन लावायला.”

“मग ? नाही लावलं ना लग्न ?”

“मग भाऊ गेले रामशास्त्र्यांकडे.”

“काय उपयोग ? रामशास्त्री नकोच म्हणणार !”

“इथंच तुमचा अंदाज चुकला.”

“मग काय, लावा म्हणाले पुनर्विवाह ?”

“तर काय ! रामशास्त्र्यांनी चक्क सांगितलं, पुनर्विवाहास शास्त्राधार आहे.”

“काय म्हणता !”

“खरं तेच. केवढा गदारोळ झाला; पण शास्त्रीबुबांचा निर्णय पक्का. ते म्हणाले, शास्त्राधार आहेच.”

“शास्त्राधार कुठला ! अहो, बायकोच्या अंगावर लगेच टोपपदरी लुगडं आलं. पाणीदार मोत्यांची नथ नाकात दिसली आणि पोराच्या गळ्यात चक्क कंठी !”

“पण त्याचा काय इथं संबंध ?”

“अगदीच हो तुम्ही वेडे. अहो, परशुरामभाऊंच्या मुलीला पुनर्विवाहाला शास्त्राधार काढून दिला, मग परशुरामभाऊंनीही आपल्या खजिन्यातून काही यांना काढून दिलं. देणं-घेणं रामराम.”

“हॅं हॅं हॅं... !”

हसण्या-खिदळण्याचे, उपाहासपूर्ण सुरांचे खळखळाट !

जानकीला ते हसणं ऐकवलं नाही. त्या हसण्याला उपहासाचा विलक्षण दर्प

होता. टवाळीचा ताल होता आणि रामशास्त्र्यांच्या चारित्र्यहननाचा चौघडा त्या हसण्याच्या रूपानं वाजतोय, कर्कश, कानठळ्या बसवणारा, असं वाटलं.

मुलाला घेऊन जानकीबाई बेलबागेतून बाहेर पडल्या तेव्हा त्यांच्या मोठ्या आणि सुंदर डोळ्यांत पाणी तरळलं होतं. जन्माच्या जोडीदाराची निंदानालस्ती कानांनी समक्ष ऐकावी लागली होती. हे ऐकलेले शब्द म्हणजे सुयाच ! टोकदार आणि जहरीसुद्धा.

मुलगा म्हणाला, "आई, लवकर का ग जायचं ?"

"चल बाळ. आज आता लवकरच जाऊ या."

"मला खेळायचंय."

"हे ठिकाण वाईट आहे."

"देऊळ कधी वाईट असतं ?"

"लोक वाईट असतात देवळातले."

"हं, लोक वाईट आहेत ?"

"मला माहीत नाही. चल, घरी जाऊ या."

आईनं मुलाची बखोटी धरली आणि जवळजवळ फरपटतच त्याला ती नेऊ लागली. आई-मुलगा घरी आले. रामशास्त्री नुकतेच आरती आटोपून देवघरातून बाहेर येऊन बसले होते. आज त्यांना जरा थकल्यासारखं वाटत होतं. रात्री कसब्यात कायस्थांची बैठक होती; पण तिला जायचं नाही असं त्यांनी आधीच ठरवून टाकलं होतं. त्यामुळे सोप्यावर लोडाला टेकून विश्रांती घेत ते स्वस्थ बसले होते. अलीकडे त्यांच्यावरचा कामाचा बोजा फारच वाढला होता. अमीन आणि दप्तरदारांनाही डोकं वर काढायला होत नव्हतं. तशात नेहमीचे लोकापवाद ! कामाची गर्दी, पेशवाईतला घरभेदेपणा, जाती-जमातीची वितुष्टं, कोतवालांच्या कटकटी, जमीन-जुमल्याची भांडणं. . . अशा अनेक प्रकारचे तंटेबखेडे सोडविण्यात किंवा त्याबाबत न्याय देण्यात रामशास्त्र्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे भाग घ्यावा लागत होता. राज्यकारभार करणाऱ्या यंत्रणेपेक्षा न्यायसंस्थेवर जबाबदारी अधिक होती आणि म्हणून डोळ्यांत तेल घालून वागावं, वावरावं लागत होतं. आज त्यांना असाच शिणवठा आला होता. मन आणि शरीर दमलं होतं. गात्रं विश्रांती मागू लागली होती. रामशास्त्री ग्लानी आल्यासारखे बसले होते.

एवढ्यात जानकी बाळासह आली. आज तिला देवळातून यायला उशीरच झाला होता. दिवेलागण तर केव्हाच होऊन गेली होती. रातकिड्यांनी किरकिरायला सुरुवात केली होती; अजून स्वयंपाक व्हायचा होता. घरात चाकरमानी खूप होती; पण स्वयंपाक स्वतः जानकीच करी. जनाबाईनं चुलखंड पेटवून ठेवलं होतं. ते धगधगत होतं. त्यावर एक मोठं तपेलं उकळत होतं. स्वयंपाकाला ऊन पाणी लागलंच तर असावं म्हणून.

"आज उशीर झाला यायला ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"बेलबागेत गेले होते."

"इतका वेळ ?"

"हो. बाळ खेळत होता. बसले."

"बरं झालं, नाही तरी अलीकडे तुम्हाला घराबाहेरचं जग काही राहिलंच नाही. आम्ही न्यायमंदिरात आणि तुम्ही अन्नमंदिरात," असं म्हणून रामशास्त्री हसले.

"पुन्हा कध्धी जायची नाही मी बेलबागेत."

"का ? देवावर रागवलात ?"

"नाही. देवाच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांवर."

"त्यांच्यावर तरी का ?"

"भक्त भक्तासारखे वागत नाहीत म्हणून."

"म्हणजे ?"

"टवाळ्या करतात. अभद्र बोलतात आणि देवळातलं सगळं प्रसन्न वातावरण बिघडवून टाकतात."

"कोणी टवाळी केली ? कुणाची ?"

"रोज कुणाची तरी करीतच असतील; पण आज माझ्या जिव्हारी लागली ती. मला ऐकवेना." हे म्हणताना जानकीचे डोळे पाण्यानं डबडबले. तिला दुःख आवरेना आणि मग देवळातला सगळा संवाद जानकीनं रामशास्त्र्यांना निवेदिला. ते ऐकल्यावर गंभीर होण्याऐवजी रामशास्त्री हसूच लागले आणि म्हणाले,

"बाळाला जेवायला घालून झोपव. मग सांगतो तुला."

बाळ जेवला आणि लगेच अंथरुणावर लुडकला. तो झोपीच गेला. दोघांची

जेवणं झाली. माजघरात अंथरुणं टाकली होती. घरात फार उकडत होतं.

"चला. मोकळ्या अंगणात बसू," रामशास्त्री म्हणाले आणि दोघंही अंगणात तुळशीच्या कट्ट्यावर जाऊन बसले.

आभाळात चांदण्यांनी चंद्राभोवती फेर धरला होता. अंगणाच्या कडेला लावलेली मेंदी हळुवार वाऱ्याबरोबर डुलत होती. तुळशीवृंदावनातली तुळस आभाळाकडे एकटक बघत राहिली होती. आसमंत शांत होता. वातावरण निवांत होतं.

"आता सांगा, मघाशी का वाईट वाटलं ?"

"आपल्या माणसांची निंदानालस्ती कुणाला सहन होईल ?"

"इतकं हळुवार मन ठेवून चालणार नाही तुम्हाला. तुम्ही न्यायाधीशाच्या पत्नी आहात."

"न्यायाधीशाची पत्नी असले तरी मी एक स्त्री आहे."

"पण ती स्त्री अशा एका पुरुषाबरोबर जन्माची जखडली गेली आहे की, तिला हे सारं सहन करावंच लागेल."

"पण असं काही नसताना लोकांनी का बोलावं ?"

"बोलणाऱ्याचं तोंड धरता येत नाही. अणि असं पाहा, आकाशात पोचलेल्या उंच पर्वतीशिखराकडे खुरटी माणसं जेव्हा पाहतात तेव्हा ती असंच बोलतात."

"त्यांचं बोलणं बंद केलं पाहिजे."

"मग त्यांना अधिकच चेव येईल."

"आपण माहुलीला जाऊ."

"आणि काय करू ?"

"सुखानं राहू. नको ते न्यायाधीशपद. नको ते मोठेपण."

"वेडी. लोकापवाद एवढे जर मनाला लावून घ्यायचं म्हटलं तर माणसानं जगायला नको."

"बायकांच्या जातीला असंच वाटतं. हे घ्या..."

"काय आहे ?"

"प्रसाद."

"कुणाचा ? कुठला ?"

"जोतीपंतदादांकडून आलाय."

"आत्ता इथं कसा ?"

"ओच्यात घालून नारळाचे तुकडे मघाशीच आणले."

"बाळाला दिलास ?"

"हो. बुक्काही पाठवलाय त्यांनी."

"बरोबर काही पत्रबित्र ?"

"आहे ना."

"आधी दाखव. खरं म्हणजे ते मघाशीच वाचायला हवं होतं."

"का ?"

"भला माणूस आहे. देवाच्या स्थापनेच्या कामातही लोक त्रास देतात. बेलबागेतच फक्त टवाळ आणि दुष्ट असतात असं नाही."

दोघंही घरात आले आणि जानकीबाईंनी दुपारी सेवकाबरोबर आलेलं पत्र रामशास्त्र्यांना दिलं...

"वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री शास्त्रीबोवा स्वामींचे सेवेसी विद्यार्थी जोती गोपाळ महाभागवत सा. न. वि. वि. श्री पांडुरंगाच्या स्थापना ते प्रांतीहून करीत इकडे हे प्रांती आलो. मार्गी पेट येवले परगणे पाटोद येथे आलो. तेथीलही गावकरी अनुकूल झाले. देवाल्य बांधून दिलं. येक वर्ष जाले. आम्ही जनस्थानी येऊन राहिलो. आमच्या मागे रा. बावाजी गोसावी पुन्यस्तंभकर पेठ मजकुरी राहतात. त्यांचे तेथे व्यंकटेश संस्थान आहे. त्यास त्यांनी आमचे संवस्थानाकडे समारंभ विशेष पाहून तेथे आमचा ब्राह्मण होता, त्यासी नाना प्रकारे कजिया करून श्री पांडुरंगाच्या मोर्ती स्थापिल्या होत्या, त्यांचा उच्छेद करून घेऊन गेला. देवाल्य पाडीत होता ते गावकरी याणी राहविले. पुन्हा स्थापनेचा आरंभ करताच मारामारी करून मोर्ती नेल्या. आपणास लिहिले असे. मशारनिलेस तेथे नेऊन चौकशी करावयाची आसली तर करावी. नाही तर कमाविसदारास ताकीदपत्रे पाठवावी. हरयेक प्रकारे देव स्वस्थानी बसतील ऐसे करावे. स्वराज्यात ऐसे कोठे जाले नाही. आपण धर्मकृत्याचे ठायी सादर आहेत. ल्याहावे ऐसे नाही. सूचनार्थ लि ॥ असे."

रामशास्त्र्यांनी पत्र वाचून संपवलं आणि त्याचं भेंडोळं कोनाड्यात ठेवलं.

त्यांना विलक्षण उद्विग्नता प्राप्त झाली. स्वार्थी संधिसाधूंनी परमेश्वरी कार्याबाबतही अशी वर्तणूक करावी हे वाचल्यावर त्यांना बहुत विषण्णता प्राप्त झाली. मोगली मुलुखात घडते तर नवल नव्हते. पण स्वराज्यातही स्वधर्मियांनीच दैवताची अशी विटंबना आरंभली होती आणि तीही निव्वळ स्वार्थापायी.

रामशास्त्र्यांचा संताप अनावर झाला. अपराधी समोर असता तर हाती आसूड घेऊन त्यांनीं स्वतःच त्याची पाठ रक्तबंबाळ केली असती इतके ते क्रोधाविष्ट झाले होते.

आता जवळजवळ मध्यरात्र व्हायला आली होती. तरी या प्रकरणाचा बंदोबस्त केल्याशिवाय झोप येणार नव्हती रामशास्त्र्यांना. अंगरखा चढवला, खांद्यावर उपरणं घेतलं. . . "एवढ्या रात्री निघालात !" जानकीनं काळजीच्या स्वरात विचारलं.

"जायलाच हवं. कोतवालाला सांगतो. नानाच्या कानावर घालतो."

"पण सकाळी गेलं तर नाही का चालणार ? नाही तरी येवल्याला माणूस पाठवायचा तर तो काही आता रात्री निघणार नाही."

"खरं आहे. खरं आहे तुम्ही म्हणता ते. . . सकाळपर्यंत वाट पाहिली पाहिजे. दोन-तीन प्रहर जागून काढले पाहिजेत."

रात्र तळमळून काढली रामशास्त्र्यांनी.

आणि सकाळीच शनिवारवाड्यातून त्यांना नेण्यासाठी पालखी आली. भोयांनी वाड्याच्या तोंडाशी पालखी आणून खाली ठेवली आणि देवडीवाल्याला सांगितलं. रामशास्त्री बाहेर पडणार तोच कुणी एक गृहस्थ लगबगीनं आत शिरला. त्याच्या चालीत उताविळी होती, भिरभिरत्या नजरेत संशय होता आणि तोंडावर लाचार हसू होतं. त्याच्याबरोबर आणखी साधासुधा जासूद. हरकाम्यासारखा दिसणारा. त्याच्या हातात एक तबकासारखं ताट होतं. झाकलेलं होतं. त्यात बऱ्याच काही वस्तू असाव्यात असं वरून पाहूनही वाटत होतं. हात जोडून आणि पुढे येत खोटं हसून तो म्हणाला. . . "मी येवल्याच्या पुण्यस्तंभकर गोसाव्यांकडून आलोय."

"असं ! काम काय ?" रामशास्त्र्यांनी कडवट सुरात विचारलं.

"हे द्यायचंय."

"कुणाला ? कुणाकडून आलात तुम्ही ?"

"सांगितलं ना बापाजी गोसाव्यांकडून."

"मग ? हे मला द्यायचा संबंध ?"

"आहेर आणलाय. त्यांनीच पाठवलाय."

"माझ्या घरी आत्ता कोणतंच कार्य निघालेलं नाही."

"केवळ सदिच्छा म्हणून पाठवलाय प्रसाद. व्यंकटेशाचा."

'प्रसाद'... हा शब्द ऐकल्यावर रामशास्त्री थबकले. आता त्यांच्या कल्पनेची तार जुळली. जोतीपंतदादा महाभागवतांनी दिलेलं ते पत्र, त्यात केलेली विनंती... येवल्याच्या गोसाव्यानं केलेली पुंडाई... त्याबाबत करावी लागणारी कारवाई... आणि हा आत्ता अनोळखी माणूस घेऊन आलेला अनाहूत आहेर.. काहीही संबंध नसताना बापाजींना सदिच्छेचा पुळका यावा ना ?

म्हणजे ही लाचच आहे.

पण लाच म्हणायचं नाही ना याला, कारण व्यंकटेशाचा प्रसाद सोबत पाठवलाय. प्रसाद तो. नाकारून नाही चालणार. म्हणून रामशास्त्र्यांनी विवेक केला...

"ठेवा ते तबक इथं," रामशास्त्री म्हणाले.

त्या माणसानं लगबगीनं ते तबक खाली घेतलं. त्यावरलं मखमली कापडाच्या रुमालाचं झाकण काढलं. शेजारी एका लहानशा ताम्हनात नारळ व बुक्का होता आणि दोन पैठण्या, एक धोतरजोडी, एक शालजोडी, त्यावर एक मोत्याची कंठी आणि शिवाय एक थैली लहानशीच...

रामशास्त्र्यांनी हे आणणाऱ्याकडे एकवार तिखट दृष्टीनं पाहिलं आणि विचारलं,

"आपण बापाजींचे कोण ?"

"मी त्यांचा नातलग. कसब्यात राहतो मी."

"आपलं नाव ?"

"कृष्णाजी पांडुरंग."

"उचला हे सारं."

"आँ !"

"उचला म्हणतो ना हे सारं !" रामशास्त्र्यांचा क्रोधाविष्ट सूर.

"आपणच ठेवा म्हणालात ना ?" एक लाचार हास्य.

"त्यातला प्रसाद तेवढा ठेवा."

"हाही प्रसादच आहे, शास्त्रीबुवा."

"मला शिकवू नका. प्रसाद तेवढा ठेवा आणि बाकीचं उचला."

रामशास्त्र्यांच्या डोळ्यांत अंगार फुलला होता. तिथं शेकडो ठिणग्या जमा झाल्यासारखं वाटत होतं.

कृष्णाजी पांडुरंगासारखा चिवट निर्लज्जही रामशास्त्र्यांकडे पाहून घाबरला. त्यानं भराभर नारळ-बुक्का काढून ठेवला आणि तो आहेर त्यानं पुन्हा झाकून घेतला. खांद्यावरून गडबडीत खाली सरकलेलं उपरणं सावरून कृष्णाजी पांडुरंग पुन्हा म्हणाले,

"पाहा शास्त्रीबुवा ! आम्ही काय, केल्या हुकमाचे धनी. त्यांनी सांगितलं द्या, दिलं. तुम्ही सांगता न्या, नेतो; पण पुन्हा एकदा विचार करून पाहा शास्त्रीबुवा. किमान एक सहस्त्र रुपयांचा ऐवज आहे. लक्ष्मी अशी लाथाडू नका."

"कृष्णाजी पांडुरंग, आता तुम्ही अधिक काही न बोलणं बरं. आपण या," रामशास्त्री पुन्हा रागानं म्हणाले.

मग कृष्णाजी पांडुरंगानं आवरतं घेतलं आणि तो तडक वाड्याबाहेर पडू लागला.

"हे पाहा कृष्णाजी,"रामशास्त्र्यांनी पुन्हा हाक मारली.

"सांगा शास्त्रीबुवा, काय सेवा करू आपली ?"

"बापाजीला निरोप द्या. . ."

"हो, देतो ना. हे कमी वाटलं का ? संभावना अधिक हवी ?"

"कृष्णाजी !" रामशास्त्री जवळजवळ ओरडलेच.

"शास्त्रीबुवा, माझं काही चुकलं का ?"

"सगळंच चुकलात तुम्ही. बापाजी चुकले, तुम्ही चुकलात आणि तुमच्याबरोबर मलाही तुम्ही चूक करायला लावत होता."

"तसं नाही, शास्त्रीबुवा."

"हे पाहा कृष्णाजी, बापाजी तुमचे निकटचे आप्त. त्यांना सांगा, बापाजी, तुम्ही स्थान चुकलात. तुम्ही धोंडा टाकलात तो चिखलात पडावा म्हणून; पण तिथं दमदार जमीन आहे. कितीही धोंडे रचलेत तरी मातीला खड्डा पडायचा नाही. धोंडे दमतील, माती दमणार नाही."

"होय शास्त्रबुवा, सांगतो."

"आणखी एक सांगा... बापाजींना म्हणावं, आमच्याशी पुन्हा केव्हाही असा बर्ताव कराल तर जेरबंद करून आणण्याचा हुकूम देऊ."

कृष्णाजी पांडुरंग शास्त्रीबुवांकडे पाहातच राहिले. त्यांच्या हातातला आहेर त्यांच्या कायेबरोबरच थरथरत होता.

बाळ आता मोठा झाला आहे. हो, दहा वर्षांचा म्हणजे मोठाच की. तीन वर्षांपूर्वीच व्रतबंध उरकला. त्या वेळी पेशव्यांनी सोन्याचं कडं घातलं बाळाच्या हाती. रमाबाईसाहेबांनी भरगच्च आहेर केला. माहुलीला जेवणावळ उठली. पुण्याला पंगती झडल्या. तेव्हापासूनच वधूपिते विचारायला लागले होते; पण शास्त्रीबुवांना सवड मिळत नव्हती. व्याप वाढले होते.

आलेल्या अभ्यागतांशी बोलायचं, मुलगी बघायला जायचं किंवा दाखवायला आणा म्हणून सांगायचं आणि रामशास्त्र्यांनी त्या दिवशी 'येणे होणार नाही,' म्हणून कळवायचं असं कितीदा तरी झालं. माणसं कंटाळली. प्रभुण्यांच्या घरी मुलीसाठी जायलाच नको अशी भावना झाली. कुणी नवखा परका आणि अगदीच माहीत नसलेला आलाच तर त्याला पुणेकर कल्पना करून देत आणि तो येणारा बिचकत बिचकतच रामशास्त्र्यांच्या वाड्यात जाई. शास्त्रीबुवांची भेट झाली तर नशीब आणि नाही झाली तर दुर्दैव अशाच समजुतीनं जावं हे बरं असे.

एके दिवशी बाजीभट्ट चावरे माहुलकर आले. समवेत गोपाळ दीक्षित होता. बाजीभट्ट चावरे भला माणूस. गोपाळ दीक्षित स्नेहाला पक्का. बालपणापासून रामशास्त्र्यांशी त्यांची मैत्री. काशीला एक तप काढलं तेव्हा इकडल्यापैकी ज्या कोणा माणसांची रामशास्त्र्यांना आवर्जून आठवण होई त्यात बाजीभट्ट आणि गोपाळ दीक्षित असे. रामशास्त्री महत्पदाला चढले आणि ही दोन्ही भली माणसं माहुलीत तशीच राहिली; पण कृष्ण-सुदाम्यासारखी मैत्री होती प्रभुणे-चावरे-दीक्षितांची. प्रतिवर्षी बाजीभट्टांच्या शेतात हुरडा खायला तरी रामशास्त्री नेमानं आणि सहकुटुंब जात. शेत ते केवढं ! सहा गुंठ्यांचं; पण बाजीभट्टाला त्या हातभर जमिनीचाही अभिमान होता. गोपाळ दीक्षित प्रवचनं-पुराणं आणि धर्मकृत्य करून राहत होता.

रामशास्त्री देवघरात होते. तोच ढग गडगडल्यासारख्या आवाजात बाजीभट्ट म्हणाले,

"आहेत का हो न्यायाधीश ?"

"न्यायाधीश पूजा करताहेत वाटतं," गोपाळ दीक्षित म्हणाले आणि मग मनमोकळा संवाद, हितगुज, आठवणी... यांना ऊत आला.

"अरे रामशास्त्र्या, पोराचं लग्न करतोस का नाही ?" बाजीभट्टानं आपल्या डोक्यावरूनं हात फिरवीत विचारलं.

"पाहा हो. लोकांचे न्याय करता-करता घरातच अन्याय होऊन जायचा. अरे, मुलगा दशक ओलांडील आता वयाचं," गोपाळ दीक्षित हसून म्हणाले.

"गोपाळा, अरे तुम्हीच करून टाका ना त्याचं लग्न," रामशास्त्री गोपाळराव आणि बाजीभट्टांना म्हणाले.

"वा रे वा ! बाप बसला लोकांचे कज्जे चालवीत आणि पोराला मुंडावळ्या आम्ही बांधायच्या होय रे !" बाजीभट्ट म्हणाले.

"खरंच सांगतो बाजीभट्ट, तुम्ही जर एखादं चांगलं स्थळ आणलंत आणि त्याचं लग्न ठरवलंत तर माझी ना नाही."

"नीट विचार करा हो रामशास्त्री ! नाही तर मागाहून म्हणाल, निदान बापाला विचारायचं तरी."

"कधीच म्हणणार नाही. अरे, माझा मुलगा तो तुमचाच मुलगा. तुम्ही जे कराल ते त्याच्या हिताचंच असणार."

"मग ठरलं ?"

"ठरलं. माझा हा अखेरचा शब्द समजा. शब्द मी बदलणार नाही."

"मुलाच्या आईला विचारलं का ?"

"विचारा तुम्हीच आत. तुमची काय ओळख नाही ?"

जानकी माजघराच्या दाराशी उभीच होती. तिनं हा सगळा संवाद ऐकला होता. तो ऐकून ती सुखावली होती. विचारायचं कारणच नव्हतं. तिला हे सर्व हवंच होतं. कितीक दिवस ती मोकळेपणानं बोलायचं म्हणत होती; पण मोकळेपणाच मिळाला नाही. आज बाजीभट्ट आणि गोपाळ दीक्षित आले. ते रामशास्त्र्यांचे जिवाभावाचे स्नेही. त्यांनीच विषय काढला आणि लग्न ठरवायचं ठरवलंदेखील.

“तुम्ही आता काळजीच करू नका आणि तुम्ही माहुलीला यायचं फक्त,” बाजीभट्ट म्हणाले.

“अरे, पण याच्या अग्निहोत्राचं काय ?”

“हो. ती अडचण आहेच; पण अग्निहोत्रासह येईल.”

“हो, यावंच लागेल. मुलाच्या लग्नासाठी निदान एवढं तरी करावं.”

रामशास्त्र्यांचा स्नेहमय पाहुणचार घेऊन बाजीभट्ट चावरे आणि गोपाळ दीक्षित निघून गेले आणि पुढच्याच सप्ताहात बाजीभट्टाचं पत्र आलं,

॥ श्रीकृष्णावेणी प्रसन्न ॥

वे.शा. सं. रा. रा. शास्त्रीबाबा यांसी प्रति बाजीभट्ट चावरे माहुलकर सा. न. वि. उपरी येथील वृत्त माघ वद्य प्रतिपदेपर्यंत आपले कृपेकरून समस्त सुखरूप असो. या नंतरी येथे तुमच्या चिरंजीवास वधू माभळेश्वर पुरुषोत्तमभट्ट अग्निहोत्री यांची कन्या आम्ही वे. मू. गोपाळ दीक्षित मिळून त्याशी वचन करून लग्न फाल्गुन शुद्ध प्रतिपदा अथवा नवमी या दोन्ही तिथीतील एक तीथ नेमस्त करू म्हणून त्यासी करार करून त्याजला निरोप दिला. तरी काही साहित्य करून मुलाला घेऊन आपणच लग्नास यावे म्हणजे काही न्यून दिसणार नाही. आणि तुम्ही आल्याने क्षेत्रातही श्लाघ्यता दिसेल. नाही तरी समग्र पाहुणे मात्र दिसतील यास्तव अग्निहोत्रासमवेत अगत्य येणे. कदाचित आपंणास गुंता बहुतच असला तरी मुलास साहित्य करून पाठविणे. स्थळ उत्तम आहे. अनमान न करावा. मुलीचे सूत्र पाठवले आहे, ते मुलास लावून पाहणे. चार सा बोटाचे अतंर असलिया कामावर पडेल. कळावे.

आणि मग माहुली ग्रामी, कृष्णेच्या काठी, मुलामाणसांच्या सोहोळ्यात रामशास्त्र्यांच्या मुलाचं लग्न थाटात झालं. मुख्य न्यायाधीशाच्या मुलाचं लग्न ! मुलाच्या घरच्या लोकांपेक्षा इतरांनीच मोठा थाट उडवून दिला होता. व्याही माभळेश्वर पुरुषोत्तमभट्ट विशेष प्रसन्न होते. न्यायाधीशाच्या घराशी संबंध जडला होता ना.

रामशास्त्री स्वत: सहकुटुंब लग्नाला होतेच. माभळेश्वर भट्टांनी आपल्या या व्याह्याची मोठीच बडदास्त ठेवली होती. मध्यस्थ बाजीभट्ट आणि गोपाळ

दीक्षित लग्नासाठी रात्रंदिवस राबत होते. विशाल सुशोभित मंडप उभारला होता. चार-पाचशे माणसं एका वेळी जेवू शकतील एवढा त्याचा पसारा होता.

वरमाई जानकी प्रसन्न होती. किती तरी दिवसांनी घरात तिच्या मनासारखी गोष्ट घडून आली होती. घरात एवढे सण, समारंभ, उत्सव, व्रतं आणि उद्यापनं होत; पण घरच्या कर्त्या पुरुषाला त्यात भाग घ्यायला सवडच नसे. रामशास्त्री या लग्नासाठी चांगले चार दिवस आले होते. प्रत्येकाशी मोकळेपणानं बोलत होते. प्रत्येकाची दखल घेत होते. त्यामुळे जानकीला अंतर्यामी सुख होत होतं. मुलाचं लग्न होतंय हा आनंद तर होताच; पण नवरा त्यात मनापासून भाग घेतोय याचं समाधान त्या आनंदाहून मोठं होतं.

लग्नाला खाशी मंडळी सगळी यायची होती. नाना फडणीस, सखारामबापू, पेठे, पटवर्धन, रास्ते आणि पेशव्यांच्या घरातली सगळी माणसं यायची होती. त्यामुळे माहुलीकरांना स्वर्ग दोन बोटं उरला होता. श्रीमंत माधवराव पेशवे जातीनं या लग्नाला रमाबाईसह येणार हे जेव्हा माहुलीकरांना समजलं तेव्हा त्यांनी रामशास्त्र्यांच्या मुलाच्या लग्नाची तयारी म्हणजे गावच्या उत्सवाची तयारी असं समजून कामाला सुरुवात केली.

पण...

शनिवारवाड्यात ऐनवेळी काही गुंता निर्माण झाला आणि श्रीमंत माधवरावच काय पण नाना-बापूसुद्धा आले नाहीत. सर्वांचे आहेर मात्र मोठमोठे. गावकऱ्यांची काहीशी निराशा झाली; पण आलेल्या आहेरावरून पेशवे दरबारी रामशास्त्र्यांची प्रतिष्ठा केवढी मोठी आहे, हे जाणल्यानं गावकरी अभिमानानं फुलून गेले.

लग्नसोहोळा संपला. जानकी सासू झाली. आता दोन दिवस घरात सत्यनारायण, बोडण करावं आणि सोळा सोमवारच्या व्रताचं उद्यापन करावं असं जानकीनं ठरवलं होतं. त्यासाठी बाजीभट्टांना सगळी तयारीही करायला सांगितली होती.

आणि दुसऱ्याच दिवशी पुण्याहून खलिता आला—

'पंढरपूरच्या बडव्यांचा निर्णय करावयाचा आहे. सत्वर येणे.'

झालं. सत्यनारायण थाटात झाला. बोडणं झाली. देवीला सवाष्णींनी आंघोळ घातली...

पण या वेळी रामशास्त्री नव्हते. ते केव्हाच पुण्याला पोचले होते.

* * *

माधवराव पेशवे आणि दादासाहेब यांचं वितुष्ट आता आणखीच विकोपाला गेलं होतं. माधवरावांनी दादासाहेबांपुढे मागं शरणागती पत्करली असली, तरी दादासाहेब आणि आनंदीबाई यांच्या कारस्थानाची कूटविद्या शनिवारवाड्याला घेरत होती. गारदी, इंग्रज आणि इतर पलटणवाले शनिवारवाड्यात या ना त्या मार्गानं आपला प्रवेश होऊन आपला जम कसा बसेल याकडे लक्ष देऊन होते. रघुनाथरावांच्या उतावीळ, लहरी आणि चैनीबाज स्वभावाचा फायदा घेणारे कावेबाज, धूर्त, पै-पावलीचे भटभिक्षुक आणि नटवे निरुद्योगी यांची त्यांच्याभोवती गर्दी झाली होती. माधवरावांची प्रकृती अलीकडे खंगत चालली होती, तर दुसरीकडे स्वराज्यातली सौदेबाजी वाढली होती. तशातच अवर्षणं, दुष्काळ आणि स्वाऱ्या यांनी लोकांचं नित्य जीवन काळजीचं झालं होतं. माधवरावांनी बहुत सायास करून अर्ध्या तपाच्या आत पानिपतानंतरची परिस्थिती काबूत आणली होती. पुन्हा तीच परिस्थिती येईल की काय असं वाटण्यासारखं वातावरण निर्माण झालं होतं.

दादासाहेबांनी स्वतः तर शनिवारवाड्याला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केलाच; पण इतरांनाही तसं करायला त्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्षानं प्रवृत्त केलं. बऱ्याच दिवसांपासून पंढरपूरच्या बडव्यांचा वाद गाजत होता. देवस्थानची खरं तर या वादामुळे विटंबनाच होत होती; पण बडव्यांना त्याची फिकीर नव्हती आणि आता तो वाद अगदी विकोपाला गेला होता. बडव्यांनी दादासाहेबांशी संधान बांधलं होतं. दादासाहेबांच्या पक्षाचा जोर वाढला आहे हे बडव्यांनी जाणलं होतं आणि म्हणूनच रामशास्त्री जेव्हा बडवे प्रकरणाचा निकाल लावतील तेव्हा लावोत, पण त्यांना आधी सांगितलेलं असावं म्हणून दादासाहेबांनी रामशास्त्र्यांना तातडीनं निरोप धाडला होता. रामशास्त्री माहुलीहून आले तोच दादासाहेबांचा खास शागीर्द देव्या त्यांची वाटच पाहत होता.

"सरकारांनी सांगावा धाडलाय." मुजरा करून देव्या म्हणाला.

"घटकाभरानं येतो म्हणून सांग," उपरणं अंगावरून काढत रामशास्त्र्यांनी सांगितलं.

"घटकाभरानं नाही, आत्ताच चला," देव्या बोलला.

तशी रामशास्त्र्यांनी त्याच्याकडे एक जळजळीत कटाक्ष फेकला आणि ते म्हणाले, "देव्या, निरोपाचं काम निरोप्यानं करावं."

"सरकारस्वारीची तशी आज्ञा आहे."

"तू आता चालता हो. मला निरोप देण्याचं काम तू केलं आहेस. माझा निरोप घेऊन जाण्याचंही काम कर."

"जी."

"आणि लक्षात ठेव. पुन्हा असा अतिरिक्त उर्मटपणा करू नको. तू दादासाहेबांचा शागीर्द आहेस."

"जी," देव्या ओशाळून म्हणाला आणि गेला.

आणि मग घटकाभरानं रामशास्त्री वाड्यावर गेले. दादासाहेबांच्या महालात प्रवेश केला तेव्हा आनंदीबाई दादासाहेबांना विडा देत होत्या. म्हणून रामशास्त्री क्षणभर उंबऱ्याशीच थांबले.

"यावं यावं रामशास्त्री. आमचा काही एकान्त चाललेला नाही," हसून दादासाहेब म्हणाले.

आनंदीबाईच्या चेहऱ्यावर रामशास्त्र्यांना बघताच एक आठी उमटली; पण ती लगेच नाहीशी झाली. हसत त्या म्हणाल्या,

"रामशास्त्री, बसा हं. तुमचं बोलणं होऊ दे. मिठाई पाठवून देते. अमृतराव आणि नारायणरावासाठी आणलीय मथुरेहून."

आनंदीबाई आत गेल्या. मग दादासाहेब रामशास्त्र्यांकडे वळून म्हणाले,

"रामशास्त्री, पंढरपूरचे बडवे आपण जाणता ?"

"नाही. ओळखत नाही. ऐकून आहे एवढंच."

"तुमची त्यांची भेट ? समक्ष ?"

"न्यायमंदिरात, अथवा दप्तरात."

"खासगीत नाही ?"

"नाही."

"भेट हवी ?"

"कशाला दादासाहेब ?"

"बडवे चांगले आहेत."

"असतील; पण मी त्यांची भेट का घ्यावी ?"

"म्हणजे त्यांचा चांगुलपणा अधिक समजेल, रामशास्त्री."

"न्यायमंदिरातल्या तराजूला घरच्या तोलकाट्यापेक्षा अधिक काही कळतं श्रीमंत," रामशास्त्री म्हणाले.

तेव्हा दादासाहेब थोडे चमकले; पण नंतर हसून ते म्हणाले,

"सर्वच गोष्टी तराजूवर ठेवून निर्णय घेता येत नाहीत, रामशास्त्री."

"पण न्याय फक्त तराजूनं तोलूनच करावा लागतो, दादासाहेब."

"अस्सं ! रामशास्त्री, विचार करा. पंढरपूरच्या बडव्यांचा कज्जा साधा नव्हे. लोकांच्या भावभावना त्याच्याशी निगडित आहेत."

"असतील; पण शास्त्रार्थ जो असेल तोच न्याय."

"शास्त्रीबुवा, मागं नारायणाच्या मुंजीचा मुहूर्त पाहताना आपण सोय म्हणून शास्त्र डावललं आहे."

"नाही श्रीमंत. आपत्काळी सोय हेही शास्त्रच आहे. शिवाय आपण म्हणता तसं काही केल्याचं स्मरत नाही मला."

"सोयीच्या बाबी स्मरणात राहतात. गैरसोयीच्या स्मरणातून निसटतात."

"आपल्याला स्मरण असेल तर सांगावं. मी अपराध कबूल करीन."

"नारायणाला मुंज लाभत नव्हती तेव्हाचा प्रश्न."

"मग मी तर त्या वेळी ब्राह्मणसभा भरवून सभेसमोर श्रीमंत नारायणरावांच्या मौंजीबंधनाविषयी प्रश्न ठेवला होता."

"निर्णयाचं स्मरण आहे, शास्त्रीबुवा ?"

"नाही. कारण मौंजीबंधन विधी तर केव्हाच होऊन गेला."

"ब्रह्मवृंदानं काढून दिलेले मुहूर्त घरात कोणालाच पसंत नव्हते, मग तुम्ही तेही बदललेत."

"असेल; पण मुहूर्त बदलला म्हणजे शास्त्र डावललं असं थोडंच आहे ? श्रीमंत अशा प्रकारे मला सांगत आहात की, मी काही बदकर्म केलं आहे. वाटल्यास पुनश्च ब्राह्मणसभा बोलवा आणि शहानिशा करा अशी माझी आपणास विनंती आहे," रामशास्त्री ठामपणे म्हणाले.

मग दादासाहेबांचा सूर नमला. काहीशा नरमाईच्या सुरात ते म्हणाले, "शास्त्रीबुवा, मागल्या गोष्टी वृथा उगाळीत बसण्यापेक्षा येथून पुढे काय करता येईल ते पाहू."

“आपण उचितच बोललात, श्रीमंत.”

“मग बडव्यांना कळवू ?”

“हो, कळवावं श्रीमंत.”

दादासाहेब आनंदले; पण रामशास्त्र्यांचं पुढचं वाक्य ऐकताच त्यांचा आनंद लोप पावला. ढगाआड चंद्र जातो तसा.

रामशास्त्री म्हणाले, “बडव्यांना कळवावं की, रामशास्त्री शास्त्राला धरून न्याय करतील आणि केवळ न्यायच करतील.”

दादासाहेब अवाक होऊन रामशास्त्र्यांकडे पाहत राहिले होते.

¤

# ११

सकाळीच आज दरबार भरायचा होता. नगारखान्यावर भगवा झेंडा डौलानं फडकत होता. दिल्ली दरवाजा सताड उघडा होता. शनिवारवाड्याचं हे महाद्वार, नव्हे, मराठी राजवटीचं महाद्वार. द्वारावर राऊत, देवडीवाले, पहारेकरी सगळे होते. समोरच्या पटांगणात खोगीर घातलेले ऐटबाज घोडे फुरफुरत होते. आसपास त्यांचे मोतद्दार रेंगाळत होते. डाव्या बाजूला एक प्रशस्त दगडी चौथऱ्यासारखा भाग. त्यावर पालख्या उतरल्या होत्या खाशांच्या. दिल्ली दरवाजातून माणसांची सतत वर्दळ सुरू होती. इंग्रज आणि डच वखारवाल्यांचे वकील आज दरबाराला यायचे होते.

गणेश महाल आज विशेष सजला होता. दरबारी सरंजामानं गणेश महालाला शोभा आली होती. पेशव्यांच्या मसनदीच्या पायऱ्या मखमलीनं पांघरल्या होत्या. महालातली शोभिवंत हंड्याझुंबरं लकाकत होती. नाना-बापू केव्हाचे येऊन ठेपले होते. त्यांच्या मागोमाग न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे दाखल झाले. आज नगारखान्यावर खास सनईचा इंतजाम केला होता. चौघडा, शिंग आणि तुतारी वाजवणारे सज्ज होते. पेशव्यांच्या दरबार-प्रवेशाच्या वेळी तुतारी वाजणार होती आणि नंतर चौघडा दणाणणार होता. सिद्धता तर सारी झाली होती. चिकाच्या पडद्याआडची मंडळी काही-काही आली होती. मातुःश्री गोपिकाबाईंचं माहेरही आज आलं होतं. रास्ते, पटवर्धनांच्या लेकी-सुना शक्य तितक्या दाटीवाटीनं बसल्या होत्या आणि त्यांच्यात जानकी बसली होती.

अवतीभवतीच्या सगळ्या बायका दागिन्यांनी नुसत्या मढलेल्या होत्या. लंकेची पार्वती होती ती फक्त जानकी. गळ्यातलं मणिमंगळसूत्र हाच तिचा

दागिना. लफ्फे, तन्मणी, चिंचपेट्या, वेळा-वाक्या हे सारे श्रीमंती दागिने सरदारांच्या स्त्रियांनी घालावेत आणि पेशव्यांच्या बायकांनीच ल्यावेत. सर्वसामान्यांना काळी पोत हाच दागिना. जानकी अगदी पदर लपेटून बसली. कधी नव्हे ती आज दरबार बघायला आली होती. रमाबाईसाहेब किती दिवस तरी बोलावत होत्या. नुसतं शनिवारवाड्यात दुपारच्या वेळचं जाणं नाही ते सणा-उत्सवाला कुठलं जमायला.

जानकीनं कधी हौसेनं रामशास्त्र्यांना विचारलंच तर त्यांचा प्रसन्न होकार कधी यायचा नाही. नुसतं नजर आभाळाकडे लावून हूं म्हणायचं. म्हणजे तो नकारच की. आणि बाईसाहेबांचे कितीही निरोप आले तरी घरच्या परवानगीशिवाय थोडंच जाता येतं ! पण आज अगदी जणू सूर्य पश्चिमेला उगवला. उदासीन स्वर प्रसन्न झाला. कोरड्या कंठात संगीताचे जणू कोमल स्वर आले. कोरांटीला प्राजक्ताची फुलं आली आणि आज दरबार-सोहळा बघायला रामशास्त्र्यांनी आनंदानं संमती दिली. म्हणून तर जानकीबाई आज चिकाच्या पडद्याआड आधीपासून येऊन बसल्या होत्या. त्यांना रमाबाईसाहेबांना अगदी डोळे भरून पाहायचं होतं. आनंदीबाई फार सुंदर आहेत असं जानकीबाईंनी ऐकलं होतं. एक-दोन वेळा त्यांना ओझरतं पाहिलं होतं; पण त्यांना समक्ष बघावं अशी मनातून किती दिवसांची इच्छा होती ती आज पुरी होणार होती.

आज दरबारात विलक्षण उत्साह होता. शागीर्दापासून सरदारापर्यंत प्रत्येक जण आपापल्या परीनं उत्सवाच्या वेषात रुबाबदारपणा आणून उपस्थित होता. रंगोबेरंगी दुशेले, दुपट्टे, शुभ्र उपरणी, तांबडी पागोटी आणि रेशमी अंगरखे आणि खाशांच्या अंगावरील उंची दागदागिने यांनी वातावरण कसं श्रीमंत वाटत होतं. अत्तराच्या फवाऱ्यांनी वायू सुगंधित झाला होता. गणेशापुढे चांदीच्या दोन उंच समया तेवत होत्या. उदबत्त्यांचा धूर आणि गंध आसपास दरवळत होता.

मंडळी स्थानापन्न झाली. आज बऱ्याच दिवसांनंतर दरबार असा भरला होता. निजामाच्या स्वारीच्या हाहाःकारानंतर आणि हैदरशी झालेल्या संग्रामानंतर असे दरबार भरविण्यात आले होते. आता ही तिसरीच वेळ. लोकांची उत्सुकता शिगेला पोचली होती. श्रीमंत माधवराव आणि नारायणराव, दोघेही अजून यायचे होते. खरं तर नारायणरावांनी अगोदर येऊन बसायला हवं होतं; पण नारायणरावांचं पोरपण अजून संपलं नव्हतं. विवाह होऊनही प्रौढपणा प्राप्त

झाला नव्हता. लहरी, हट्टी, छांदिष्ट स्वभाव दिवसेंदिवस वाढतच होता.

दादासाहेबही अजून दरबारात आले नव्हते. ते नाहीत म्हणजे आनंदीबाई नव्हत्याच. वाड्यात नैर्ऋत्येला दादासाहेबांचा बदामी बंगला. या बंगल्याच्या मागल्या अंगणाच्या बाजूनं आभाळात धुराच्या रेषा येत होत्या. कुणी आसपास गेलं असतं, तर त्याला सहज समजून आलं असतं वासावरून की, होमात सोडलेल्या तुपाच्या धारा ज्वाळेला भिडत आहेत आणि दादासाहेबांचं कर्मकांड होत आहे.

दरबारातली माणसं स्थानापन्न झाली आहेत.

...आणि

नारायणरावांनी बकुळीच्या चौकात खेळ मांडला आहे, दादासाहेब बंगलीत होमात दंग आहेत आणि श्रीमंत माधवरावसाहेब देवघरात सोवळ्यात आहेत.

पुढे कुणी व्हायचं ! सांगायचं कुणी आणि कुणाला ?

रामशास्त्री आपल्या आसनावर होतेच. त्यांनी एका शागीर्दाला पुढे बोलावलं आणि सांगितलं,

"दादासाहेबांना निरोप दे. म्हणावं, नानांनी दरबारात बोलावलंय आणि नारायणरावांना घेऊन या."

शागीर्द गेला. रामशास्त्र्यांनी त्याच्यापाठोपाठ दोन हुजरे पाठवले. शागीर्द गेला तसा परत आला हात हालवीत. हुजरे त्याच्याबरोबर नव्हते. नारायणराव आणि दादासाहेब तर नव्हतेच.

"काय झालं ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"श्रीमंत येत नाहीत. दोघेही. धाकटे खेळत्यात. थोरले सोवळ्यात हायत."

"हुजरे कुठायत ?"

"बकुळीच्या चौकात. धाकट्या श्रीमंतांनी त्यांनाबी खेळायला लावलं. त्यांना इकडं येऊच देईनात."

"आणि दादासाहेब ?"

"थोरल्या श्रीमंतांच्या बंगलीवर गारडी हाय. तो आतच जाऊ देत नाही. मी सांगितलं त्याला तर मिशीवर हात देऊन माझ्यावरच बरची रोखली... न."

"अस्सं..." रामशास्त्री म्हणाले आणि नापसंतीची, क्रोधाची एक सूक्ष्म रेषा त्यांच्या तेजस्वी मुखावर तरळून गेली.

मग रामशास्त्री स्वतः जातीनं दादासाहेबांकडे निघाले. महालातून बाहेर पडले. हिरकणी चौकातल्या कारंजाशी आले. तिथं नारायणराव पाण्याशी खेळत होते. कारंजातलं पाणी हुजऱ्यांच्या आणि शागिर्दांच्या अंगावर उडवून खिदळत होते.

"श्रीमंत !" रामशास्त्र्यांनी तीव्र स्वरात हाक मारली.

नारायणरावांनी भानावर येऊन वळून पाहिलं. नारायणरावांच्या मस्तकी कोणतंही शिरोभूषण नव्हतं, चेहऱ्यावर पाण्याचे थेंब घर्मबिंदूसारखे थबकले होते. अंगरखा पाण्यानं भिजला होता, पायांतले चढाव त्यांनी दूर कुठं तरी काढून ठेवले होते. नारायणरावांची ती अवस्था पाहून, त्यांचं पोरपण पाहून, त्यांना कठोर शब्दांनी बोलावं असं रामशास्त्र्यांना वाटलं नाही. बोलायचं असूनही बोलू नये असं वाटलं. म्हणून ते एवढंच म्हणाले, "श्रीमंत, दरबारात चला सत्वर."

"शास्त्रीबुवा, पाणी पाहा किती छान उडतंय ते," नारायणराव आपल्याच नादात म्हणाले.

"श्रीमंत, पोरखेळ पुरे करा."

"हो, हो, आलोच," रामशास्त्र्यांच्या स्वरातली जरब ओळखून नारायणराव वरमले आणि तडक आपल्या महालाकडे गेले. नारायणराव गेले आणि समोरून दादासाहेब येताना दिसले.

"काय रामशास्त्री, कुणाची वाट पाहता? माधवाची?" दादासाहेबांनी रामशास्त्र्यांच्या जवळ येऊन म्हटलं.

"नाही श्रीमंत. वाट आपलीच पाहतोय. म्हटलं, होमाचा धूर विरून जाईल तेव्हाच आपण दरबारासाठी बाहेर पडणार. आपणाला लवकर जागं करावं."

"तुम्ही केव्हाही जागं करायला आला असतात तरी आमचं नित्यकर्म पुरं झाल्याशिवाय आम्ही आलोच नसतो, रामशास्त्री."

"ते मी जाणून होतो श्रीमंत. शनिवारवाड्याच्या क्षात्रधर्माला या ब्रह्मतेजानं सध्या कवटाळलं आहे, हे मी जाणतो."

"मतलब ?"

"मतलब साफ आहे श्रीमंत. आपण समजला नसाल तर दरबारानंतर बोलू. आधी दरबारी व्हावं आपण."

"माधव आला ?"

"आधी नारायणराव, मग आपण आणि आता रावसाहेब. . . मी आत्ता याच कामगिरीवर आहे."

"शास्त्रीबुवा, न्यायाधीशाचं पद सांभाळता-सांभाळता तुम्हाला आणखीही बरेच उपद्व्याप करावे लागतात तर. . ." दादासाहेब छद्मीपणानं हसून म्हणाले. रामशास्त्र्यांनी दादासाहेबांचा तो वार अलगद झेलला.

"दादासाहेब, गोलंदाजाला गोलंदाजीबरोबरच आयत्या वेळी तोफ बिघडली तर तोफेची दुरुस्तीही करावी लागते."

"ठीक ठीक, रामशास्त्री. चालू द्या तुमची गोलंदाजी आणि तोफखान्याची दुरुस्ती. आम्ही आता दरबारी जातो," दादासाहेब निघून गेले.

आणि रामशास्त्री माधवरावांच्या महालाकडे वळले. महालात माणसं नव्हती. राणोजी आणि श्यामा आतल्या दालनात माधवरावांच्या आणि रमाबाईंच्या साजांची तयारी करीत होते. विनायक शागीर्द चढाव पुसत होता.

"राणोजी, श्रीमंत कुठं आहेत ?"

"देवघरात," राणोजीनं देव्हाऱ्याकडे पाहत उत्तर दिलं.

"किती वेळ झाला ?"

"एक घटकाभर झाला."

"श्रीमंतांना म्हणावं दरबार सज्ज आहे. आपणच यायची खोटी."

राणोजी आत गेला आणि तडक बाहेर आला. म्हणाला, "श्रीमंतांनी सांगितलंय, थोडा वेळ थांबा. संध्या व्हायची आहे."

रामशास्त्री दरबारात परत निघून गेले.

अलीकडे वाड्यावर हे असं खूप-खूप वेळा घडत होतं. श्रीमंत माधवराव अगदी तरुण वयात पेशवेपदावर आलेले. एकीकडे राघोबादादा आणि दुसरीकडे काही कारस्थानी ज्येष्ठ सल्लागार यांच्या कोंडीत सापडले होते ते. राघोबांनी तर होमहवनांचा सपाटा चालवला होता. कुणाला वाटावं शनिवारवाड्यात तलवारीपेक्षा ताम्हन-पळ्या जास्त आहेत; धार्मिक कृत्यांना शनिवारवाड्यात जणू ऊत आला होता. व्रतवैकल्ये, त्यांची उद्यापनं, होमहवनं, अभिषेक, लघुरुद्र असं काही ना काही वाड्यावर सतत सुरू असे. त्यातून पेशवे तर गणपतीभक्त. मग अथर्वशीर्षाची आवर्तनं, ब्राह्मणदक्षिणा यांनी वाडा कसा गजबजून जायचा. माधवरावांचं लक्ष कारभारात नव्हतं असं नाही; पण आपलं कर्तव्य चोख रीतीनं

बजावतानाही या तरुण आणि कर्तृत्ववान पेशव्यांचा वेळ या कर्मकांडमय कृत्यात फार जातो, नको इतका जातो हे रामशास्त्र्यांना पाहवत नव्हतं.

या गोष्टीची जाणीव पूर्वी शास्त्रीमंडळात असताना रामशास्त्र्यांनी नानासाहेब पेशव्यांनाही दिली होती आणि आता हीच गोष्ट त्यांना माधवरावांजवळही बोलावी लागत होती. पेशवे आपल्या नित्याच्या पूजादी-कर्मात अधिक वेळ घालवतात हे जाणल्यावर केव्हा तरी एकदा सूचकपणानं पेशव्यांना याची जाणीव द्यावयाचीच होती आणि आज तर अगदी कहर झाला...

पेशवेघराण्यातले तिन्ही पुरुष...

एक कारंज्याशी, त्याच्या पाण्याशी खेळत होता.

दुसरा होमाचे मंत्रपठण करीत होता.

आणि तिसरा संध्या राहिली म्हणून सांगत होता.

आणि इकडं दरबार भरला होता.

थोड्या वेळानं माधवराव दरबारात आले. दरबाराचा सोहोळा झाला. अपेक्षित कामकाज झालं. दरबार संपला. माणसं घरोघर गेली. पटांगणातले घोडे आपल्या मालकांना घेऊन गेले. पालख्या पाठमोऱ्या फिरल्या. भोयांनी वाटा धरल्या.

चिकाच्या पडद्याआड असलेला स्त्रीसमुदाय आधीच तेथून हालला होता. रमाबाईसाहेबांनी जानकीला आज आपल्या महालात बोलावलं होतं. पेशव्यांच्या महालातलं आगतस्वागत आणि पाहुणचार घेऊन जानकी मेण्यातून आपल्या शनिवारातल्या वाड्याकडे गेली.

आता काही खास निवडक मंडळी दरबारात उरली होती. आनंदीबाईंनी खुणावल्यामुळे दादासाहेब बंगल्याकडे केव्हाच चालते झाले होते. नारायणानं पुन्हा हिरकणी चौकातल्या कारंज्याकडे धाव घेतली होती.

नाना फडणीस, सखारामबापू, रास्ते आणि रामशास्त्री एवढेच आता श्रीमंतांबरोबरचे लोक होते. मोरो हरी आणि बाबाजी धोंडदेव रामशास्त्र्यांसाठी थांबले होते; पण शास्त्रीबुवांनी त्यांनाही परत पाठवून दिलं.

महालातून बाहेर पडताना जानकीनं राणोजीबरोबर रामशास्त्र्यांना निरोप दिला होता, "घरी लवकर या. भोजनाची सिद्धता ठेवते," त्यामुळे रामशास्त्र्यांनाही आज लगोलग घरी जायचं होतं. शिवाय दुपारी

माभळेश्वरभट्टाकडची माणसं यायची होती. व्याह्यांच्या स्वागताला वाड्यावर स्वतः असणं अगत्याचं होतं, तरी पण आज एक कठोर कर्तव्य बजावल्याशिवाय रामशास्त्र्यांना शनिवारवाड्याबाहेर पडायचं नव्हतं. म्हणून रामशास्त्री तिथंच घोटाळत होते. नाना आणि बापू एवढेच राहिले आणि बाकीचे गेल्यावर मग रामशास्त्री म्हणाले,

"श्रीमंत, एक अर्जी आहे."

"बोला रामशास्त्री. अर्जी का म्हणता ?"

"श्रीमंत, आम्ही दरबारचे सेवक. पेशव्यांचे शागीर्द. आम्ही असंच म्हणायला हवं."

"रामशास्त्री, आज आपला सूर काही वेगळा आहे," श्रीमंत माधवराव रामशास्त्र्यांकडे पाहत हसून म्हणाले.

"आज तसंच काही बोलायचंय श्रीमंत. विनंती करायची आहे."

"बोला ना मग. अनमान का ?"

"मला न्यायाधीशपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावं."

रामशास्त्र्यांची ही मागणी ऐकून नाना-बापूही चमकले. श्रीमंतांनीही चकित नजरेनं रामशास्त्र्यांकडे पाहिलं.

"रामशास्त्री, दौलतीचे न्यायाधीश आम्ही तुम्हाला नेमलं ते तुम्हाला इतक्या लवकर त्या जबाबदारीतून मुक्त करण्यासाठी नव्हे," गंभीर स्वरात माधवराव म्हणाले.

"होय श्रीमंत. मी जाणतो; पण ज्याला त्याला आपला धर्म पाळलाच पाहिजे. त्याच्या आड कोणती कामगिरी येत असेल, तर त्याने त्या कामगिरीचा त्याग केला पाहिजे, नाही तर धर्म सोडला पाहिजे."

"मतलब ? तुम्हाला काय म्हणायचंय, रामशास्त्री ?"

"श्रीमंत, मी जन्मानं ब्राह्मण. विद्या आणि धर्म हा आमचा व्यवसाय, हे आमचं कर्तव्य. पण..."

"पण काय, रामशास्त्री ?"

"हे न्यायाधीशपद स्वीकारल्यापासून मला धड संध्येलाही वेळ होत नाही. देवपूजा तर लांबच राहिली. गेले अनेक दिवस मी याचा विचार करतोय, श्रीमंत. कर्तव्यात कसूर करून चालणार नाही म्हणून न्यायदानाकडे लक्ष द्यायलाच हवं;

पण ब्राह्मण्यधर्माचं पालन हातून नीट होत नसल्यानं माझं मन मला खातंय, श्रीमंत."

"आणि यासाठी तुम्ही पदत्याग करायला सिद्ध झालात ?"

"होय श्रीमंत. गंगाकाठी जाऊन खुशाल पोथ्या वाचीन, संध्या करीन, अभिषेक करीन, व्रतं-उद्यापनं करीन, होमहवन करीन; पण न्यायाधीशपदावरची कामं सांभाळताना मला हे सारं नाही करता येत."

थोडा वेळ कुणीच काही बोललं नाही. माधवरावांची चर्या बदलली. त्यांच्या अंतर्यामी कशाची तरी खूण पटल्याची साक्ष त्यांच्या चेहऱ्यावर दिसू लागली आणि मग रामशास्त्र्यांकडे वळून ते म्हणाले,

"तुमच्या म्हणण्याचा आशय आमच्या ध्यानी आला, रामशास्त्री. नाना, बापू, तुमच्याही ध्यानी आला असेलच."

नानांनी होकारार्थी मान डोलवली. बापू काहीच बोलले नाहीत. तेव्हा श्रीमंतांनी विचारलं, "बापू, तुम्ही काहीच बोलला नाहीत."

"श्रीमंत, रामशास्त्री उपरोधानं बोलले हे पूर्णपणे माझ्या ध्यानी आलं आहे. रामशास्त्री जे बोलले ती एक वेळ वस्तुस्थिती मानली तरीही रामशास्त्र्यांनी मर्यादा ओलांडली आहे, अतिक्रमण केलं आहे असं मला वाटतं आणि आपणाला ते पटेल," बापू काहीशा रोषानंच म्हणाले आणि अभिप्रायार्थ त्यांनी श्रीमंतांकडे पाहिलं.

"होय बापू. रामशास्त्र्यांनी अतिक्रमण केलं हे तर खरंच," श्रीमंत म्हणाले.

बापूंचा चेहरा उजळला. आपल्या म्हणण्याला श्रीमंतांची पुष्टी मिळाली, आता पुढे आणखी एखादा प्रस्ताव करण्यास हरकत नाही असं बापूंना वाटलं असावं. एवढ्यात रामशास्त्रीच म्हणाले,

"श्रीमंत, ज्या कारणासाठी आम्हासारख्या सेवकांना मर्यादा सोडून बोलावं लागतं ते कारणही मर्यादा कुणी तरी सोडणं हेच आहे. श्रीमंत, आपण जन्मानं ब्राह्मण असलात तरी ज्या आसनावर आपण आहात ते आसन क्षत्रियाचं आहे. पूजादी कर्म करण्याआधी आपण हा विवेक करणं आवश्यक आहे की, राज्याचं रक्षण आणि प्रजाहितवर्धन हेच आपलं आद्यकर्तव्य आहे. म्हणून म्हणतो, श्रीमंत, आपला खरा धर्म ब्राह्मणाचा नाही, क्षत्रियाचा आहे."

"रामशास्त्री, आता तर तुम्ही फारच अविवेक केलात," बापू ओरडून म्हणाले.

"बापू, रामशास्त्र्यांवर अकारण आग पाखडू नका. क्रोधाविष्ट व्हायला हवं आम्ही. ते तुम्हीच क्रोध धरता ? बापू, रामशास्त्र्यांना धन्यवाद द्या !"

"श्रीमंत !" बापू आश्चर्यानं उद्‌गारले.

"होय, धन्यवादच द्यायला हवेत. रामशास्त्री, आपण आपल्या कर्तव्याची जाणीव आम्हाला करून दिलीत. आम्हाला योग्य मार्ग दाखवलात हेच ठीक झालं. आपल्या या कठोर सूचनेचा आम्ही आनंदानं स्वीकार करतो," श्रीमंत माधवराव संतोषानं म्हणाले.

बापूंना आश्चर्याचा धक्का बसला.

नानांना अपेक्षित होतं तेच झालं. श्रीमंत रावसाहेबांनी रामशास्त्र्यांच्या कठोर सूचनेचं संतोषानं स्वागत केलं होतं. नानांना श्रीमंतांचा स्वभाव पुरतेपणी माहीत होता. श्रीमंत रामशास्त्र्यांना मानतात हेही त्यांना बापूंपेक्षा अधिक माहीत होतं.

श्रीमंत माधवराव आपल्या महाली निघून गेले. नाना-बापूही गेले. रामशास्त्री वाड्यावर परतले.

या घटनेमुळे रामशास्त्र्यांनाही पेशव्यांविषयी विश्वास वाटू लागला. सत्याची सोबत करणारा, न्यायाची कदर करणारा हा शासक आहे याची साक्ष पटली आणि रामशास्त्री मनोमन आनंदले आणि यापुढे आपल्याला अधिक विश्वासानं आणि जोमानं काम करता येईल. सर्वसामान्य माणसाला त्वरित न्याय देता येईल याची त्यांना खात्री झाली.

* * *

रामशास्त्र्यांना घरी यायला जरा उशीरच झाला होता. भोजनवेळ टळून गेली होती. दुपारच्या सावल्या उतरू लागल्या होत्या. जानकी वाट पाहून-पाहून माजघरात चटईवर लवंडली होती. बाजीभट्टांचा मुलगा आला होता चार दिवस राहायला. तो आणि बाळ मागच्या अंगणात झाडाच्या सावलीला काही तरी खेळत होते.

रामशास्त्री वाड्यात आले तर सगळी सामसूम ! पागोटं खुंटीवर ठेवून त्यांनी उपरणं खुंटीला लावलं आणि अंगरखा काढून मागीलदारी पाय धुण्यासाठी गेले. त्यांच्या पावलांच्या आवाजानं दचकून जानकी जागी झाली आणि म्हणाली,

"वेळ बराच झालाय. जेवायचं."

"तुम्ही का नाही जेवलात ?"

"रीत सोडून जेवू ?"

"कधी-कधी."

"न्यायाधीशाच्या बायकोनं तरी रीत पाळावी."

"हो. आज तू दरबार बघितलायस."

"बघितला. बाईसाहेबांनी मला उद्या संध्याकाळी पुन्हा बोलवलंय."

"रमाबाईसाहेबांनी का आनंदीबाईंनी ?"

"त्या कशाला बोलावतील ? रमाबाईसाहेबांनीच बोलावलंय."

"कशाला ?"

"मला हो काय ठाऊक ! बाई या म्हणाल्यात. जाऊ ना ?"

"जा ना. अवश्य. तुमचा पेशव्यांच्या अंतर्गृहात भाव वधारला म्हणायचा आता," रामशास्त्री हसून म्हणाले.

"काही तरीच बोलायचं ते. मेणाही पाठवीन म्हणाल्यात."

"पाहा. मग मी म्हणतो ते खोटं का ? न्यायला मेणाही येणार."

"बाईच म्हणाल्या."

"बाईंना तुमची सोबत आवडलेली दिसते."

"मला नाही बाई समजत काही."

जेवणं झाली. दुपारनंतर माबळेश्वरभट्ट येणार होते; पण ते आलेच नाहीत. वाट पाहून पाहून रामशास्त्री अस्वस्थ झाले. सोप्यावर येरझारा घालीत होते. दिवेलागण झाली आणि कसब्यातल्या दीक्षितांकडून निरोप आला,

"माबळेश्वरभट्ट आजारी आहेत. येणार नाहीत. मुलीलाच पाठवून द्यावी. एक महिन्यानी पोचती करू."

"काय करायचं मग ?"जानकीनं विचारलं.

"गोपाळ दीक्षित येईल पुढच्या सप्ताहात. त्याच्याबरोबर पाठवून देऊ सूनबाईला, म्हणजे पोचवायला आत्ता कुणी जायला नको."

"असंच करू या. गोपाळ दीक्षित व्याह्यांची चौकशीही करून येतील. नाही तर आपल्याला नुसती काळजी करण्याशिवाय आत्ता काय करता येणार आहे ?"जानकी म्हणाली.

* * *

"मैने, मेणा गेला का ग प्रभुण्यांच्याकडे ?"

"गेला बाईसाहेब, शिदू भोईच गेलाय," मैना दासी म्हणाली.

"बाकीची तयारी झाली ?"

"हो, झाली; पण बाई, हे सारं कुणासाठी ?"

"ज्यांना बोलावलंय त्यांच्यासाठीच हो."

"जानकीबाईंना आवडेल ?"

"हो. ते काही दान नाही. भेट आहे ती."

"लुगडी चांगली आहेत बाईसाहेब, आणि ती चिंचपेटी तर इतकी सुरेख आहे... नथ तर मला फारच आवडली."

"जानकीबाईंच्या नाकात ही नथ चांगली शोभून दिसेल."

रमाबाईंनी जानकीबाईंना आज मुद्दामच बोलावलं होतं; दुपारच्या वेळी बसायला म्हणून. मनमोकळ्या गप्पा होतील, परिचय होईल आणि... म्हणून बोलावलं होतं रमाबाईंनी. त्या दिवशी दरबारात रमाबाईंनी जानकीला पाहिलं तेव्हा त्यांना कसंसंच वाटलं.

'पेशव्यांच्या मुख्य न्यायाधीशाची बायको अशी लंकेची पार्वती कशी ?' असा विचार रमाबाईंच्या मनात चमकून गेला आणि या विचाराला अनुलक्षूनच रमाबाईसाहेबांनी जानकीला आज बोलावलं होतं. शनिवारवाड्यात रमाबाईंच्या महालात श्यामा, मैना या दासींची धावपळ होत होती, रमाबाई जातीनं स्वतः सगळं पाहत होत्या. सवाष्णीला वाण देतात तेव्हा जशी तयारी करतात तशी सगळी तयारी झाली होती. शिवाय बाजूला एका चौरंगावर दोन चांदीची तबकं होती. एका तबकात एक पैठणी, दोन चांगली भारी लुगडी, पाच जरीचे खण, नारळ, चांदीच्या कुंकवाचा करंडा असं सगळं होतं. दुसऱ्या तबकावर रेशमीवस्त्र झाकलेलं होतं. आत मोत्याच्या बांगड्या, पाटल्या, चिंचपेटी, चपलाहार, वाक्या, नथ असे सारे भारी किमतीचे दागिने होते.

मुदपाकखान्यात खाद्यपदार्थ बनावायला सांगितलं होतं. सरबतासाठी श्यामानं पिवळीधमक लिंबं आणून ठेवली होती. केशर खलून ठेवलं होतं.

मेणा आला. जानकीबाई मेण्यातून उतरल्या. मैना पुढे झाली. तिनं जानकीबाईंना महालात नेलं. रमाबाई दारातच उभ्या होत्या.

"यावं. बसा. काही त्रास नाही ना झाला ?" रमाबाईंनी विचारलं.

"मेण्यात बसायची सवय नाही मला, थोडी भीती वाटली."

"मेणा हलतो आणि पडतो की काय असं वाटतं. पहिल्या पहिल्या वेळेस मलाही मिरजेला अशीच भीती वाटायची," रमाबाई हसून म्हणाल्या. प्रशस्त गाद्यांवर स्वच्छ चादरी होत्या. टेकायला लोड होते. रमाबाई बसा म्हणाल्या तशी जानकी समोरच्या चटईवर बसू लागली.

"तिथं नाही, इथं बसावं आपण," मैना म्हणाली.

आणि मग रमाबाई आणि जानकीबाई बराच वेळ बोलत बसल्या होत्या. दोघींच्या माहेरांची माहिती, आवडी-निवडी, संसार यावर खूप बोलणी झाली.

बेदाणे आणि काजू घातलेल्या साजूक तुपातल्या शिऱ्याच्या दोन चांदीच्या पसरट वाट्या एका तबकात घेऊन मैना आली.

"घ्या जानकीबाई, घ्या. तुम्हाला शिरा आवडतो असं शास्त्रीबुवांनी केव्हा तरी एकदा इकडे सांगितलं होतं."

"बाई, मला खायला नको. आपण बोलावलं म्हणून आले. आपल्या शेजारी बसून आपल्या महालात मी काही खाल्लं असं इकडे कळलं तर."

"तर काही होणार नाही. रामशास्त्र्यांना आमच्याकडची सर्व कल्पना आहे. घ्या तुम्ही. संकोचू नका बाई," रमाबाई आग्रहानं म्हणाल्या आणि त्यांनी मैनेला सांगितलं, "मैने, आता यावर सरबत नको. दूधच आण दोघींना."

जानकीबाई जायला निघाल्या तेव्हा रमाबाईंनी त्यांना पुन्हा बसायला सांगितलं. कुंकू लावलं. ओटी भरली. पैठणीची घडी तिथल्या तिथं मोडायला लावली. नथ आणि वाक्या घालायला लावल्या आणि त्यांच्या समोर एक बिलोरी आरसा धरायला मैनाला सांगितलं.

"बघा जानकीबाई, किती सुंदर दिसता तुम्ही," रमाबाई कौतुकानं म्हणाल्या.

"आणि आता अशाच घरी जा हो. शास्त्रीबुवांना दाखवा. मेणा आहेच. मेण्याबरोबर श्यामाला पाठवून देतेच आहे मी."

जानकीबाई तृप्त मनानं शनिवारवाड्यातून बाहेर पडल्या. वाड्यातून बाहेर पडताना रमाबाईंचे शब्द त्यांना सतत आठवत होते.

"धाकट्या बहिणीनं थोरल्या बहिणीला दिलंय समजा. अव्हेर करू नका."

रमाबाईसाहेबांनी बहिणीचं नातं सांगितलं आणि मग जानकीबाईंना काही बोलता आलं नाही.

मेणा शनिवारात प्रभुण्यांच्या दाराशी आला. मेण्याच्या दाराशी असलेला झिरमिळी पडदा सरकला आणि त्यातून एक स्त्री उतरली. रामशास्त्री नुकतेच सदाशिव पेठेतल्या कुलकर्ण्यांकडून आले होते. आज त्यांच्याकडे सत्यनारायण होता. सायंकाळी प्रसादाला जाता येणार नाही म्हणून रामशास्त्री आताच जाऊन आले होते.

जानकीबाई मेण्यातून येणार हे त्यांना ठाऊक होतं; पण. . . त्या स्त्रीला पाठमोरी पाहिली. . . बांधा तर जानकीसारखाच होता; पण उंची पैठणी, केसांचा खोचा, त्यावर शेवंतीची वेणी, नाकात नथ, दंडात वाक्या, . . . ही कोणी पेशव्यांकडची माहेरवाशीण असावी असं रामशास्त्र्यांना वाटलं; पण जानकी तर अजून आलेली नाही आणि या कुठं निघाल्या वाड्यात ? बोलावं तरी कसं असा प्रश्न पडला रामशास्त्र्यांना. इतक्यात पाठीमागून रमाबाईंची दासी मैना हातात दोन जड तबकं घेऊन आली. ताटंच ती. दोन्हीही रेशमी रुमालांनी झाकलेली होती.

"मैने, कुठं चाललीस ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"तुमच्याच की घरात," मैना उत्तरली.

"अजून बाई आल्या नाहीत."

"ऑ !. . ." मैना चकित झाली.

"होय. घरात कुणी नाही. बाई शनिवारवाड्यावर तुमच्याकडेच गेल्या आहेत. आता आत कोण गेल्या ?"

. . .आणि मैना तोंडाशी पदर घेऊन हसू लागली. शास्त्रीबुवांना समजेना मैनेला हसायला काय झालंय ते.

"अवो, बाईच हायेत त्या," मैना म्हणाली.

"कोण बाई ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"कोण बाई म्हंजे ? तुमच्या. वैनीसाहेब."

"आमच्या ? म्हणजे जानकी ?"

"हो, हो. वळखलं नाहीसा ?"

"नाही. जानकी अशी कधीच नव्हती," शास्त्रीबुवा म्हणाले.

"लई गोड दिसतात आज," मैनेचा कौतुकाचा स्वर.

"हो. गोड दिसतात," असं पुटपुटत रामशास्त्री आत गेले. त्यांच्यामागून मैना

एका भोयाला घेऊन आत गेली. तिच्या हाती ती तबकं होतीच. मैना येऊन सोप्यावर थांबली.

जानकी सामोरी आली तशी शास्त्रीबुवांनी विचारलं,

"कोण आपण ?"

"इश्श ! असं काय विचारायचं ते ?" लाडिकपणे जानकी म्हणाली.

"मी खरंच विचारतोय. आपण कोण ?" शास्त्रीबुवांच्या स्वरात कडवटपणा होता. केवळ लटकेपणानं शास्त्रीबुवा विचारीत नाहीत हे आता जानकीला समजलं. त्यामुळे ती काही न बोलता तशीच उभी राहिली.

"केवळ यासाठी वाड्यावर गेला होतात ?"

"बोलावलं म्हणून गेले होते. हे होणार हे मला माहीत नव्हतं."

"नाकारता आलं असतं."

"नाकारलंही होतं; पण बाईसाहेबांचा फार आग्रह झाला. . ."

"आणि त्याला तुम्ही बळी पडलात."

"बळी नाही पडले. त्यांच्या भावनेची कदर केली."

"भावनेची कदर ? म्हणजेच स्वार्थाचे चोज !" असं रामशास्त्री म्हणताच जानकी चमकली. तिच्या चेहऱ्यावर संमिश्र भावना निर्माण झाल्या. डेळ्यांत मेघ डोकावले. नाकाचा शेंडा लालबुंद झाला. डोळयांतून दोन मोती टपकन ओघळले. ते नथेच्या मोत्यांनी झेलले. मोत्यांनी मोती मातीला मिळू दिले नाहीत. ते माणसापेक्षा शहाणे होते.

"आपल्याला काय वाटलं, मी दागदागिने, वस्त्रप्रावरणं आणि धनद्रव्य यांच्या लोभानं वाड्यावर गेले ? मुळीच नाही."

"तसं नसतं तर तुम्ही ही पैठणी नेसून आलाच नसता."

"पैठणी माझ्यासाठी नाही नेसले. माझ्या धाकट्या बहिणीसाठी."

"कोण धाकटी बहीण ?"

"रमाबाईसाहेब."

"हे नवं नातं आजच्याच दिवशी निर्माण झालं ?"

"मनं जुळली की नाती जुळायला अवकाश नाही लागत."

"हे नातं तुमच्याकडून का त्यांच्याकडून ?"

"आपण खरंच कोरडे न्यायाधीश ! भावनेचा आपला काहीच का संबंध

नाही? रमाबाईसाहेबांना वाड्यात अलीकडे फार एकटं-एकटं वाटतं. जिवाभावाची सोबतीण नाही, सखी नाही. रावसाहेब कधी राजकारणात, कधी अंथरुणावर. मातोश्री पोथ्यापुराणात नाहीतर गंगापुरात. आनंदीबाईंचा सहवास म्हणजे चिमणीला घारीचा सहवास. माझ्याशी किती बोलत होत्या त्या. त्यांना फार-फार बरं वाटलं मी गेल्यावर. मी आहेर नको म्हटला तर डोळा पाणी आणून त्या म्हणाल्या, 'नाही नका म्हणू. धाकट्या बहिणीनं थोरल्या बहिणीला दिलाय आहेर असं समजा. अव्हेर नका करू.' " जानकी बोलत होती, मैना सोप्यावर हातात तबक घेऊन उभी होती. रामशास्त्री ऐकत होते.

"मग मला सांगा, केवळ स्वाभिमान जागवण्यासाठी त्यांच्या शुद्ध भावनेला मी लाथाडू? सांगा ना? तुमच्या न्यायात भावनेला काहीच का मोल नाही?" पदरानं डोळे पुसत जानकीनं प्रश्न केला; पण या प्रश्नाला रामशास्त्र्यांजवळ उत्तर नव्हतं.

कारण—

'न्याय भावना जाणत नाही,' असंच उत्तर द्यावं लागलं असतं. आणि मग जानकी देवघरात गेली. अंगावरला सगळा साज तिनं उतरवला. पैठणीची घडी चापून-चोपून केली. कुंकू वाहिलं. अलंकार उतरवले. मैनेकडून ती तबकं घेतली. त्यातला कुंकवाचा करंडा आणि नारळ तेवढा ठेवला. बाकीचं सारं पुन्हा तबकात व्यवस्थित ठेवून तबकं रेशमी रुमालानं पांघरवली आणि. . .

एका चिठोऱ्यावर मैनेपाशी पत्र दिलं—

"पैठणीची घडी मोडून दिली आहे. धाकट्या बहिणीनं ती आता नेसावी. बाईसाहेब, तुम्ही दिलेल्या आहेरातलं जेवढं माझं होतं— कुंकवाचा करंडा आणि श्रीफल, तेवढं ठेवलंय, बाकीचं परत केलंय."

मैना निघून गेली. मेणा पुढे सरकला आणि भावनेचा आवेग अनावर झालेली जानकी झटकन् तोंड फिरवून स्वयंपाकघरात निघून गेली. रामशास्त्री तिच्या या आगळ्या दर्शनानं स्तंभित झाले होते. तिचं हे वेगळं रूप विवाहानंतर प्रथमच बघायला मिळत होतं. न्यायाधीशांची पत्नी, श्रीमंत बाईसाहेबांची सखी, स्वाभिमानी गृहिणी, वत्सल बहीण, या साऱ्या भूमिका तिनं एकाच वेळी वठविल्या होत्या.

रामशास्त्री अवाक होऊन तिच्याकडे पहात होते.

शनिवारवाड्यावर मैना परत आली तेव्हा तिच्या हाती तबकं जशीच्या तशी होती. घडलेला प्रकार साऱ्या संवादासह मैनेनं बाईसाहेबांना सांगितला आणि रमाबाई चकित झाल्या. जानकीची थोरवी, रामशास्त्र्यांचा कठोर नि:स्वार्थीपणा याचा त्यांना नव्यानं प्रत्यय आला होता आणि त्यांना आश्चर्याबरोबर कौतुकही वाटलं होतं.

रात्री म्हालात रावसाहेब आणि रमाबाई बोलत होते. रमाबाई दुपारची ही हकिगत गोष्टीसारखी सांगत होत्या आणि माधवराव एकचित्तानं ती ऐकत होते. गोष्ट संपली... मेणा परत आला... आहेराची ताटं भरलेलीच होती...

धाकट्या बहिणीचे डोळे भरून आले होते आणि प्रसन्नपणे माधवराव हसून म्हणाले होते, "पेशव्यांचा मुख्य न्यायाधीश असाच असणार, आहे. रमा, दौलतीची आता मला मुळीच चिंता नाही. रामशास्त्र्यांच्या हाती दौलतीचा न्याय सुरक्षित आहे."

¤

# १२

**पा**लखीतून रामशास्त्री उतरले ते थेट शनिवारड्याच्या चिरेबंदी पायऱ्या झपाझप चढून आत गेले. सदरेवर बरीच मंडळी होती; पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला रामशास्त्र्यांना वेळ नव्हता. श्रीमंतांचा तातडीचा निरोप आला होता. काही खास बाब असलीच पाहिजे, त्याशिवाय श्रीमंत कुणाला कधी उगीचच उताविळपणे बोलवायचेच नाहीत, हे रामशास्त्र्यांना ठाऊक होतं.

श्रीमंतांच्या महालाच्या दाराशीच राणोजी भेटला आणि रामशास्त्र्यांच्या कानात तो हळूच कुजबुजला,

"वातावरण गरम आहे, शास्त्रीबुवा."

"का ?"

"मातुःश्री लई मंजे लई रागावल्यात."

एवढं बोलून राणोजी पुढं निघून गेला आणि आपणाला का बेलावलं असावं याची अंधुक कल्पना रामशास्त्र्यांना आली.

मामला अवघड होता.

होय !

मल्हारराव रास्ते. . . खुद्द पेशव्यांचे मामा. . . निकटचे आप्त. . . त्यांच्या हातून एक आगळीक घडली होती आणि तीबाबत रामशास्त्र्यांनी काल इन्साफ केला होता. न्यायमंदिरात, सर्वांच्या देखत आणि खासगीतही. . . रामशास्त्र्यांनी आपला निर्णय कुठंच बदललेला नव्हता.

श्रीमंत माधवराव स्वारीवर असताना पुण्यात शत्रूनं जो धुमाकूळ घातला

त्यानं अवघा हलकल्लोळ माजला आणि प्रजेची फार ससेहोलपट झाली. ही गोष्ट श्रीमंतांच्या मनाला खचितच लागून राहिली होती. पुण्यात जो प्रलय घडला तो केवळ शत्रूनं मुसंडी मारल्यामुळे नव्हे, तर पुण्यातलेच काही घरभेदे आणि सूर्याजी पिसाळ शत्रूला वाट दाखवून पुण्यात फिरवू लागले. मग काय रान मोकळं झालं शत्रूला. अवघड वाट सोपी करून दिली स्वकीयांनीच आणि लुटालूट जाळपोळ, मारझोड, पडझड यामुळे अवघा आकान्त माजला.

कसून चौकशी करूनही 'हे का घडावं' याचे धागेदोरे माधवरावांच्या हाती येईनात; पण पाप फार दिवस लपून राहत नाही. त्याला आपलं काळं तोंड घेऊन प्रकाशाला सामोरं जावंच लागतं. तस झालं. चिरेबंद भिंतींनाही भोकं पडतात. मग पापाला बोलकं करायला कितीसा वेळ ! आपण होऊन शनिवारवाड्यावर येऊन सांगणारे तयार झाले. बित्तंबातमी मिळाली. अनेक दु:खितांच्या जीवघेण्या कथा माधवरावांनी ऐकल्या. हानी समक्ष डोळ्यांनी पाहिली. उद्‌ध्वस्त आणि विच्छिन्न वाडे कसे कोसळले ते जागेवर जाऊन पाहिले आणि बरेच दिवस अंधारात घुबडासारखं तोंड लपवून राहिलेलं एक नाव एके दिवशी पुढे आलं...

सरदार मल्हारराव रास्ते !

खुद्द पेशव्यांचे सख्खे मामा ! गोपिकाबाई मातु:श्रींचे बंधू. राज्यकर्त्यांचे निकटचे आप्त. अवघ्या पटवर्धन घराण्याचे सगेसोयरे. रास्त्यांच्या किती माहेरवाशिणी पटवर्धनांच्या सुना ! असे हे रास्ते...

...सरदार मल्हारराव रास्ते.

पापाचे वाटेकरी म्हणून आरोपी झाले.

रास्त्यांच्या विरुद्ध न्यायमंदिरात कज्जा चालू नये म्हणून वरपासून खालपर्यंत, आणि स्वयंपाकघरापासून सदरेपर्यंत नेटाचे प्रयत्न झाले; परंतु श्रीमंत माधवरावांनी कुणाचं काही चालू दिलं नाही आणि निर्णय अखेर रामशास्त्र्यांवर सोपविला.

पर्वतीच्या पायथ्याशी एकदा सखारामबापू या काळात भेटले. रामशास्त्र्यांना म्हणाले, "शास्त्रीबुवा, मल्हाररावांच्या बाबतीत काय निर्णय घेतलात तुम्ही ?"

"निर्णय अजून व्हायचा आहे."

"ठीक, तो होण्यापूर्वी हे ध्यानात असू द्या, की, रास्ते पेशव्यांचे निकटवर्ती आप्त आहेत."

“ते ध्यानात घेण्याची आवश्यकताच नाही.”

“मग ठीक तर. काय ते तुम्ही समजालच.” असं म्हणून बापू जाऊ लागले. तर रामशास्त्र्यांनी त्यांना थांबवलं अणि म्हणाले, “बापू, मी अशा अर्थानं म्हणालो की, न्यायदानासाठी कुणाची नातीगोती लक्षात घेण्याचं कारण नाही. निरपेक्ष न्यायदानाला नाती मंजूर नसतात बापू,”रामशास्त्री काहीशा तीव्र स्वरात म्हणाले.

यावर बापू काही बोलले नाहीत. मुकाटपणे निघून गेले आणि मग श्रीमंतांची मुलाखत...

* * *

मल्हारराव रास्ते यांना कोणतं शासन करावं या चिंतेनं माधवरावांना ग्रस्त केलं होतं. माधवराव दुहेरी पेचात सापडले होते. एकीकडे राजकारण, दुसरीकडे कुटुंबप्रेम; पण श्रीमंत रावसाहेबांनी प्रेमापेक्षा कर्तव्याला नेहमीच श्रेष्ठ मानलं होतं. रामशास्त्र्यांचा सल्ला पुसण्यासाठी त्यांनी त्यांना बोलावणं धाडलं.

रामशास्त्री पेशव्यांच्या दिवाणखान्यात आले तेव्हा एकट्या माधवराव पेशव्यांशिवाय तिथं कुणीच नव्हतं. एवढ्या मोठ्या महालात टांगलेली हंड्या-झुंबरं, अंथरलेले रुजामे, बैठका आणि दारावर पहारेकरी. आत कोणालाही येऊ न देण्याबद्दल माधवरावांनी कडक ताकीद दिली होती. पेशव्यांना अभिवादन करून रामशास्त्री आसनावर बसले आणि...

“रामशास्त्री, आमचं मन मोठ्या अडचणीत सापडलंय. द्विधा होतंय ते. अशा वेळी आपल्या अचूक सल्ल्याची आम्हाला नितांत आवश्यकता आहे,” श्रीमंत माधवराव काहीशा विषण्णतेनं म्हणाले.

“मामला काय आहे, श्रीमंत ?”

“व्यक्ती कौटुंबिक; पण तिचं कृत्य राजकीय,” माधवराव म्हणाले.

“मी समजलो नाही आपला आशय,” रामशास्त्री जिज्ञासेनं म्हणाले.

“तेच सांगणार आहे, रामशास्त्री. आरोपी म्हणून आमचे मामा, सरदार मल्हारराव रास्ते तुमच्यापुढे येणार आहेत.”

“हो. हे तर मी जाणतोच श्रीमंत; पण...”

“हा प्रश्न इतका साधा नाही, रामशास्त्री. याचा निर्णय काय लागणार हे तर तुम्ही व मी, आपण जाणून आहोत; पण. . . रामशास्त्री, या प्रकरणानं आमचा कुटुंबकलह मोठा होणार यात शंका नाही.”

“मग ? खटला काढून टाकायचा का, श्रीमंत ?”

“नाही रामशास्त्री. खटला तर चाललाच पाहिजे. फक्त तो जनतेसमोर न्यायमंदिरात न होता, इथं या गणेश महालात चालेल. बाकी सर्व अधिकार सुपूर्द केले आहेतच.”

“जशी आज्ञा, श्रीमंत,” रामशास्त्री म्हणाले.

आणि मल्हारराव रास्त्यांना पाचशे रुपये दंड केला रामशास्त्र्यांनी. मातु:श्री गोपिकाबाईंनी हा प्रश्न फारच प्रतिष्ठेचा केला. रास्ते त्यांचे भाऊ. रास्त्यांना दंड झाला तर शनिवारवाड्यात पाणीही पिणार नाही, अशी प्रतिज्ञा केली मातुःश्रींनी. आणि म्हणूनच माधवराव पेचात पडले होते. इकडं आड तिकडं विहीर अशा अवस्थेत सापडले होते श्रीमंत. आणि जेव्हा खरोखरीच तसं घडण्याची वेळ आली तेव्हा त्यांच्या जिवाची काहिली झाली. यातून काही तोड निघते का ते विचारण्यासाठी त्यांनी रामशास्त्रींना त्वरित निरोप धाडला आणि म्हणूनच रामशास्त्री तातडीनं वाड्याकडे आले होते.

“या शास्त्रीबुवा. आम्ही तुमचीच वाट पाहत आहोत,” रामशास्त्र्यांना पाहताच श्रीमंत म्हणाले आणि त्यांनी रामशास्त्र्यांना आपल्या अगदी जवळ बसवून घेतलं.

“रामशास्त्री, रास्त्यांना झालेला दंड माफ नाही का होणार ?” श्रीमंतांनी अजीजीनं विचारलं.

“श्रीमंत, न्यायाधीशाच्या सहीशिक्क्यानिशी जो हुकूम निघाला तो न्यायाधीशानं स्वत:च फिरवणं म्हणजे न्यायाची बेइज्जत करण्यासारखं आहे. पण श्रीमंत, आपण हे का विचारीत आहात ?”

“रामशास्त्री, या माधवराव पेशव्यानं राक्षसभुवनावर पराक्रम केला; पण शनिवारवाड्यात त्याची मती कुंठित होऊन बसली आहे.”

“श्रीमंत, सरळसरळ साफ सांगावं. श्रीमंताच्या हुकमानं झालेला दंड माफ करता येईल; पण न्यायालयाला माफी देणं शक्य नाही. दंडाची रक्कम त्वरित खजिन्यात भरलीच पाहिजे. नाहीतर..”

“नाहीतर काय, रामशास्त्री ?”

“जेरबंद करून आणण्याचा हुकूम होईल !”

“जेरबंद ! रास्त्यांना जेरबंद ! ! नको. . . रामशास्त्री, काहीतरी मार्ग काढा.

तोड सुचवा. जेणे करून न्याय जिवंत राहील आणि मीही...”

“श्रीमंत ! आपण असं का बोलता ?” रामशास्त्री आवेगानं म्हणाले, “माझी काही चूक झाली, कोणता अपराध झाला असेल तर क्षमा करावी...”

“अपराध आमचाच झाला आहे, रामशास्त्री. आम्ही रास्त्यांचे आप्त झालो आहोत. रामशास्त्री, मातु:श्रींनी आपला निर्णय न बदलण्याचं ठरवलंय; तुम्ही न्याय बदला असं आम्ही सांगणार नाही... पण... या वेळी आम्ही काय करावं रामशास्त्री ?” श्रीमंत कळवळ्यानं म्हणाले.

“श्रीमंत, एक गोष्ट करता येईल...”

“सांगा रामशास्त्री. त्वरित सांगा. जेणेकरून या जाचातून आमच्या मनाची मुक्तता होईल असा काही उपाय सांगा,” अधीरतेनं श्रीमंत म्हणाले.

“दंडाची रक्कम आपल्या खासगीतून आपण भरावी म्हणजे रास्त्यांना दंडही भरावा लागणार नाही आणि शिक्षेची माफीही द्यायला नको.”

रामशास्त्र्यांच्या या उपायावर श्रीमंत बेहद्द खूष झाले. त्यांचे डोळे आनंदातिशयानं लकाकले. रामशास्त्र्यांनी दोन्ही काठांना धक्का न लावता सहीसलामत सुटण्याचा मार्ग सांगितला होता. रामशास्त्र्यांच्या चतुर बुद्धीचं श्रीमंतांना कौतुक वाटलं आणि श्रीमंतांनी आपला संतोष प्रसन्न शब्दांनी व्यक्त केला.

पण...

रामशास्त्र्यांच्या या उपायाचा म्हणावा तसा उपयोग झाला नाहीच. मातु:श्रींनी शनिवारवाड्याचा त्याग केला तो केलाच. खासगीतून तरी रक्कम भरावीच लागली, हा त्यांना जास्त अपमान वाटला. त्यांना रास्त्यांसाठी दयेची भीक नको होती. आरोपातून सन्मानपूर्वक मुक्तता हवी होती; पण ते होणं नव्हतं. कारण...

कारण तो निर्णय रामशास्त्री प्रभुणे यांचा होता. या निर्णयात परिवर्तन परमेश्वरही करू शकला नसता.

* * *

शनिवारवाड्याच्या एका चौकात चर्चा चालू होती...

“विसाजीपंतानं फिरंग्यांची आगळीक करायला नको होती.”

“हो. ते खरं; पण विसाजीपंतांना कोण बोलणार ? मातब्बर आसामी.”

“शिवाय रास्त्यांप्रमाणेच निकटचे नसले करी पेशव्यांचे आप्तच.”

“आणि वसईचे सुभेदार.”

“दरबारात विसाजीपंत लेल्यांचं वजन मोठं.”

“सखारामबापूंचे आणि त्यांचे संबंध आणखीच वेगळे. विसाजीपंतांसाठी बापू काळीजसुद्धा काढून ठेवतील.”

“पण फिरंग्याला केलं तरी काय विसाजीपंतानं ?”

“अहो, सुवर्णदुर्गावरून वसईला जहाजं जात होती फिरंग्यांची. माल ठेचून भरलेला होता. लुटली जहाजं विसाजीपंतानं.”

“लुटली असतील. लूट सरकारजमा केली असली म्हणजे झालं.”

“अहो, तिथंच तर गोम आहे.”

“काय गोम आहे, पंत ?”

“फिरंग्याला लुटलं; पण लूट खजिन्यात आली नाही. लुटीला पाय फुटले आणि ती विसाजीपंतांच्या वाड्यावर गेली वसईच्या. ही ही हीऽ”

“हळू बोला पंत. वाड्यात आत्ता सामसूम आहे म्हणून ठीक आहे. श्रीमंत बाईसाहेबांना घेऊन पर्वतीला गेलेत. नाना, बापू, कोणीच वाड्यात नाहीत म्हणून बरं. नाहीतर आपणासारख्या कारकुनांची कंबक्तीच व्हायची.”

“बरं, पुढं काय ते सांगा.”

“हे बघा, विसाजीपंतावर खटला चालवायचा म्हणजे सोपी गोष्ट नाही. मघाशी तुम्ही जी विसाजीपंताची नाती सांगितलीत त्यात आणखी थोडी भर टाका. म्हणजे विसाजीपंत नाकातला बाल आहे हे कळून यईल.”

“अणखी काय पंत ?”

“अहो, दादासाहेबांचे उपकारकर्ते आहेत विसाजीपंत. अटकेपार झेंडे लावणाऱ्या दादासाहेबांनाही मुठीत ठेवलंय विसाजीपंतानं.”

“आता रामशास्त्री प्रभुण्यांची खरी कसोटी आहे.”

“असे रामशास्त्री कैक पचवलेत विसाजीपंतानं.”

“अहो, रास्त्यांनासुद्धा दंड झाला होता म्हटलं.”

“रास्ते वेगळे, लेले वेगळे. असले हे न्यायाधीश म्हणजे घरच्या म्हातारीचे काळ असतात. हिंमत असेल तर लेल्यांना न्यायासनासमोर उभं करा म्हणावं रामशास्त्र्यांना !”

“ते काही सांगू नका. वेळ पडली तर खुद्द रावसाहेबांनासुद्धा रामशास्त्री

न्यायासनापुढे उभं करतील."

"बोलायला सोपं आहे. लेल्यांना काही झालंच तर वसई गेली म्हणून समजा. आणि बापूही गेले हातचे पेशव्यांच्या."

"बघू या आता काय-काय होतं ते. घोडामैदान जवळच आहे."

खुद्द शनिवारवाड्यात असे हे संवाद. पुण्याच्या पेठापेठांतून तर विसाजीपंतांवर भरलेल्या खटल्याची चर्चासत्रं झडली होती.

कारण मामलाच तसा महत्त्वाचा होता.

विसाजीपंतांनी फिरंग्यांची जहाजं लुटली होती आणि फिरंग्यानं पेशव्यांकडे तक्रार गुदरली होती. शिवाय लूट सरकारी खजिन्यात जमा केली नव्हती.

विसाजीपंतांविरुद्ध तक्रार म्हणजे जबाबदारीचा मामला होता. विसाजीपंत ही 'अवघड जागा' होती पेशव्यांच्या दृष्टीनं. म्हणूनच हे प्रकरण खुद्द श्रीमंतांनीच रामशास्त्र्यांसमोर चालवायला दिलं. विसाजीपंतांसारख्या मातब्बर आसामीचा खटला रामशास्त्र्यांनी चालवू नये आणि तसा अधिकार त्यांना देण्यात येऊ नये म्हणून सखारामबापूंनी हरप्रकारे प्रयत्न केले; श्रीमंतांची मनधरणी केली, पण श्रीमंतांनी दाद दिली नाही. श्रीमंत निर्णयाला पक्के. खटला रामशास्त्र्यांनीच चालविला पाहिजे, यात बदल नाही, असं त्यांनी निक्षून सांगितलं, तेव्हा बापू हात चोळीत स्वस्थ बसले.

न्यायदानाचा दिवस कुतूहलाची किरणं घेऊनच उगवला. शनिवारवाडा, वाड्यातली पेशव्यांची कचेरी हेच न्यायालय. मोठं प्रशस्त दालन. लोकांनी गच्च भरून गेलंय. नगरवासी न्यायदान ऐकायला उत्सुक आहेत. आरोपी मातब्बर, फिर्यादी फिरंगी, न्यायाधीश कठोर, सत्ताधीश न्यायप्रेमी ! या खटल्याला त्यामुळेच विशेष महत्त्व होतं. रामशास्त्र्यांसाठी सारी सभा आतुरली होती.

रामशास्त्री आले. गंभीरपणे आपल्या आसनावर येऊन बसले. सभेनं उठून रामशास्त्र्यांना उत्थापन दिलं. रामशास्त्र्यांनी एकवार नजर फिरवून पाहिलं. त्यांना आरोपी कुठं दिसेना. दफ्तरदार बाजूला होतेच. रामशास्त्र्यांनी विचारलं, "आरोपी हजर आहेत ?"

"नाही. त्यांना बोलावणं पाठवलंय," दफ्तरदार विनम्रपणे म्हणाले.

"त्यांना आधी हजर का नाही केलं ?"

"सखारामबापूंच्या कचेरीत बसले आहेत."

हे ऐकताच रामशास्त्र्यांच्या डोळ्यांत नापसंती उतरली.

फिर्यादी फिरंगी आपल्या जागी उभा होता. त्याच्या शेजारीच एक दुभाष्या होता. रामशास्त्र्यांनी विचारले, "आपली फिर्याद काय आहे ?"

दुभाष्यानं फिरंग्याला सांगितलं. फिरंग्यानं लवून मुजरा केला आणि तो म्हणाला, "सुवर्णदुर्गावरून वसईला आमची जहाजं जात होती. अशा जहाजांवर जकात घेऊन त्यांना पुढं जाऊ द्यायचं अशी आजवरची वहिवाट; पण विसाजीपंतांनी आमचा वीस लाखांचा माल लुटला. आमची विनंती ही की आम्हाला तो माल परत तरी मिळावा, नाही तर बदल्यात वीस लाख रुपये नुकसानभरपाई मिळावी."

फिरंग्यानं मोठाच तिढा घातला होता.

एवढ्यात सखारामबापूंचा हुजऱ्या न्यायमंदिरात निरोप घेऊन आला. "रामशास्त्र्यांना सखारामबापूंनी बोलावलंय."

हा निरोप ऐकताच रामशास्त्र्यांची चर्या एकदम बदलली. डोळ्यांत एखादी ठिणगी फुलत असल्यासारखी दिसली. किंचित मान वर करून ते म्हणाले,

"कारभारी, सखारामबापू यांना सांगा की, न्यायासनापुढे काम चालू आहे. रामशास्त्री या वेळी रिकामे नाहीत."

आणि पुन्हा एकदा दफ्तरदारांना तीव्र आणि भेदक सुरात रामशास्त्री म्हणाले, "आरोपीला पुन्हा एकदा बोलावणं करा. पुकारा द्या आणि त्यांना समजही द्या की न्यायासनापुढे हजर झालंच पाहिजे."

निरोप गेला. थोडा वेळ झाला आणि संतप्त चेहऱ्यानंच सखारामबापूंनी कचेरीत प्रवेश केला. बापूंच्या कपाळाच्या शिरा ताडताड उडत होत्या. रागाच्या अनावरतेमुळे त्यांचं सर्वांग कंप पावत होतं. संतापामुळे ओठांतून शब्द बाहेर फुटत नव्हता; पण बोलण्यासाठी ओठ तर हलत होते. शेवटी एकदा बापू म्हणालेच,

"रामशास्त्री, विसाजीपंतांवरील हा खटला राजकीय स्वरूपाचा आहे."

"मग ? आपलं म्हणणं काय आहे, बापू ?" रामशास्त्र्यांनी शांतपणे विचारलं.

"मराठी राज्याचे हितसंबंध यात गुंतलेले आहेत. हा खटला न्यायासनासमोर चालविता येणार नाही. या न्यायासनासमोर तर नाहीच नाही."

रामशास्त्र्यांनी एकवार बापूंकडे रोखून पाहिलं. रामशास्त्र्यांची नजर भेदक होती. त्या नजरेनं बापूंच्या काळजाला चीर गेली. रामशास्त्री शांत पण निश्चयी सुरात म्हणाले,

"हा खटला राजकीय स्वरूपाचा नसून, पूर्णपणे फौजदारी स्वरूपाचा आहे बापू. फिरंग्यांनी फिर्याद दाखल केली आहे. तीबरहुकूम काम चालवणं या न्यायासनाचं कर्तव्य आहे."

आणि मग विसाजीपंतांच्या नावानं तीन वेळा पुकारा झाला. बापू नुसते थरथरत होते. त्यांचं शरीर म्हणजे नुसता एक थरथरता गोळा आहे संतप्त, असं वाटत होतं; पण ते तसेच उभे होते. अप्रत्यक्षपणे, पर्यायानं हा त्यांचा अपमानच होता.

विसाजीपंत आले नाहीत. नाव पुकारूनही आले नाहीत. मग रामशास्त्र्यांनी आज्ञा केली, "आरोपी येत नसेल तर त्याला जेरबंद करून आणावं."

विसाजीपंतांना जेरबंद. . . !

उपस्थित जनसमुदाय चमकला. विलक्षण खळबळ माजली तिथं. विसाजीपंतांना !. . . पेशव्यांचे आप्त जेरबंद !. . . मातब्बर सरदार जेरबंद ! ! सखारामबापूंचे जिवलग जेरबंद ! ! !

बापू क्रोधातिशयानं ओरडले, "रामशास्त्री, कसली धुंदी चढली आहे तुम्हाला ? तुम्ही कुणाला जेरबंद करण्याचा हुकूम देता ?"

. . . सारी स्तब्ध सभा डोळे फाडून बघू लागली.

जणू दोन द्वंद्वी आमनेसामने ठाकले आहेत. . .

"खामोश !" रामशास्त्री तेवढ्याच जोरानं ओरडले. तीव्रपणे. आजपर्यंत रामशास्त्री प्रत्यक्ष कारभाऱ्यावर असे कधी ओरडले नव्हते; पण आज कारभाऱ्यांनी न्यायकचेरीच्या कारभाराला आणि इभ्रतीला सुरुंग लावला होता आणि म्हणून रामशास्त्र्यांना आवाज चढवावा लागला होता.

एवढ्यात विसाजीपंत न्यायालयात हजर झाले. तसं करण्यावाचून विसाजीपंतांना गत्यंतरच नव्हतं.

विसाजीपंत सरळ जाऊन सखारामबापूंच्या शेजारी बसणार होते; पण रामशास्त्री करड्या- कठोर नजरेनं पाहत होते; हे विसाजीपंतांनी पाहिलं होतं. ते लगेच उभे राहिले. जागच्या जागी थरथरत !

“फिरंग्यांच्या गलबतावरील माल आपण लुटला ?” रामशास्त्री.

उत्तर नाही. विसाजीपंत तसेच उभे.

“विसाजीपंत, फिरंग्यांच्या गलबतावरील माल आपण लुटला असा आपल्यावर आरोप आहे. आरोप कबूल ?”

“नाही ! नामंजूर ! नाकबूल,” विसाजीपंत उद्गारले.

मधेच नाक खुपसून बापू म्हणाले,

“माल लुटला ? रामशास्त्री, विसाजीपंत हे पेशव्यांचे सुभेदार आहेत. त्यांना काय चोर— लुटारू समजता ?”

“दफ्तरदार, कारभाऱ्यांना समज द्या की, न्यायालयात न्यायाधीशाला नावानं संबोधण्याची पद्धत नाही.”

बापू चरकले.

“कारभारी, न्यायदानाच्या कामात ढवळाढवळ करणं इष्ट नाही.” रामशास्त्री काहीशा दरडावणीच्या सुरात म्हणाले, “बोला विसाजीपंत, या आरोपाबाबत आपणाला आणखी काही सांगायचंय ?”

“मी माल लुटला नाही. सुभेदार या नात्यानं जप्त केला,” विसाजीपंत एकेक शब्द स्पष्ट उच्चारीत म्हणाले.

“असं ! मग जप्तीचा माल आणि रोकड सरकारात जमा केली ?”

यावर विसाजीपंत काहीच बोलले नाहीत.

रामशास्त्र्यांनी हातातली कागदपत्रं चाळवून त्यातली एक पावती फडफडवली आणि ते म्हणाले,

“गलबतावरचा माल वीस लक्ष रुपयांचा होता, याबद्दलचा पुरावा म्हणून ही पावती. यावर काही सांगायचंय, विसाजीपंत ?

पंचमंडळी पाहत होती. सर्वांनी पावती बारकाईनं पाहिली.

“मला इथं काहीच सांगायचं नाही,” असं घुश्शातच म्हणून विसाजीपंत अर्थपूर्ण नजरेनं बापूंकडे पाहू लागले.

“आपणाला जे काही सांगायचंय ते इथंच, या न्यायमंदिरातच सांगावं लागेल विसाजीपंत. आणि त्याबाबतचा निर्णय इथंच होईल. निःसंकोच मनानं सांगा, विसाजीपंत,” रामशास्त्र्यांनी मृदू आवाजात सांगितलं.

पुन्हा बापू संतप्त झाले आणि म्हणाले,

"रामशास्त्री, विचार करा. विसाजीपंतांच्या दर्जाचा विचार करूनच खटला चालवा. हा खटला विसाजीपंतांविरुद्धच नव्हे, तर पर्यायानं खुद्द पेशव्यांविरुद्ध तुम्ही चालवत आहात, असं आम्ही समजावं काय ?"

"बापू," रामशास्त्री करडेपणानं म्हणाले, "आपण काय समजावं हे न्यायालय सांगणार नाही. विसाजीपंतांचा दर्जा आणि अधिकार कोणताही असेल; पण तो या न्यायमंदिराच्या बाहेर. न्यायमंदिरात कोणताही आरोपी हा केवळ आरोपीच असतो. कोणाच्याही प्रतिष्ठेची वा दर्जाची– खुद्द राज्यकर्त्याचीही पर्वा न्यायदेवता करीत नाही. ती जाणते फक्त न्याय."

"तुम्हाला पर्वा नसली तरी न्याय देणाऱ्या पंचांना पर्वा आहे ना.त्यांना आमच्याबरोबरच राहायचंय, या गावात, देशात."

आता मात्र रामशास्त्र्यांचा क्रोध अनावर झाला. ज्येष्ठतेला मान देण्यासाठी ते आतापर्यंत बापूंना फार बोलले नव्हते. आता मात्र संयमानं सीमा ओलांडली आणि अत्यंत तप्त आवाजात रामशास्त्री म्हणाले,

"बापू, आपल्या बोलण्यानं आपण न्यायमंदिरात पंचांवर दडपण आणीत आहात. न्यायाच्या दृष्टीनं ही गोष्ट निषिद्ध आहे. आपण न्यायमंदिरातून त्वरित निघून जावं आणि गेला नाहीत तर न्यायदेवतेचा अपमान केला या गुन्ह्यादाखल आपणाला कडक शासन करावं लागेल."...आणि सखारामबापूंनी कपाळावरचा घाम टिपला. तरातरा पावलं टाकीत ते निघून गेले.

मग रामशास्त्री पंचांना म्हणाले, "पंचमंडळी, विसाजीपंतांविरुद्ध पुरावा गोळा झाला आहे. आपल्या बचावासाठी विसाजीपंत काहीही सांगू शकले नाहीत. त्यांना बचावाची संधी दिली होती. न्यायदेवतेला स्मरून, सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून, कोणत्याही दडपणाला बळी न पडता आणि कोणत्याही सत्तेची तमा न बाळगता निर्णय द्या. निःस्पृहपणे न्यायाच्या बाजूनं उभं राहा."

पंचांनी काही काळ विचार केला आणि आपलं मत रामशास्त्र्यांना सांगितलं. आपला अखेरचा निर्णय, पंचांच्या सल्लामसलतीनंतर. प्रमुख न्यायाधीश या नात्यानं रामशास्त्री सांगू लागले,

"लेले, तुमच्यावरील आरोपाबाबत पुरेसा पुरावा उपलब्ध झाला असल्यानं आणि तुमची बाजू तुम्ही न मांडल्यानं तुमच्यावरील आरोप सिद्ध झाला आहे.

परिणामी तुम्ही गुन्हेगार ठरला आहात. तुमच्या या गुन्ह्याला शिक्षा देणं क्रमप्राप्त आहे. तुम्ही फिर्यादी फिरंग्यांना वीस लक्ष रुपये द्यावेत आणि दंड म्हणून दीड लक्ष रुपये सरकारी खजिन्यात भरावेत."

विसाजीपंत सुन्नपणे ऐकत होते.

रामशास्त्र्यांचा हा निर्णय ऐकून न्यायमंदिरात उपस्थित असलेल्या साऱ्यांनाच धक्का बसला. विसाजीपंत तर दिङ्‌मूढ झाले. जे कधी घडलं नव्हतं ते घडलं. शासनयंत्रणेतील एका जबाबदार आणि महत्पदस्थित व्यक्तीला अपराधाबद्दल कठोर शासन झालं होतं. पिंडीवरला विंचू म्हणून त्याची गय करण्यात आली नव्हती.

फिरंग्याला न्याय मिळाला. विसाजीपंतांना दंड भरावा लागला.

* * *

काही लब्धप्रतिष्ठित सरदारांना या घटनेमुळे जबरदस्त धक्का बसला. काहींना विलक्षण जरब बसली. पानिपतच्या युद्धानंतर मराठेशाहीला हादरा बसून जी मरगळ निर्माण झाली होती तिचा फायदा काही रगेल मानकऱ्यांनी आणि सरदारांनी स्वार्थासाठी घेतला होता. आपल्या भागात स्वतःच्या सत्तेची सरंजामशाही निर्माण करून पेशव्यांच्या दरबारीही आपली मक्तेदारी सांगायला सुरुवात केली होती. कुणी नात्यानं, कुणी वयानं, कुणी अधिकारानं, कुणी धनमदानं पेशव्यांच्या मसनदीपेक्षा आपलं आसन बळकट आणि महत्त्वपूर्ण आहे असं सांगू लागला होता. आपापला सुभा म्हणजे आपलं राज्य असं समजून मानभावी आणि मनमानी सत्ता भोगण्याचा हव्यास वाढत होता. नेमकं हेच माधवरावांना नको होतं. हा पोकळ डोलारा मोडून त्या जागी नवा महाल बांधायचा होता माधवरावांना; पण घाव घालायचे कुणी? खंड पाडायचा कुणी? या कामी सारीच यंत्रणा दक्ष, जागरूक आणि कर्तव्यनिष्ठ असणं आवश्यक होतं. या यंत्रणेतला महत्त्वाचा दुवा म्हणजे न्यायासन.

विसाजीपंतांच्या कज्जात रामशास्त्र्यांनी जो कठोर निर्णय दिला होता त्यामुळे न्यायासनाची प्रतिष्ठा वाढली होती, दरारा वाढला होता. श्रीमंतांना हेच अपेक्षित होतं. ते घडलं होतं.

विसाजीपंतांचा निवाडा झाला आणि रामशास्त्र्यांवर दातओठ खाणाऱ्यांची संख्या वाढली; पण रामशास्त्र्यांच्या निःस्पृह व्यक्तिमत्त्वात कुठं उणं नव्हतं.

त्यामुळे दातओठ खाणाऱ्यांना दातओठ खाण्यावरच समाधान मानावं लागे. रामशास्त्र्यांच्या निर्लोभी मनाची, निःस्पृह बाण्याची आणि निरपेक्ष निर्णयाची साक्ष खुद्द श्रीमंतांनाच पटली होती.

* * *

श्रीमंत या निवाड्यावर मनातून संतुष्ट होते; पण बापूंना स्वस्थ बसवेना. कोणत्याही न्यायाधीशाविषयी असतात तसल्या वावड्यारेवड्या रामशास्त्र्यांविषयीही होत्याच. लाच खाण्याचे आरोप होते. पक्ष धरून मनसुबी करण्याचे आरोप होते. बापूंनी श्रीमंतांना हे सगळे आरोप सांगितले आणि श्रीमंतांनी बापूंच्यादेखत रामशास्त्र्यांची शहानिशा करायचं ठरवलं.

रामशास्त्री येताच बापू सावरून बसले. रामशास्त्र्यांपेक्षा बापूंचा चेहरा अपराधी आणि संकोचल्यासारखा दिसत होता. “या शास्त्रीबुवा, विसाजीपंतांचा निवाडा तुम्ही बहुत कौशल्यानं केलात; पण जनलोकात तुम्ही अप्रिय झालात,” श्रीमंत रामशास्त्र्यांचं स्वागत करून म्हणाले.

श्रीमंतांच्या चेहऱ्यावर फिकटपणा दिसत होता. अलीकडे त्यांची प्रकृती खंगत चालली होती. पौर्णिमेचा तेजःपुंज चंद्र वद्य पंधरवड्यात क्षीण होत जावा तशी माधवरावांची कांतिमान काया आता रोगग्रस्त झाल्यानं आक्रसलेली दिसत होती. डोळ्यात तेज मात्र तसंच. पाणीदार डोळे आणि मुद्रा करारी. थोड्या वेळापूर्वीच वैद्य येऊन प्रकृती पाहून गेले होते. श्रीमंतांच्या मुद्रेवर शीण स्पष्ट दिसत होता.

श्रीमंत आपल्या आसनावर बसले होते; पण बसण्याचेही श्रम त्यांना होत असावेत असं त्यांच्या मुद्रेवरून वाटत होतं. मधूनच खोकल्याची उबळ येत होती. एखादी बाहेर पडत होती. एखादीला श्रीमंत दाबून धरीत होते. गळ्याच्या शिरा खोकताना फुगत होत्या आणि छातीवर हात देऊन श्रीमंतांना बोलावं लागत होतं. खोकल्याची आणखी ढास आली आणि स्वतःला सावरीत श्रीमंत म्हणाले, “रामशास्त्री, विसाजीपंतांचा निवाडा करण्यापूर्वी त्यांचे आणि दौलतीचे संबंध लक्षात घेतले होतेत ?

“होय श्रीमंत,” रामशास्त्री शांतपणे म्हणाले.

“आणि तरीही हा निर्णय तुम्ही दिलात ?”

“होय. निर्णय न्यायदेवतेनं दिला. मी फक्त तो बोलून दाखवला.”

"ठीक. बापू, त्यावर तुम्हाला काही म्हणायचंय ?"

"श्रीमंत, मला एवढंच म्हणायचंय. आपणाला फक्त न्यायालय चालवायचं नाही. राज्य चालवायचंय. कारभार करायचाय."

"ठीक बोललात बापू. रामशास्त्र्यांना याची जाणीव दिसत नाही."

श्रीमंतांच्या उद्गारांबरोबर बापूंचा चेहरा उजळला.

श्रीमंत आपल्या बाजूनं बोलले असं वाटून ते अंतर्यामी आनंदले आणि उपहासदृष्टीनं रामशास्त्र्यांकडे पाहू लागले.

"रामशास्त्री, बापूंचं म्हणणं आपल्या ध्यानी आलं ?"

"पूर्णपणे."

"मग विसाजीपंतांबाबत तुम्ही जो निर्णय केला त्याचा पुनर्विचार करणार ? लेले मातब्बर आहेत."

"नाही श्रीमंत. ते होणे नाही."

"नाही ?" श्रीमंतांनी रामशास्त्र्यांना विचारलं.

"होय श्रीमंत, ते कदापि होणे नाही."

"रामशास्त्री, आता मात्र खरोखरीच तुम्ही मदांध झालात. खुद्द श्रीमंतांपुढे हा बकवास ? ही गुर्मी ?" बापू रागानं म्हणाले.

"थांबा बापू. आम्हीच या मामल्याचा निर्णय करू. तुम्ही अकारण का श्रमी होता ?" श्रीमंत बापूंना शांतपणे म्हणाले, "रामशास्त्री, तुमचा निर्णय पक्का असंच समजायचं ?"

"होय श्रीमंत. निर्णय एकदाच होतात न्यायमंदिरात. न्यायमंदिर म्हणजे राजकारणाचा खलबतखाना नव्हे." रामशास्त्री म्हणाले. बापूंनी रागानं डोळे फिरवले. श्रीमंतांच्या मुद्रेवर हास्य उमटलं.

"रामशास्त्री, आपण जरा असं पुढे या," खोकल्याची उबळ घशातच धरून ठेवीत श्रीमंत म्हणाले.

रामशास्त्री पुढे झाले आणि श्रीमंतांनी आपल्या गळ्यातील मोत्याचा कंठा काढून रामशास्त्र्यांच्या गळ्यात घातला.

"हे काय, श्रीमंत ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"न्यायाची कदर."

"श्रीमंत !"

"होय रामशास्त्री. तुमच्या निःस्पृहतेची खूण आहे ती. हे दान नव्हे की ही बक्षिसी नव्हे. ही आहे स्मृती. या प्रसंगाची. तुमच्या काटेतोल बुद्धिचातुर्याची.रामशास्त्री, आमच्या पश्चात, हा कंठा तुम्हाला या प्रसंगाची आठवण करून देईल आणि सांगेल की न्यायासनाची जागा नेहमी सत्तेच्या आसनाच्याही वर असते. शास्त्रीबुवा, तुमची निःस्पृह वृत्ती अशीच मराठी दौलतीच्या कामी येऊ द्या."

"श्रीमंत !" भारावलेल्या अंतःकरणानं रामशास्त्री म्हणाले.

बापूंच्या डोळ्यांपुढे मुंग्यांचं वारूळ फुटलं होतं. त्यांना काहीच दिसत नव्हतं ! ना श्रीमंत, ना रामशास्त्री.

* * *

"साऊ, बाळाच्या मातुःश्रींना म्हणावं चार दिवस झाले, आपण अन्नाला स्पर्श केला नाही. थोडं खाऊन घ्यावं."

"धनी, आईचं अंतःकरण हाय त्ये."

"होय ना. म्हणून तर आम्हाला त्यांच्यासमोर जाववत नाही. साऊ, तूच तिला खायला घाल. तिला रडव जरा. म्हणजे ती मोकळी होईल. डोहात पाणी तुडुंब भरलेलं असतं. तिच्या उरात दुःख आहे. डोह वाहिला पाहिजे. नदीच आटेल."

"धनी, मी चाकरमानी मोलकरीण. आपणच सांगा."

"मी... मी काय सांगू ? कोणत्या तोंडानं सांगू..."

श्रीमंतांनी दिलेला पाणीदार मोत्यांचा झुबकेदार कंठा खुंटीला लोंबत होता. तो ऐटबाज कंठा दिमाखानं त्याच्या धन्याकडे पाहत होता; पण त्याचा धनी आज त्याला जवळ घेण्याच्या मनःस्थितीत नव्हता. हा कंठा मिळाला; पण दैवानं कंठमणीच काढून घेतला...

चूल-बोळक्यानं खेळण्याच्या वयातच सूनबाई विधवा झाली. जानकीच्या काळजाचा तुकडा काळानं हिरावून नेला. प्रभुण्यांचा वंशदीप एक साधी फुंकर घालून त्यानं विझवून टाकला.

चार दिवस झाले होते. घर सुनं सुनं वाटत होतं. आप्त, सगेसोयरे सगळे समाचाराला येऊन गेले होते. आता घरात फक्त साऊ मोलकरीण होती. ती मात्र खरंच सावलीसारखी राहत होती. साऊला मायेचं, घरचं कुणीच नव्हतं. ती प्रभुण्यांकडेच, प्रभुण्यांकडची होऊन राहिली होती. जानकीबरोबर सावलीसारखी

राहायची.

"धनी, बाईंना जेवायला सांगता, तुमीबी गेले चार दिवस काय खाल्लंय ! पानावर बसता, चार शितं तोंडात गेली नाही तोच उठता."

"साऊ, अन्न खावंसंच वाटत नाही."

"तुम्ही तसे, अन् बाई अशा."

"साऊ, सूनबाई कुठाय ?"

"हाय माजघरात. त्या पोरीसाठी तरी तुमी खायला नको का ? कवळी वेल. करपून जायची बघा उन्हात. तिला सावली हवी मायेची धनी. तुमीच असं बसलात तर कुणाच्या तोंडाकडे बघावं लेकरानं ? धनी, उठा आता."

रामशास्त्री उठले. हातपाय धुऊन देवघरात गेले. तिन्हीसांज झाली होती. जानकीनं देवापुढे समई लावली होती. त्याच्या पिवळ्या प्रकाशात तिचा उदासवाणा चेहरा आणखी विषण्ण दिसत होता. श्रीमंत रमाबाईसाहेब समाचाराला येऊन गेल्या होत्या. त्यांनी जानकीला वाड्यातच राहायला बोलावलं होतं; पण त्यांनी बोलावलं म्हणून लगेच आपण जाणं हे युक्त नव्हे, म्हणून जानकीबाई गेल्या नव्हत्या.

"चल, जेवू या आपण," रामशास्त्री म्हणाले. तिघांचीही पानं घेतली होती. स्वयंपाकघरात तेलदिव्याचा तांबुसपिवळा प्रकाश होता. कडेला पानं, समोर चूल ढणढणत होती.

"सूनबाईला सगळं वाढ," रामशास्त्री म्हणाले.

"मला भूक नाही," सूनबाई म्हणाल्या. एवढीशी पोर. दुःख म्हणजे काय ते कळण्याचंही वय नव्हतं; पण नातं बदललं की वयही बदलतं म्हणतात. तशी जाण आली होती पोरीला आणि हसती खिदळती वनपरी असणारी ती मुलगी मुकी बाहुली झाली होती. सासू-सासऱ्यांबरोबर चार घास तिनंही पोटात ढकलले.

जेवणं झाली. रामशास्त्री ओसरीवर येऊन बसले. तशी पाठीमागून जानकी आली आणि म्हणाली,

"उद्या तिचा भाऊ येणार आहे. पाठवून देऊ या चार दिवस."

"चार दिवस कशाला ? चांगली महिना दोन महिने जाऊ द्या. नाही तरी या वातावरणात राहून तिचं कोवळं मन करपूनच जायचं."

“आणि मला वाटतं आपणही...”

“आपणही ? काय आपणही ?

“आपणही माहुलीला जाऊन येऊ चार दिवस.”

“माहुलीला ?”...

“का ? आपण येणार नसलात तर मी जाईन बापडी.”

“येईन. मलाही यायलाच हवं. पुढलं सर्व तिथंच करू.”

...सूनबाईला न्यायला तिचा भाऊ आला होता. दीड-दोन वर्षांपूर्वी आली तेव्हा कुमारी होती. काल-परवा सौभाग्यवती आणि आता... गंगाभागीरथी... पांढऱ्या कपाळानं माहेरी गेली बिचारी.

आणि मग रामशास्त्री आणि जानकी माहुलीला जायला निघाले. पालखी आणि मेणा तयार होते. भोई खांद्यावर जाड पंचे घेऊन सिद्ध होते. निघायची वेळ झाली होती.

“जानकी, तो कंठा घे तेवढा बरोबर.” रामशास्त्री म्हणाले.

“कंठा कशाला आता ? या प्रसंगी ?”

“दागिना म्हणून नव्हे. जागल्या म्हणून. जानकी, हा कंठा जवळ असला म्हणजे तो मला माझ्या कर्तव्याची याद देईल. भावनेच्या भरातून मला बाहेर आणील. असू दे तो जवळ. दागिना नव्हे तो.”

* * *

शनिवारवाड्यावरच्या नभांगणात एक पाखरू सारखं घिरट्या घालत होतं. एकटंच. मनोहारी रुपडं होतं त्याचं. ढगावर झेप मारायची होती त्याला. मग... फड्फड्फड्... कोण्या पारध्यानं त्याची पारध आरंभली होती. जीव वाचला होता; पण पंख जायबंदी झाला होता; पण पाखराची धडपड विलक्षण. उंच जाता येईल तेवढं जात होतं असहाय्यपणे खाली येत होतं. श्रीमंतांच्या महालासमोरच्या पुष्करणीवर दोन्ही पायांवर उभं राहत होतं. श्रीमंत टक लावून पाहत होते. रामशास्त्री शेजारी होते. बोलत कुणीच नव्हतं. रमाबाईसाहेब एकदा डोकावून गेल्याचं शास्त्रीबुवांनी पाहिलं; पण श्रीमंतांच्या समाधीचा भंग कोण करणार ?

इतक्यात...

पाखराचा चीत्कार ! जीवघेणी तडफड, धडपड...

मघाशी आभाळात होतं तेव्हा आभाळाचं राजेपण त्याच्याकडे आहे असं वाटत होतं. आता त्याच्यावरच आभाळ कोसळलं.

पाखरू खाली पडलं. चंचू उघडी. पंढुर पोट, लांबलेले पाय, निष्प्राण देह.

"पाखराला कोणी टिपलं तपास करा," हुजऱ्याला सांगितलं गेलं आणि थोड्याच वेळात हुजऱ्या आला. बदामी बंगल्यातून पाखरावर हा जीवघेणा आघात झाला होता. हे ऐकलं आणि मन आणि काया विद्ध झालेले श्रीमंत रावसाहेब आणखीच विव्हळ झाले.

"रामशास्त्री, या पाखरासारखी आमची अवस्था होणार."

"श्रीमंत, आपण फार बोलू नये. वैद्यांनी विश्रांतीची आवश्यकता आहे असं सांगितलंय. आपण थेऊरास जाणार ते सत्वर जावं."

"शास्त्रीबुवा, बदामी बंगल्यातून पाखरू टिपलं."

"ध्यानी आला आशय, श्रीमंत."

"पंख कापलेलं पाखरू आभाळात उंच जात होतं. केवढी भव्य आशा व किती मोठी महत्त्वाकांक्षा ! पण कुणाच्या तरी आसुरी आनंदाला त्याची महत्त्वाकांक्षा बळी पडली."

"श्रीमंत, आपण हे बोलू नये."

"मला बोलू द्या रामशास्त्री. आज आता नाही बोललो तर केव्हाच बोलता येणार नाही. आम्ही राजयक्ष्म्याचे रुग्ण म्हणजे मृत्यूच्या राजमार्गावरचे बिनीचे प्रवासी, आम्ही बोललंच पाहिजे. रामशास्त्री, कदाचित थेऊराहून शनिवारवाड्यात आम्ही परत येणारही नाही."

"श्रीमंत !"

"गजाननाच्या सहवासातच आमचा अंतकाळ असणार आहे. हा राजयक्ष्मा आमची सोबत तिथं सोडेल. ही फांदी मोडून पडेल आणि मग दुसऱ्या कुठल्या फांदीवर बसायला तो आतुर यमदूत निघून जाईल."

"श्रीमंत, मी काही मोकळ्या गोष्टी करायला इथं आलो. आपण जर असेच बोलणार असाल तर मला इथं बसता येणार नाही."

एवढ्यात राणोजीनं चाटण आणून दिलं. श्रीमंतांनी ते घेतलं आणि पुढं म्हणाले, "शास्त्रीबुवा, आम्ही नसलोच तरी जी प्रकरणं दप्तरी दाखल झाली आहेत ती निकाली काढा. तुम्हाला संपूर्ण अधिकार दिले आहेत आम्ही. केवळ

पेशवे नाहीत म्हणून कामकाज मंदावू नये."

"ते तसं कधीच होत नाही श्रीमंत. निदान न्यायालयात तरी."

"प्रभूंच्या प्रकरणाबाबत काय विचार केला आहे तुम्ही ?"

"प्रभूंना वैदिक कर्मं करण्याचे अधिकार असावेत, असंच माझं मत आहे."

"नाना आणि तुम्ही एकविचारे काय ते करा."

"आपण चिंता करू नये, श्रीमंत."

"आणि हे पाहा शास्त्रीबुवा, तुमच्या नावे पंधराशे रुपयांची रक्कम आमच्या खजिन्यातून तुमच्याकडे जमा करायला सांगितली आहे."

"ती कशासाठी, श्रीमंत ? प्रयोजन ?"

"शास्त्रीबुवा, तुम्ही बोलला नाहीत तरी तुम्हाकडील सर्व आम्हास आमच्या अंतर्गृहातून कळतं. शास्त्रीबुवा, कर्जाचा इतका भार तुम्ही वाहता आणि याची आम्हास मुळीच कल्पना नव्हती."

"पण श्रीमंत, ते माझं वैयक्तिक कर्ज आहे. त्याचा भार आपणावर. . ."

"शास्त्रीबुवा, आमच्या राज्याचा केवढा भार आपण वाहता आहात ! मग आम्ही आपला एवढा भार हलका केला तर ते आमचं कर्तव्यच आहे. तुम्ही काही मानू नये, रामशास्त्री."

"श्रीमंत, ही रक्कम मला स्वीकारता येणार नाही."

"जशी इच्छा ! एकूण तुम्हीसुद्धा आमच्या अखेरच्या दिवसांत आम्हाला कर्तव्यपूर्तीचा आनंद उपभोगू देणार नाही ?" श्रीमंत विषण्णतेनं म्हणाले.

"श्रीमंत, माझ्या म्हणण्याचा हेतू हा नव्हता. आपणाला वाईट वाटत असेल तर आपण केलेल्या कर्जनिवारणव्यवस्थेचा स्वीकार करायला मी आनंदानं तयार आहे; पण लोकापवाद येऊ नये ही इच्छा."

"लोकापवादाचं प्रयोजनच काय ? ही रक्कम आमच्या खासगीतून लावली आहे, रामशास्त्री !"

श्रीमंतांच्या थोर दिलाची पुन्हा एकदा रामशास्त्र्यांना साक्ष पटली. गुणग्राहक, कर्तृत्ववान आणि सहृदय सत्ताधीशाला थेऊरच्या वाटेवर निरोप देताना रामशास्त्र्यांच्या कठोर मनालाही पाझर फुटला.

* * *

थेऊरच्या श्री गजाननाच्या समोर, सभामंडपात श्रीमंतांचं आसन होतं. बेचैनी

वाढली होती श्रीमंतांची. इच्छारामपंत, राणोजी, श्यामा, स्वत: रमाबाई जातीनं श्रीमंतांची काळजी घेत होते. अतिश्रमानं खंगलेल्या माधवरावांच्या कर्पूरगौर कायेला राजयक्ष्म्यानं पुरं पोखरलं होतं. गजाननाच्या सान्निध्यात राहून वेदनाविव्हळ रावसाहेब दु:खाला विसरण्याचा प्रयत्न करीत होते; पण दु:खच तसं जीवघेणं होतं. तीव्र होतं. धन्वंतरींनी हात टेकावे असा प्रभाव होता रोगाचा. त्यातून दौलतीची चिंता. दादांचा भोग मनाला भुंग्यासारखा पोखरणारा. दादा नजरकैदेत होते. दौलतीचा कोसळता इमला सावरण्यात रावसाहेब यशस्वी झाले तरी घरची ही नात्यागोत्याची दौलत सांभाळताना त्यांचाच आयुष्याचा इमला खाली येऊ पाहत होता. दुखणं विकोपाला गेलं होतं.

अंतकाळी तरी गृहच्छिद्र बुजावं, समेट व्हावा, जरीपटका मानानं मिरवावा म्हणून रामशास्त्र्यांनी माधवरावांना लाखमोलाचा सल्ला दिला की, राघोबादादांना नजरकैदेतून मुक्त करावं.

आणि दादा मुक्त झाले. केवळ रामशास्त्र्यांच्या सल्ल्यामुळे! राज्य निर्नायकी होऊ नये, राज्यात बेदिली माजू नये म्हणून रामशास्त्र्यांनीच हा चतुर सल्ला दिला होता. श्रीमंतांनी तो मानला होता.

श्रीमंतांचे खास दूत गोविंदराव खासगीवाले तसं फर्मान घेऊन पुण्याला आले आणि त्यांनी दादांना थेऊरला येण्याविषयी विनंती केली.

वृत्तीनं चंचल पण मनानं भावकोमल असणारे दादा थेऊरास धावले. बरोबर गारद्यांची पलटण होतीच.

सभामंडपात श्रीमंत निरवानिरवीच्या गोष्टी करीत होते. एका लोडाला टेकून, दुसऱ्या हाताशी लोड घेऊन, शाल पांघरून रावसाहेव बसले होते. डोळे खोल, चेहरा पांढराफिकट, मधूनच खोकल्याची उबळ, नजर मात्र विलक्षण तीक्ष्ण. तीरासारखी धारदार आणि वेगवान.

"रामशास्त्री, आजवर या दौलतीच्या सेवेसाठी आपण मला साथ दिलीत. मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. नारायणाला सांभाळा. तो लहान आहे, हूड आहे. चुकलं तर त्याला पदरात घ्या आणि मोठेपणानं कारभार करा. बापू, रामशास्त्री, आमच्या दौलतीचं भूषण आहात तुम्ही. तुमच्यासारख्या श्रीमंत विभूतींच्या सहाय्यानं हा रथ आम्ही येथवर आणला."

"श्रीमंत, त्रास होईल असं बोलू नये आपण," रामशास्त्री कळवळ्यानं

म्हणाले. समोर रमाबाईंनी डोळ्याला पदर लावला होता.

"रामशास्त्री, आपलं न्यायदान निर्भीड, नि:स्पृह असं असतं. ते तसंच असू दे यापुढे. पेशवाईची इभ्रत त्यामुळेच वाढणार आहे."

राणोजी सांगत आला, "रघुनाथराव गारद्यांच्या फौजेसह माधवरावांच्या भेटीला येत आहेत."

वातावरण गंभीर झालं. पुतण्याच्या अंतकाळी भेटीला येताना काका फौजफाटा घेऊन येतात ! या भाऊबंदकीचा शेवट काय होणार याचीच चिंता प्रत्येकाला जाळत होती. ती वार्ता ऐकून तशाही अवस्थेत माधवराव संतापले आणि ओरडून त्यांनी सांगितलं,

"एकटे काकाच येत असतील तर माझ्या भेटीला पाठवा. सगळीकडे चौक्यापहारे बसवा आणि पुरा बंदोबस्त करा."

आज्ञेप्रमाणे अंमलबजावणी झाली. दादा हट्टाला पेटले होते. पुतण्या प्रेमाचा आणि गारदी मोहब्बतीचे ! मग काय, थेऊरच्या वाड्याबाहेर थोड्या अंतरावर मोठी चकमक झाली.

सुमेरसिंगाच्या तलवारीला राणोजीची तलवार भिडली. प्रकरण विकोपाला जाणार असं दिसताच रामशास्त्री रघुनाथरावांना सामोरे गेले आणि कमालीच्या कळवळ्यानं म्हणाले,

"श्रीमंत, आपण काय मांडलं आहे ? रावसाहेबांची अवस्था विकोपाला गेली आहे. आपल्या भेटीसाठीच केवळ त्यांनी तग धरली आहे. गारद्यांना मागं ठेवावं आणि श्रीमंतांच्या भेटीस सडे यावं."

रामशास्त्र्यांच्या भावकोमल शब्दांनी दादा द्रवले. त्यांनी बेत बदलला आणि भरल्या आवाजात ते म्हणाले,

"चला शास्त्रीबुवा, मला माधवला पाहू द्या. चला सत्वर."

रामशास्त्री आणि राघोबादादा वाड्याच्या देवडीतून आत सभामंडपाच्या दिशेनं येताहेत तोच पुन्हा गोविंदराव खासगीवाले घाबऱ्या घाबऱ्या आले आणि म्हणाले, "दादासाहेब, चलावं लवकर. श्रीमंत घाबरे झालेत. काका आले का म्हणून विचारताहेत."

रामशास्त्री आणि दादासाहेब लगबगीनं पुढे गेले आणि तशाही अवस्थेत पुतण्याला कवटाळून काका म्हणाले,

"माधवा, अरे काय तुझी ही अवस्था !"

दादांनी उपरण्यानं डोळे टिपले. रावसाहेबांना हुंदका फुटला.

अति त्रस्त, पीडलेले व्याकुळ माधवराव क्षीण आवाजात म्हणाले,

"काका, तुमच्या मायेचा स्पर्श झाला, कृतार्थ झालो. मृत्यूची वाट मोकळी झाली. आता सुखानं जातो मी."

"माधव, काय रे तुझं बोलणं ?" दादा सद्गदित होऊन म्हणाले.

"होय काका. मला आता बोलवत नाही. वेदनेनं अंग जाळलंय, भाजतंय मला. अंगाची लाही-लाही होतेय. काका, बापूंना, रामशास्त्र्यांना, इच्छारामपंतांना जवळ बोलवा."

श्रीमंतांच्या शय्येभोवती सारे जमले.

"रमा, गंगाजल आण," श्रीमंत म्हणाले.

राणोजीनं गंगाजलाचा कलश शेजारी तबकात ठेवला. सभामंडप शोकाकुल झाला. श्री गजाननाच्या साक्षीनं एक शोकनाट्य घडत होतं. घंगाळात घटिकापात्र ठेवलं होतं. ते बुडत चाललं होतं.

"काका, माझा हात हाती घ्या," रावसाहेब म्हणाले,

दादासाहेबांनी माधवरावांचा हात हाती घेतला आणि ते म्हणाले,

"माधवा, तू बरा होशील, माझी खात्री आहे."

"काका, मी बराच होणार आहे. मृत्यू मला खुणावतोय. काका, माझी अंतिम इच्छा पूर्ण कराल ?"

"माधवा, तुझा प्रत्येक शब्द मी कर्तव्यपूर्तीचा शब्द मानीन. तू इच्छा सांग माधवा. बोल रे !" काका व्याकुळतेनं म्हणाले.

"काका... नारायणाला पेशवा करा... आणि दौलतीचा सारा कारभार तुम्ही करा."

दादा चमकले. बापू थक्क झाले. मुत्सद्दी दिङ्मूढ झाले. दादांच्या डोक्यात वीज चमकून गेली. मनसुबा कोणता करून आले नि मागणी काय झाली !

माधवरावांनी नारायणाला निकट बोलवलं आणि नारायणाचा हात दादांच्या हाती दिला.

"माधवा, निश्चिंत हो. नारायण माझा आहे. तुझी इच्छा मी पुरी करीन, माधवा."

शब्द श्रीमंतांच्या कानी गेले. विव्हल मुद्रा तृप्त दिसू लागली. आग आग होणाऱ्या शरीराचा थंड काला झाला. निस्तेज नेत्रांत समाधान अवतरलं... "ग जा न नऽऽग जान नऽऽ"

ज्योत विझली. घटिकापात्र भरून बुडालं. मंडपात कल्लोळ माजला. थोर कर्तृत्व पार्थिवरूपात समोर शय्येवर होतं. . . आणि भविष्यकाळ कठोर कर्तव्यासाठी रामशास्त्र्यांना खुणावीत होता.

¤

# १३

दुःखमग्न शनिवारवाड्यात दरबार भरला होता. म्लान वातावरणाला उत्साहाची किनार लावण्याचा कोणी कितीही प्रयत्न केला, तरी रावसाहेबांच्या मृत्यूनं झालेल्या दुःखाचा विसर कुणाला पडला नव्हता. धगधगत्या चितेत पार्थिव रावसाहेबांच्या समवेत सती रमाबाई जळत आहेत या दृश्याला डोळ्यांपुढून बाजूला काढायचं म्हटलं तरी कुणी काढू शकत नव्हतं आणि तरीही सारे लोकाचार, रीती-रिवाज, कर्तव्यकर्म, व्हायलाच हवी होती. ती होत होती. दरबार हा त्यातलाच एक प्रकार !

दादांनी अंतकाळी रावसाहेबांना वचन दिलं होतं, "नारायण माझा आहे," दादा स्वतः साताऱ्याला गेले आणि नारायणासाठी त्यांनी छत्रपतींकडून पेशवाईची वस्त्रं आणली. राज्यकारभाराची प्रत्यक्ष जोखीम दादासाहेबांनी घेतली होती. 'सत्ताधीश आपणच आहोत, तख्ताधीश नारायण असेना का,' ही भावना दादांच्या मनात घर करून होती.

दरबाराची वेळ झाली होती. पेशव्यांचे सर्व सरदार, मानकरी, आप्त, राजकारणातल्या महत्त्वाच्या व्यक्ती, देशोदेशींचे दूत, असे लोक मोठ्या इतमामानं जमले होते. चिकाच्या पडद्याआड सौभाग्यवती गंगाबाई आणि आनंदीबाई होत्याच. नारायणरावांनी दरबारात प्रवेश केला तेव्हा त्यांच्याबरोबर मुख्य कारभारी सखारामबापू, न्यायाधीश रामशास्त्री आणि दादासाहेब होते. दरबारात पेशव्यांना उत्थापन दिलं. सारी मंडळी स्थानापन्न झाली. रघुनाथरावांनीच नारायण पेशवा झाल्याची घोषणा केली. आणि सर्व मानकऱ्यांनी गादीला राजनिष्ठेचे मुजरे करावेत, असं आवाहन केलं.

मधे अल्पकाळ गेला.

दरबार सारा स्तब्ध होता. कुणीच मुजऱ्याला उठेना. या नको असलेल्या शांततेचा भंग कुणी तरी करायला हवा होता. या शांततेच्या पोटात मोठं वादळ सामावलेलं होतं. मुजरा कुणीच केला नाही. कारण, रघुनाथराव स्वतःच गादीला मुजरा न करता खाली बसले होते. खरे तर त्यांनीही राजनिष्ठेचा मुजरा करायला हवा होता. रामशास्त्र्यांनी हे तत्काळ ओळखलं आणि विनम्रभावानं ते रघुनाथरावांना म्हणाले,

"श्रीमंत दादासाहेब, राजनिष्ठेचा पहिला मुजरा आपणच करायला हवा. तो मान आपलाच. त्यानंतर अवघे मानकरी आपापल्या मानाप्रमाणे मुजरा करतील. आपण मसनदीसमोर यावं, दादासाहेब."

सखारामबापू आणि दादासाहेब यांची नजरभेट. नजरा काही बोलल्या. तिकडे पडद्याआड आनंदीबाई अस्वस्थ झाल्या. दरबारात सर्वांच्याच मनातून थर्रकन एक लहर उमटून गेली.

बापूंच्या अंगाचा तिळपापड झाला होता. रघुनाथरावांच्या चेहऱ्यावर नाराजी होती. त्याला राग आणि नापसंती यांनी साथ केली होती. रामशास्त्र्यांनी पुन्हा एकदा आवाहन केलं तरी दादासाहेब आपल्या आसनावर बसलेलेच. रामशास्त्री काही बोलणार एवढ्यात क्रोधाविष्ट बापू म्हणाले,

"रामशास्त्री, रघुनाथरावदादा म्हणजे कोणी अन्य मानकऱ्याप्रमाणे मानकरी नव्हेत की पेशव्यांचे सरदार नव्हेत. ते पेशव्यांचे आप्त आहेत आणि वडीलकीच्या नात्यानं कारभार पाहणारे दुसरे स्वामीच आहेत."

रामशास्त्र्यांनी एकवार सखारामबापूंकडे रोखून पाहिलं आणि सुस्पष्ट आवाजात ते म्हणाले, "या गादीचा स्वामी एकच. बाकी सारे सेवक."

दरबारात बहुतांशांनी माना डोलावल्या. रामशास्त्र्यांना दाद दिली. तेव्हा रामशास्त्री पुन्हा म्हणाले, "दादासाहेब राज्यकारभार पाहतील आणि त्यांना मिळणाऱ्या पेशवेपदाच्या अधिकारांचा ते उपयोगही करतील; पण ते पेशवे होणार नाहीत. म्हणून मी नम्रपणे सांगतो की, दादासाहेबांनी गादीला मुजरा करावा आणि इतरांचा मार्ग मोकळा करावा."

तरीही दादासाहेब स्वस्थच ! ते सारखे बापूंकडे आणि वर आनंदीबाईकडे पाहत होते. शेवटी रामशास्त्री कडव्या स्वरात म्हणाले,

"दादासाहेब, आपण गादीला मुजरा केला नाही तर आपल्या हेतूविषयी आणि भूमिकेविषयी दरबाराला संशय येईल."

बापू अस्वस्थ झाले. वर आनंदीबाईंच्या डोळ्यांत अंगार फुलला. दादासाहेबांचा मनस्वी जळफळाट झाला; पण नाइलाज होता. शास्त्रीबुवांनी मर्मावर घाव घातला. तिरिमिरीत रघुनाथरावदादा उठले, पुढे गेले आणि अगदी नाखुषीनंच त्यांनी तीन मुजरे केले. रीतीप्रमाणे.

रामशास्त्र्यांनी सुस्कारा टाकला. रिवाजाप्रमाणे अन्य मानकऱ्यांनी मुजरे केले. नजराणे झाले. घोषणा झाल्या. शिंगतुतारी ललकारली. दरबार संपला. शनिवारवाड्याचा दरबार महाल मोकळा झाला.

* * *

"राणोजी, इकडे ये," रामशास्त्र्यांनी राणोजीला हाक मारली.

"रावसाहेबांचा विश्वासू म्हणून तुझीच नेमणूक नारायणरावांची देखभाल करण्यासाठी मुद्दाम केली आहे."

"जी हुजूर."

"तुझं इमान आता कसोटीला उतरणार आहे. डोळ्यांत तेल घालून लक्ष द्यायला हवं. चाणाक्षपणात तसूभरही उणं होईल तर घात होईल."

"हुजूर, नेक चाकराची निष्ठा नारायणरावांच्या पायांशी दाखल आहे."

"दादांची गारद्यांशी सोयरिक वाढली आहे. गारद्यांच्या प्रत्येक हालचालीकडे लक्षपूर्वक पाहा. रावांचा हूडपणाही संभाळून घे."

"हुजूर, राणोजी कशात कमी पडणार नाही याची खात्री असावी."

"राणोजी, तुझ्यासारखे चाकर हाच दौलतीचा आधार. वाड्यात विपरीत झालं, तर तुझ्या चाकरीचं इमान नष्ट होईल, राणोजी."

"हुजूर, माझ्या डोळ्यांदेखत तरी असं काही होणार नाही. रक्ताचा शेवटचा थेंब मातीला मिळेपर्यंत मी रावांच्या मागं सावलीसारखा राहीन."

"मला हेच हवंय राणोजी तुझ्याकडून. शनिवारवाड्यावरचं आभाळ झाकाळून आलंय... वादळाची लक्षणं आहेत. जरीपटका तुझ्या रखवालीत आहे, राणोजी."

"हुजूर ! स्वामीनिष्ठा बोलत नाही, करते."

"शाबास !"

* * *

"मिठू मिठू..."

"मिठू मिठू... वा ! काय गोड बोलतोय पोपट," नारायणराव म्हणाले.

"आपण सदरेवर जावं. रामशास्त्री आले आहेत," गंगाबाई म्हणाल्या.

"मग रामशास्त्र्यांना आपल्या महालात यायला बंदी आहे ?"

"राजकारणाची खलबतं खासगी महालात करायची ?"

"आवश्यक असेल तर तिथंही करायची."

"आणि योग्य नसेल तर तिथंसुद्धा करायची नाहीत," गंगाबाई हसून म्हणाल्या आणि नारायणरावही मोकळं हसले.

"हा सोनेरी पिंजऱ्यातला हिरवा रावा गोडा बोलतो का महालाच्या चौकटीत उभ्या असलेल्या तुम्ही गोड बोलता तेच कळत नाही."

"कळत नसलं तर सावकाश सांगेन. शास्त्रीबुवा इकडेच येताहेत वाटतं. आपण तो पिंजरा कोपऱ्यात ठेवावा. राणोजी, पिंजरा ठेव."

"राणोजी, रामशास्त्री येत असतील तर त्यांना आतच बोलाव."

"जी हुजूर !"

रामशास्त्री धीमेपणानं आत आले.

"बोला रामशास्त्री, आज आम्ही अत्यंत आनंदात आहोत. काय सेवा करू मी आपली ? का येणं केलं ?" नाटकीपणानं नारायणराव म्हणाले.

"श्रीमंत, आपण आता पेशवे आहात. आता जरा प्रौढपणा धरावा अंगी," रामशास्त्री शांतपणे पण थोड्या निश्चयी स्वरात म्हणाले.

"बरं बरं. प्रौढपणा धरतो. सांगा, काय म्हणणं आहे," नारायणराव म्हणाले आणि गंगाबाई निघून गेल्या.

"श्रीमंत, प्रभूंच्या प्रकरणी आपण जो अन्यायकारक निर्णय केला..."

"रामशास्त्री, कसला अन्याय ? कुठलं प्रकरण ? प्रभू कोण ?"

"आपणाला काहीच स्मरत नाही असं दिसतंय; पण मला स्मरण करून द्यायला हवं. श्रीमंत, प्रभू जमात शेकडो वर्षं या भूमीत सन्मानानं राहत आहे. चार आतताई मंडळींनी त्यांच्यावर उठल्यासुठल्या ग्रामण्ये करावीत हे आपल्या राजवटीला शोभेसं नाही. आपण अधिक दक्षतेनं सर्व पाहायला हवं."

"शास्त्रीबुवा, या प्रकरणी आम्ही आपलाच सल्ला घेतला होता."

"हो. घेतला होता; पण मानला नाही."

"शास्त्रीबुवा, आम्हाला दादांनी आणि काकूंनी सांगितलं की जुने मोडू नये आणि नवे करू नये अशी शाहू छत्रपतींची रीत ! ती आपण पाळली पाहिजे."

"श्रीमंत, ही गोष्ट ग्राह्यच आहे; पण विवेक आणि सदसद्विवेकबुद्धी याची संगत अशाही वेळी सोडून चालणार नाही."

"ती आम्ही सोडली असं आपणाला कसं वाटतं, शास्त्रीबुवा ?"

"सक्तीनं तळघरात परभांना कोंडण्याचा हुकूम आपलाच ना?" रामशास्त्र्यांनी नारायणरावांच्या डोळ्यांत रोखून पाहत म्हटलं.

यावर नारायणराव काहीच बोलले नाहीत.

"श्रीमंत, त्यांच्याकडून कतबा कसा लिहून घेतला ? कुणी घेतला ?"

"कसला कतबा ?"

"वेदोक्त धर्माचे कसलेही अधिकार प्रभूंना नाहीत असा ?"

"शास्त्रीबुवा, कतबा वगैरे आम्ही जाणत नाही. हा प्रकार आमच्यापरोक्ष आमच्या संमतीविना झाला आहे."

"श्रीमंत, हुकमावर आणि नंतर कतब्यावर आपली सहीनिशाणी शिक्का आहे, मग अपरोक्ष घडलं कसं ?"

"ते दादांना व कारभाऱ्यांना विचारा. त्यांनी सांगितलं आम्ही निशाणी दिली."

"श्रीमंत, राज्यकर्त्याच्या हातून हा बेजबाबदारपणा त्याच्या स्थानाला शोभेसा नाही. आपण सहीनिशाणी द्याल त्यावरील मजकुराचीही जबाबदारी आपलीच असते श्रीमंत !"

"पण प्रभुग्रामण्याबाबत गंगापुराहून मातुःश्रींचाही निरोप आला होता की, प्रभूंचा योग्य तो नीट बंदोबस्त करावा."

"श्रीमंत, रावसाहेबांनी रास्त्यांच्या प्रकरणाबाबत कोणता निर्णय घेतला होता आणि मातुःश्री गंगापुरास का गेल्या हे आपण जाणताच. राजकारणास नाती ठाऊक नसतात, नसावीत; कारण राजकारण हे प्रजेसाठी असतं श्रीमंत. रावसाहेबांच्या मार्गानं आपण चालायला हवं."

नारायणराव यावर काही बोलले नाहीत. त्यांना रामशास्त्र्यांविषयी काहीही वाटत असलं तरी कोणतीच भावना दर्शविता आली नाही; कारण शास्त्रीबुवांचा दबदबा तसा फार ! त्यांची भूमिका न्यायी आणि त्यांच्या शब्दाला निश्चयाचं

बळ !

"श्रीमंत, प्रभूंच्या प्रकरणी मी आपणाला फेरविचार करण्याची विनंती करतो. प्रभूंना वेदोक्त धर्माचे सर्व अधिकार असले पाहिजेत, प्रभू सर्व वैदिक कर्मे करू शकले पाहिजेत असं मला वाटतं."

"हा निर्णय मी तुमच्यावर सोपवतो रामशास्त्री," नारायणराव म्हणाले.

"मग विलंब कशाला ? तसा फतवाच काढून टाकावा." रामशास्त्री म्हणाले.

* * *

गणेश महालातल्या गजाननाच्या मूर्तीला अलंकारांनी विभूषित केलं होतं; पण ते अलंकारदेखील त्या क्रूर हत्याकांडात उडालेल्या रक्तानं लडबडून गेले होते. शनिवारवाड्याच्या दालनातून रक्ताचा सडा पडला होता. चिरेबंदी जमीन त्या रक्ताला दिमाखानं वागवत होती. जिथं भुई होती तिथं जमीन रक्त पिऊन फुगली होती. मस्तवाल गारद्यांनी वाड्यात कल्लोळ केला होता. रघुनाथरावांच्या साक्षीनं. ते वाड्यात हजर असताना ही कत्तल घडली.

दिल्ली दरवाजाची देवडी दुःखमग्न झाली होती. नऊ स्वामिभक्तांची प्रेतं भोताखाली झाकून पडली होती. नारोजी नाईकाच्या गळ्यावरून सुमेरसिंगाची रक्तपिपासू तलवार करवतीप्रमाणे फिरली होती.

श्रीमंत नारायणरावांच्या शवाला विधिपूर्वक अग्नी देण्यात आला होता. दादांच्या देखत कोवळ्या नारायणाची हत्या झाली होती. 'काका मला वाचवा !' म्हणत असतानाही काका पुतण्याला वाचवू शकला नव्हता. काकाच्या देखत पुतण्याच्या शरीराचे तुकडेतुकडे झाले होते. वृक्षाच्या साक्षीनं त्याला बिलगलेली वेल नराधमानं निपटून काढली.

आनंदीबाईंच्या गळ्यातला कंठा सुमेरसिंगाच्या गळ्यात जायला बघत होता. आनंदीबाईंच्या महत्त्वाकांक्षेची पहाट उगवली होती; आता वैभवाचा सूर्य लवकर प्रकाशणार होता. पण... आनंदीबाईला कुठं ठाऊक होतं की, सूर्यापूर्वीही एक अढळ असा तारा उगवलेला असतो— शुक्रतारा !

* * *

नारायणाच्या चितेचा अग्नी अजून पुरता विझला नाही तोच राघोबादादांच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी होत होती. रक्तानं लाल झालेली शनिवारवाड्याची अंगणं, चौक सडा-रांगोळ्यांनी सुशोभित करण्याचं फर्मान

सुटलं होतं. सुतक न पाळता सोहळ्याच्या तयाऱ्या चालू होत्या आणि अश्रुविमोचनाऐवजी आनंदोत्सवाची लयलूट होत होती.

रामशास्त्री अस्वस्थ होते.

ज्या राज्यात रामशास्त्री न्यायाधीश, त्या राज्यात असा विलक्षण थरारक प्रकार घडावा ना ! पण पुरावा !...

रघुनाथरावांचे खुषमस्करे त्यांचा जयजयकार करीत होते. लोभी कुत्र्यांची एक लाचार पिलावळ राघोबांच्या अवतीभवती जमा झाली होती आणि त्यांच्यापुढे तुकडे टाकून त्यांना घरच्यांवर भुंकायला लावण्याची पुण्यप्रद कामगिरी आनंदीबाई करीत होत्या.

रीतीप्रमाणे दरबार भरणार होता.

अमृतराव-बाजीरावांनी वस्त्रं आणण्याची व्यवस्था केली होती. रघुनाथरावांच्या पेशवेपदाची द्वाही आज फिरणार होती. पेशवाईची वस्त्रं ग्रहण करणार होते दादा.

...आणि पुण्यात !

उघड किंवा, मोठ्यानं बोलत कुणीच नव्हतं, पण दवंड्या ऐकल्या, फर्मानं पाहिली, की डोळ्याला डोळा भिडत होता. कानाशी तोंडं जात होती. आणि मग...

"ऐकलंत ? गुढ्यातोरणं उभारावीत अशी आज्ञा करण्यात आली आहे."

"आज्ञाच ! आपण होऊन कोण उभारणार ?"

"अहो, त्यांच्या विजयाच्या नौबती ऐकू येण्याऐवजी आम्हाला तर नारायणरावाच्या किंकाळ्याच ऐकू येताहेत."

"आणि हा दरबार ? छे, कट शिजवणारा खलबतखानाच म्हणा."

"गुढ्या उभारताहेत ! गारद्यांच्या तलवारीच उभ्या करा म्हणावं मेलेल्यांची मुंडकी अडकवून !"

"गुलालाऐवजी रक्त आहेच सांडलेलं."

"बऱ्याच लोकांनी तोरणं लावलीत हो."

"अहो, करता काय ? मर्जी संपादायला हवी नं ?"

"पण रामशास्त्र्यांनी म्हणे स्वच्छ सांगितलं."

"काय सांगितलं ?"

"श्रीमंतांच्या मृत्यूचं सुतक आहे. गुढीसारखं मंगलचिन्ह माझ्या घरावर मी मुळीच उभारणार नाही."

"कमाल आहे हं रामशास्त्र्यांचीही."

"गारद्यांच्या तलवारी रामशास्त्र्यांनी बघितलेल्या दिसत नाहीत."

"तलवारीला भिऊन तडजोड करणारा माणूस नाही रामशास्त्री म्हणजे."

"नसेल; पण अजून गारदी आहेत वाड्यात."

"असू दे हो, बोलू नका. चला उद्योगास जावं. आपण असं बोलतो असा नुसता संशय आला तरी आपली तीच गत व्हायची."

* * *

रामशास्त्री अस्वस्थ होते.

घराच्या दिवाणखान्यात नुसते फेऱ्या मारत होते. दरबारचं आमंत्रण तर होतंच. जायलाही हवं होतं; पण मन घेत नव्हतं. रामशास्त्र्यांना मनातून आश्चर्य वाटत होतं ते लोकांचं. एका काकानं आपल्या पुतण्याचा खून करवला होता. एका सत्तालोलुपानं दुसऱ्या माणसाचा वध केला होता, तरी लोक स्वस्थच होते. कारभारी, सैनिक, व्यापारी, सेवक, व्यावसायिक. . . सारे सारे स्वस्थ होते आणि त्यातलेच काही जण तर बेभानपणे आनंदोत्सव साजरा करीत होते.

पुरावा हवा !

दादासाहेबांवर आरोप ठेवायचा तर पुरावा हवा.

रामशास्त्री अस्वस्थपणे फेऱ्या घालीत होते. दूरवर आभाळात कुणाच्या तरी इमल्यावरची गुढी त्यांच्या डोळ्यांना खुपत होती. सनई-चौघड्यांचे आवाज कानांना कर्णकर्कशश वाटत होते.

एवढ्यात जानकीनं सांगितलं, "मागल्या दरातून शामा आलीय."

श्यामा ! रमाबाईंची दासी. खरी तर पेशव्यांची बटिक; पण जिवाभावाची सेविका.

श्यामा घाबरी दिसत होती. तिचा तजेलदार चेहरा अतिश्रमानं थकल्यासारखा वाटत होता.

पाठोपाठ राणोजी आला. राणोजी घायाळ होता. विद्ध होता. रक्ताळलेल्या जखमा त्याच्या शरीरावर दिसत होत्या. श्यामा आणि राणोजी. पती-पत्नी ! साधे सेवक; पण त्यांनी पेशव्यांच्याच पायांशी आपली निष्ठा रुजू केली होती.

"शास्त्रीबुवा, हा कागद आणलाय. वाचा."

"कसला कागद राणोजी ? आणि तुला हे काय झालं ?"

"हुकूम ! दादासाहेबांचा."

"कसला ?"

"रावांस मारण्याचा. मी चकमक करून हस्तगत गेला अन् श्यामा पुढे घेऊन आली. म्हटलं माझं काही बरं-वाईट झालं तर माझ्याबरोबर पुरावा नष्ट व्हायला नको."

तो कागद रामशास्त्र्यांनी वाचला आणि...

त्यांचे डोळे विस्फारले. उल्कापात झाल्यासारखं वाटलं त्यांना.

ज्या पत्रानं पेशवाईच्या शांततेचा वध केला, ज्या पत्रानं सत्तालोलुपांचं कारस्थान यशस्वी झालं, ज्या पत्रानं गर्भवती गंगाबाईचा नवरा तिच्यापासून कायमचा हिरावून नेला ते पत्र...

तो यमदूताचा हुकूमनामा रामशास्त्र्यांच्या हाती होता.

आता याहून सबळ पुरावा कोणता हवा होता ?

राणोजी आणि श्यामा निघून गेली.

रामशास्त्री तडक उठले. पत्र अंगरख्याच्या आतील बाजूस जपून ठेवलं आणि गंभीरपणे ते जायला निघाले.

"केव्हा यायचं होणार आहे ?" जानकीनं विचारलं.

"दरबार संपल्यावर," रामशास्त्र्यांनी तुटकपणे उत्तर दिलं.

"आज आपलं चित्त ठिकाणावर नाही."

"आहे. ठिकाणावरच आहे."

"लपून किती ठेवावं माणसानं ? चेहरा सांगतो ना."

"जानकी, खरं आहे तू म्हणतेस ते."

"काय ?"

"जानकी, देवाजवळ प्रार्थना कर."

"काय करू ?"

"माझ्यासाठी धैर्य मागून घे."

"ते न मागताही परमेश्वरानं आपल्याला दिलंय."

"पण आता नव्यानं मागायला हवं. आज मला त्याची नितांत आवश्यकता

आहे, जानकी." अंतर्मुखतेनं रामशास्त्री म्हणाले.

"मी तर कधीचंच ते ओळखून आहे. कालच अनंतभट्टांना अभिषेक करायला सांगितला देवाला."

"जानकी, आणखी लघुरुद्रसुद्धा सांग... कदाचित..."

"काय कदाचित ?"

"कदाचित आज— आज दरबारातून मी परतही येणार नाही."

"बाई ग ! काय मी ऐकते !" दोन्ही कानांवर हात ठेवीत जानकी भयभीत चेहऱ्यानं म्हणाली, "मग आपण जाऊच नये."

"न जाऊनही चालणार नाही. पापाचा एवढा मोठा पुरावा माझ्यापाशी आहे. आता कठोर न्याय करणं आवश्यकच आहे."

"मला काही समजत नाही त्यातलं. माझं एवढंच मागणं आहे, माझ्या बळकट कुंकवाला धक्का न लागावा."

"तो लागायचा असला तर राहणार नाही आणि लागायचा नसला तर कल्पान्त झाला तरी लागणार नाही; पण मला माझं कर्तव्य बजावलंच पाहिजे. एक कुंकू पुसलं गेलंय या कागदानं. त्याची दखल घ्यायला हवी."

असं म्हणून रामशास्त्री बाहेर पडले आणि हळव्या जानकीनं डोळ्यांना पदर लावला.

* * *

वाड्यात उत्सवाची नुसती गर्दी चालली होती. स्मशानात शृंगारनृत्य करून जीव आणावा, ओढूनताणून, तसं चाललं होतं.

हेरंब महाल माणसांनी फुलून गेला होता. आज दरबार इथंच होता. महालात ठेचून माणसं होती. मानकरी, कारभारी, सरदार, दरकदार, निमंत्रित, प्रतिष्ठित नागरिक...

आनंदीबाई पडद्याआडून सर्वांच्या चर्या बारकाईनं न्याहाळीत होत्या. कुणाच्या चेहऱ्यावर कोणता भाव उमटतो ते त्यांना निरखून बघायचं होतं. आज महत्त्वाकांक्षा फळाला आली होती ना त्यांची.

भालदार-चोपदार आले... ललकारले... रघुनाथरावांच्या आगमनाची आणि दरबार-प्रवेशाची सूचना मिळाली...

दरबारातील यच्चयावत मंडळी उठून उभी राहिली. धीमी पावलं टाकीत

हास्यवदनानं रघुनाथराव दरबारी आले.

पंतप्रधान रघुनाथराव पेशवे आले.

आनंदीबाईच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. अमृतराव-बाजीराव प्रमुदित झाले. पेशव्यांची मसनद समोर होती. तेथपर्यंत मुजरे घेत-घेत दादासाहेब पुढं जाऊ लागले. मसनदीवरील आसनावर बसण्यासाठी त्यांनी एक पाऊल उचललं...

आणि ते किंचित बावरल्यासारखे झाले.

"आज रावांची आठवण येत आहे," कंठभरल्या आवाजानं दादासाहेब म्हणाले.

"श्रीमंत, शोक आवरला पाहिजे. आता आपण पेशवे आहात. प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानलं पाहिजे आपण," सखारामबापू घाईघाईनं म्हणाले. त्यांनी दादासाहेबांचा हात धरला आणि त्या आधारानं ते त्यांना मसनदीवर बसवू लागले. तोच—

"थांबा !" रामशास्त्र्यांचा खणखणीत आवाज.

त्या शब्दात, शब्दाच्या दोनच अक्षरांत विलक्षण जरब होती, जोर होता, ती एक प्रकारे दरडावणीच होती, निश्चय होता.

अवघ्या दरबारानं मागं वळून पाहिलं.

आणि सर्वांना दिसले ते रामशास्त्री प्रभुणे ! पेशवाईचे मुख्य न्यायाधीश. पुढे येत रामशास्त्री म्हणाले, "पेशवाईचा मुख्य न्यायाधीश या नात्यानं पेशव्यांना गादीकडे नेण्याचा आणि मसनदीवर बसविण्याचा मान माझा आहे."

दादासाहेब दोन पावलं मागं झाले आणि मग सखारामबापू आणि इतर कारभारीही मागं सरकले.

रामशास्त्र्यांनी रघुनाथरावदादांचा हात धरला आणि पुढं जाता-जाता ते म्हणाले, "चलावं श्रीमंत. ही पेशव्यांची मसनद. थोरल्या बाजीरावांपासून तो नारायणरावांपर्यंतच्या सर्व पेशव्यांची ही मसनद. श्रीमंत, ही मसनद नारायणरावांचीही. ज्या नारायणरावांचा सांभाळ करण्याचं वचन आपण अंतकाळी रावसाहेबांना दिलं होतं त्यांचीच ही रिकामी मसनद आपली आतुरतेनं वाट पाहत आहे."

रामशास्त्र्यांच्या शब्दांत विलक्षण उपहास होता. छद्मीपणा होता. दादासाहेब थबकले आणि नुसतं म्हणाले, "शास्त्रीबुवा !"

"चलावं श्रीमंत. त्या पाहा ! बाईसाहेब आपणाला या मसनदीवर पाहण्यास

उत्सुक झाल्या आहेत. चलावं. मसनदीचा रंग हिरवाच आहे, लाल नाही," रामशास्त्र्यांच्या या उद्गारांनी तर दादासाहेब आणखीच चमकले आणि. . . पडद्याआडून आनंदीबाई संतापातिशयानं ओरडल्या, "बापू, हे बंद करा."

रघुनाथरावांचा चेहरा फिकट दिसू लागला आणि ते मागं-मागं सरकू लागले. तेव्हा आनंदीबाई कडवटपणानं पण निश्चयानं म्हणाल्या,

"आपण मसनदीवरील गादीवर बसावं."

दरबारचं वातावरण तप्त, गंभीर झालं होतं आणि मग आतापर्यंत उपहासानं, सूचकपणे बोलणाऱ्या रामशास्त्र्यांनी उघड बोलण्यासाठी उग्र रूप धारण केलं. रामशास्त्री खड्या आवाजात म्हणाले,

"श्रीमंत रघुनाथराव पेशवे मसनदीवर बसणार नाहीत; कारण ते पापी आहेत."

अवघा दरबार हादरून गेला. त्वेष, भीती, संताप, औत्सुक्य, आश्चर्य ! किती तरी भावभावनांचे संमिश्र कल्लोळ !

"शास्त्रीबुवा, तुम्ही भानावर आहात का ?" आनंदीबाई किंचाळल्या.

"श्रीमंत रघुनाथरावांचे हात नारायणरावांच्या रक्तानं रंगलेले आहेत."

"प्रत्यक्ष पेशव्यांचा त्यांच्याच दरबारात अपमान ?"

"बाईसाहेब, आपण आत व्हा. मी बोलतो याला मजपाशी पुरावा आहे," रामशास्त्री शांतपणे ठासून म्हणाले.

"नाही शास्त्रीबुवा, मी नारायणाचा खून नाही केला," दादासाहेब बावचळून म्हणाले.

"मग काय नारायणरावांनी आत्मघात केला ?" त्यांच्याकडे रोखून पाहत रामशास्त्र्यांनी विचारलं.

"या गारद्यांच्या गोंधळात तो मारला गेला."

"मारला गेला ? आणि म्हणून त्यांना मानाचे कंठे आणि शिरपेच दिलेत ? तुमच्या जोड्याशी उभं राहण्याची या रक्ताला चटावलेल्या राक्षसांची पात्रता नाही; त्यांना तुम्ही शिरपेच बहाल केलेत ?"

आता मात्र रामशास्त्री पुरे क्रोधाविष्ट झाले होते. रामशास्त्र्यांनी गारद्यांचा जो उल्लेख केला त्यानं गारदी खवळले. सुमेरसिंग तलवार उपसूनच आला; पण दादासाहेबांनी त्याला थांबवलं, आणि ते म्हणाले, "रामशास्त्री, सैल जिभेनं उगाच

आरोप करू नका."

"शास्त्रीबुवा, तुमचा पुरावा सादर करा," घोरपडे सरदार म्हणाले आणि मग रामशास्त्री सर्वांना उद्देशून बोलू लागले–

"दरबारी मानकऱ्यांनो, मीं पेशवाईचा न्यायाधीश ! भक्कम आणि सबळ पुराव्याशिवाय मी कधीच बोलणार नाही. पुरावा हवा म्हणालात ना ? हा घ्या पुरावा," असं म्हणून रामशास्त्र्यांनी दादासाहेबांच्या हस्ताक्षरातलं त्यांच्या सहीशिक्क्याचं ते हुकूमपत्र दरबारला दाखवलं. आणि सगळे लोक विस्मयचकित झाले. रामशास्त्री वाचू लागले–

राजेश्री सुमेरसिंग खरकसिंग इसुफखान जोरावरसिंग गारदी जमादार निसबत, खासा हुजुरत यासी तुम्ही समक्ष कबूल केल्याप्रमाणे रावास मारावे त्याबद्दल तुम्हास पाच लक्ष रुपये रोख आणि नगर, पुरंदर व साष्टी हे तीन किल्ले देण्याचा करार केला असे..."

"थांबा शास्त्रीबुवा," घोरपडे आवेशानं म्हणाले, "आम्ही आशय समजलो. सहीशिक्का पाहिला. आता अधिक वाचू नका. याचा निकाल त्वरित झाला पाहिजे."

हा अनन्वित आणि अनुचित प्रकार पाहून दरबारी लोकांची मनं बदलून गेली. पेशवे राघोबा त्यांना आता उघडपणे पापी दिसू लागले. शिंद्यांनी तर उघडउघड तसा आरोप केला. न्यायाची मागणी केली आणि त्वरेनं तो देण्यासाठी रामशास्त्र्यांना सांगितलं.

दादा बाईसाहेबांइतके मनानं कणखर नव्हते. दादा बुजले, बावरले. वाड्याबाहेर माणसांची तोबा गर्दी उसळली होती. दरबारात हे प्रहसन चाललं होतं. सोहोळा संपला होता. आता पंचनामा.

एका बाजूला गारद्यांची टोळी हातात नंग्या तलवारी घेऊन पुढच्या हुकमाची वाट पाहत उभी होती, तर दुसऱ्या बाजूला शिंदे आणि आणखी इज्जतदार सरदारही जय्यत तयारीत होते. मसनदीच्या अवतीभवती दादासाहेब, बापू, नाना, रामशास्त्री, घोरपडे, शिंदे, नारोजी नाईकाचा मुलगा, ही सारी मंडळी होती. बायकांच्या घोळक्यात आनंदीबाई रागानं फुणफुणत होत्या. या वातावरणाचा दादासाहेबांच्या मनावर ताण पडला आणि अवचितपणे ते बोलून गेले–

"शास्त्रीबुवा, रावास धरावे असा हुकूम होता. मारावे असा नव्हता."

"कागदावर मारावे असाच हुकूम आहे," रामशास्त्री म्हणाले.

"शास्त्रीबुवा, याची शहानिशा करायचीच असेल तर अशी आणि या प्रकारे करता येणार नाही," आनंदीबाई ओरडल्या.

"शास्त्रीबुवा, माझ्या हातून प्रत्यक्ष अनुचित कर्म घडलं नसलं तरी मीच त्याला जबाबदार असेन तर प्रायश्चित्त घ्यायची माझी तयारी आहे. आपण प्रायश्चित्त सांगा. विधिपूर्वक मी ते घेईन आणि मगच मसनदीवर बसेन," राघोबादादा अगतिकपणे म्हणाले.

"प्रायश्चित्त तर घ्यावंच लागेल. पेशव्यांची मसनद विटाळता कामा नये. दादासाहेब, प्रायश्चित्तास आपण सिद्ध आहात ?" रामशास्त्रांनी त्यांच्याकडे रोखून पाहत विचारलं.

"होय शास्त्रीबुवा. मी आनंदानं तयार आहे. ब्राह्मणभोजनं, होमहवन, दानधर्म, विधिव्रते, काय सांगाल ते करू; पण यातून मुक्त होऊ."

"श्रीमंत दादासाहेब, आपल्या हातून पेशवाईचे धनी श्रीमंत नारायणराव यांची हत्या घडली आहे. . ."

"रामशास्त्री ! सबूर !" बापू त्वेषानं ओरडले.

"कारभारी, न्यायदानाच्या कामी आपण स्वस्थ असावं. श्रीमंतांनी विचारल्यावरून मी त्यांना प्रायश्चित्त-विधी सांगत आहे."

"शास्त्रीबुवा, तीर्थयात्रा करून यायला सांगितलीत तरी करू. आम्हांला काही मसनदीवर जाण्याची त्वरा नाही."

"तीर्थयात्रा ?" रामशास्त्री उपहासानं म्हणाले, "तीर्थयात्रेनं या पापाचा नाश होणार नाही. पायपिटीनं आणि जलस्नानानं आपल्या अंगावरील ही धूळ जाणार नाही. श्रीमंत, अशा प्रकारचं कोणतंही दिव्य आपल्या आघोरी पापाचं परिमार्जन करू शकणार नाही."

"मग सांगा, कोणतंही दिव्य करायला सांगा."

"होय. दिव्यच करावं लागेल. फार मोठं दिव्य !"

"ऐका श्रीमंत ! प्रायश्चित्त कोणतं ते ऐकण्यासाठी आपल्या मनाची तयारी करा. या पापाला एकमेव प्रायश्चित्त म्हणजे देहान्त शासन."

देहान्त शासन ! दरबार दचकला. आनंदीबाईंच्या कपाळाच्या शिरा ताड्ताड् उडू लागल्या. राघोबांनी डोळे विस्फारले. डोकी सुन्न झालीं सगळ्यांची.

आनंदीबाई संतापातिरेकानं ओरडल्या,

"सुमेरसिंग, खरकसिंग, बघता काय, बेड्या ठोका या पढिक पंडिताला आणि कैदखान्यात बंदिस्त करून ठेवा."

सुमेरसिंग, खरकसिंग पुढं सरकू लागले. तसे शिंदे पुढे झाले. त्यांची तलवार खरकसिंगाच्या तलवारीला भिडली आणि ते म्हणाले,

"शास्त्रीबुवांच्या केसालाही धक्का लागेल तर ही तलवार तुमच्या रक्तानं रंगेल आणि या दरबारात इथं गारद्यांच्या प्रेतांचा खच पडेल."

शिंद्यांच्या आवेशपूर्ण इशाऱ्यानं गारदी खचले; कारण शिंदे तसे मातब्बर होते. त्यांना मानणारे दरबारात कितीक होते.

रामशास्त्री म्हणाले, "शिंदे, आपण का कष्ट घेता ? कैदखान्यातच काय पण स्वर्गातही जायची आम्ही सिद्धता केलेली असते तेव्हाच आम्ही न्यायासनावर बसतो."

राघोबादादा कळवळून म्हणाले,

"शास्त्रीबुवा, माझ्या हातून जे नकळत घडलं त्यासाठी देहान्त प्रायश्चित्ताशिवाय आणखी एखादं प्रायश्चित्त असेल तर सांगा."

"श्रीमंत, न्यायाला पर्याय नसतो. मी पुन्हा एकदा निःसंदिग्धपणे सांगतो, आपल्याला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय गती नाही."

"काय ? खरंच नाही ?"

"नाही. त्रिवार नाही."

"श्रीमंतांनी हे प्रायश्चित्त नाही घेतलं तर ?" बापू म्हणाले.

"नाही घेतलं तर तो न्यायदेवतेचा अपमान होईल. लोकहो, दादासाहेब या मसनदीवर बसणार. खुनी, पापी आणि बाईलबुद्ध्या असा हा चंचल पेशवा या गादीवर येणार. पेशव्यांच्या या पवित्र गादीवर हे पाप असेपर्यंत मी या पुण्यात, या राज्यात पाणीही पिणार नाही. मला निरोप द्या."

रामशास्त्री हेरंब महालाच्या दरवाजाच्या दिशेनं जाऊ लागले. लोकांनी त्यांना वाट करून दिली. सरदारांनी मानाचे मुजरे केले. त्यांच्या जात्या आकृतीकडं दादासाहेब दिङ्मूढ नजरेनं पाहत होते. लोक भारावून गेले होते.

रामशास्त्री बाहेर पडताच आनंदीबाईंनी सुटकेचा निःश्वास टाकला. रामशास्त्री शनवारवाड्याबाहेर आले. बाहेर जमलेल्या हजारो लोकांनी त्यांच्या नावाचा जयजयकार केला. न्यायाची बूज राखणारा निःस्पृह न्यायशास्त्री !

अन्यायाचा कठोरपणे परामर्ष घेणारा निर्भीड धर्मज्ञ ! त्यांच्या उदात्त कृतीला जनतेनं उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता.

* * *

दरबारातून थेट घरी आले रामशास्त्री. अंतःकरणात आग भडकली होती. लाचार आणि स्वार्थी कारभारी, पापी पेशवा, मतलबी स्त्री आणि सारे असेच काही. त्यांना या सगळ्याचा वीट आला होता. कुणीकडे ती श्रीमंत रावसाहेबांची राजवट आणि कुणीकडे हा आपमतलबी गोंधळ ! रामशास्त्र्यांना पुण्यात राहण्याची इच्छा नव्हती. घरी येताच ते जानकीला म्हणाले,

"जानकी, जाण्याची तयारी कर."

"कुठं ?"

"कुठंही. जगाच्या पाठीवर."

"पाठ फार मोठी आहे जगाची."

"पण पुण्यात नको."

"चालेल. मी आपली सावली. आपण पुढे, मी मागं."

"तीर्थयात्रेला जाऊ. मन शांत होईल."

"आणि नंतर मग ?"

"पुढचं पुढे हरी जाणे."

"माझ्या मनात एक ठिकाण आहे."

"सांग. बसायला फांदी तर हवी."

"पांडववाडी. वाईजवळची."

"चांगली जागा आहे."

"केव्हा निघायचं ?"

"आत्ताच. साऊला सांग. आम्ही आता लवकर येणार नाही म्हणावं."

"सांगते. बरोबर काय घेऊ ?"

"लज्जेपुरती वस्त्रं, एक वेळचं अन्न. आणखी काही नको."

"मग तयारी झालीच आहे. निघायचं ?"

"निघू या. पेशव्यांच्या वस्त्रग्रहणाच्या तुताऱ्या व्हायच्या आत पुण्याची वेस ओलांडायला हवी !"

¤

# १४

कृष्णेच्या तीरावर वाईच्या सावलीत वसलेली पांडववाडी म्हणजे लहानशी टुमदार वसाहतच. नानांच्या मेणवलीपासून पांडववाडी अर्धा कोस अंतरावर. दक्षिणेला कृष्णा नदी आणि उत्तरेला पांडवगड किल्ला. पांडवगडाच्या उतरणीवर पांडववाडी वसलेली. वाडीची भूमीच अशी की, एखाद्या घराच्या दारात किंवा अंगणात उभं राहून महाबळेश्वराच्या पर्वतापासून चंदन-वंदन, किल्ल्यापर्यंत कृष्णेनं आपल्या डाव्या-उजव्या अंगाला वागवलेलं सौंदर्य आणि निसर्गानं निर्माण केलेली श्रीमंती पाहता यावी. एकान्त आणि एकाग्रता हवी असेल तर पांडववाडीतला निवांत अनुभवावा.

रामाजी नारायण कोल्हटकर या सत्पुरुषानं काही काळ पांडववाडीला निवास केला होता.

अशा या पांडववाडीत रामशास्त्री येऊन राहिले आणि त्यांच्या अस्वस्थ मनाला बरीच स्वस्थता लाभली. वाई, धोम, बहिरवगड, पांडवगड, पलीकडे महाबळेश्वर . . अशा रम्य परिसरात रामशास्त्री राहू लागले. आता रोजच्या राजकारणाचा तापजाळ नव्हता, की खटल्याखोकल्यांची कटकट नव्हती. रामशास्त्री स्वयंनिर्णयानं दिनक्रम ठरविण्यास मुक्त होते. पांडवगडाच्या पायथ्याला त्यांची जीवनगंगा संथपणे वाहत होती.

अशा या दूरवरच्या ठिकाणी पुण्याच्या वार्ता क्वचितच येत. आल्या तरी त्या विकृत रूप घेऊन येत. त्यामुळे शनिवारवाड्यात नेमकं काय घडतंय ते कळायला मार्ग नव्हता.

जानकीबाई आणि रामशास्त्री. दोघंच राहत होते पांडववाडीला. एक दिवस रामशास्त्री पांडवगडावर गेले होते. आज गडावर वाईची काही पंडितमंडळी येणार होती. रामशास्त्र्यांना यायला बरच वेळ होणार होता. सकाळी गेलेले रामशास्त्री माध्यान्ह होऊन दिवस कलला तरी आले नव्हते.

आणि इकडे घरी एक अतिथी केव्हाचा येऊन वाट पाहत होता. जानकीबाईंना अतिथीची माहितीच नव्हती. अतिथीनं आपण होऊन सांगितलं होतं, “राम येईपर्यंत मी थांबणार आहे.”

आणि ‘धोमला जाऊन येतो,’ असं सांगून निघून गेला अतिथी.

रामशास्त्री आले आणि त्यांनी पाहिलं...

प्रथम ओळखलं नाही; पण... नजरभेट झाली. ओळख पटली.

“अनंतभट्ट, केवढा रे दिसू लागलाय ?” रामशास्त्री म्हणाले.

“आणि तू तरी काय लहान दिसतोस आता ! आणि आता तर काय, पेशव्यांचा मुख्य न्यायाधीश तू,” अनंतभट्ट आनंदानं म्हणाला.

“अरे, असतोस कुठं ? करतोस काय ?

“सारं सांगतो. सावकाशीनं”

“आता आल्यासारखा निवांत चार दिवस राहा.”

“राहणार आहे. मग मला उत्तरेत जायचं आहे.”

“जायची बात आत्ताच नको.”

“नको तर नाहीच करीत.”

तब्बल एका तपानंतर मित्र भेटत होते. सोबती एकमेकांना मिळाले होते. अनंतभट्टानं उत्तरेत मोठी ख्याती संपादन केली होती. बाळंभट पायगुंडे कैलासवासी झाले होते, त्यांची पाठशाळा आता अनंतभट्ट पाहत होता. अनंतभट्टाला दक्षिणेत यायला फुरसतच झाली नव्हती आजपर्यंत. रामशास्त्र्यांना भेटायची आतुर इच्छा होती त्याला; पण पाठशाळेची देखरेख, विद्वत्सभांची आमंत्रणं आणि अन्य कार्यांत त्याला फुरसतच झाली नाही; पण या वेळी अंनतभट्टानं ठरवलं होतं कर्नाटकात जाताना पुण्याला जाऊन यायचंच. पुण्याला आल्यावर त्याला सारी हकिगत समजली होती आणि तिथून त्यानं पांडववाडीला कूच केलं होतं.

चार दिवसांनी अनंतभट्ट गेला तेव्हा रामशास्त्र्यांना हुरहूर लागली.

काशीतले ते दिवस आठवले. स्मृतीची पानं चाळली. त्या ज्ञानमय पवित्र वातावरणात त्यांनी पुन्हा एकदा प्रवेश केला आणि केवळ आठवणीसाठी चार दिवस सुखाचे काढले.

* * *

"पुण्याहून स्वार आला आहे."

"कधी ?"

"सकाळचाच आलाय."

"थैली आणि लखोटा आलाय ?"

"हो. हे पाहा इथं कोनाड्यात."

रामशास्त्र्यांनी थैली उघडली. आत पत्र होतं—

॥ श्री ॥

वे. शा. सं. रा. शास्त्रीबाबा स्वामीचे सेवेसी विद्यार्थी सखाराम भगवंत याचा कृ. सा.न. वि. येथील वर्तमान वैशाख शु ॥ ४ पर्यंत यथास्थित असे. विशेष आम्ही पुरंदराहून निघोन सातारियास आलो. श्रीमंत महाराज राजश्रींची भेट जाली. उदईक पंचमीस रविवारी वस्त्रे श्रीमंतास होतील. त्या उपरी येथून पुरंदरास जाऊ. त्यांस आपण निघोन पुरंधरी यावे. येथून आपणाकडे माहादाजी रामचंद्र पाठविले आहेत. हे सांगतील ते ध्यानात आणोन पुरंधरी यावे."

प्रत्यक्ष सखारामबापूंचं पत्र ! रामशास्त्र्यांना जरा आश्चर्यच वाटलं. गंगाबाई प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न लाभलं होतं आणि पुण्यात बारभाई प्रकट होऊन त्यांनी दादासाहेबांना दोषी ठरवलं होतं. नवजात बालकाला पेशवा करून त्याच्या नावानं बारभाई कराभार करणार होते.

शास्त्रीबुवा पत्राप्रमाणे पुण्यास व पुरंदरास गेले; पण पुन्हा न्यायासन स्वीकारण्यासाठी त्यांचं मन घेईना. न्यायात ढवळाढवळ आणि हस्तक्षेप त्यांना सहन होण्यासारखा नव्हता. नाना आणि बापू यांना त्यांनी तसं स्वच्छच सांगून टाकलं.

कसब्याच्या गणपती मंदिरात नाना भेटले तेव्हा शास्त्रीबुवा म्हणाले,

"नाना, आता पद स्वीकारण्यास मन धजत नाही."

"शास्त्रीबुवा, आपल्यासारखी माणसं हाच तर पेशवाईचा पडत्या काळातला आधार. शनिवारवाडा तुमची सेवा मागतोय. शास्त्रीबुवा."

"शनिवारवाडा मागतोय ? पण कारभाऱ्यांना हवीय का ती ?"

"त्याशिवाय का आम्ही आपल्याला एवढ कळवळून विचारतो ?"

"पण कारभाऱ्यांचा हस्तक्षेप बहुत !"

"तो होणार नाही याची आम्ही जातीनं खबरदारी घेऊ."

"आणि बापू ?"

"बापूंचंही तेच. त्यांनीच तर महादजीला पाठवून आपणास पुरंदरी बोलावलं ना ! शास्त्रीबुवा, मनात विकल्प आणू नये. आम्ही हे व्रत घेतलंय. आपणही आपल्या सेवेचं पानफूल वहावं."

"ते तर आमचं कर्तव्यच आहे कारभारी; पण आम्हाला तसा हवाला हवा. तोही तोंडी नको."

थोडा वेळ थांबून नाना म्हणाले,

"शास्त्रीबुवा, आपण येथून घरी परतण्यापूर्वी आमच्या सहीशिक्क्याची हवालापत्रं तुमच्या घरी पोचली असतील."

आणि तसंच झालं. नानांच्या पत्रात स्पष्ट हवाला होता आणि बापूंचं पत्रंही अगदी बमोजीब होतं—

॥ श्री ॥

वे. शा. स. रा. शास्त्रीबाबा स्वामींचे सेवेसी वि. उपरी सांप्रत मनसुब्या होतात यात आपणास चौघांचा उपरोध पडतो. याजमुळे शेवटास जात नाही. ऐशास आम्ही आपले तर्फेने शपथपर्वक हे पत्र आपणास लिहिलं आहे. येविसी संशय न धरता आपणही शपथपूर्वक ईश्वर स्मरोन आमची अगर दरबारात चार मातबर आहेत त्यांची भीड न धरता न्याय करून विल्हेस लावीत जावे. या उपर आळस करू नये. रा ॥छ १९ रजब लो. अ. दी. हे विनंति.

आणि मग वेदशास्त्रसंपन्न शास्त्रीबाबा रामशास्त्री पुन्हा न्यायासनस्थ झाले. आता त्यांच्या न्यायमंदिरात कुणाची ढवळाढवळ होणार नव्हती. हस्तक्षेप नव्हता. न्यायासन मुक्त होतं, स्वतंत्र होतं, स्वयंभू होतं; कारण कारभाऱ्यांनीच ते तसं ठेवण्याचा निश्चय केला होता.

भाद्रपदाचा उगवता सप्ताह ! गणेशोत्सवाची तयारी शनिवारवाड्यात चालली होती. श्रीमंत सवाई माधवरावांना पुरंदरावरच ठेवण्यात आलं होतं. त्यामुळे उत्सवाचा थाट पुरंदरीच होता; पण वाड्यातही रीतीप्रमाणे उत्सव साजरा व्हायला हवा म्हणून अगदी थाटामाटात नाही तरी पूजाविधी आणि कथाकीर्तनादी होऊन उत्सव साजरा केला जात होता.

या वेळी एका हरदासी स्त्रीला पाचारण करण्यात आलं होतं. बाई होती तिसगावाची बहुश्रुत आणि जनसामान्यामध्ये बाईचा फारच बोलवा होता. पहिल्याच श्लोकात बाई छाप पाडते असा लौकिक. गळा गोड, विवरणाची धाटणी आकर्षक आणि लोकांसमोर येण्याचं धैर्य म्हणून बाईनं भल्याभल्या कीर्तनकारांना मागं टाकलं होता.

या वर्षी वाड्यावर बाईचं कीर्तन होणार होतं. पुरंदरी असलेले नाना, बापू, रास्ते हेसुद्धा बाईच्या कीर्तनासाठी मुद्दाम पुण्यास आले होते. श्रींच्या विसर्जनासाठी त्यांना पुन्हा पुरंदरी जायचं होतं. ललिताच्या दिवशी मोठा समारभं पुण्यात होत असे तो आता गडावर व्हायचा होता. आता शनिवारवाड्यात केवळ हरिकीर्तन !

रोषणाई मात्र विशेष केली होती. नक्षीदार गालिचे आणि रुजामे, लोड, तक्के, बैठका आणि हरिदासीबाईसाठी पोस अंथरला होता. दोन्ही बाजूला साथीला बसणारे वादक. आरतीसाठी नीरांजनं-तबकं तयार होती. बुक्का-गुलाल चांदीच्या वाट्यांतून भरून ठेवलेला होता. हरिदासीबाईंनी कीर्तनास सुरुवात केली.

रामशास्त्री, नाना, बापू लोडाला टेकून बसले होते. समोर काही बायका पण होत्या. त्यांत जानकीबाई येऊन बसल्या.

पूर्वरंग संपला. बाईंनी आख्यान सुरू केलं. आख्यानाचा ओघ आला स्त्रियांवर. बाई आख्यान रंगवून सांगत होत्या.

"स्त्रियांना कामवासना फार नाही. पुरुषांच्या मानानं कमीच. पूर्वयुगी ही स्थिती विशेष करून होती. तरीसुद्धा जेहेत्ते कालाचे ठायी, त्या युगी पुनर्विवाहास संमती होती. पुनर्विवाह शिष्टसंमत होता आणि कलियुगात पुनर्विवाहाचा निषेध केला आहे. या विसंगतीला काय म्हणावं ? काय स्त्री बदलली का तिचा काम वाढला ? पण याची संगती लागत नाही. मनाला पटत नाही."

बाईंनी गार्गी, मैत्रेयी, शर्मिष्ठा, देवयानी, सीता, द्रौपदी यांच्यावरून एकदम या विषयावर उडी मारली. आख्यानातून तत्त्वचिंतनात बाईंनी प्रवेश केला. आणि तो करता करता तोल नाही संभाळला. बाई पुढे म्हणाल्या, "काम वाढला तरी निषेध करणं शोभत नाही. शास्त्रीबुवांसारखे धर्मशास्त्रज्ञ, तत्त्वविमर्षक इथं उपस्थित आहेत, त्यांनीच या गोष्टीचा मेळ घालावा."

बाईंनी कीर्तनकाराची भूमिका सोडून एकदम प्राश्निकाची भूमिका घेतली आणि सभेचा रागरंग बदलला. सभाजन आश्चर्यचकित झाले. एरवी इतर सभांतून कीर्तनकारानं सांगायचं आणि इतरांनी ऐकायचं, तर आज या सभेत कीर्तनकारच इतरांना प्रश्न विचारीत होता.

शास्त्रीबुवा काय उत्तर देतात याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं होतं. वास्तविक शास्त्रीबुवांना या ठिकाणी बोलायचं नव्हतं; पण बाईंनी प्रश्न केलाच होता. त्याचं उत्तर देणं आवश्यक होतं. संकेत सोडून बोलणं भाग होतं.

"कलिनिषेध लिहिणारे कोण होते ?" शास्त्रीबुबांनी विचारलं.

"कलिनिषेध तर पुरुषांनी लिहिला," बाई उत्तरल्या.

"ठीक. बाई, पुरुषांनी त्यांना भावलं तसं लिहिलं. लिहिताना त्यांनी फार विचार केला नाही आणि स्त्रियांच्या सुखदुःखाचा विचार तर कोणीच केला नाही. स्त्रियांना दुःख असतं हे कोणी जाणलंच नाही. स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे असंच सर्वांनी मानलं. तेव्हा बाई, याचा मेळ बसत नाही. पूर्वयुगात स्त्रियांना पुनर्विवाहास संमती होती, तेच योग्य होतं. कलिनिषेध निषेधार्हच आहे."

रामशास्त्र्यांच्या या निर्णयानं ही सभा चकित झाली. शास्त्रीबुवा असं काही बोलतील असं कुणालाच वाटलं नव्हतं. शास्त्रीबुवांना धर्ममार्तंड समजणारे तथाकथित बुजुर्ग धर्ममार्तंड मात्र शास्त्रीबुवांवर रोष धरून राहिले; कारण शास्त्रीबुवांच्या मतामुळे या स्थितिप्रिय लोकांना धक्काच बसला आणि काही तरी करून शास्त्रीबुवांशी हमरीतुमरी करायची, वादविवाद करायचा आणि त्यांची भरसभेत नाचक्की होईल, असा कावा करायचा योजूनच मंडळी बाहेर पडली.

आबा कसबेकर नानांना भेटायला आला, या बुजुर्ग ब्राह्मणाचं म्होरकेपण आबांकडे होतं.

"अलीकडे प्रभुणे शास्त्रीबुवा अवास्तव आणि वायफळ बोलू लागले

आहेत. त्यांचा समाचार घ्यावा लागेल आम्हाला. त्याआधी आपण त्यांचा बंदोबस्त करावा नाना," आबा नाना फडणिसांना म्हणाले.

"बंदोबस्त करा म्हणजे काय करू ? त्यांना जेरबंद करू ?"

"वेळ पडली तर तेही करावं."

"ते कठीण आहे. कारण शास्त्रीबुवा न्यायास धरून बोलतात."

"आम्ही एवढी सारी मंडळी या पक्षी असताना शास्त्रीबाबा न्यायाला धरून बोलतात असं आपण कसं म्हणता, नाना ?" आबांनी जणू काही आपण रोकडा सवाल विचारला अशा थाटात उत्तर दिलं.

"आबा, माणसांच्या संख्येवर न्याय अवलंबून असता तर जगात पेंढाऱ्यांचा न्यायच मानला गेला असता," नाना आबांकडे रोखून पाहत म्हणाले.

"मला तसं नव्हतं म्हणायचं; पण. . ."

"मग काय म्हणायचं होतं ?"

"प्रभू ग्रामण्य प्रकरणात शास्त्रीबुवांनी योग्य निर्णय केला नाही."

"तो केला नाही असं मी म्हणणार नाही. आबाशास्त्री, तुम्हाला सांगायचं असलं तर रामशास्त्र्यांना स्वत:च का नाही जाऊन सांगत ?"

"जाईन. स्वत:च जाईन. आणखी काही ब्राह्मणांना घेऊन जाईन आणि ब्रह्मवृंदांदेखत शास्त्रीबुवांना आम्ही याचा जाब विचारू," आबाशास्त्री तापून म्हणाले.

"आबा, मग आता असंच जा शास्त्रीबुवांच्या वाड्यावर," नाना हसून म्हणाले.

आणि खरोखरीच सारी मंडळी शास्त्रीबुवांच्या वाड्यावर आली. शास्त्रीबुवा मागील अंगणात चाफ्याच्या झाडाला पाणी घालत होते, तर जानकीनं सांगितलं, "ब्रह्मवृंद भेटायला आलेत."

"कोण कोण आहेत ?"

"आबा कसबेकर तेवढे मला ठाऊक."

"ठीक. आलोच."

हात पुसत शास्त्रीबुवा बाहेर आले. जाजमावर पाचपंचवीस लोक दाटीवाटीनं बसले होते. त्यांच्या पुढ्यात आबाशास्त्री होते. रामशास्त्र्यांनी सर्वांना हसून नमस्कार केला आणि आत सागितलं,

"अतिथी आले आहेत. काही आहारप्रबंध करा."

"शास्त्रीबुवा, आम्ही खाण्यासाठी किंवा शिळोप्याच्या गोष्टी करण्यासाठी आलो नाही," आबा फणकाऱ्यानंच म्हणाले.

"आपण कोणत्याही कारणासाठी या. मला माझा गृहस्थधर्म पाळला पाहिजे. आज या निमित्तानं एवढे मोठे आणि इतके ब्राह्मण माझ्या घरी आलेत. त्यांच्या आतिथ्याचं पुण्य मी दवडू म्हणता ?"

"आतिथ्याचं पुण्य तुम्हाला हवं आणि धर्मशास्त्राविरूद्ध निर्णय देऊन ते पापही तुम्हाला हवंच !"

"म्हणजे ?" शास्त्रीबुवा आश्चर्यानं म्हणाले.

"प्रभूंच्या बाबतीत तुमचे निर्णय आणि तुमची मतं शास्त्रविसंगत आहेत."

"अस्सं. म्हणजे या बाबतीत तुम्ही बोलणार आहात तर !" रामशास्त्री हसून म्हणाले.

एवढ्यात फराळाची ताट आली. शास्त्रीबुवांनी ती मधे ठेवली आणि ते म्हणाले "घ्या. आधी पोटोबा करू. मग काय कलागती करायच्या असतील त्या करू."

आबाशास्त्री आणि इतर मंडळींनी नाही नाही म्हणत ताटावर ताव मारला. मंडळी तृप्त झाली आणि नंतर आबाशास्त्र्यांनीच विषय काढला.

"शास्त्रीबुवा, प्रभूंना वेदोक्तकर्माचे अधिकार असावेत का नसावेत याविषयी बरीच वर्षं खल चालू आहे. तुमचं काय म्हणणं आहे ?"

"इतकी वर्षं खल करून वेळ वाया घालविण्यासारखा हा प्रश्न नाही."

"शास्त्रीबुवा, तुम्ही आडव्यात जाऊ नका. माझ्या प्रश्नाचं साफ-साफ उत्तर द्या. तुम्ही आणि नाना, या दोघांनी धर्माचा ऱ्हास चालविला आहे."

"आबा, आपला धर्म इतका क्षुद्र आहे ? केवळ आम्ही दोघांनीच काही केल्यावर त्याचा ऱ्हास होतो ?" रामशास्त्री उपहासानं म्हणाले.

"प्रभूंना वेदोक्त अधिकार आहे असं मत देऊन तुम्ही पाप केलंय."

"प्रभू काय माणूस नाहीत, आबा ?"

"माणूस आहेत; पण ब्राह्मण नाही."

"मग ब्राह्मण माणूस नाही ?"

"विकृत प्रश्न !" आबा झटक्यात म्हणाले.

"मग मला सांगा, प्रभूंनी श्रावणी करू नये असं आपण म्हणता ते कोणत्या आधारावर ?" रामशास्त्र्यांनी खडसावून विचारलं.

"शास्त्राच्या आधारावर," आबा फणकारले.

"शास्त्र कोणी पाहिलं आहे ? तुमच्यापैकी एकानं तरी."

सर्वांच्या माना खाली होत्या. अगदी आबाशास्त्र्यांची मानसुद्धा.

"प्रभूंस अधिकार नाही म्हणता. शास्त्र पाहिलेलं नाही. बोलण्याला आधार नाही. आबाशास्त्री, तुम्ही करता हे परिणामाचे नव्हे."

"मागिलांनी केलं ते आम्ही बोलतो."

"मागे यमाजीपंती केलं ते शेवटास गेलं नाही. नारायणरावसाहेबांनी केलं तेही शेवटास गेलं नाही, तर तुम्ही काय पदार्थ ?" रामशास्त्र्यांनी आबाशास्त्र्यांना काहीशा तीव्र स्वरात विचारलं.

आबा निरुत्तर झाले. बरोबरीचे ब्राह्मण अवाक् झाले. मग रामशास्त्री सर्वांना समजावणीच्या सुरात म्हणाले,

"आपण ब्राह्मणांनी असा आततायीपणा करू नये. प्रभूंना श्रावणीचाही अधिकार आहे. नाही असं शास्त्रात कुठंही सांगितलेलं नाही. मला तर असं कळवण्यात आलं आहे की, ब्राह्मण कथेकऱ्यांनी प्रभूंवर बहिष्कार घालून त्यांच्याकडे कथा करू नये असं ठरवलं आहे. आबा, हे खरं का ?"

"होय. खरं आहे."

"आणि कारण तरी किती क्षुद्र ! ब्राह्मण कथेकरी उभा राहून कथा करतो आणि प्रभू श्रोते बसलेले असतात ! या हरिकीर्तनाच्या बाबतीतही आमच्या मनात असा दुजाभाव असावा ना ? आबाशास्त्री, खऱ्या ब्राह्मण धर्माला हे शोभणारं नाही. बोला मंडळी, तुमचं काय म्हणणं आहे यावर ?"

कोण काय म्हणणार आणि उत्तर तरी काय देणार ! रामशास्त्र्यांच्या बिनतोड युक्तीवादापुढं तोंड उघडण्यास कुणी धजावलाच नाही आणि तेव्हापासून चार-पाच दशकं चाललेला कायस्थ प्रभूंचा वाद कायमचा मिटला.

* * *

"अहो, मला कसंसंच होतंय बघा."

एका अशुभ संध्याकाळी जानकीबाई रामशास्त्र्यांना म्हणाल्या.

"वैद्यांना बोलावतो. औषध घेतलंस की चटकन उतार पडेल."

“नको. माझं हे दुखणं औषधानं बरं होईल असं नाही मला वाटत.”

“आज काय बोलतेस तू जानकी असं ?”

“हो, काही काही माणसांना मरण कळतं म्हणतात.”

“बोलू नकोस फार. साधा ताप आला म्हणून मृत्यूची गोष्ट कशाला करायला हवी ?”

“पाय घसरून पडलेल्यालाही मृत्यू येतो आणि डोंगरावरून पडला तरी जगतो. आयुष्यरेषा उसवली की...” जानकीबाईंचा स्वर विषण्ण होता.

“मी वैद्याकडे जाऊन येतो.”

“आज तुम्ही कुठंही जाऊ नका. ऊर धडधडतोय माझा. मला आधार हवाय, सोबत हवी. वैद्याकडे जाऊ नका. मला एकटं वाटतं.”

“मग साऊला पाठवतो.”

“तिला तरी बिचारीला कशाला यातायात.”

. . .संध्याकाळ भरत चालली होती. करकरीत तिन्हीसांज झाली होती. सांजवाती लागल्या होत्या. स्नानसंध्येला ब्राह्मण बसले होते. घराघरांत ओट्याओसऱ्यांवर मुलं परवचा म्हणत होती. कुणी तरी चिमण्या आवाजात म्हणत होती—

दिव्या दिव्या दीपत्कार, कानी कुंडलं मोतीहार
दिव्याला देखून नमस्कार ।
दिवा जळो देवापाशी, माझा नमस्कार तुळशीपाशी ।

रामशास्त्र्यांच्या घरात दीपत्कार नव्हताच. शुभंकरोती म्हणायलाही कुणी नव्हतं. बाळ केव्हाच गेला होता. बाळाची आई आता बाळाच्या मार्गानं चालली होती.

रामशास्त्री वैद्याकडून परत आले...

साऊनं डोळ्यांना पदर लावला होता. प्रभुण्यांच्या घराच्या वृंदावनातली तुळस गळून पडली होती.

“धनी, बाई जाताना मला सांगून गेल्या...”

“काय सांगून गेल्या, साऊ ?”

“म्हणाल्या, ह्यांना म्हणावं माझ्या माघारी तुमचे हाल होतील. तुम्ही... तुम्ही दुसरं लग्न करा...”

साऊचा पदर तिच्या डोळ्यांतल्या पाण्यानं चिंब भिजला.

रामशास्त्र्यांच्या डोळ्यांनाही कधी नव्हे तो ओलावा आला आणि त्यांनी डोळ्यांना उपरणं लावलं.

* * *

"शास्त्रीबुवांनी म्हणे लगेच विवाह उरकून घेतला."

"लगेच ! अहो, हिची चिता विझायच्या आत त्यांनी बोहोल्यावर जायची व्यवस्था केलीसुद्धा."

"काही तरी काय बोलताय पंत. रामशास्त्र्यांच्या बायकोनंच तशी इच्छा व्यक्त केली होती मरताना. त्यांची ती साऊ आहे ना, तिला विचारा."

"अहो, हे आपलं सांगायला झालं; पण शास्त्रीबुवांना स्वस्थ बसवलं नाही हेच खरं."

"पेशव्यांची बहाल मर्जी बुवा या ब्राह्मणावर."

"कशी काय ?"

"आहो, एकीला जाळण्यासाठी पंधराशे रुपये दिले आणि दुसरीला जोडण्यासाठी तीन हजार रुपये बक्षीस दिलं."

"वा ! याला म्हणतात भाग्य !"

"भाग्य त्यांचं आणि दुर्भाग्य तुमचं-आमचं."

"नव्या स्त्रीचं नाव काय हो ?"

"काशीबाई."

"नाव पवित्र आहे. कुणाची हो ?"

"ते काही माहीत नाही हो."

"पंत, रामशास्त्र्यांबद्दल काही वेडंवाकडं आणि असं उघड्या जागी बोलू नका. खप्पा मर्जी होईल शनिवारवाड्याची."

"मोठा कावेबाज माणूस दिसतोय हो. सगळे फायदे मिळवतो आणि तरी पुन्हा निःस्पृह ! कमाल आहे त्याच्या चातुरीची."

"अहो चातुरी कसली ? त्यांचा अधिकारच आहे तेवढा मोठा."

"मग निःस्पृह कसले ? दिमतीस शागीर्द असतात, चोपदार असतात, खिजमतगार आहेतच, आसाराम जमादार शास्त्रीबावांकडेच असतो."

"आणि या सर्वांचा खर्च सरकारातून होतो."

"मग या माणसाला कर्ज का असावं ?"

"काही कळत नाही, काय गौडबंगाल आहे ते."

"पण माणूस अगदी धुतल्या तांदळासारखा हो !"

"आणी कफल्लक."

"पण संसारात व्यवहारशून्य आणि उदासीन !"

"सदा घर भरलेलं. माहुलीच्या कुळवाड्यापासून तो काशीच्या ब्राह्मणापर्यंत कुणी ना कुणी यांच्या वाड्यावर सतत असतोच."

"आणि मग कर्जाचे डोंगर उभारले जातात."

"आहो, डोगर केवढे का होईनात. पेशवे आहेत ना ते डोंगर जमीनदोस्त करायला. म्हणजे कर्ज फेडायला. यांना काय चिंता."

"तसा त्यांना खर्च काहीच नाही हो. मोठेपणाच्या नावाखाली सारं काही सुव्यवस्थित होत. आहो, घरी काही सणवार असू द्या, समारंभ होऊ द्या, त्रिंबकजी गुरवाकडून हजार हजार पत्रावळी वाड्यावर पोचत्या होतात. देणं नास्ती, घेणं नास्ती !"

"नास्ती कसं, त्या मोबदल्यात दुसरं काही त्रिंबकला मिळतच असणार. याशिवाय एवढ्या पत्रावळी पुरवायला तो काय वेडा आहे ?"

"इकडं परभांच्याकडून सन्मान घ्यायचा; इकडं ब्राह्मणांत धर्मशास्त्री म्हणून मिरवायचं अशी दुहेरी तऱ्हा आहे यांची. चला, त्यांच्यासारखं आपल्याला थोडंच जमतंय ? आपल्याला अभिषेकाशिवाय दक्षिणा कोणी देणार आहे ?"

¤

# १५

"काशीबाय, सांभाळ घराला. गोपाळालाबी अन् गोपाळाच्या बापालाबी. काशीबाय, वीस वर्सं या घरात काढली. जाववत नाही. पर जायाला हवं. डोळं काम देत न्हाईत आता."

रामशास्त्र्यांच्या वाड्यात वीस वर्षांहून अधिक काळ घालवलेली साऊ काशीबाईंना सांगत होती.

जानकीबाई घरात आली तेव्हा साऊ होतीच, जानकी गेली तेव्हाही साऊ होतीच. काशीबाईंनाही साऊची सावली होतीच; पण साऊला आता काम होत नव्हतं. तिचा मुलगा चांगला कर्तासवरता होता. कोल्हापुराकडे पेठेत राहायचा. त्यानं आता तिला घेऊन जाण्याचं ठरवलं होतं.

साऊ चालली होती.

"लुगडी किती दिलीत ?" रामशास्त्र्यांनी काशीबाईला विचारलं.

"साऊसाठी आठ आणि सुनेसाठी चार. नवे कोरे सणंग आहेत."

"बाकी सारं दिलं ?"

"रुपयांची थैली तिच्याजवळ देऊ नका. मुलाजवळ द्या."

"हो."

"वाटभर पुरेल एवढे खायला ?"

"त्यापेक्षा जास्त आहे."

साऊचा मुलगा आला. बैलगाडी होती. साऊ निघाली. गोपाळानं साऊला नमस्कार केला.

"शंभरावर ईस वर्सं जग रे माज्या राजा," असं म्हणून साऊनं आपले दोन्ही

हात त्याच्या गोजिऱ्या मुखावरून फिरवले आणि ती म्हणाली, "अगदी बापाची सय करून देतो पोरगा."

साऊ उंबऱ्यावर आली आणि थांबली.

"काय झालं साऊ ?" रामशास्त्र्यांनी विचारलं.

"धनी, जानकीबायची आणि बाळाची सय आली." असं म्हणून साऊनं डोळ्यांना पदर लावला.

उंबऱ्याच्या बाहेर पाऊल पडलं तेव्हा मागं वळून साऊनं काशीबाईंना बोलावलं आणि रुद्ध कंठानं साऊ म्हणाली,

"काशीबाय, धन्यास्नी जप. वीस वर्षं मी त्यांचं अन्न खाल्लंय. धनी नादिष्ट मानूस. खाण्याचीबी आठवण राहात नाय. आन हे बघा आता त्येंच्या जिवाला तरास सुरू झालाय. तुपात भिजवलेली खारकेची पूड आवडती धन्याला. मी बरणीत तयार करून ठेवलीय. रोज सकाळच्याला देत जा."

असं सांगून साऊ बाहेर पडली. परत फिरली. घरात आली आणि माजघरातल्या एका अंधाऱ्या कोनाड्यातून एक जुनाट चौकोनी शिसवीची पेटी बाहेर काढली. तिनं काशीबाईला जवळ बोलावलं अन् ती म्हणाली,

"काशीबाय, ह्ये ठेव. मोठ्याघरचं धन हाय. मी विसरूनच जायची."

"काय आहे साऊ त्यात ?"

"मोत्याच्या कंगण्या."

"त्या कुठल्या ?"

"सतीचा परसाद."

"म्हणजे ?"

"मी सांगतो," रामशास्त्री म्हणाले. "श्रीमंत रमाबाईसाहेबांनी तुमच्या सवतीला– जानकीला– सती जाण्यापूर्वी प्रसाद म्हणून दिल्या होत्या; पण साऊ, त्या तुझ्याजवळ कशा ?"

"बाईसायबांनीच शेवटी माज्यापाशी दिल्या. म्हणाल्या, 'तुझ्या नव्या धनिणीला घाल,' मी त्या दिवशी या पेटीत ठेवून दिल्या अन् तुमाला द्यायचं विसरले. बाई सती पतिवरतेचे दागिने हायत."

असं म्हणून साऊ बाहेर पडली.

त्या मोत्याच्या कंगण्या शिसवी पेटीतून डोकावत होत्या आणि

रामशास्त्र्यांना आणि काशीबाईंना तिथं रमाबाई-जानकीबाई दिसत होत्या.

* * *

"ऐकलंत का ?"

"काय ?"

"आता काम जरा कमी करावं. अलीकडे तुम्हाला थकवा फार येतो."

"थकव्याची चिंता आणि शरीराचे कोड करून चालणार नाही. आता तर जबाबदारी वाढली. श्रीमंत सवाई माधवरावांच्या नावानं बारभाई कारभार करीत होते. आता श्रीमंतांना कळू लागलं; पण अजून अपरिपक्व अवस्थेत आहेत. आमच्यासारख्यांनी आताच डोळ्यांत तेल घालून वागायला हवं."

"पण अगदी अंथरुणावर पडेपर्यंत शिरावर ओझं घ्यायचं कशाला ?"

"ते ओझं नाही हो. आम्ही आपणहून पत्करलेलं व्रत आहे."

"व्रत करता-करता वात जळून जायची."

"गेली तरी व्रत उरलं पाहिजे."

"गोपाळच्या लग्नाचं विचारताहेत आप्तस्वकीय."

"उरकून घेऊ. तुम्हालाही सुनमुख लवकर बघायला मिळेल."

"जसं काही माझ्यासाठीच लग्न करायच आहे त्याचं."

"त्याचं लग्न त्याच्यासाठीच."

"पार्वतीच काय ?"

"ती अजून पोर आहे. तिचं पाहता येईल पुढं. गोपाळचं करू."

रामशास्त्री आणि काशीबाई बोलत होते. शेजारी चार वर्षांची पार्वती आई-वडिलांचं बोलणं कळत नसलं तरी कळल्यासारखं ऐकत होती. एवढ्यात अंगणातून गोपाळ धावत आला आणि पटकन् आईच्या मांडीवर बसला.

"अरे आता नऊ वर्षांचा मुलगा तू. लहान का ? मांडीवर काय बसतोस ?" रामशास्त्री म्हणाले आणि त्यांनी पाहिलं, गोपाळच्या डाव्या हातावरील मनगटावर रुपयाएवढा डाग होता.

"हे काय झालं ?"

"भाजलं."

"कसं ?"

"काल चुलीतला निखारा काढून घेतलान हातावर. तो घरंगळला

मनगटावर."

"गोपाळ, पुन्हा नको असलं अघोचर करू."

"पाठशाळेतही वेळेवर जात नाही."

"भोग आपला."

"सुधारेल ?"

"आशा करू या."

"पडा आता जरा. आज तुळशीचं बी शिजवून देत्ये. घ्या."

* * *

आश्विन उजाडला होता. चावरी थंडी अंगाला झोंबत होती. चातुर्मासाचे शेवटचे दिवस आले होते. सरत्या आश्विनात शेतं बहरली होती. देवळादेवळांतून पहाटेला काकड-आरत्या होत होत्या आणि रामशास्त्री प्रभुणे अंथरुणाला खिळले होते.

शरीर आता खंगलं होतं. काम करण्यास ते आता कुरकुरू लागलं. विजयादशमीला दरबारचा मोठा उत्सव ! पण त्यालाही रामशास्त्र्यांना जाता आलं नाही.

मनात आलं एकदा माहुलीला जाऊन यावं. त्या मातीचा वास घेऊन यावा. कृष्णेच्या पाण्यात डुंबून यावं, घाटावरल्या वाळूत लोळून यावं. सांबाच्या पिंडीला घागरीनं आंघोळ घालावी. देशमुखाच्या शेतात ओळीच्या आंब्याखाली गारव्याला बसावं, कारण झाडावर चढून आंबा तर आता काढता येणार नाही, की डहाळी तोडता येणार नाही.

काका-काकूंच्या आता फक्त आठवणी होत्या. आते तर स्मृतिकोशात केव्हाच जाऊन बसली होती. शंकरशास्त्री, अप्पाशास्त्री ही माणसं आता चेहऱ्यानंही कुणाला आठवणार नव्हती... रामशास्त्र्यांना पुन्हा एकदा त्या जगात जायचं होतं. तिथला गंध मनसोक्त लुटायचा होता; पण वैद्यबुवांनी सांगितलं, 'या अवस्थेत प्रवास झेपणार नाही.' मनानंच माहुलीचा प्रवास केला.

जहागीरदारांचा पुतण्या आठवला, जहागीरदार आठवले, मावशी आठवल्या, सावकार अनगळ आठवले, नानासाहेबांच्या कानातील ती भिकबाळी आठवली आणि नंतर गालावर मिळालेला प्रसाद !

अवचितपणे रामशास्त्र्यांचा हात कानाकडे गेला. सुवर्णात मोती गुंफलेली

ती मानाची भिकबाळी कानात होती. निश्चयानं विजयश्री संपादन केल्याची ती खूण होती. विद्वत्तेची साक्ष होती, पांडित्याचं प्रेमभरानं केलेलं कौतुक होतं.

जीवनातील महान परिवर्तनाचं ते चिन्ह होतं.

"गोपाळ कुठाय ?" क्षीण आवाजात रामशास्त्र्यांनी विचारलं.

"वाड्यात तर नाही ?" काशीबाई उत्तरल्या.

"संध्या नाही केलीन् आज."

"मी करायला लावते त्याला. आपण चिंता नका करू उगाच. आजारपणी काळज्या जास्त पोखरतात माणसाला."

"मला आजार आहे ?"

"नाही ? मग जा पर्वतीवर," काशीबाई हसून म्हणाल्या.

"आवश्यकता वाटलीच तर जाईनसुद्धा. पायांनी नाही नेलं तरी जाईन. आहो, मागं पानिपतानंतर पर्वतीवर भाऊच्या तोतयाची तपासणी झाली. तेव्हा तर मुठेच्या वाळवंटात माझा पाय मुरगळला होता; पण एकटा, काठीच्या आधाराविना पर्वतीवर गेलो. डोली नाही, पाल नाही. पाय दुखला थोडा, पण कार्य ाधलं."

"आपण कितीही उंचीवर, कशाही अवस्थेत, कुणाही समोर जाल. माझी खात्री आहे. न्यायाचं काम म्हटलं की अगदी इंद्रासमोर जाऊन उभे राहाल आणि म्हणाल, काय सेवा करू ?"

"काशी, माझं आयुष्य मी निर्धारानं बदललं. बहकलेलं, बुडणारं तारू स्वतःच वादळाशी टकरा घेत, समुद्रावर विजय मिळवून किनाऱ्याला लागावं तसं मी केलंय. मला आता चिंता आहे ती गोपाळची."

"गोपाळचंही तसंच होईल."

"झालेलं मला याची देही याचि डोळा बघायचंय."

"मिळेल. मिळणार आहे."

"मला वाटत नाही काशी. मला आतून संदेश मिळत असतो सतत की, रामशास्त्री, आता तू फार दिवसांचा सोबती नाहीस. तुझं. . . कार्य संपलंय. जागा रिकामी कर."

"तिन्हीसांजेला असलं बोलू नये."

"दिवसाच्या तिन्हीसांजेला आयुष्याच्या तिन्हीसांजेच्या गोष्टी करणं

यासारखं औचित्य नाही, जानकी." (त्यांना पहिलीची आठवण झाली.)

"आपण असंच बोलणार असाल, तर मला तरी बोलणं बंद केलं पाहिजे."

"पार्वती कुठाय ?"

"बोकिलांच्या घरी नेलीय तिला त्यांच्या रखमाजीनं खेळायला."

"उद्या नाना येणार आहेत. सकाळीच. शागीर्द आला होता ना ?"

"हो. समाचाराला येणाराहेत सांगून गेला."

दुसऱ्या दिवशी सकाळी नानांची पालखी प्रभुण्यांच्या वाड्यासमोर थांबली आणि नाना फडणीस आत आले.

रामशास्त्री गादीवरच उठून बसले आणि लोडाचा आधार घेऊन नानांशी बोलू लागले.

"तबियत बरी आहे ना आता ?"

"चांगलीच आहे; पण जीवच कंटाळलाय या शरीरात राहायला."

"अजून पेशवाईला तुमच्यासारख्यांची फार आवश्यकता आहे."

"पेशवाईला म्हणजे कुणाला ? नाना, आपणाला. आणखी कोणास आहे ?"

"शास्त्रीबुवा, तुम्ही मोठ्या इभ्रतीनं हे आसन सांभाळलं, आता ते होणं नाही. तुमच्यासारखा न्यायाधीश आता आम्हाला परमेश्वराकडेच मागावा लागेल."

"शास्त्रीबुवा, आपल्या पश्चात आपल्या चिरंजिवांची काही व्यवस्था ?"

"व्यवस्था ? ती काय आम्ही करणे ?"

"शास्त्रीबुवा, श्रीमंतांनी त्यास काही द्यावं अशी इच्छा असल्यास सांगा."

रामशास्त्री बराच वेळ केवळ आढ्याकडे पाहत होते. कुणीच बोललं नाही. नानांना वाटलं हा विषय आपण उकरायला नको होता.

"नाना, माझा पुत्र अविद्वान आणि मूर्ख आहे."

"शास्त्रीबुवा, अवखळ आहे एवढंच म्हणा. वयानुरूप त्यास शहाणपण प्राप्त होईल."

"ते होईल तेव्हा होवो. सद्यःस्थितीत तो असाच आहे."

"तरीही सांगा, श्रीमंतांनी त्यास काय द्यावं ?"

"नाना, त्यास काही योग्यता यावी असं तुम्हास वाटत असल्यास श्रीमंतांची धोतरं धुण्यास सांगावं."

"शास्त्रीबुवा !"

"होय नाना."

"शास्त्रीबुवा, न्यायासनावर जितके कठोर तितकेच तुम्ही या शय्यासनावरही कठोर ?"

"तो आमचा स्वभावच आहे, नाना. आता आमच्याबरोबरच तो नष्ट व्हायचा."

"शास्त्रीबुवा, मी गोपाळची व्यवस्था दप्तरातून करतो," असं सांगून नाना निघून गेले."

* * *

कार्तिक उजाडला. सृष्टीला फुटलेले धुमारे आता हिरवेगार आणि टवटवीत झाले होते. वातावरण मन प्रसन्न करणारं होतं; पण... प्रभुण्यांच्या वाड्यात उदास अवकळा होती. पेशवे अस्वस्थ होते. कारभारी कचेरीवर नव्हते.

प्रभुण्यांच्या वाड्याकडे रीघ लागली होती. शनिवार पेठेच्या बाजूनं किती तरी पालख्या धावत होत्या. कबुतरखान्याला आज माणसांनी वेढून टाकलं होतं.

कार्तिक शुद्ध त्रयोदशीसह चतुर्थी होती.

काशीबाईचं कुंकू पुसायला यमदूत उभे होते.

गोपाळ आणि पार्वतीला पोरकं करायला ते सज्ज होते. माहुलीच्या महामानवाला न्यायला ते सिद्ध झाले होते.

रामशास्त्र्यांना धाप लागली होती. श्वासोच्छ्वास जोरानं होत होता. अंथरुणावर अंतसमय दिसू लागला होता; पण चेहऱ्यावर भावनेचा, भीतीचा, करुणेचा लवलेश नव्हता. जे न्यायासनावर तेच इथं.

काशीबाईंनी डोकं मांडीवर घेतलं होतं. गोपाळ दिङ्मूढ होऊन उभा होता. लहानगी पार्वती पायाच्या अंगठ्याशी खेळत होती. नाना, बापू, पेठे, पटवर्धन, खाजगीवाले, शिंदे, घोरपडे, रास्ते वाड्याच्या अंगणात होते. नाना जवळ होते. न्यायाधीशाला निरोप द्यायला कारभारी निकट होता.

घटिका भरली.

देवघरातील निरांजनाची वात फडफडली.

आभाळात झाकोळून आलं.

ज्योत फडफडली आणि विझली ! हवेत विरळ धूर. प्रभुण्यांच्या वाड्यात आकान्त !

हेरंब महालातील न्यायासन गदगदलं. शनिवारवाड्याचे चिरे सद्गदित झाले. माहुलीची हवा कुंद झाली.

बापूच कुठं दिसत नव्हते. ते आले.

"बापू, मधेच कुठं गेलात तुम्ही ?" नानांनी विचारलं.

"चंदनाच्या मोळ्या आणि घृत याची व्यवस्था करून आलो."

"चंदनाच्या मोळ्या ? का ?"

"नाना, हयातभर शास्त्रीबुवा आणि आम्ही कधी स्नेहानं वागलोच नाही. राजकारणात त्यांचं आमचं कधी जमलंच नाही; पण माणसाची इभ्रत मोठी हे आम्हाला कबूल करायला हवं. मरणान्तानि वैराणि. नाना, शास्त्रीबुवांना आम्ही डोंगराएवढं देऊ केलं, त्यांनी गोणीभरसुद्धा कधी घेतलं नाही. निःस्पृहस्य तृणं जगत् । आता मृत्यूनंतर तरी त्यांना काही देऊ द्या. त्यांच्यासारखीच सुगंधी जळणारी, स्वतः जळून दुसऱ्याला गंध देणारी चंदनकाष्ठे ! म्हणून गेलो होतो नाना," बापूंनी शेल्यानं डोळे टिपले.

* * *

"आता रामशास्त्र्यासारख्या न्यायाधीश मिळणे नाही."

"पेशव्यांनी दोन हजार रुपये उत्तरकार्यास दिले. गोपाळला सदरेस वस्त्रं दिली."

"गोपाळची तैनातही पेशव्यांनी चालू ठेवली म्हणे."

"ठेवलीच पाहिजे."

"आणखी एक आश्चर्य ! कळलं का ?"

"काय ?"

"गोपाळ अस्थी गोळा करायला गेला होता ना तर. ."

"तर काय ?"

"रामशास्त्र्यांच्या कानातली भिकबाळी जशीच्या तशी सापडली."

"पतिव्रतेची सौभाग्यलेणी सापडतात तशी ?"

"हो, तशीच. चुकून कानात राहिली होती म्हणे. तेवढीसुद्धा बरोबर नेली नाही."

"निःस्पृहस्य तृणं जगत् ।"

¤

## रवीन्द्र भट यांची ग्रंथसंपदा

इंद्रायणीकाठी

*संत श्री ज्ञानेश्वरांच्या अभूतपूर्व जीवनाची गाथा.*

❊

घास घेई पांडुरंगा

*भक्तशिरोमणी संत श्री नामदेवांच्या जीवनाची भक्तीकथा.*

❊

भेदीले सूर्यमंडळा

*श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवनावरील रसाळ कादंबरी.*

❊

सागरा प्राण तळमळला

*स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरील रोमहर्षक कादंबरी.*

❊

सत्यं शिवं सुंदरं

*श्री स्वामी विवेकानंदांच्या जीवनावरील कादंबरी.*

❊

**इंद्रायणी साहित्य**

२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

कठोर कर्तव्यनिष्ठ, निःस्पृह जीवनशैली आणि समतोल निर्णायक न्यायदृष्टी ही त्रिदल वैशिष्ट्ये असणाऱ्या रामशास्त्री प्रभुणे यांची ही चरित्रकहाणी म्हणजेच ही *'निःस्पृह'* कादंबरी.

सिंहासनस्थ सत्ताधीश असो की महत्त्वाची मातबर व्यक्ती असो, न्यायासनापुढे सारेच समान असतात हे रामशास्त्री प्रभुणे यांनी पेशवाईच्या निःस्पृह न्यायासनावरून निर्देशित केले. पापाला क्षमा नाही. गुन्ह्याला माफी नाही, निर्णयाला विलंब नाही, याची प्रचिती म्हणजे रामशास्त्री प्रभुणे यांचा न्याय!

प्रसिद्ध साहित्यिक *न. म. जोशी* यांनी शब्दांकित केलेली *'निःस्पृह'* वाचकांच्या हाती देताना *'इंद्रायणी साहित्य'* या आमच्या प्रकाशनसंस्थेस सानंद अभिमान वाटत आहे.

...

५०

भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव

कव्हर छपाई 'विनायक आर्टस'